दक्षिणाप्राइझ कमिटीकडून हें पुस्तक प…
बक्षीस मिळालें आहे.

स्त्रियांची योग्यता व त्यांचीं कर्तव्यें.

भाग १.

लेखक — शंकर गोपाळ देशमुख.
शिक्षक, गरुड हायस्कूल, धुळें.

मुंबई.
"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

किंमत १० आणे.

दक्षिणाप्राइझ् कमिटीला हें पुस्तक पसंत पडून यास
बक्षिस मिळालें आहे.

स्त्रियांची योग्यता
व
त्यांची कर्तव्यें.

भाग ३.

लेखकः—

शंकर गोपाळ देशमुख.

शिक्षक, गरूड हायस्कूल, धुळें.

मुंबई.

" तत्त्वविवेचक " छापखान्यांत छापिलें.

किंमत १० आणे.

ज्या पुस्तकांच्या आधारानें हें पुस्तक लिहिलें त्यांचीं नांवें.

1. Woman's Worth and Work.
2. Todd's History of Rajasthan.
3. Sketch Book.
4. Character.
5. Heroines of Ind.

अभिप्राय.

श्री.

सा. न. वि. वि.

आपण लिहिलेल्या 'स्त्रियांची योग्यता व त्यांचीं कर्तव्यें' या पुस्तकांतील विषय फार महत्वाचा असून तितकाच उपयुक्तही आहे. त्यांतील विचार उदात्त असून उत्कृष्ट व मनोवेधक रीतीनें प्रदर्शित केले आहेत. यांत दाखल केलेलीं उदाहरणेंही त्या त्या प्रसंगास साजेशीं असून बोधप्रद आहेत. हें पुस्तक स्त्रियांनीं मननपूर्वक वाचिलें असतां स्वतःची सुधारणा करण्यास हें चांगलें साधनीभूत होऊन यापासून त्यांना योग्य मदत मिळेल यांत शंका नाहीं. एकंदरींत, महाराष्ट्रांतील प्रत्येक कुटुंबवत्सल माणसाच्या संग्रहीं ठेवण्यासारखें हें पुस्तक आहे असें मला वाटतें.

DHULIA,
18th March 1909.

R. P. GODABOLE,
Head Master,
G. H. School.

श्री

सा. न. वि. वि. आपण मजकडे आपलें 'स्त्रियांची योग्यता व त्यांचीं कर्तव्यें' हें पुस्तक वाचावयास दिलें, तें मी लक्षपूर्वक समग्र वाचून पाहिलें. पुस्तक खरोखर सर्वप्रकारें संग्रहणीय झालें आहे. ज्यांच्याकरितां आपण इतके श्रम करून तें लिहिलें आहे, त्या प्रत्येक व्यक्तीनें हें जवळ ठेवून त्यांतील उदात्त स्पृहणीय उदाहरणें वाचून तदनुसार वर्तन ठेविल्यास आपल्या श्रमाचें दरेंच चीज होईल, यांत

संशय नाहीं. पुस्तकाची भाषा सरळ, साधी व मनोवेधक झाली आहे. आंपण इतर देशांतील व्यक्तींचीं जीं उदाहरणें गोविलीं आहेत, तीं यथार्थ व प्रसंगास साजतील अशींच आहेत. एकंदरींत स्त्रियांनींच नव्हे, तर प्रत्येक संसारी पुरुषानें सुद्धां हें पुस्तक संग्रहीं ठेवून वाचल्यास त्यास वारंवार येणाऱ्या अडचणी बऱ्याच अंशीं दूर करितां येतील व आपल्या समागमास राहणाऱ्या स्त्रियांशीं कसें वर्तन ठेवावें हें त्यास चांगलें समजेल कळावें लोभ असावा हे विनंती.

DHULIA
14-3-1909

M. S. APTE
Head Master,
Training School.

प्रस्तावना.

कुलीन स्त्रिया व तरुण मुली यांच्या मनाची सुधारणा होत जावी आणि त्यांच्या बुद्धीचा विकास होऊन तिला प्रगल्भ स्वरूप प्राप्त व्हावें; आपलीं कर्तव्यें कोणतीं आहेत, तीं आपणास कशीं नीट बजावितां येतील व त्यांसंबंधीं आपली जबाबदारी कोणती व किती मोठी आहे, हें त्यांच्या ध्यानांत स्पष्टपणें यावें; तसेंच, त्या कर्तव्यांसंबंधानें आपली जबाबदारी ओळखून त्याप्रमाणें त्यांनीं आपलें वर्तन सतत ठेवावें; ह्या व अशाच इतर प्रकारच्या गोष्टी आपल्या समाजाच्या सध्यांच्या स्थितींत अत्यंत इष्ट आहेत. असें होत गेलें तरच समाजांतील सुज्ञ व विचारी लोकांच्या मानास त्या पात्र होतील असें मला वाटतें. तेव्हां या बाबतींत त्यांस कांहीं मदत करितां आली तर पहावी या हेतूनें हे तीन निबंध लिहिण्याचा मीं यथामति यत्न केला आहे. यापासून इष्टकार्य कितपत् तडीस जातें, हें पहावयाचें आहे.

वर निर्दिष्ट केलेले हेतु साधण्याकरितां स्त्रियांनीं कोणत्या दिशेनें यत्न करावा; **माता, पत्नी, कुमारी व भगिनी** या नात्यानें त्या त्या स्थितींतलीं आपापलीं कामें, आपल्या सात्त्विक व कोमल वृत्तींस धक्का न पोहोंचवितां मनाची योग्य भावना कायम ठेवून त्यांस कशीं तडीस नेतां येतील हें दाखविण्याचा अल्प यत्न ह्या निबंधांत मीं केला आहे.

स्त्रियांस मिळणाऱ्या शिक्षणांत ज्या मानानें जोम असेल, त्या मानानें व तितक्या उच्च प्रकारचीं कामें हातीं घेऊन तीं तडीस नेण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येण्याचा संभव आहे. असें शिक्षण म्हटलें म्हणजे मनास व अंतःकरणास मिळणारें शिक्षण होय. ह्या प्रकारचें शिक्षण त्यांस मिळत गेलें तरच स्वहितनिरपेक्षा व आत्मसंयमन

वगैरे थोर गुण त्यांच्या अंगीं येण्याचा संभव आहे अशी माझी समजूत आहे. स्त्रियांमध्यें मानसिक व नीतिविषयक शिक्षणाचा प्रसार व्हावा ही अत्यंत इष्ट गोष्ट आहे. तथापि, पुरुष जें काय करितात, तें सर्व आपणास करितां येईल, या भरीस पडून त्यांनीं आपल्या नैसर्गिक कोमल वृत्तींस कमीपणा आणावा असें माझें म्हणणें नाहीं. त्यांच्या कर्तव्याचें मुख्यस्थान 'गृह' होय. परमेश्वरानें जी कांहीं बुद्धीची देणगी त्यांस दिली आहे, तिचा विकास यथामति व यथाशक्ति करून ज्यांच्यांशीं आपला संबंध येईल, त्यांच्या संबंधानें आपलें खरें कर्तव्य ओळखून तें उत्तम प्रकारें बजावण्याचें सामर्थ्य त्यांनीं अंगीं आणावें; आणि तें चोखरीतीनें पार पाडून आपणांस इहपरलोकीं धन्य म्हणवून घ्यावें. इतकें साधण्याचा यत्न यथाशक्ति त्यांजकडून होत गेला म्हणजे त्यांनीं आपलें पवित्र कर्तव्य बजाविलें असें म्हणण्यास चिंता नाहीं. एका मार्मिक ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं, 'सद्गुण सद्धर्म व सदाचरण यांजकडे वर्तनाचा रोख ठेवून आपला स्वभाव व आपलें अंतःकरण जेणेंकरून सुधारत जाईल अशा गोष्टींकडे मनाचा लय लावणें, हें आपलें मुख्य कर्तव्य होय.' हें तत्त्व त्यांच्या मनावर बिंबून त्याची झाक त्यांच्या एकंदर वर्तनांत दृग्गोचर झाली पाहिजे.

या पुस्तकाचे **माता व पत्नी** हे दोन भाग लिहून झाल्यावर ते विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झाले. कांहीं मित्रमंडळीस ते पसंत पडल्यामुळें तिसरा भाग **कुमारी** हा लिहावा अशा आशयाच्या सूचना कांहीं मंडळीकडून आल्या व त्याप्रमाणें मीं आरंभही केला. परंतु ह्या जगाच्या राहटींत सर्वच गोष्टी मनासारख्या कोठें घडतात? संसारांत नानाप्रकारचीं संकटें येतात. त्यांपैकींच एक बिकट संकट मजवर गुजरल्यामुळें माझ्या मनाची हुशारी पार लयास गेली. निराशेनें मला पूर्ण ग्रासलें.

लिहिण्यावाचण्यासारख्या व्यवसायाला मनाचें जें एका प्रकारचें स्थैर्य लागतें, तें अगदीं नाहींसें झाल्यामुळें अर्थात्च तिसरा भाग लिहिण्यास मनाची एकाग्रता होईना. अशी मनाची स्थिति असतांना पहिल्या दोन भागाचीं छापील मजकुराचीं पत्रें कोणी तरी छापखान्याचा मालक पुस्तक रूपानें छापण्यास तयार होईल तर पहावें, या हेतूनें मुंबईस माझे सन्माननीय मित्र—**रा. सा. गणेश जनार्दन आगाशे** बी. ए. यांजकडे रवाना केलीं. त्या सद्गृहस्थास माझ्या मनाची स्थिति अवगत असल्यामुळें तिसरा भाग लिहून काढीपर्यंत हीं पत्रें मी कोणाकडेही द्यावयाचा नाहीं असें मला त्यांनीं कळविलें. आणि जेणेंकरून तिसरा भाग लिहिण्यास मी उद्युक्त होईन असें उत्तेजनपर पत्र मला लिहिलें. या बद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. त्यामुळें हा तिसरा भाग लिहिण्याचें मनांत आलें व निराश झालेल्या माझ्या मनास कसा तरी धीर आणून हें काम कसेंबसें मीं शेवटास नेलें. यांत कांहीं ग्राह्यांश असेल तर त्याचें सर्व श्रेय त्या सदगृहस्थास दिलें पाहिजे.

एकंदरींत तरुण मुलींना या निबंधांपासून कांहीं बोध घेतां येऊन त्यांस आपलें कर्तव्य बजावण्याच्या कामांत उत्तेजन आलें व अल्पांशानें तरी त्यांस मदत झाली; तसेंच, पोक्त स्त्रियांना विचार करण्यास हें पुस्तक साधनीभूत होऊन आपल्या कर्तव्याबद्दल उच्च कल्पना त्यांच्या मनांत आली व तदनुसार वर्तन ठेवण्याची त्यांना स्फूर्ति झाली तर या माझ्या अल्प यत्नाचा कांहीं तरी उपयोग झाला असें मी समजेन.

सरते शेवटीं हें पुस्तक लिहीत असतां ज्या आणखीं कांहीं सद्गृहस्थांनीं मित्रभावानें मला उपयुक्त सूचना केल्या त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून ही अल्पसेवा वाचकांपुढें ठेवून त्यांची रजा घेतों.

धुळें,
पश्चिम खानदेश. } **शं. गो. दे.**

अनुक्रमणिका.

भाग १ ला.

माता.

भाग २ रा.

पत्नी.

भाग ३ रा.

कुमारी.

मत–**भगिनी** या नात्यानें स्त्रियांची योग्यता–त्यांची कर्तव्यें–बंधु भगिनींचें परस्पर प्रेम–बहिणींचा भावाकडे लळा–हतभागी बहिणी–त्या बंधु सेवेला देह कसा अर्पण करितात–मानलेल्या बहिणीवरील प्रेमाचें स्वरूप–**सुभद्रा–द्रौपदी** यांच्या कथा.

मेवाडची राणी **कर्णावती–हुमायून** इला बहीण समजून तिचा पाठीराखा होतो–**हुमायूना**चे वंशजांनीं **चित्तोर**च्या राण्यांस बहिणीप्रमाणें मानलें–**कर्नल टॉड, उदेपूर, बुंदी,** व **कोटा** येथील राण्या-**चंदबाई-हिंगणे** घराण्यांतील गोष्ट-सतत परिश्रम–**आनंदीबाई जोशी–लीलावती–गार्गी**–विचारवंत माणसांचें कुटुंब-ज्ञानार्जनामुळें होणारे आनंद व येणारा सुखानुभव–अशा आनंदांत गर्क होणाऱ्या चाणाक्ष कुटुंबाचें वर्णन–सहनशीलता–या गुणाचें महत्त्व–त्याच्या अभावीं होणारे परिणाम–क्षुल्लक गोष्टींमुळें मनास व्यर्थ त्रास होतो, तो न होऊं देण्याची संवय व त्यास उपाय–गंभीरता–आत्मसंयमन–कुमारीनें अंगीं आणण्यासारखे इतर गुण–वाचन–कसें वाचावें याबद्दल सूचना–**लॉकी** नामक ग्रंथकाराचें मत–सभ्यता–कुलीनता–कुलीन माणसांचीं लक्षणें–सौजन्याचा महिमा–**इमरसन**चें वचन–मर्मच्छेद करणारें भाषण व त्यापासून होणारे दुष्परिणाम–मानसिक धैर्य–**सावित्री**ची गोष्ट–राजघराण्यांतील कुलवती स्त्रियांचे पराक्रम–लहान सहान कामांची योग्यता तशा प्रकारच्या कामांवर नसते–ती पार पाडण्याच्या रीतीवर अवलंबून असते.–आयुष्यांतील काल सुखकर कसा होईल. १३०–१६०

स्त्रियांची योग्यता व त्यांचीं कर्तव्यें.

भाग १ ला.

माता.

यं मातापितरौ क्लेशं सहेते संभवे नृणाम्।
न तस्य निष्कृतिः शक्या कर्तुं वर्षशतैरपि ॥

मनुः.

आई व तिचें मूलः—आईनें आपलें मूल मांडीवर घेतलें आहे व ती त्यास पाजीत आहे, असें चित्र काढून जर त्याकडे आपण पहात बसलों, तर आपल्या तोंडांतून काय उद्गार निघतील बरें? 'अहाहा! हें चित्र किती तरी मनोहर आहे! यापेक्षां ज्यास्त प्रेक्षणीय व ज्यास्त मनोवेधक दुसरें चित्र सांपडेल काय?' पहिलेंच मूल मांडीवर घेऊन आई त्यास स्तनपान देत आहे, हें पाहून ज्याचें अंतःकरण द्रवत नाहीं, तो खरोखर सात्विक वृत्तीचा मनुष्य नसला पाहिजे. त्याला मनुष्य म्हणणें योग्य नाहीं. आजपर्यंत जगांत जे मोठे नामांकित चित्रकार होऊन गेले, त्यांनीं आई व तिचें स्तनपान करणारें अर्भक, या हृदयास पाझर फोडणाऱ्या पण साध्या देखाव्याचें हुबेहुब चित्र काढण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु त्यांतली खरी खुबी त्यांस न साधल्यामुळें ते निराश झाले आहेत. चित्रकारां-

मध्यें अति विख्यात जो **राफेल**—ज्याला हव्या त्या देखाव्याची खुबी हुबेहुब उतरण्याची परमेश्वरानें जणूं काय देणगीच दिली होती, तो या साध्या गोष्टीचें हुबेहुब स्वरूप वठविण्याचा कित्येक वर्षें सारखा यत्न करीत होता; पण त्याच्या हातून मनाप्रमाणें तें वठलेंच नाहीं. गोष्ट पाहिली तर दररोजच्या पाहण्यांतली, अगदीं साधी; तरी मोठमोठे कलमबहादर चित्रकार मोठ्या चातुर्यानें ती चित्रांत उतरण्याचा प्रयत्न करितात, तरी मूळ गोष्टींतली खुबी उतरत नाहीं ती नाहींच!

सर्व भाषांमध्यें **आई** या अर्थाचा शब्द किती गोड व आनंदकारक आहे! मुलांस बोलतां येण्यापूर्वीं तीं प्रथम '**आई**' हा शब्द उच्चारूं लागतात. तसेंच आपणास कांहीं ठेंच लागली, हात कापला, किंवा एकदम कांहीं जखम झाली किंवा वेदना होऊं लागली तर आरंभीं **आई** हाच शब्द तोंडीं येतो. या शब्दांत कांहीं विलक्षण प्रेम आहे. तसेंच अपत्याबद्दलचें आईस वाटणारें प्रेमही अमर्याद व अहेतुक असतें. त्याच्यावर तिची जशी भक्ति असते, तशी कोणाची कशावरही विरळाच. 'कळवळ्याची जाती, करी लाभाविणें प्रीती' ही उक्ति अपत्यांबद्दलच्या आईच्या वर्तनास किती बरोबर लागूं पडते! मूल होईपर्यंत कोणत्याही स्त्रीच्या स्वभावाची खरी परीक्षा होत नाहीं. मूल झाल्यानंतर तिच्या स्वभावांत पोक्तपणा येऊन, जे गुण तिच्या अंगीं आहेत असें कोणासही पूर्वीं वाटत नव्हते, तेच गुण स्वाभाविकपणें तिजमध्यें दिसूं लागतात. तिचा पोर-

कटपणा जाऊन तिच्या अंगीं भारदस्तपणा येऊं लागतो व तिचा भेकडपणा नाहींसा होऊन तिच्या अंगीं धैर्य येतें. अपत्या-बद्दल वाटणारें प्रेम, अपत्यसंगोपनास लागणारी सहनशीलता व शांति, इत्यादि निरनिराळ्या गुणांचा प्रादुर्भाव तिजमध्यें दिवसेंदिवस ज्यास्त दिसूं लागतो. सारांश, जे गुण आपणांत आहेत अशी कल्पना सुद्धां तिला नसते, ते गुण स्वाभाविकपणें तिच्यांत येऊन तिला भूषणदायक होतात.

अपत्यांविषयींचें आईचें प्रेम व बापाचें प्रेम यांतही फरक असतो. आपला **मुलगा** आपलें नांव चालवील, तो चांगला निघाल्यास आपण प्रख्यातीस येऊं व आपल्या वंशाची कीर्ति होईल, असें बापास वाटत असतें. मुलाच्या अंगीं कांहीं चांगला गुण असल्यास तो आपल्यामुळेंच आहे असेंही बापास वाटूं लागतें; परंतु आईच्या प्रेमाचा प्रकार याहून फारच भिन्न असतो. तिचें प्रेम फारच शुद्ध असतें. केवळ अपत्याकरितांच तें असतें, त्यांत कोणतीही भेसळ नसते. मुलावर तिचें प्रेम प्राणापलीकडे असतें. ती त्याच्या बऱ्याकरितां हवीं तीं संकटें व हाल सोसण्यास आणि त्याची हवी ती कामगिरी बजावण्यास नेहमीं तयार असते. मूल आजारी असतानां त्याच्याजवळ रात्रीच्यारात्री कुरकुर न करितां राहून व स्वतः कितीही श्रम पडले तरी ते मुळींच मनांत न आणितां, ती एकसारखी झटत असते. इतर लोकांनीं त्याच्या बरें होण्याची आशा सोडली, तरी तिला आशा वाटतच असते; त्याच्याबद्दल आतां कांहीं भीति नाहीं

असें जरी दुसऱ्यास वाटलें तरी तिची भीति कायमच असते; त्याला बरें होण्यास जरी फार वेळ लागला तरी कंटाळा न करितां त्याच्यासंबंधानें प्रत्येक प्रकारचें कंटाळवाणें कामसुद्धां फार शांतपणानें व प्रेमानें ती करीत असते. आज कांहीं गुण येईल उद्यां कांहीं तरी बरें वाटेल, असें मनांत आणून सर्व प्रकारचे हाल सोसण्यास ती तयार असते. दुसऱ्या कोणास दुःख होत असतां तिचें अंतःकरण कदाचित् कळवळून जाणार नाहीं; परंतु आपलें मूल त्या स्थितींत आहे असें तिच्या दृष्टीस पडतांच ती त्याच्या दुःखनिरसनार्थ कोणी कांहीं म्हटलें तरी तिकडे लक्ष न देतां मोठ्या उमेदीनें तयार होते व त्याची शुश्रूषा करूं लागते. ऐन संकटाच्या वेळीं सर्वांनीं आपणास सोडिलें, तरी आपली आई आपणास मदत करण्यास आपल्या सन्निध असतेच. आपण एकादी मोठी चुकी केली असतां त्याबद्दल खरोखर वाईट वाटून आपणास ताळ्यावर आणावयाचें असल्यास, कांहीं क्रोध न दाखवितां अंतःकरणापासून वाईट वाटत आहे असें दाखवून, आपणास ताळ्यावर आणण्याचा ती एकसारखा प्रयत्न सुरू ठेविते. आपण तिच्या अंतःकरणांत सदैव वास करितों व ती आपणास कधींही विसरत नाहीं. आईच्या अपत्यप्रेमांत जें विलक्षण मार्दव असतें तें फारच चिरस्थायी असतें. म्हणूनच **रामदास**स्वामीनीं म्हटलें आहे कीं:—' बालक जाणेना मातेसी, तिचें चित्त बाळापाशीं.' तिच्या अंतःकरणांतील एकंदर कोमल वृत्तींमध्यें अपत्यप्रेमाची वृत्ति फारच बलवत्तर असते. आपलपो-

टेपणामुळें या प्रेमांत कधींच अंतर पडावयाचे नाहीं. कसाही धोक्याचा प्रसंग आला तरी हें प्रेम ढळावयाचें नाहीं. अपत्याच्या कमी योग्यतेमुळें तें कमीही व्हावयाचें नाहीं, किंवा कृतघ्नतेमुळें तें ऱ्हासही पावावयाचें नाहीं; अपत्याच्या सोयीसाठीं वाटेल त्या आत्मसुखाचा त्याग करावयास सदा सर्वकाळ आई तयारच असते. त्याच्या सुखासाठीं स्वतःच्या वाटेल त्या आनंदावर पाणी सोडण्यास ती मागें पुढें पाहात नाहीं. त्याची कीर्ति झाली असतां तिला केवढें तरी भूषण वाटतें! त्याचा अभ्युदय झाला असतां तिच्या आनंदास पारावार नाहींसा होतो. 'अपत्यावर एकादें संकट आलें तर तें अपत्य केवळ त्या संकटामुळेंच तिला अधिक प्रिय वाटूं लागतें. त्याची कांहीं कारणामुळें नाचक्की झाली, तरी सुद्धां तिच्या प्रेमांत यत्किंचित् सुद्धां कमीपणा होत नाहीं.' सारांश, 'कुपुत्रो जायते क्वचिदपि कुमाता न भवति–' या उक्तीचें प्रत्यंतर जगाचें बारीक रीतीनें अवलोकन करणारास दररोज दिसण्यासारखें आहे; असो.

घरगुती कामांत सुद्धां सुज्ञ आई जर पाहणारीसवरणारी असली, तर परिणाम फारच चांगला होतो. तिच्यायोगानें घराला शोभा येते व त्याचें सौंदर्य वाढतें. तिच्या कर्तबगारीनें तें विश्रांतिस्थान बनतें. सर्व प्रकारचा नीटनेटकेपणा राखून सर्व व्यवस्था करण्याची हातोटी तिला साधलेली असते. घरांत चिरकाल शांतता राहण्याकरितां जें चांगलें वळण सर्वांस लागणें

इष्ट आहे, तें तीच लाविते. तिचें वर्तन प्रेमळ असून भारदस्त-पणाचें असल्यामुळें व स्वार्थत्यागाची ती केवळ मूर्तिच असल्यामुळें घरांतल्या माणसांवर साहजिकपणेंच तिचें वजन बसतें. तिजपुढें व्रात्य मुलें तावडतोब आज्ञाधारक बनतात. त्यांस ताळ्यावर आणण्याकरितां तिला कडक उपाय योजण्याची मुळींच जरूर पडत नाहीं. घरांत सर्वत्र व्यवस्था व स्वच्छता असल्यामुळें पोटापाण्याच्या धंद्यानें श्रमून घरीं आलेल्या घर-धन्याची चित्तवृत्ति शांत होऊन त्याचा थकवा नाहींसा होतो. तिच्या गोड सान्निध्याचा परिणामच असा होतो कीं, सर्व संसारचक्र फार सुरळीत रीतीनें चालूं लागतें. दुर्दैवाचा फेरा येऊन आई घरांतून नाहींशी झाल्यास गृहप्रभा नष्ट झाल्यासारखी होते. प्रभातकाळीं व रात्रीं सृष्टीसौंदर्याची जी मजा दिसते, ती पुन:पुन: त्या त्या वेळीं दिसेल; वसंतऋतु संपतांच त्यांतली बहार नाहींशी झाली तरी हिंवाळा गेल्यावर तो ऋतु परत येतांच ती पुनः आपल्या दृष्टीस व मनास रंजवील; परंतु आई नष्ट झाल्यानें रिती झालेली जागा कशा-नेंही भरून येत नाहीं. कुटुंबांतून आई नाहींशी झाली म्हणजे त्या कुटुंबांत ती असतांना जो अपूर्व आनंद दृष्टीस पडत असे, तो पुनः कधींच दिसून येत नाहीं. हरएक कामासंबंधानें वेळच्यावेळीं सावधगिरी ठेवून त्यास जपणें, सर्वांचें सुखदु:ख जाणणें, ज्यांच्या त्यांच्याकडून योग्य काम घेणें, मुलांबाळांस फारसा कडकपणा न दाखवितां योग्य वेळीं जपून ताळ्यावर आणणें, व एकंदर

संसाराचा गाडा सुरळीत चालू ठेवणें, हीं कामें शाहण्या आई-कडून जशीं चांगलीं होतात, तशीं दुसऱ्या कोणाकडूनही व्हावयाचीं नाहींत. तसेंच ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं न गडबडतां धैर्य धरून प्रसंग पार पाडणें व त्या प्रसंगीं स्वतःला कितीही दुःख झालें तरी तें मनांत न आणणें, वगैरे कामांत लागणारी गंभीरता तिच्या अंगीं असते. अशा प्रसंगीं तिच्या अंगचा धिमेपणा दृष्टीस पडतो व तिची सहनशीलता दिसून येते. ही तिची वृत्ति पाहून सभोंवतालच्या माणसांस सुद्धां काम करण्याचें स्फुरण येतें. सारांश-सारासारविचार, दूरदृष्टी, दक्षता, चातुर्य व स्वार्थत्याग, इत्यादि संसारोपयोगी व थोर गुण आईमध्यें दिसण्यांत येतात. म्हणून 'आईसारखें' दुसरें दैवतच नाहीं असें जें विद्वानांचें वचन आहे, तें अगदीं यथायोग्य आहे.

आजपर्यंत या जगांत मोठमोठे लोक होऊन गेले, त्या बहुतेकांस मोठेपणा केवळ त्यांच्या आयांमुळें प्राप्त झाला, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचें अलौकिक धैर्य, त्यांची नीतिमत्ता, त्यांचें औदार्य वगैरे गुण त्यांच्या अंगीं त्यांच्या आयांपासून आलेले दिसतात. 'सुशीलो मातृपुण्येन' अशा लोकांची मातृभक्तीही त्यांच्या गुणांप्रमाणेंच मोठी असते. महाराष्ट्राचें नांव ज्या तेजस्वी महापुरुषानें गाजविलें व आपल्या अजब शिताफीनें व अनुपम कर्तबगारीनें **औरंगजेबासारख्या** कावेबाज व मसलती बादशहास व **शाईस्तेखानासारख्या** कुरेबाज सरदारांस सुद्धां चकवून तोंडांत बोट घोलावयास

लाविलें, त्या **शिवाजी महाराजांची** मातृभक्ति केवढी होती, हें त्यांचा जीवनवृत्तांत वाचणारास ठाऊक आहेच. अगोदर **दादोजी कोंडदेवाचा** व नंतर **रामदासस्वामींचा** उच्च प्रकारचा बोध ग्रहण करून तदनुसार चोख वर्तन करण्यास **शिवाजी महाराज** तयार झाले, यास तरी सुशील, ईश्वरपरायण व शहाण्या **जिजाबाईचेंच** गृहशिक्षण कारण होय. तसेंच ज्याचे अतुल पराक्रम सर्व जगास विदित झाले आहेत व ज्याचा यशोदुंदुभि **अमेरिकेंत** सारखा दुमदुमत आहे, त्या प्रसिद्ध **जॉर्ज वाशिंग्टनाचें** चरित्र वाचणाऱ्यांची पक्की खात्री होईल कीं, त्या महापुरुषाच्या हातून जें काय झालें, त्या बहुतेकाचें श्रेय त्याच्या मातेलाच दिलें पाहिजे. **जॉर्ज** अकरा वर्षांचा असतां त्याचा बाप निवर्तला, तेव्हां त्या कुटुंबाच्या संसाराचा सर्व बोजा त्याच्या आईवर पडला. ही स्त्री जर कच्च्या हिमतीची असती, तर सर्वच अव्यवस्था होऊन या कुटुंबाची आणि त्यांतील मुलाबाळांची व एकंदर मालमत्तेची दुर्दशा होऊन गेली असती. पण त्या वेळेस मनाचा समतोलपणा राखून या बाईनें मोठ्या धीरानें एकंदर मालमत्तेची नीट व्यवस्था लाविली व मुलाचें संगोपन व्यवस्थित रीतीनें करून त्याचें शिक्षणसुद्धां स्वतःच्या देखरेखीखालीं करविलें. दूरदर्शित्व, प्रामाणिकपणा, करारीपणा वगैरे ज्या गुणांनीं **वाशिंग्टन** कीर्तीच्या शिखरावर चढला व कृतज्ञ लोकांच्या स्तुतीस पात्र झाला, ते गुण केवळ त्याच्या आईनें त्यास लाविलेल्या वळणाचें फल होय. तसेंच **इंग्लंडांत**

पहिल्या चार्लस राजाच्या वेळीं राजा व प्रजा यांच्या दरम्यान बेबनाव होऊन जें भयंकर रण माजलें व ज्याचा शेवट राजाच्या शिरच्छेदानें झाला, त्या आणीबाणीच्या व धामधुमीच्या प्रसंगीं ज्यानें आपली असाधारण कर्तबगारी लोकांस दाखवून त्यांस विस्मित केलें, त्या वीरमणी **क्रॉम्वेलची** हकीकत ऐकावी, तेव्हां त्याच्या बापाचें नांव फारसें ऐकण्यांत न येतां त्याच्या आईचेंच नांव ऐकण्यांत येतें. कोणत्याही प्रसंगीं दुसऱ्याची मदत न घेतां स्वतःच्या पायांवर उभें राहण्याचा या स्त्रीचा बाणा असे. **क्रॉम्वेलची** अढळ धर्मश्रद्धा, त्याचा दृढनिश्चय, त्याचा धिमेपणा व स्वभावाचें स्थैर्य, इत्यादि गुण त्याच्यांत त्याच्या आईकडून आलेले होते. तसेंच **फ्रान्स** देशांत बंडखोरांनीं १६ व्या **लुई** राजाचा वध केल्यावर जी अंदाधुंदी माजली होती, ती हां हां म्हणतां चट् सारी नाहींशी करून ज्यानें देशचे देश पादाक्रांत केले व आपल्या अद्वितीय शौर्यानें सर्व युरोपखंड हालवून सोडिलें, त्या वीरशिरोमणी **नेपोलियन**ची आपल्या आईबद्दलची भक्ति फार मोठी होती व तिची सेवा करण्यास तो नेहमी तयार असे. "माझ्यामध्यें कांहीं चांगुलपणाचा भाग असेल व माझ्या हातून जर कांहीं नांव घेण्यासारखें कृत्य झालें असेल, तर त्या सगळ्यांचें यश माझ्या आईलाच दिलें पाहिजे व त्याबद्दल तिचीच स्तुति केली पाहिजे–" असे उद्गार तो नेहमी आपल्या मित्रांजवळ काढीत असे.

सदर्हूप्रमाणेंच देशचेदेश काबीज करून त्या त्या ठिकाणच्या राजांस ज्यानें पादाक्रांत केलें व शेंकडों–हजारों–प्रांतचे प्रांत

लुटले, जाळिले, उद्वस्त केले आणि स्वपराक्रमानें तिन्ही खंडांत आपलें नांव अजरामर केलें, त्या प्रतापी **शिकंदर बादशहाची** गोष्ट अशीच आहे. अशा प्रकारचीं इतिहासप्रसिद्ध पुष्कळ उदाहरणें देतां येतील. **शिकंदर बादशाहाच्या** आईचा स्वभाव फार जालीम असून ती महत्वाकांक्षी असल्यामुळें तिच्या मुलांस तिजपासून कधीं कधीं बराच त्रास सोसावा लागे. एके प्रसंगीं **शिकंदर बादशाहा** एशिया खंडांत ठिकठिकाणीं स्वाऱ्या करून प्रांतचे प्रांत काबीज करित असतां, त्याचा प्रधान **ॲंटिपेटर** याजकडून त्यास एक पत्र आलें, त्यांत-" आपली आई राज्यप्रकरणीं कामांत सुद्धां ढवळाढवळ करिते व त्यामुळें मला फार त्रास होतो " असें लिहिलें होतें. त्यावर त्या बादशाहाच्या तोंडांतून असे उद्गार बाहेर पडलेः-" माझ्या आईच्या डोळ्यांतून अश्रूचा एक थेंब पडला तर अशीं सहाशें पत्रें पुसून जाऊन तीं व्यर्थ होतील, हें **ॲंटिपेटरला** कळत नाहीं." तात्पर्य, या जगाच्या रंगभूमीवर वर नमूद केल्या-सारखीं जीं अनेक पात्रें येऊन गेलीं, त्यांच्या कृतींत कितीही भिन्नता दिसली, तरी आपल्या आईचे आपण ऋणी आहों, आपल्या अंगीं मोठेपणा असलाच तर तो आपल्या आईमुळें आहे, अशा समजुतीच्या बाबतींत मात्र त्यांचें पूर्ण साम्य दिसतें.

याप्रमाणें आईची थोरवी वर्णावी तितकी थोडीच आहे. तिऱ्हाईत मनुष्यानें एखाद्या मुलास ताळ्यावर आणण्याकरितां दोन दोन तीन तीन तास उपदेश करून कशीही खटपट

केली, तरी जो इष्ट परिणाम घडून येत नाहीं, तोच परिणाम आईच्या दोन चार शब्दांनीं सहज घडून येतो. लहान मुलास शिक्षक बारा महिन्यांत जें शिकवील, तेंच आई मोठ्या प्रेमळ रीतीनें दोन महिन्यांत शिकवील, असा सर्वत्र अनुभव आहे. पण ज्याप्रमाणें सुज्ञ आईपासून होणाऱ्या कल्याणाचें वर्णन करावें तितकें थोडेंच, त्याचप्रमाणें वाईट आईकडून होणाऱ्या दुष्परिणामांचें वर्णन करावें तितकें कमीच होणार आहे. विचारशून्य आळशी, असमंजस अशी आई असल्यामुळें किती मुलांच्या आयुष्याची नासाडी झाली असेल? आपल्या आईच्या अंगीं निश्चय नसल्यामुळें, तिनें आपले फाजील लाड केल्यामळें, तिला सारासार विचार करण्याची संवय नसल्यामुळें, आपणास लागावें तसें वळण लागलें नाहीं व आपली बुद्धि भलत्याच मार्गाकडे लागली असें मनांत येऊन हळहळणारे कितीक तरी असतील!

'लहानपणीं तूं माझ्या मनांत सुनीतीचीं तत्त्वें बिंबवून दिलींस व मजकडून जीं कांहीं आज सत्कृत्यें यथाशक्ति घडत आलीं आहेत, तीं त्याचींच फळें आहेत—असें वारंवार माझ्या मनांत येऊन, तुझे उपकार मजकडून कधींच फिटावयाचे नाहींत असें वाटूं लागतें.' अशा आशयाचें पत्र एका गृहस्थानें आपल्या आईस पाठविलें; तें वाचून तिला किती तरी धन्यता वाटली असेल!

आपलें कर्तव्य—मग तें लहान असो किंवा मोठें असो—उत्तम प्रकारें बजावलें जाऊन त्याचें सुफल आपल्या पाहाण्यांत आलें असतां जें समाधान वाटतें व जो विलक्षण आनंद होतो त्याचें वर्णनच

करितां येत नाहीं. त्यांतली बहार ज्यास त्याचा अनुभव आला असेल त्यासच ठाऊक. उलटपक्षीं, आपणास लहानपणीं कोणत्याही प्रकारचें चांगलें वळण आपल्या आईनें लाविलें नाहीं, आपलें संगोपन व्हावें तसें झालें नाहीं, म्हणून सर्वतोपरि आपण अगदीं हताश झालों अशा अर्थाचे आपल्या अपत्यांकडून निघालेले उद्गार जर एखाद्या आईनें ऐकिले तर तिला काय वाटेल, ह्याची कल्पना वाचकांनींच करावी.

म्याडम् कांपन् नांवाच्या विदुषीबरोबर **नेपोलियन** बादशाहा संभाषण करीत असतां, त्यानें तिला विचारिलें कीं, 'लोकांस यथायोग्य शिक्षण मिळण्याच्या कामांत कोणत्या गोष्टींची उणीव आहे?' 'सुशिक्षित आयांची' म्हणून तिनें पोक्त उत्तर दिलें. त्या बादशाहास ही गोष्ट बरोबर पटली. तो म्हणाला-'शिक्षणपद्धतीचें बीज यांतच आहे; तर मग मुलांचें संगोपन उत्तम रीतीनें करून त्यांस उत्तम वळण लावण्याचें सामर्थ्य जेणेंकरून आयांमध्यें येईल, अशा प्रकारचें शिक्षण त्यांस देणें हें आपलें प्रथम कर्तव्य होय.' **फ्रान्सचें** राज्य हातीं लागल्यावर त्या देशाच्या उन्नतीसाठीं त्यानें जे अनेक यत्न केले, त्यांत त्यानें स्त्रीशिक्षणास आदिस्थान दिलें व तत्प्रसारार्थ शाळा घालून बराच खर्च केला. एका विद्वान ग्रंथकाराचें असें मत आहे कीं, पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्याच्या मनावर निरनिराळीं राष्ट्रें पाहूनही जो ठसा उमटत नाहीं, तो ठसा आईला सहज वठवितां येईल. ही गोष्ट अगदीं

खरी आहे. असें असूनही आईचीं कर्तव्यें तिजकडून यथायोग्य बजावलीं जाण्यास तिला शिक्षणाची आवश्यकता आहे, असा विचारसुद्धां आपले लोक मनांत आणीत नाहींत, मग तें देण्याची तर गोष्ट लांबच! मुलांप्रमाणें मुलींच्याही शिकण्याची तरतूद झाली पाहिजे, जितकी मुलांच्या शिक्षणाबद्दल आपण काळजी वाहतों तितकी मुलींच्या शिक्षणाकरितां आपण काळजी वाहिली पाहिजे, असें समजणारे लोक आपणांत किती आहेत! देशांतील एकंदर लोकसंख्येच्या मानानें पाहतां अशा समजुतीचीं माणसें फारच कमी, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. जो थोडा बहुत प्रयत्न सध्यां सुरू आहे त्यापासून कितीसा फायदा होणार? दहा अकरा वर्षांच्या आंतच मुली गृहिणी बनतात व लागलीच त्यांचा अभ्यास बंद पडतो. नऊ किंवा दहा वर्षांच्या वयापर्यंत शाळेंत जाऊन त्या जें 'र ट प' शिकतात त्याची वाढ पुढें होत नाहीं. संसाराच्या नानाप्रकारच्या काळजींचें दडपण लवकरच त्यांच्यावर येऊन पडतें; त्यामुळें त्यांचीं मनें संस्कृत होऊन प्रगल्भ दशेस येऊन पोहोंचत नाहींत; इतकेंच नाहीं, तर त्यांच्या मूळच्या बुद्धीचा अंकुरसुद्धां जागच्या जागींच करपून जातो. **हर्बर्ट स्पेन्सरनें** म्हटलें आहे:–'मुलांचें जगणें किंवा मरणें, त्यांच्या मानसिक शक्तीची प्रगल्भता किंवा त्यांचा ऱ्हास, या गोष्टी ज्या प्रकारानें त्यांचें संवर्धन होतें, त्यावर अवलंबून असतात.' तर मग ज्यांच्यावर ही जबाबदारी कांहीं काळानें येणार, ज्यांच्यावर त्यांच्या संगोपनाचा बोजा

पडणार, त्यांच्या कानावर शिशुसंवर्धनाबद्दल एक शब्दही पडूं नये, त्या बाबतींत त्यांस यत्किंचित् सुद्धां शिक्षण मिळूं नये, ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय? आपल्या पोटीं येणाऱ्या कोमल अर्भकांचीं मनें प्रफुल्लित ठेवून त्यांस योग्य वळण लावणें व त्यांचें योग्य संवर्धन करणें वगैरे नाजूक व जबाबदारीच्या कामांची अवघड कला तिला साधली पाहिजे व ह्या बाबतींत चार दोन शब्द तिच्या कानीं पडले पाहिजेत व याचा विचार करण्यास तिला अवकाश सांपडला पाहिजे असा विचार कोणाच्या तरी मनांत येतो काय? किंवा नुसता विचार येऊन तरी काय उपयोग? त्या बाबतींत विशेष कळकळीनें जोंपर्यंत यत्न होत नाहींत, तोंपर्यंत हे विचार व्यर्थ होत. आईचें कर्तव्य योग्य रीतीनें बजावण्याच्या कामांत ती लायक होण्यास तिच्या अंगीं पुष्कळ चांगले गुण असले पाहिजेत. ती जितकी सभ्य, तितकीच निश्चयी असली पाहिजे. कोणत्या गोष्टींकडे केव्हां काना-डोळा करावा, केव्हां न करावा, वर्तनांत कडकपणा केव्हां दाखवावा, केव्हां त्यांत ढिलाई असावी, हें तिला चांगलें समजलें पाहिजे. तसेंच कोणत्या प्रसंगीं काय शिकवावें व आपण स्वतः काय शिकावें, हें तिनें जाणिलें पाहिजे. आपल्या अपत्यांच्या मनांत स्वत:बद्दल जितकें प्रेम तितकीच पूज्यबुद्धि तिला उत्पन्न करितां आली पाहिजे. तिचा स्वभाव गोड असून जितका शांत व गंभीर, तितकाच निश्चयीही असला पाहिजे. तिची अभिरुची चांगली असून तिच्या रीतीभाती आवडण्याजोग्या असाव्या.

आपल्या मुलांबाळांबद्दल तिला फार कळकळ वाटली पाहिजे. असें नसेल तर तिच्यावर त्यांचा पूर्ण विश्वास कधींच बसावयाचा नाहीं. तसेंच रास्त गोष्ट कोणती आहे हें अति बारकाईनें निवडून काढून त्या गोष्टीस अनुसरून तंतोतंत वर्तन ठेवण्याची खबरदारी तिनें घेतली पाहिजे. तिनें उदार असावें, पण उधळपट्टी करूं नये. कोणतीही गोष्ट पुढें घेतली तरी तिजबद्दल पोक्त रीतीनें विचार करून तिचा योग्य निर्णय ठरविण्याची बुद्धि तिच्यांत असली पाहिजे. मुलांस उपदेश करतांना तिला सर्व धोरण कळलें पाहिजे व सर्वांत मोठा गुण तिच्यांत हा पाहिजे कीं, परमेश्वराच्या ठिकाणीं तिची भक्ति फार असली पाहिजे; कारण, तिचीं कामें इतकीं नाजूक तऱ्हेचीं आहेत व तिच्यावरची जबाबदारीही इतकी मोठी आहे कीं, संसारचिंतांच्या ओझ्याखालीं ती दडपून जाण्याचा संभव फार असतो; असें होऊं नये म्हणून तिनें आपल्या कर्तव्यास यथाशक्ति जपावें व त्यांत यश मिळण्याचा हवाला **परमेश्वरावर** ठेवून त्याची प्रार्थना व भक्ति करीत असावें, म्हणजे चित्ताला समाधान वाटेल. त्याचप्रमाणें तिनें आपली जबाबदारी जाणिली पाहिजे व आपल्या कामाचें महत्व किती आहे हेंही तिला चांगलें समजलें पाहिजे. आपण स्वतः नानातऱ्हेच्या यातना व कष्ट सोसून ज्या लेंकरांस जन्म दिला, त्यांची ज्या मानानें आपण काळजी घेऊं किंवा उपेक्षा करूं, त्या मानानें तीं या जगांत भरभराटीला चढतील किंवा त्यांचें सर्वस्वी नुकसान होऊन तीं नाश पावतील—ही गोष्ट तिच्या मनावर चांगलीच बिंबली पाहिजे.

लहानपणीं मुलांमुलींस सर्वत्र जग सुखमय वाटत असतें; तेव्हां तीं संसारांत पडून कालक्रमणा करूं लागण्यापूर्वीं त्यांची योग्य तयारी जर आईकडून झाली नाहीं, तर तिला त्याबद्दल किती पश्चात्ताप वाटेल व तिचें मन तिला किती खाईल ? संसारास आरंभ झाल्यावर जीवनार्थकलहामध्यें आपल्या मुलाचा पराभव होऊन तो हतवीर्य होऊन पडला आहे व अशा वेळीं चिंतातुर मुद्रेनें आपल्याकडे पाहून जर त्यानें असे उद्गार काढिले कीं–' **आई**, या जीवनार्थकलहांत अवश्य लागणारीं आयुधें तूं मला दिलीं नाहींस, संसारसमरांगणांत माझ्याशीं झुंजणारे शत्रु मला कोणते भेटतील, त्यांना चीत् करण्याचे उपाय कोणते, मजवर कोणतीं संकटें येऊन मला कसे कसे हाल काढावे लागतील व त्यांतून सुटण्याचे मार्ग कोणते, यांबद्दल तूं मला एक शब्दही सांगितला नाहींस; मला कधींच उपदेश केला नाहींस; म्हणून आतां मी हा एथें हताश होऊन पडलों आहे–' तर तिच्या काळजास भोंकें पडल्याशिवाय राहतील काय ? किंवा एखाद्या आईची मुलगी लहानपणापासून चांगलें वळण न लागल्यामुळें बहकून कुसंगतीनें वाईट मार्गास लागली व खरा आणि योग्य मार्ग आपल्या आईनें आपणास दाखविण्याचा यत्न वेळींच केला असता, तर आपणाकडून भलत्याच चुक्या झाल्या नसत्या–अशा विचारानें विव्हल होऊन तिनें डोळ्यांवाटे पाणी काढिलें, तर तें पाहून तिच्या आईला वर्मीं घाव लागल्यासारखें होऊन ' दे माय धरणी ठाय ' असें होणार नाहीं काय ?

मनुष्यास बऱ्या वाईट संवयी प्रथम घरींच लागतात. जसजसें मनुष्य वयानें वाढत जातें, तसतशा या प्रथम लागलेल्या संवयी वयाबरोबर बळावत जातात. तसेंच वळण ज्या मानानें चांगलें किंवा वाईट असेल, त्या मानानें पुढें मनुष्य चांगलें किंवा वाईट निपजतें. प्रथम लहानपणीं लागलेल्या संवयींनीं मनुष्य पुढें इतकें जखडलें जातें कीं, त्या संवयी त्याच्या जन्माच्या सोबतिणी होऊन बसतात. त्या संवयी बदलण्याचा कोणीही यत्न केला तर त्या सुटतां सुटत नाहींत. त्या केवळ त्याचा प्रतिस्वभाव होऊन बसतात. बाळपणीं मुलांच्या कोमल मनांवर जे संस्कार घडतात, तेच पुढें दृढ होत जातात व तीं मुलें मोठीं झाल्यावर, कर्तीसवर्ती बनल्यावर, त्या संस्कारांप्रमाणें त्यांच्याकडून वर्तन घडत जातें. घरीं मुलांच्या मनांत लहानसहान विचारांचें व कल्पनांचें बीं रुजून जो मतांकुर फुटतो, त्यापासूनच पुढें सार्वजनिक मताचा वृक्ष बनतो. कारण, एकंदर जनसमूह प्रायः घरांतूनच तयार होऊन बाहेर येतो. म्हणून, एकंदर जनसमूहास म्हणजे राष्ट्रास चांगलें वळण लावण्याचें सामर्थ्य घरांतल्या प्रमुख माणसांच्या अंगीं जितकें असतें तितकें त्यांवर राज्य चालविणाऱ्या राजांच्याही अंगीं नसतें, असें सिद्ध होतें. याप्रमाणें सर्व प्रकारें वळण लागण्याचें, चालचलणूक, रीतीभाती व एकंदर वर्तन ठाम करण्याचें मुख्य उगमस्थान 'गृह' होय. या गृहांत जसें वळण लागेल, जसें शिक्षण मिळेल, तसा त्याचा परिणाम सर्व जनतेवर होणारा आहे. म्हणून 'गृहशिक्षण' हा विषय इतक्या मह-

त्वाचा आहे कीं, त्याबद्दल लिहावें तितकें थोडेंच. या गृहांत जर नेहमीं परस्परांबद्दल प्रेम, कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा वगैरे सद्गुणांचा वास असला; गृह चालविणारीं प्रमुख माणसें जर समजुतदार, प्रेमळ व सदाचार संपन्न असलीं; तरच त्यांतून आरोग्यसंपन्न, स्वतःचें व जवळच्या मनुष्याचें कल्याण करण्यास समर्थ व वाडवडिलांचा सन्मार्गदर्शक कित्ता गिरविणारीं, अशीं माणसें निपजण्याची आशा असते. तेव्हां सर्व गृहाचें सूत्र ज्यांच्या हातांत आहे त्या आईबापांवर आपल्या भावी मुलांचें सुखदुःख, त्यांचें बरें वाईट निघणें, त्यांची भरभराट किंवा त्यांची विपत्ति, ज्ञान किंवा अज्ञान, इत्यादि बऱ्या वाईट गोष्टी पुष्कळ अंशीं अवलंबून असतात. आणि त्यांतही बापापेक्षांही आईवरच त्या विशेषतः अवलंबून असतात. कारण, अगदीं बाल्यावस्थेपासून मुलांचा संबंध तिच्याशींच जास्ती असतो. घरांतल्या व्यवस्थेंत तिचाच हात जास्ती असतो. एका विद्वान् ग्रंथकारानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'गृहसंस्थेची मालकीण स्त्री आहे. सर्व मुलांबाळांवर तिचाच पूर्ण अमल असतो. त्यांस कांहीं लागलेंसवरलें तर दाद मागण्याकरितां तीं आईकडेच धांव घेतात. तिचें उदाहरण रात्रंदिवस त्यांच्या डोळ्यांसमोर असतें. म्हणून तिचें सर्वथैव अनुकरण त्यांच्याकडून जाणूनबुजून नव्हे, तर साहजिक होतें.'

लहानपणीं मुलांची अनुकरण करण्याची शक्ति फार प्रबळ असते. मोठीं माणसें घरांत कांहींतरी काम करीत असलीं म्हणजे लहान मुलें त्यांची हुबेहुब नक्कल वठवितात, हें बहुतेकांच्या पाह-

ण्यांत आहे. अनुकरणाकडे त्यांच्या मनाची साहजिक प्रवृत्ति असल्यामुळें सभोंवतालच्या नेहमीं दृष्टीसमोर असणाऱ्या माणसांची उठण्याबसण्याची, बोलण्याचालण्याची व विचार करण्याची ढब त्यांस लागावी, यांत नवल काय? असें होणें अपरिहार्य आहे. म्हणून त्यांच्या मनावर नानाप्रकारचे उत्तम संस्कार वठवावयास हा बाल्यावस्थेचाच काल फार महत्त्वाचा आहे. या अवस्थेंत मूल असतां त्याच्या मनास कोंवळ्या रोपाची उपमा देतात, तें योग्य आहे. कारण, कोवळें रोपटें जसें वांकवावें तसें वांकतें. तेंच दिवसानुदिवस कठीण होत गेलें म्हणजे आपल्या इच्छेनुरूप वांकविण्याचें काम कठीण जातें. म्हणून मुलें सद्गुणी निपजावीं अशी आपली इच्छा असल्यास त्यांच्यापुढें वागणुकीचे उत्तम नमुने अवश्य ठेविले पाहिजेत. हें जर खरें आहे तर मग मुलांच्या नजरेसमोर सदासर्वकाळ आईचाच नमुना असतो. म्हणून एका महाविद्वानानें जें म्हटलें आहे, कीं 'आई ही शंभर शिक्षकां बरोबर आहे' तें यथार्थ आहे.

नुसत्या उपदेशापेक्षां उदाहरणानें जास्ती फायदा होतो असा सर्वत्र अनुभव आहे. नुसत्या बोलण्यापेक्षां कृतीची किंमत जास्त आहे. उपदेश फक्त बोलण्यानें करितां येतो, पण उदाहरणाला कृति करून दाखवावी लागते. एखाद्याच्या बोलण्यांत व कृतींत फरक दिसला तर तो कोणाच्याच मानास पात्र होत नाहीं व त्याचा बोजही राहत नाहीं. केवळ उपदेश करणारांची स्थिति इसाबनीतींतील वांकडें तिकडें चालण्याबद्दल आपल्या

पिलांस रागें भरणाऱ्या पण आपण तशाच रीतीनें चालणाऱ्या खेकडीप्रमाणें होते, हें सर्व शहाणी आई मनांत समजून असते. आपलीं वडील माणसें उपदेश करितात, त्याप्रमाणें तीं स्वतः आचरण करितात किंवा नाहीं, हें मुलें मोठ्या बारकाईनें पहात असतात. मुलांच्या लक्षांत ह्या गोष्टी येत नाहींत, असें वडील माणसांस वाटण्याचा संभव असतो; पण ती समजूत चुकीची आहे. ह्या गोष्टी त्यांच्या चट्कन् लक्षांत येतात. म्हणून आपल्या उपदेशाप्रमाणें मुलांनीं चालावें अशी आपली इच्छा असल्यास आपलें बोलणें व आपली कृती यांत नेहमीं मेळ ठेविला पाहिजे. उपदेशापेक्षां स्वतःच्या कृतीनेंच–उदाहरणानेंच–इष्ट कार्य घडतें. म्हणुनच चांगल्या समजुतदार आईच्या उदाहरणाची आवश्यकता फार आहे. कारण तिचें उदाहरण–तिचा नमुना–रात्रंदिवस मुलाच्या समोर असतो. म्हणून वर जें सांगितलें तें चांगल्या शहाण्या आया विसरत नाहींत. एका विद्वान् ग्रंथकारानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, उदाहरणाचें महत्त्व इतकें आहे व त्यामुळें होणारा परिणामही इतका दीर्घकाल टिकणारा आहे कीं, त्याचें वर्णन करणें शक्यच नाहीं. उदाहरण हें प्रत्येक गोष्ट शिकण्याचें एक साधन आहे. असें जर आहे तर आईच्या उदाहरणापेक्षां जास्ती जोरदार उदाहरण कोणाचें आहे ? असो.

मुलांच्या खस्ता खाऊन त्यांस लहानाचें मोठें करणें हें काम वाटतें तितकें सोपें नाहीं. हें काम करितांना ज्या शेंकडों लहान सहान गोष्टी कराव्या लागतात, त्या दिसायाला फार क्षुल्लक

दिसतात; परंतु त्या यथास्थित व बरोबर व्हायाला आईच्याच हाताची गरज लागते. इतर दुसऱ्या कोणाकडूनही तें काम योग्य रीतीनें होत नाहीं. मुलांस त्रास न वाटूं देतां, प्रेमळ व नाजूक रीतीनें त्यांचें संगोपन करून, त्यांस वाढविण्याची हातोटी आईसच साधली असते. आपल्या बाळाबद्दल स्वाभाविकपणें जें अतोनात प्रेम आईस वाटत असतें, त्या प्रेमामुळेंच हें बिकट व नाजूक काम तिच्याकडून चांगलें होतें. आईचें प्रेम कोणती गोष्ट तडीस नेणार नाहीं? पितृप्रेमापेक्षां मातृप्रेमाची थोरवी फार मोठी आहे. कितीही वर्षें लोटून गेलीं तरी या प्रेमांत कमीपणा व्हावयाचा नाहीं. जे अपराध घडले असतां कोणीहि क्षमा करणार नाहीं, असे अपराध मुलाकडून घडले व त्याबद्दल आईला अतिशय वाईट वाटलें, तरी ते अपराध, मुलाच्या ठायीं असलेल्या नैसर्गिक प्रेमातिरेकानें, ती सहज विसरून जाते. ती आपल्या मनांतलें दुःख व राग एकीकडे ठेवून मुलांस क्षमा करते. घर सोडून मुलगा कितीही लांब गेला व मुलीचें लग्न होऊन ती सासरीं गेली, तरी आईचें प्रेम त्यांच्या मागोमाग जावयाचेंच. तिला जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं सर्वत्र अपत्यप्रेमच दिसत असतें. अपत्यांच्या कोणत्याच मागणीला या प्रेमास ना म्हणतां येत नाहीं. **मातृप्रेम** काय सहन करणार नाहीं?—कसली क्षमा करणार नाहीं? कोणती गोष्ट गोड करून सोडणार नाहीं? कोणत्या कष्टमय व दुःखप्रद गोष्टीचें स्वरूप पालटून तिला आनंदाचें स्वरूप आणणार नाहीं? याच प्रेमामुळें

बाल्यावस्था सुखावह होते. बाल्यावस्थेंतील त्या त्या आनंददायक गोष्टीच्या स्मरणानें संसारांतील अनेक उपाधींनीं व यातायातींनीं क्षुब्ध झालेल्या मनुष्याच्या चित्तवृत्ति, तो मोठा झाल्यावरही, याच प्रेमाच्या स्मरणानें शांत होतात आणि कांहीं वेळ तरी तो आनंदानुभव घेतो. मातृप्रेमाची थोरवी वर्णावी तितकी थोडीच. जो धडा शिकत असतांना अति कंटाळवाणा वाटतो, तोच आईजवळ शिकला असतां मनोरंजक वाटूं लागतो. मातृप्रेमाचा हा केवढा प्रभाव! संसारांत कशाही अडचणी आल्या तरी आईच्या तोंडांतून उत्तेजनाचा शब्द ऐकल्याबरोबर त्या बोलतां बोलतां नाहींतशा होतील, असें वाटूं लागतें. बापानें कांहीं हिताच्या सूचना केल्या तर त्या तशा न रुचतां उलट्या केव्हां केव्हां कटकटीसारख्या वाटूं लागतात व त्यांचा मुलांस रागही येतो; परंतु त्याच सूचना आईच्या कर्णमधुर शब्दांनीं बाहेर आल्या असतां उपदेशपर वाटूं लागतात. मुलांचे खेळ; तरुणावस्थेंतील त्यांच्या महत्वाकांक्षा; त्यांच्या उमेदी व मोठे झाल्यावर त्यांनीं केलेलीं महत्कृत्यें; त्यांस मिळालेलें यशापयश; त्यांच्या आशानिराशा; त्यांचें सुखदुःख वगैरे त्यांच्या संबंधानें त्या त्या गोष्टींत आईच्या प्रेमाचा जणूं काय प्रवेश होऊनच ती त्यांच्याशीं एकचित्त होते व प्रसंग येईल त्याप्रमाणें त्यांचें सांत्वन करण्यास, त्यांस धीर देण्यास, त्याला उपदेश करण्यास, त्यांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेण्यास व त्यांचें अभिनंदन करण्यास नेहमीं तयार असते. ज्या गुह्य व भरंवशाच्या गोष्टी मुलाच्यानें आपल्या अतिशय प्रेमळ

बापास सांगवत नाहींत किंवा सांगण्याची त्यास इच्छा होत नाहीं, त्याच तो आईच्या कानांत निःशंक व साफ दिलानें सांगतो. म्हणूनच—

" उपाध्यायान् दशाचार्य आचार्याणां शतं पिता।
सहस्रंतु पितृन्माता गौरवेणातिरिच्यते ॥ "

असें स्मृतिकारांनीं आयांची योग्यता वर्णितांना म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे.

हें सर्व अमर्यादित व निरभिलाष प्रेम आईमध्यें पाहिजेच आहे. त्यावांचून चालावयाचेंच नाहीं. कारण कधीं कधीं असें घडून येतें कीं, ज्या अपत्यांवर आई प्राणापलीकडे प्रीति करते, तींच अपत्यें तिची निराशा करून सोडितात. त्यांचें लालनपालन करून त्यांस योग्य वळण लावण्यासाठीं तिनें जी अंग मोडून खटपट केली असते, ती सर्व व्यर्थ जाऊन तीं अगदींच बेधोरणी निघतात. इतकेंच नाहीं, तर कांहीं कांहीं दिग्विजयी मंडळी तर—

' पलंगीं बैसवूनि राणी, माते हातीं आणवी पाणी ।
स्त्रिये पाटवाची चोळी, माता अखंड चिंध्या गाळी ॥

या **नामदेवाच्या** उक्तीप्रमाणें बरोबर वर्तन करून स्वतःस धन्य म्हणवून घेतात!! अशा वेळीं या अतोनात प्रेमाचा फार उपयोग होतो. तिची निराशा झाली तरी, आज नाहीं उद्यां तरी, आपलें मूल ताळ्यावर येईल असें या प्रेमामुळें तिच्या मनांत येतें व रात्रंदिवस त्याच्या बऱ्याकरितां ती झटतच असते. त्याच्या कृतघ्नतेनें तिचा निश्चय कमी होत नाहीं व ती निरुत्साह होत

नाहीं. मुलांस ताळ्यावर आणण्याच्या व त्यांस योग्य वळण लावण्याच्या कामीं तिला तात्काल यश आलें नाहीं, तरी तिची ती खटपट सर्वस्वी व्यर्थ जाते असें नाहीं. त्या खटपटीचा केव्हां ना केव्हां तरी उपयोग होतोच. आई जिवंत असतां मुलानें केलेल्या दुर्वर्तनाबद्दल जरी त्यास फारसें वाईट वाटत नाहीं, तरी तिच्या मरणोत्तर आपण सुधारण्यासाठीं तिनें केलेल्या यत्नांबद्दल त्यास वाईट वाटतें व अशा मुलांस मागाहून पश्चात्ताप होऊन तीं वाटेवर आल्याचींही बरींच उदाहरणें आढळून येतात.

मातृप्रेमाचा महिमा मोठा म्हणून त्याचें वर्णन जितकें करावें तितकें थोडें होणार आहे. असें जरी आहे, तरी या प्रेमाला विचाराचें सहाय्य नसलें तर परिणाम चांगला होत नाहीं. आपणास आईचें **विचारयुक्त प्रेम** पाहिजे; **आंधळें प्रेम** नको. जीं मानवरत्नें आपल्या कृतींनीं या जगतीतलास केवळ भूषणभूत झालीं, तीं तरी थोर व विचारवंत आयांच्या विचारयुक्त प्रेमाचींच फलें होत. केवढेंही प्रेम त्या आयांच्या अंगीं असून त्यांत जर विचाराची भर पडली नसती, तर **शिवाजी, बोनापार्ट**प्रभृति मंडळीच्या हातून मोठमोठे पराक्रम झाले असते किंवा नाहीं याची शंका आहे. मुलगा कितीही बुद्धिवान् असला, तरी त्याचा उत्साह कमी न करितां व तो फुकट न दवडतां त्यास योग्य तऱ्हेनें वळवावयास शहाणीच आई पाहिजे. तीच मूर्ख असली तर त्या मुलाच्या बुद्धीचा व उल्हासवृत्तीचा फारसा उपयोग न होतां तो भलतीकडे बहकून वाईट परिणाम घडून येण्याचा संभव असतो.

एका विद्वान शारीरशास्त्रज्ञाचें असें म्हणणें आहे कीं, मुलामध्यें जे कांहीं गुण किंवा दुर्गुण आढळून येतात, ते विशेषेंकरून त्याच्या आईपासून आलेले असतात. मूल म्हणजे केवळ आईचीच प्रतिमा असतें. **नेपोलियन बोनापार्ट** नेहमीं म्हणत असे कीं, मुलांचें भावी सद्वर्तन किंवा दुर्वर्तन सर्वस्वी त्यांच्या आयांवर अवलंबून असतें. त्याच्या चरित्रकारांपैकीं एकानें असें म्हटलें आहे कीं, **नेपोलियनास** फक्त त्याच्या आईचा धाक वाटत असे. तिच्यावांचून इतर कोणासही तो दाद देत नसे. त्याची आईही अशी चतुर होती, कीं केव्हां गोड, तर केव्हां कडक, असें त्या त्या समयास योग्य वर्तन त्याच्याशीं ठेवून त्याजमध्यें आपल्याबद्दल प्रेम व पूज्यभाव उत्पन्न करी व त्यास आपली आज्ञाही पाळावयास लावी.

आईच्या वळणावर मुलें किती जातात हें एका शाळेच्या रिपोर्टांत लिहिलेल्या एका गोष्टीवरून चांगलें लक्षांत येईल. त्यांत एक गृहस्थ लिहितो कीं ' मी एकदां एक मोठा कारखाना पहावयास गेलों होतों. तेथें कामावर पुष्कळ मुलें लाविली जात असत. कोणत्याही मुलास कामावर रुजू करण्यापूर्वी तेथील व्यवस्थापक त्या मुलाच्या आईच्या वर्तनाचा शोध करीत; आईचें वर्तन चांगलें असल्याबद्दल जर त्यांची खात्री झाली, तर मग त्या मुलांच्या वर्तनाची चौकशी मुळींच करीत नसत. कारण त्यांची अशी खात्री झाली होती कीं, जिचें वर्तन चांगलें शुद्ध आहे अशा आईचीं मुलें चांगल्या रीतीनें वागावयाचींच.

व्यवस्थापक लोक मुलांच्या बापाच्या वर्तनाकडे मुळींच लक्ष पुरवीत नसत.

असेंही पाहण्यांत आलें आहे कीं, बाप वाईट व दुर्व्यसनी निघाला, पण आई शहाणी, सच्छील, सात्विकवृत्तीची असली तरी देखील तें कुटुंब सुव्यवस्थित राहून मुलें बहुतेक चांगलीं निघून नांवालौकिकास येतात. तोच प्रकार उलट असला, म्हणजे बाप कितीही सज्जन असून आई वाईट असली, तर मुलें चांगलीं निपजलीं अशीं उदाहरणें वरच्या मानानें फारच थोडीं सांपडतील. लहानपणीं ज्या संवयी मुलांस लागतात त्या त्यांस मोठ्या झाल्यावरही सोडीत नाहींत, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. हा नियम येथेंच काय, पण सर्व जगांतील लोकांस लागू पडतो. लहानपणीं मुलांस ज्या प्रकारचें वळण लागलें असेल त्यावर त्याचें वर्तन सर्वस्वी अवलंबून असतें. जेथें मुलगा ५।६ वर्षांचा होऊन शाळेंत जाऊं लागेपर्यंत त्यास कोणत्याही प्रकारचें वळण लावण्याचा यत्न ज्यांच्याकडून व्हावयास पाहिजे, त्यांच्याकडून होत नाहीं; किंवा तो करण्यास त्या आया समर्थ केल्या जात नाहींत, तेथें मुलांचें सद्वर्तन ठाम होणें कितपत शक्य आहे याचा विचार प्रत्येकानें आपल्याशींच करावा. चांगली गोष्ट कोणती, वाईट गोष्ट कोणती, खऱ्याखोट्याचें स्वरूप कोणतें, कर्तव्य म्हणजे काय, तें किती पवित्र व महत्त्वाचें असतें, स्वतःवरची जबाबदारी म्हणजे काय, इत्यादि गोष्टींच्या स्पष्ट कल्पनांचा प्रवेश लहानपणापासून मुलांच्या डोक्यांत हळू हळू

व्हावयास लागला पाहिजे. हें नाजुक काम करण्यास आया स्वभावतःच योग्य असतात. परंतु त्या सुशिक्षित नसल्यास तें काम करण्यास त्या अयोग्य होतात. कोमल अर्भकांचें नाजुक शरीर व हवें तसें वळणारें मन हें **परमेश्वरानें** आईच्या दिमतीस दिलें असतें. 'मानवी जातीच्या उन्नतीचें किंवा अवनतीचें प्रत्येक मूल घटक असतें.' तेव्हां या दिवसानुदिवस उमलत जाणाऱ्या कोमल कलिकेंत बऱ्यावाइटाचे, कल्याण अकल्याणाचे, अभ्युदय विपत्तीचे किती जोरदार अंकुर भरलेले असतात? त्या त्या उत्तम अंकुरांचा पूर्ण विकास करून त्यांस प्रगल्भता आणणें हें काम आईचें आहे. तेव्हां हें काम जर इतकें महत्वाचें, इतकें जबाबदारीचें आहे, तर तें जिच्या हातीं यावयाचें ती आई किती शहाणी, किती पोक्त, किती अनुभवी असली पाहिजे? ती स्वतःच पोरकट, अप्रबुद्ध व अज्ञान असल्यास, मुलांच्या मनावर प्रथम संस्कार घडण्याच्या वेळीं त्यांच्या संगोपनाची दिशा चुकली असतां त्यापासून कसे व किती अनर्थ होण्याचा संभव आहे हें वेगळें सांगण्याची गरज नाहीं.

एखादी बाग किंवा तींतील जमिनीचा कांहीं भाग कांहीं कालपावेतों लागवड केल्यावांचून राहिला, तर त्यांत किती कांटे, बोराटे किंवा इतर निरुपयोगी झाडेंझुडपें उगवतात? तसेंच, मुलांचें मन व त्यांचा अंतरात्मा कांहीं काळपावेतों शिक्षणावांचून राहिल्यास त्यांत दुर्बुद्धि व दुष्ट संवयींचे अंकुर जोरावत जाऊन इतके अनावर होतात कीं, त्याचें मूळ चांगलें रुजल्यावर मग तें

काढून टाकण्याचा कसाही यत्न झाला तरी त्याचें पूर्ण निर्दालन करणें फार कठीण पडतें.

मोठा नामांकित मुत्सद्दी व्हावयाला जे गुण अवश्य लागतात, त्यांपैकीं बहुतेक गुण आईला आपलीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावतां येण्यास तिच्या अंगीं असावे लागतात, असें म्हटलें असतां अतिशयोक्तीचा दोष येईल असें वाटत नाहीं. कसाही प्रसंग आला तरी न गडबडतां तिची चित्तवृत्ति स्थिर व शांत राहिली पाहिजे. तात्पर्य, तिला तिचा स्वभाव आवरण्याची शक्ति पाहिजे. गृहकृत्यांच्या हरएक बाबतींत व्यवस्था करण्याची बुद्धि तिला पाहिजे व ती राखण्याचें तिच्या अंगीं सामर्थ्य पाहिजे. कोण कशा प्रकारचें माणूस आहे व कोणाचें वर्तन कसें आहे हें तिच्या ताबडतोब लक्षांत आलें पाहिजे व त्यांतील भेदाभेद मार्मिक रीतीनें जाणण्याच्या कामीं तिची नजर मोठी तीव्र पाहिजे. तिला विचार करण्याची संवय लागली पाहिजे व तिची विचारसरणी पोक्तपणाची पाहिजे. कोणतेंही काम भिजत न ठेवितां त्याचा निकाल लागलीच्या लागलीच लावीत जाण्याची संवय तिनें केली पाहिजे. कोणत्याही बाबतींत काय करावयाचें, काय न करावयाचें, याचा शांतपणें विचार तिनें ठरविला पाहिजे व मग विचारपूर्वक निकाल ठरविल्यावर, ठरल्याप्रमाणें तो अमलांत आणण्याचें व तदनुरूप वर्तन करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं पाहिजे. त्या बाबतींत ढिलाई होऊं देतां कामा नये.

असें चोख वर्तन नेहमीं ठेवतां येण्यास हरकत येऊं नये म्हणून हरएक कामाचा निकाल लावण्याच्या पूर्वीं घाई न करितां पोक्तपणानें व योग्य रीतीनें काय तो निर्णय ठरविण्याची बुद्धि तिला असली पाहिजे. मुलांस आवरून त्यांचा बंदोबस्त नीट रीतीनें राखण्याचें काम राज्यकारभाराच्या कामाइतकेंच कठीण आहे. ज्याप्रमाणें शहाणा राजा आपल्या प्रजेला आपला अंमल अति कडक भासूं देत नाहीं व तो चालवितांना अति ढिलाईही दाखवीत नाहीं, त्याचप्रमाणें शहाणी आई आपल्या मुलाबाळांस आपलें वर्तन अति कडक वाटूं देत नाहीं व त्यांत अति ढिलाईही दाखवीत नाहीं. ती या दोन प्रकारच्या वर्तनापैकीं मधलें वर्तन ठेविते. तसेंच जें वचन स्वतःस राखतां येणार नाहीं, असें वचन ती तोंडावाटे कधींच काढीत नाहीं. सगळ्यांत विशेष गोष्ट ही कीं, तीं सत्यास अतिशय जपत असते. मुलांच्या नजरेस लबाडी तावडतोब येते. त्यांस फसविण्याचा थोडासा जरी प्रयत्न झाला तरी आपणावरचा त्याचा विश्वास अगदीं साफ उडून जातो. म्हणून मुलाशीं लबाडी करणें म्हणजे त्याच्यांत असत्याचें बीजारोपण करणें होय, हें शाहाणी आई पक्कें लक्षांत ठेविते. परंतु आई विचारशून्य व मूर्ख असली तर लहानसहान व क्षुल्लक बाबतींत मुलाशीं लबाडी केली असतां कांहीं चिंता नाहीं असें मनांत आणून, थोड्या वेळेपुरतीं कटकट चुकविण्याकरितां मुलांशीं लबाडी करण्यास ती बिलकुल मागेंपुढें पाहत नाहीं. असें केल्यानें आपण केवढें पातक करीत आहों व त्यांस पात-

काचा धडा गिरविण्यास कसें प्रवृत्त करीत आहों हें अज्ञानोंमुळ तिच्या लक्षांतसुद्धां येत नाहीं. पुष्कळवेळां असें घडून येतें कीं, मुलें कांहीं चमत्कारिक प्रश्न विचारितात व त्यांच्या त्या सर्व प्रश्नांस उत्तरें देणें कठीण पडतें; किंवा तसें करणें योग्य नसतें. अशा-वेळीं कांहीं तरी लबाडीचें उत्तर देण्यापेक्षां त्यांस मुळींच उत्तर न देणें बरें. मग बेहेत्तर आहे त्यांची निराशा झाली तरी. कधीं कधीं मुलांशीं खरें बोलणें सोयीचें नसतें. अशावेळीं कांहींच न बोलणें बरें, पण खोटें बोलणें उपयोगी नाहीं. कारण, खोटें बोलण्यांनें कांहींएक फायदा न होतां मुलांस मात्र खोट्याचें स्वरूप चांगलें स्पष्ट कळूं लागतें. आईनें मुलांशीं खोटें बोलून जर त्यांस फसविलें तर मुलें सुद्धां तसेंच करून तिला निःसंशय फसवूं लागतील. तसेंच, शिव्या देण्याची कित्येक मुलांस लहान-पणापासूनच संवय लागते. इकडेही आयांनीं फार लक्ष पुरविलें पाहिजे. कित्येक मूर्ख आया तर स्वतःच मुलामुलींस शिव्या देतात, त्यामुळें त्यांस शिव्यांचा अनायासें धडाच मिळत जातो. ही फार खेदाची गोष्ट आहे. एका शाहाण्या आईची अशी एक गोष्ट सांगतात कीं, तिच्या एका मुलानें दुसऱ्या एका मुलास शिवी दिली. ती त्या आईनें ऐकिली, तेव्हां ती लागलीच त्याच्या जवळ जाऊन म्हणाली, ‘ इश्श, किती वाईट, कितीं घाणेरडे शब्द त्वां तोंडावाटे काढिलेस हे ! या ओंगळ शब्दांनीं तुझ्याच तोंडास घाण लागली.’ असें म्हणून तिनें त्याचें तोंड पाण्यानें साफ धुवून टाकिलें व

निर्मल कपड्यानें पुसून स्वच्छ केलें व असे घाणेरडे शब्द उच्चारून पुन्हा तोंड ओंगळवाणें करूं नको म्हणून त्यास तिनें सांगितलें. तात्पर्य इतकेंच कीं, स्वतः आयांनीं नेहमीं तोंडावाटे चांगले शब्द काढिले व वाईट शब्दांबद्दल मुलांस अत्यंत तिरस्कार दाखविला, तर त्यांस अमंगळ शब्द काढण्याची वाईट संवय कधींच लागणार नाहीं. असो.

शाहाण्या आईला आपल्या अपत्यांबद्दल शाहाण्या मुत्सद्याप्रमाणें कळकळ वाटते. कोणत्या गोष्टींत त्यांचें चित्त वेधलें जातें; त्यांला कोणकोणते खेळ आवडतात व कोणते आवडणें इष्ट आहे; तसेंच त्यांचा अभ्यास कसा काय चालला आहे; त्यांत त्यांची गति कशी काय आहे; कोणता विषय त्यांला कठीण जातो; कोणता शिकण्याची त्यांला हौस वाटते—वगैरे त्यांच्या संबंधाच्या गोष्टींची चौकशी करणें तिला आवडतें. तसेंच गणितासारख्या एखाद्या कठीण विषयांतल्या एखाद्या प्रश्नाबद्दल त्याला फार वेळ गोंधळांत पडावें लागून तो सरतेशेवटीं त्याच्याकडून सुटला, परिक्षेंत तो एखाद्या विषयांत उत्तम ठरला; एकाद्या मुलाशीं त्याचें फार दिवसांपासून नीटसें जुळत नसून कांहीं दिवसांनीं त्याचें त्याच्याशीं सख्य झालें, किंवा एखाद्या मुलाशीं त्याची नवीनच मैत्री जुळली, (अशा प्रकारें मैत्री जुळविणें थोरल्या माणसांपेक्षां मुलांस लवकर साधतें.) तर अशा निरनिराळ्या प्रसंगीं त्याच्याशीं गोडीगुलाबीनें बोलून, त्याचें सर्व म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन; त्याच्याशीं हांसून बोलून,

त्याला जेणेंकरून उत्तेजन येईल तें तें ती करण्यास नेहमीं तत्पर असते. अशा या वर्तनामुळें आईच्या ठिकाणीं मुलांचा प्रेमभाव व पूज्यबुद्धि सतत जागृत राहून, कांहीं झालें तरी तें आईला केव्हां सांगूं, असें त्यांस वाटतें. परंतु उलटपक्षीं, आपल्या उमेदीच्या गोष्टी, आपले विचार, आपल्या मनोवृत्ति, आपल्या इच्छा, आपले हेतु वगैरे गोष्टी आपल्या आईस सांगण्याची सोय नाहीं व त्या सांगितल्या असतां त्या ती शांतपणानें, आनंदानें व गंभीरतेनें ऐकून घेणार नाहीं; म्हणून आपणास हिरमुसलें तोंड करून परत यावें लागेल, असें आईनें आपल्या वर्तनामुळें त्यांस कधींच वाटूं देऊं नये. आईच्या मूर्खपणामुळें दुर्दैवेंकरून असा प्रकार घडून आलाच, तर त्यापासून उभयतांसही सुख होत नाहीं हें सांगावयास नकोच. गायनास आरंभ झाल्यावर लागलीच एकाद्या वाद्याची तार तुटली, किंवा त्यांत कांहीं बिघाड झाला म्हणजे ज्याप्रमाणें त्या गायनाचा विरस होऊन केव्हांच रंग येत नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या अंतःकरणांतील गोष्टी साफदिलानें आपणास आपल्या आईस सांगतां येत नाहींत. आपण लडिवाळपणानें आपली हरएक प्रकारची हकीकत तिजजवळ सांगितली असतां ती त्यांत फारसें चित्त घालीत नाहीं, असें वारंवार वाटून जर त्यांचें मन खट्टू होत गेलें, तर दररोजच्या समागमसुखापासून जो आनंद व्हावयाचा त्यास तीं दोघेंही अंतरतात. प्रथमारंभीं असा प्रकार जरी अगदीं थोडथोडा व बहुतेक न भासणारा असला, तरी दिवसेंदिवस तो

जोरावत जातो व सरते शेवटीं स्वाभाविक प्रेमाच्यानें सुद्धां त्यास आळा घालितां येत नाहीं. येथपर्यंत स्थिति येऊन पोंहचली म्हणजे आईला सुद्धां असें वाटूं लागण्याचा संभव आहे कीं, आपला मुलगा आपल्या गुह्य गोष्टी आपल्यापासून चोरितो, त्याचा आपणावर विश्वास नाहीं, व तो आपणापासून अलग राहण्याचा यत्न करीत असतो. असे विचार आईच्या मनांत आल्यावर तिला काय वाटावें याची कोणीही कल्पना करील.

कवि व साधुलोक वर्णितात त्याप्रमाणें जग बहुतेक दुःखमय कांटेरी रान असेल, तर त्यांत कांहीं रमणीय भाग असल्यास तो पूर्व वयांतच आपल्या दृष्टीस पडला पाहिजे. या संसाराटवीमध्यें भ्रमण करीत असतां, कोठें खड्डे आहेत, कोठें दऱ्या आहेत, कोठें भयंकर कडे आहेत, कोणत्या मार्गानें गेलें असतां संकटें व अडचणी ज्यास्ती, व कोणत्या मार्गानें गेलें असतां सुख व सोयी ज्यास्ती, हा अनुभव ज्यांस आला असेल, त्यांनीं नवीन पिढीचे हाल आपल्या अनुभवजन्य ज्ञानानें टाळण्याचा यथाशक्ति यत्न केला पाहिजे; व तसें करणें त्यांचें कर्तव्य आहे. आपल्या मुलांच्या बाल्यावस्थेचा काल जितका आनंदजनक करून सोडितां येईल, तितका करून सोडण्यास प्रत्येकानें झटलें पाहिजे. कारण, या कष्टमय संसारयात्रेस, मुलांनीं आरंभ केल्यावर, त्या त्या संकटांशीं तोंड देण्यास समर्थ होण्यासाठीं व ते ते प्रसंग सहन करण्याची ताकद त्यांच्या अंगीं यावी म्हणून, बाळपणीं उपभोगिलेल्या आनंदजनक गोष्टींचें त्यांस वारंवार स्मरण होत गेलें

पाहिजे. तसें झालें असतां त्या संकटांचा व त्या प्रसंगाचा तीव्रपणा बऱ्याच अंशीं कमी होईल. संसारांत सर्वच गोष्टी मनाप्रमाणें घडणें असंभाव्य असतें. एखादेवेळीं आपला जिवलग व विश्वासू मित्र आपणाशीं वंचना करितो, किंवा ज्या गोष्टींबद्दल आपली अगदींच निराशा होते, अशा निराशेच्या प्रसंगीं चिंतातुर होऊन जेव्हां आपण एकांतीं आपणाशींच विचार करीत बसतों, तेव्हां लहानपणांतल्या मजेदार गोष्टींची साहजिक आठवण होऊन त्यापासून मनाला किती बरें सुख वाटतें? तो काळ अशा मजेचा असतो कीं, त्यावेळीं मित्र आपणाशीं वंचना करील किंवा कांहीं गोष्टींत निराश होण्याचे प्रसंग पुढें आपणावर येतील, अशा प्रकारचा यत्किंचितूही विचार मनांत येत नाहीं. अशा समयीं मनाची जी तंद्री लागते तिची बहार कांहीं निराळीच असते. आपला हिरमोड होत जाईल, केव्हां केव्हां तर आपणास अगदींच हताश होण्याचा प्रसंग येईल, आपणाला नाना तऱ्हेच्या अडचणी सोसाव्या लागतील; तात्पर्य, आपल्या मनाप्रमाणें सर्वच घडून येण्याचा संभव अगदींच कमी, अशा कल्पनांचा लवलेशही आपल्या मनांत लहानपणीं न येतां चोहोंकडे आनंदीआनंद भासत होता—इत्यादि विचार मनांत आले म्हणजे आपणास समाधान वाटून चित्तवृत्तींस उल्हास वाटू लागतो. लहानपणीं मनोवृत्तींस आनंदानें तल्लीन करून सोडणाऱ्या गोष्टी प्रौढवयांत ती बहार देत नाहींत. तीं हिरवींचार शेतें, व त्यांत आपल्या संवगड्यांबरोबर आनंदानें नाचणें,

बागडणें, झाडांवरचा तो मोहोर व त्याचा घमघमाट, खळखळ वाहणारा तो स्वच्छ ओढा, आकाशांतील ढगांचे ते निरनिराळें रंग, त्यांच्या गति इत्यादि गोष्टींपासून जो आनंद होई व जी मजा वाटे, ती अपूर्वच–तसा सुखानुभव इतःपर नाहींच. एखादे-वेळीं जगाच्या कटकटीस त्रासून डोकें भणभणले असतां एखाद्या शांत व एकांत स्थळीं स्वतःशींच विचार करीत बसलें असतां तंद्री लागली म्हणजे लहानपणीं घडलेल्या गोष्टींचीं एकामागून एक अशीं स्पष्ट चित्रें दृष्टीसमोर येऊं लागतात. एकाद्या एकांत सरोवराच्या कांठीं सभोंवतालच्या देखाव्याकडे पहात विचार करीत बसणें, टेकडीवरून पाण्याचा प्रवाह खालीं जोरानें पड-ल्यामुळें उत्पन्न झालेले सहस्रावधि तुषार पाहण्यांत गर्क होणें, एकाद्या प्रचंड वृक्षाच्या गर्द छायेखालीं बसून उमेदी बांधणें व बेत करणें,—वगैरे गोष्टी आपण प्रत्यक्ष पाहत आहों किंवा अनुभवीत आहों असें वाटूं लागतें. ज्यांच्याबरोबर आपण बोललों, हांसलों, खेळलों अशा आपल्या अति सलगीच्या मित्रांबरोबर पुनः हातांत हात घालून आपण मजेनें हिंडत आहों कीं काय असा भास होतो. आईनें सांगितलेल्या चमत्कारिक जुन्या गोष्टी, किंवा तिचें मधुर गाणें, आपलें झोंपीं जाणें, किंवा एखादे वेळीं प्रेमभरित अंतःकरणानें आपणास कुरवाळून तिनें आपले मुके घेणें, इत्यादि गोष्टींची आठवण होऊन ती ती स्थिति आज आपण प्रत्यक्ष अनुभवीत आहों असें मनांत येऊन मन त्यांत तल्लीन होऊन जातें. निद्रासुख पूर्ण अनुभवून जागें

झाल्यावर, सर्व प्रकारचे श्रम नाहींतसे झाल्यामुळें मन जसें प्रफुल्लित होतें व उमेद वाटूं लागते, तद्वतच असे विचार मनांत येऊन घोळूं लागले म्हणजे नाना चिन्तांनीं भरलेलें आपलें डोकें हलकें होऊन संसारांतील त्या त्या मनस्तापांशीं झुंजण्यास मन पुन्हा तयार होतें. अहो आयांनों! तुमच्या बाळांची बाल्यावस्था आपल्या प्रेमभरित, मृदु पण विचारवंत वर्तनानें व आपल्या सर्वगामी कनवाळूपणानें अशा आल्हादकारक व उमेद देणाऱ्या स्मृतींनीं समृद्ध करून सोडणें तुमचें कर्तव्य आहे; व तसें करणें तुमच्या स्वाधीनही आहे. सुखसंपत्तीची जी देणगी त्यांस जन्मभर पुरणारी आहे, तिचा पुरवठा त्यांस त्यांच्या अजाण वयांत करून देणें हें तुमचें अति महत्वाचें काम आहे. त्यांच्या करमणुकींत मन घालून, त्यांच्या त्रासाचें कारण जाणून, त्यांस दुःख झालें असतां त्यांचें सांत्वन करून, त्यांच्या उमेदीच्या त्या त्या गोष्टींस प्रोत्साहन देऊन,—सारांश, त्यांच्या सर्व बाबती आपल्याच आहेत असें समजून त्यांच्याशीं वर्तन ठेवाल, तर तुमच्या हातून हें सहज होण्यासारखें आहे. हें काम कठीण नाहीं. मात्र ज्या आयांस आपल्या अपत्याबद्दल वाटावी तितकी कळकळ वाटत नाहीं त्यांना हें काम कठीण वाटेल; इतकेंच नाहीं, तर त्यांना तें साधणें सुद्धां शक्य नाहीं. पण खरी कळकळ व प्रेम वाटणाऱ्या आयांस तें अगदींच सोपें आहे. अपत्याबद्दल अशी कळकळ, असें प्रेम, असा उत्साह व इतका स्वार्थत्याग आईच्या अंगीं असल्यावर आणखी ज्यास्ती तें काय पाहिजे?

कोणी कदाचित् असें विचारतील कीं, स्त्रियांची इतकी थोरवी गाण्यांत काय अर्थ आहे? आजपर्यंत त्यांच्या हातून नांव घेण्यासारखें या जगांत काय झालें आहे? विद्येंत, कलांत, शास्त्रांत किंवा इतर कोणत्याही कामांत प्रशंसनीय असें त्यांनीं काय केलें आहे? **भारत भागवता**सारखे ग्रंथ, **शाकुंतल** नाटकासारखीं नाटकें, किंवा कांहीं शास्त्रीय शोध—वगैरे ज्या ज्या नांवाजण्यासारख्या गोष्टी झाल्या आहेत, त्या त्या सर्व पुरुषांच्याच कृतींचीं व श्रमांचीं फलें आहेत. होय, ठीक आहे; पण **पाणिनी, कालिदास**प्रभृति मंडळीप्रमाणें कृति करून स्त्रियांनीं आपलें नांव अजरामर केलें नाहीं, येवढ्यावरून तशा कृति करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नाहीं असें निःसंशय ठरत नाहीं. व पुढें तशा स्त्रिया होतील किंवा नाहीं हा प्रश्न जरी मानसिक शास्त्रांतल्या वादाचा आहे, तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, त्यांना ***अहल्याबाई होळकरीण** किंवा †**राणी भवानी** होतां

---

*ऐन तारुण्याच्या भरांत हातीं अमर्यादित सत्ता असतांही व अशा वेळीं वैधव्याची गदा येऊन धाड्कन् आदळली असतांही, मन इकडेतिकडे बहकूं न देतां, निश्चयानें, नेटानें, व न्यायान्यायाचें पूर्ण धोरण जाणून या राणीनें राज्यशकट कसा बाणीनें हाकिला, हें इतिहास वाचणारांस विदित आहेच. हिचा चरित्रक्रम विशेष लक्षांत ठेवण्यासारखा असल्यामुळें हिची थोडी हकीकत येथें देतों.

अहिल्याबाई तीस वर्षांच्या वयाची असतां तिच्या हातीं राज्यसूत्र आलें. तेव्हां ती भर दरबारांत बसून राज्यकारभाराचें काम पाहत

येईल, व राज्यप्रकरणीं कामें मोठ्या शिताफीनें पार पाडतां

असे. आपल्या प्रजेचा उत्कर्ष होऊन तिची सुखवृद्धि व्हावी म्हणून तिनें जे अविश्रांत श्रम केले, जी लोकोत्तर गंभीरता दाखविली, व न्यायाच्या कामांत जी अलौकिक सत्यनिष्ठा प्रकट केली, त्यामुळें इतिहासप्रसिद्ध मानवरत्नांत हीं नेहमीं गणली जाईल यांत शंका नाहीं. ती दररोज मोठ्या सकाळीं उठून स्तोत्रपाठ करण्यांत कांहीं काळ घालवी; नंतर दानधर्म झाल्यावर अल्पाहार करी; व श्वेतवस्त्र परिधान करून, स्वतःस गळ्यांतल्या एका माळेशिवाय दुसऱ्या कोणत्याही अलंकारानें न शोभवितां, ती दुपारचे दोन वाजेपासून तों ६ वाजेपावेतों दरबारांत काम करीत बसे. नंतर संध्याकाळीं पुराण वाची. पुराणांतल्या कथा वाचण्याचा तर तिला भारी नाद असे; त्या वाचून त्यांत वर्णिलेल्या व्यक्तींच्या कृत्यांपासून कोणता बोध घेण्यासारखा आहे याचें ती फार मनन करीत असे. तिचा मनोनिग्रह पक्का असल्यामुळें तिच्या विचारांत व आचारांत धर्माची झांक नेहमीं दिसून येत असे. राज्यकर्त्री या नात्यानें नित्याचीं कामें करीत असतां, अधिकार चालवून केलेल्या प्रत्येक कामाबद्दल **परमेश्वरा**पुढें आपणास जाब द्यावा लागेल, असें पक्कें मनांत समजून ती आपलें वर्तन ठेवी. सत्त्यावर तिची निष्ठा अतिशय असे. आपली मर्जी संपादण्याकरितां एकाद्यानें आपली हांजी-हांजी करावी हें तिला बिलकुल पसंत नव्हतें. एकदां एका ब्राह्मणानें एक ग्रंथ लिहून तिला अर्पण केला. त्यांत त्यानें तिची अतिशय स्तुति केली होती. तिनें तो स्तुतिपर ग्रंथ **नर्मदा** नदींत टाकून देण्याचा हुकूम फर्माविला. ती हुद्द्याचीं कामें करण्यास जीं माणसें निवडी, तीं फार विचारानें निवडी. ती आपल्या प्रांतांतला राज्यकारभार उत्तमरीतीनें चालवीत असे, इतकेंच नाहीं, तर तिजमध्यें मुत्सद्दीपणा

येतील; **मिराबाई** बनून वाङ्मयास उत्तम भर पाडितां येईल.

चांगलाच वसत असल्यामुळें ती राज्य चालवीत होती तोंपर्यंत राज्यांत सर्वत्र शांतता राहून प्रजाजन समाधानांत यथेच्छ नांदत होते. तिनें तीस वर्षें राज्य केलें. तितक्या अवसरांत तिनें असंख्य देवालयें, धर्मशाळा, किल्ले, विहिरी व विंध्याद्रीवर एक सडकेचा रस्ता वगैरे करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. मनुष्यमात्रावरच ती दया करीत असे, असें नाहीं; तर तिच्या दयेचा पल्ला पश्वादिकांपर्यंत सुद्धां पोहोंचत असे. शेतें नांगरणारे बैल, मासे, पक्ष्यादिप्राणी यांच्या-करितांही दाणापाण्याची व्यवस्था तिजकडून होत असे. हिचा एकंदर वर्तनक्रम लक्षांत आणून **मालकम्** साहेबासारख्या परद्वीपस्थ गृहस्थानें हिजबद्दल असे उद्गार काढिले आहेत: "**अहिल्याबाई**च्या वर्तनाचा शांतपणें व निःपक्षपातानें विचार केला असतां असें वाटतें कीं, तिच्या-सारख्या राज्य करणाऱ्या स्त्रियांच्या मंडळांत ज्या अतिशय निष्कलंक व अनुकरणीय राज्य करणाऱ्या स्त्रिया होऊन गेल्या, त्यांमध्यें हिची गणना निःसंशय केली पाहिजे. **जगन्नियंत्या परमेश्वरा**पुढें आप-णास आपल्या कृत्यांबद्दल जाब द्यावा लागेल, असा पक्का समज मनांत बाळगून ऐहिक कर्तव्यें करीत असतां परिणामीं हितकर असें वळण मनाला कसें लागतें हें हिच्या चकित करून सोडणाऱ्या उदाहरणावरून चांगलें शिकण्यासारखें आहे." असें स्त्रीरत्न कोणत्याही देशास खरो-खर भूषण होय.

† **महाराणी भवानी** हिनें गेल्या शतकाच्या शेवटीं नाटोर संस्थानांत राज्य केलें. आपल्या अंगची अलौकिक कर्तबगारी दाखवून ह्या पराक्रमी स्त्रीनें कसें यश संपादिलें हें सुप्रसिद्धच आहे. जमीनदारी कामाची व्यवस्था लावण्यांत हिची जी कुशाग्रबुद्धि दिसून आली ती

एलिजाबेथ फ्राय प्रमाणें अनाथांचें रक्षण व दुःखग्रस्तांस दुःखमुक्त करितां येऊन परोपकारापासून उत्पन्न होणाऱ्या अप्रतिम समाधानाचा आस्वाद त्यांस घेतां येईल; स्त्रियांस अत्यंत उपयुक्त व साहजिक साधणाऱ्या वैद्यकीच्या धंद्यास स्त्रिया शिकवून तयार करणें, हजारों-लाखों-रोग्यांची व्यवस्था हातीं घेऊन मी मी म्हणून छातीस हात लावून पुढें येणाऱ्या धन्वंतऱ्यांस जें काम साधलें नाहीं तें स्वतः तडीस नेणें, व आरोग्यनियमांच्या ज्ञानाचा प्रसार करणें, मजुरांची स्थिति सुधारणें, ह्या व अशाच इतर कृति

खरोखर वाखाणण्यासारखी आहे. या व्यवस्थेमुळें असें झालें कीं कांहीं वतनवाडीचें उत्पन्न पुष्कळ वाढून ज्या इतर वतनाच्या जमिनी अगदीं रसातळास पोहोंचूं पाहत होत्या त्या कायम राहिल्या. या सुव्यवस्थेमुळें **नाटोर** घराण्यांत संपत्ति अतिशय वाढून त्याचें वजन फारच वाढलें. **राणी भवानी**च्या वेळीं त्या घराण्याच्या वैभवाचा कळस झाला असें म्हटलें तरी चालेल. मागचें पुढचें सर्व धोरण मनांत आणून ती आपले विचार ठाम करीत असे; व विचार निश्चित झाल्यानंतर तदनुसार चोख वर्तन ठेवी. याप्रमाणें जरी तिचा दृढ निश्चय ठरला तरी पोक्त व विश्वसनीय माणसांची सल्ला मसलत शांतपणें ऐकून घेऊन त्यांत घेण्यासारखा भाग असल्यास ती तो अवश्य ग्रहण करीत असे. ती अभिमानी स्त्री असे. पण तिच्या अभिमानास मर्यादा असल्यामुळें तो वाजवी टप्प्याच्या बाहेर भलतीकडे वाहत जात नसे. ती आपल्या हाताखालच्या माणसांशीं व आश्रितांशीं बोलतचालत असे, परंतु प्रसंग ओळखून त्यांच्यांशीं बेताबाताचें वर्तन ठेवी. त्यामुळें ते तिला वचकून असत.

करून आपणास अजरामर करून सोडणारी **फ्लॉरेन्स नाइ-टिंगेल**ही त्यांस होतां येईल. कारण, हा केवळ अजमास नसून ह्या घडलेल्या गोष्टी आहेत. यावरून इतकें स्पष्ट होतें कीं, घरांतलीं केवळ हलकींसलकीं कामें करण्यापुरतीच सरासरी बुद्धिमत्ता त्यांना आहे असें नाहीं, तर पुरुषांप्रमाणें त्यांच्यांतही शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांच्या बुद्धीचा योग्य विकास होऊं लागला म्हणजे त्यांचे यत्न फलद्रूप झाल्यावांचून राहणार नाहींत.

संपत्ति, कीर्ति, किंवा अधिकार या गोष्टी मिळविण्याकरितां जरी त्यांच्याकडून यत्न झाला नाहीं, तरी पण दिवसानुदिवस मुकाट्यानें उमलत जाणाऱ्या फुलांप्रमाणें या जगतीतलास स्वर्गाची शोभा आणण्याचा यत्न त्यांच्या हातून होत आहे ही गोष्ट कमी महत्त्वाची आहे काय ? पण हेंही असो; ज्या नरपुङ्गवांनीं व स्त्रीरत्नांनीं आपल्या स्तुत्य कृत्यांनीं या जगांत नांव गाजविलें आहे, अशा नरवीरांस व अशा सतींस प्रामाणिकपणा व सत्यनिष्ठा ह्या सद्गुणांचें जें प्रशंसनीय वळण लागलें तें तरी त्यांच्याकडूनच लागलें ना ? तेव्हां त्यांच्याकडून झालेल्या महत्कृत्यांस स्त्रियाच कारणीभूत झाल्या असें म्हणतां येत नाहीं काय ? अशा प्रकारचीं स्त्रीपुरुषें तयार करणें लहानसान काम नव्हे. मोठमोठे कवि, ग्रंथकार व मुत्सद्दी यांच्या आंगची जोरदार बुद्धिमत्ता व सचोटीचें वर्तन इत्यादि सद्गुणांचा प्रादुर्भाव त्यांजमध्यें त्यांच्या आयांकडून कसकसा होत गेला हें त्यांच्या चरित्रक्रमाचा विचार केला असतां कळून येतें. एका नामांकित कवीच्या आईची हकीकत बरीच मजेदार असल्यामुळें ती येथें देतों.

या बाईचा आनंदी स्वभाव, त्या त्या समयास साजेसा विनोद करण्याची तिची हातोटी, आल्यागेल्यांचें योग्य आदरातिथ्य करण्याची तिची तत्परता, हे व असेच तिचे इतर सद्गुण तिच्या मुलामध्यें अगदीं हुबेहूब उतरले होते. या कवीशीं अति परिचित अशा एका गृहस्थाची व या थोर स्त्रीची ओळख झाल्यावर तो गृहस्थ तीस म्हणाला, 'आमचे कविराज इतक्या योग्यतेस चढले व त्यांच्या अंगीं बरेच सद्गुण दिसून येतात, याचें इंगित आतां मला चांगलें कळून आलें; जशी त्यांची आई आहे तसेच ते हुबेहूब आहेत.' ही स्त्री साधी, आनंदी व ममताळू असे. तिच्या मुलांचा तर ती केवळ आनंदच होती. चांगली समजूत व पोक्त विचार व दूरदृष्टि हे गुण तर तिजमध्यें स्वभावत:च वसत होते. तिच्या आंगचा सर्वांत विशेष गुण हा कीं, तिला वाचण्याचा व गोष्टी सांगण्याचा भारी नाद असे. तिचा एके ठिकाणीं असा लेख आहे कीं 'माझ्या वागण्याचें मुख्य रहस्य म्हटलें म्हणजे व्यवस्था व शांतता हें होय. म्हणून जें जें काम मी हातीं घेतें, तें तें अगदीं हातावेगळें करून टाकितें. जें काम फार कठीण व ज्यास्ती त्रासाचें असतें, तें तर अगोदरच उरकून टाकितें. सर्व कामाची जिकडे तिकडे नीट व्यवस्था लागली म्हणजे मला कितीही काम पडलें, तरी त्यापासून मला कंटाळा न वाटतां माझी वृत्ति नेहमीं आनंदी राहते. आबालवृद्ध सर्व लोक मला आवडतात. त्यांच्याशीं वागतांना, मी मोठी व इतर लोक मजपेक्षां नीच, अशी आढ्यता माझ्या

ठिकाणीं मी कधींच आणीत नाहीं. असें माझें वर्तन सर्वांस पसंत असल्यामुळें मीही त्यांस आवडूं लागतें. प्रत्येक मनुष्यामध्यें काय काय चांगले गुण आहेत, हें शोधून काढण्याकरितां मी नेहमीं तत्पर असतें व त्यांच्यांत जें कांहीं वाईटसाईट असेल, त्याकडे फारसें लक्ष न देतां, ज्यानें त्यांना उत्पन्न केलें व ज्याला त्यांच्यांतलें वाईट कसें काढून टाकावें हें सर्व मनुष्यांपेक्षां चांगलें समजतें त्या **परमेश्वरा**कडे त्या वाइटाचा हवाला सोंपवितें. असा माझा वर्तनक्रम असल्यामुळें माझें मन नेहमींच आनंदांत राहतें.' निरनिराळ्या गोष्टींना उत्तम स्वरूप देऊन, ऐकणारांचें चित्त वेधतील अशा रीतीनें त्या सांगण्याची उत्तम हातोटी तिला साधली होती. म्हणून नीतीचा, सत्याचा व इतर इष्ट गोष्टींचा ठसा मुलांच्या मनावर ठसविण्यांत तिचा हातखंडा असे. अशा मनोवेधक रीतीनें गोष्टी सांगण्याचें चातुर्य आयांस साधणें अत्यंत इष्ट आहे. कारण, निरनिराळ्या तऱ्हेच्या उपदेशाचा चिरस्थायी परिणाम व्हावयास हें एक उत्तम साधन आहे. असो. हवा, पाणी, पृथ्वी, तेज, आकाश यांपैकीं कशाचेंही वर्णन करणें झाल्यास तें तिनें अशा मोहक व चटकदार रीतीनें करावें कीं, तें इत्थंभूत ऐकिल्याखेरीज तिच्या मुलांस चैनच पडूं नये. गोष्ट सांगण्याचें काम सुरू असतां तींतील निरनिराळ्या रसांचा परिणाम मुलांच्या चेहऱ्यावर उघड उघड दिसून येत असे. गोष्टींतील ज्या कथानायकाबद्दल मुलांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली असेल, त्याच्यावर कोणी दुष्टानें अतोनात संकटें आणून त्याचा

सर्वस्वी नाश केला असें सांगण्यांत आलें असतां त्या दुष्टाबद्दल त्यांच्या मनांत मोठा त्वेष उत्पन्न व्हावा; व केव्हां केव्हां तर त्यांस अति वाईट वाटून त्यांच्या डोळ्यांतून पाणी यावें. परंतु त्याच्याच जयजयकाराची गोष्ट कळली म्हणजे त्यांस उत्साह वाटून आनंदाश्रूंचें भरतें यावें. एखादेवेळीं एखादी गोष्ट अर्धीच राहिली म्हणजे ती त्यांच्या मनांत सारखी घोळत रहावी. अशा स्थितींत एखाद्या मुलानें विचारावें–'काय आई, त्या गोष्टींतल्या अमक्या मनुष्याचा असा असा परिणाम झाला असेल, नाहीं बरें?' अशा रीतीनें त्यांनीं आपापली कल्पना लढवावी. आई व तिचें अपत्य यांचें हें मनोवेधक चित्र नव्हे काय? अशा रीतीनें निरनिराळ्या गोष्टी मुलांस सांगून सुनीतीकडे त्यांच्या मनाचा ळळा लावणाऱ्या व अशा प्रकारें त्यांची कल्पनाशक्ति वाढवून त्यांस योग्य वळण लावणाऱ्या आया असल्यास त्यांचीं वाळें नीतिमान्, दृढनिश्चयी व देशभक्त निघतील असें समजण्यास हरकत आहे काय? असें झालें असतां यापेक्षां आणखी महत्कृत्य काय पाहिजे आहे? अशा रीतीनें धन्य म्हणवून घेणाऱ्या मातांची थोरवी गावी तितकी थोडीच.

कुटुंबामध्यें आई किती वजनदार माणूस आहे व तिच्या उदाहरणाचा जोर किती असतो हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. नवीन पिढीला उत्तम वळण लावून तयार करण्याची जबाबदारी जर तिच्यावर आहे तर मग तिला मानसिक, शारीरिक, नैतिक इत्यादि प्रकारचें योग्य शिक्षण मिळणें किती जरूरीचें व किती

न्याय्य आहे हें वेगळें सांगणें नको. आईचें काम कधींच न संपणारें आहे. नाजुक अर्भकांपासून मनानें व शरीरानें सुदृढ असे पुरुष व अशा स्त्रिया तयार करण्याची कठीण व नाजुक कला तिला साधावयाची असते व ही कला पूर्ण अमलांत आणण्याकरितां तिला आपला नाजुक मुत्सद्दीपणाच अमलांत आणावा लागतो.

मुलाबाळांस काळजीनें वाढविण्याच्या कामीं लागणारे श्रम हलके कसे करावे, त्यांस कंटाळा न वाटूं देतां–इतकेंच नव्हे–तर त्यांचें बरेंच मनोरंजन होईल अशा रीतीनें त्यांस कसें गुंतवून ठेवावें, हें तिलाच चांगलें समजतें. सत्कृत्यें करण्यास त्यांस तीच शिकविते. कालान्तरानें हा सच्छिष्य नांवलौकिकास आला, तर त्याचें अर्धें श्रेय आईकडे येतें. आपण घेतलेल्या श्रमाच्या फलप्राप्तीबद्दल ती निरिच्छ असते, तरी आपलें अपत्य सद्गुणसंपन्न आहे अशी तिची खातरी होतांच तिला मोठी धन्यता वाटून आपल्या श्रमांचें पूर्ण सार्थक झालें असें तिला वाटूं लागतें.

आपली जबाबदारी नीट समजून व आपलें कर्तव्य ओळखून तें मनापासून योग्य रीतीनें बजावण्याचा ज्या यत्न करितात, कुटुंबांत उत्तम व्यवस्था राखण्याकरितां ज्या रात्रंदिवस झटतात, मुलें बाळें शहाणींसुर्तीं निपजावीं म्हणून त्यांस अमृततुल्यवाणीनें ज्या सदुपदेश करितात, अशा शहाण्या व पोक्त आयांचें आतांपर्यंत वर्णन झालें.

परंतु सारासार विचार न करितां मूल मागेल तें फाजील

लडिवाळपणानें देत सुटणाऱ्या, किंवा मुलानें त्यांच्यापाशीं योग्य अथवा साजेशीच वस्तु मागितली असतां त्यांच्या पुढें नन्नाचा पाढा वाचून त्यांस वारंवार हिरमुसलें तोंड करण्यास लावणाऱ्या आयांस काय म्हणावें? अति लाड किंवा अति धाक हे. दोन्ही सारखेच अनर्थकारक आहेत. दुसऱ्या कांहीं आया अशा असतात कीं, मुलांची प्रकृति कशामुळें बिघडते याचें धोरण मनांत न आणितां व त्याबद्दल नीटसा विचार न करितां, या देवास नवस कर, त्या देवास नवस कर, अमुक काशीचा कापडी भूत भविष्य जाणतो असें भोळसरपणानें मानून त्याच्या भजनीं लाग, असा क्रम त्या सुरू ठेवितात; त्यामुळें बिचाऱ्या फसतात. दुसऱ्या कांहीं अशा असतात कीं, घरांतील संसार-संबंधीं काम आटोपलें न आटोपलें इतक्यांतच याच्या घरून त्याच्या घरीं, त्याच्या घरून याच्या घरीं, विनाकारण भटकत असतात; व ज्या वेळांत पुष्कळ उपयुक्त गोष्टी करितां येतील, त्या करण्याचा यत्न न करितां वेळेचा व्यर्थ दुरुपयोग करितात. तसेंच, बरेंच वय झाल्यावरही आपण पोक्त न दिसतां नेहमीं नवयौवनसंपन्नच दिसावें, म्हणून नटण्याथटण्यांतच व्यर्थ काळाची हानि करितात. त्याचप्रमाणें कित्येक आया अशा लहरी व तब्यतखोर असतात कीं, एखादे वेळीं मुलांचे अति लाड करून त्यांस डोक्यावर बसवितात व एखादे वेळीं ती लहर गेल्यावर त्यांच्याकडून थोडासा अपराध होतांच त्यांस बडवून बडवून बेदम करितात. कित्येक आयांची समजूत तर अशी असते

कीं, मुलांच्या मनावर नीतितत्त्वें बिंबविणें किंवा धर्माकडे त्यांच्या मनाचा लय लावणें हें आपलें कर्तव्य नाहीं; म्हणून या बाबतींत त्या अतिशयच बेफिकीर असतात. वेळ व प्रसंग कोणताही असो, तिकडे लक्ष न देतां व कोणाचीही सोय न बघतां, घरांतील शांतता नाहींशी झाली तरी हरकत नाहीं, पण आपल्या तब्यतीप्रमाणें किंवा आपण घालून दिलेल्या शिस्तीप्रमाणें गृहकृत्यें झालींच पाहिजेत, नाहींतर, सर्व धावें दणाणलेंच,– अशा हेकेखोर आईपासून कोणत्याही घरांतील माणसांस कधींही सुख व्हावयाचें नाहीं. आपणास व इतरांस त्रास झाला तरी तिकडे लक्ष न देतां व सारासार विचार न पाहतां घरांतली सर्व वस्तुस्थिति घड्याळाच्या नियमितपणानें सारखी चाललीच पाहिजे, त्यांत यत्किंचित् फेरफार होतां कामानये, म्हणून दुराग्रह धरून बसणारी आई कुटुंबप्रेम व गृहसौख्य यांची कट्टी शत्रु होय. उलटपक्षीं, जेणेंकरून घरांतलीं सर्व कामें यथास्थित चालून सर्वांस सुख होईल व गृहशोभा वाढेल अशी सुव्यवस्था न ठेवतां जी आई प्रत्येक गोष्ट अवेळीं करिते, जिच्या व्यवस्थेंत प्रत्येक वस्तूस नेमलेलें ठिकाण कधींच नसतें व कशास कांहींच मेळ न दिसतां सर्वत्र गोंधळ व घोंटाळा दिसतो, अशी आई-सुद्धां वर निर्दिष्ट केलेल्या वर्गांतच गणली जाते.

कित्येकांची अशी समजूत असते कीं, स्त्रियांना कलाकौशल्य, शास्त्रीय विषय किंवा विद्येच्या कोणत्याही इतर शाखा यांसंबंधीं शिक्षण मिळून त्यांत त्या निपुण झाल्या असतां आईचीं कामें

यथायोग्य रीतीनें त्यांस करितां येणार नाहींत. परंतु हें मत बरोबर दिसत नाहीं. मातृत्व व सुशिक्षण या परस्पर न जुळणाऱ्या किंवा विरोधी गोष्टी नाहींत. इतकेंच नाहीं, तर सारख्या स्थितींतील स्त्रियांपैकीं सुशिक्षित स्त्रीलाच आईचीं कामें अडाणी स्त्रीपेक्षां चांगल्या रीतीनें करितां येतील. कारण, मातृवात्सल्यानें बुद्धिमत्ता ऱ्हास न पावतां ती उलटी वृद्धिंगत होते, हें ज्या देशांत स्त्रीशिक्षणाचा बराच प्रसार झाला आहे, त्या देशांतल्या कांहीं स्त्रियांच्या उदाहरणांनीं दाखवितां येईल. ज्याप्रमाणें मातृपद प्राप्त झाल्यावर स्त्रियांचा भेकडपणा नाहींसा होऊन त्यांच्या अंगीं बरेंच धैर्य येतें, त्याचप्रमाणें तें पद प्राप्त झाल्यावर त्यांच्या मानसिक शक्तींचा सांठा बाहेर पडूं लागतो. आपल्या मुलांस स्वतः शिकवितां यावें म्हणून ज्या आयांनीं निरनिराळ्या भाषांचें अध्ययन केलें व निरनिराळ्या शास्त्रांत प्राविण्य संपादून आपला इष्ट हेतु तडीस नेला, अशा आयांचीं उदाहरणें पाश्चिमात्य देशांत किती तरी सांपडतील! व अशा सुशिक्षित आयांच्या निरीक्षणाखालीं तयार झालेल्या मंडळींतून किती तरी कवि, तसेंच चितारी, शिल्पशास्त्रवेत्ते, व संगीतकलापटु निर्माण झाले आहेत!

अपत्यांविषयीं आईबापांला मनापासून वाटणाऱ्या कळकळीपासून किती इष्ट परिणाम होतो हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. आपल्या अपत्यांबद्दल त्यांच्या अंतर्यामीं ज्या मानानें कळकळ वाटत असेल, त्या मानानें त्यांचें हृद्गत त्यांस कळतें. अशी कळ-

कळ नसेल तर मुलांचें हृद्गत त्यांस कधींच कळावयाचें नाहीं व त्यांस त्यांच्यासंबंधीं खरें ज्ञानही व्हावयाचें नाहीं. मुलांचें असें हृद्गत कळल्यावांचून व खरें ज्ञान झाल्यावांचून, त्यांस नीटसें शिक्षण देतां येण्याचा किंवा त्यांचें संगोपन व्हावयास पाहिजे आहे, तसें होण्याचा संभव नसतो. वनस्पतिशास्त्रवेत्ता त्या त्या वनस्पतींचे गुणधर्म फार काळजीपूर्वक पूर्णपणें लक्षांत आणितो व नंतर त्यांस कोणती जमीन, किती ओलावा, किती हवा, किती उजेड पाहिजे हें त्या मानानें ठरवितो; तोच नियम मुलांच्या शिक्षणास व संगोपनास लागू आहे. त्यांच्या मनाच्या कलांचें व त्यांच्या स्वभावाचें बारिक रीतीनें व पूर्णपणें निरीक्षण करून त्यांचा कशांत कमीपणा आहे व ती कशांत ज्यास्ती आहेत हें पूर्ण लक्षांत आणिलें व कोणत्या गोष्टींत त्यांना मदत लागते व कोणत्या गोष्टींत मदतीवांचून त्यांचें चालेल याचा विचार नीट ठरविला, तरच त्यांना योग्य शिक्षण आपणास देतां येईल. एरव्हीं देतां येणार नाहीं. अशा रीतीनें त्यांचा शिक्षणक्रम सुरू झाला असतां त्यांच्या बुद्धीचा अपव्यय होण्याची व उत्साहवृत्ति भलत्याच मार्गाकडे वळून तिचा व्यर्थ खर्च होण्याची भीति रहात नाहीं.

बाल्यावस्थेंत मुलांबद्दल आईची कळकळ कमी असली तर त्यांचा आयुष्यक्रम कष्टप्रद होतो. एकदां एका मुलानें आपल्या पाटीवर एक ओबडधोबड चित्र काढिलें व तें नेऊन आपल्या आईस दाखविलें. वर वर पाहणारास यांत कांहींच खुबी

दिसण्यासारखी नव्हती, पण मार्मिकतेनें पाहणारास त्यांत प्रत्येक प्रकारची खुबी दिसून येण्यासारखी होती. आईनें तें पाहतांच ती पाटी एकीकडे टाकून दिली व कपाळास आंठ्या घालून तिरस्कारानें त्याच्यावर रागावून त्यास म्हटलें–'कायरे, असें चिरखडण्यांत वेळ कां घालवितोस?' मुलानें हलकेंच उत्तर दिलें, "आई, मी हा एका मोठ्या टेंकडीवरचा एक किल्ला काढिला आहे. त्याच्या निरनिराळ्या बुरुजांवर पताका व निशाणें फडकताहेत हें तूं पाहिलेंस काय? तसेंच, त्यावर सरदारलोक कसे उभे आहेत, हें तुला दिसलेंच नाहीं वाटतें." "मला चिरखडण्यावांचून नाहीं कांहीं त्यांत दिसत! जा पाटी घेऊन आणि धडा करीत बस आपला!" असें आईनें मोठ्या त्वेषानें त्यास सांगितलें. बिचारें मूल! तोंड हिरमुसलें करून व अति कष्टी होऊन लांब कोपऱ्यांत जाऊन अगदीं निरुत्साह होऊन बसलें! त्याच्या मनांतील विचारतरंग व कल्पनाशक्ति त्या आईला (बुद्धि नसल्यामुळें नव्हे, तर केवळ कळकळीचा कमीपणा असल्यामुळें) जाणतां आली नाहीं. त्या मुलानें आपल्या मनांत कल्पिलेला तो किल्ला, त्याचे ते निरनिराळे बुरुज, ते दरवाजे, त्यावरील तें सरदारमंडळ, त्यावरचीं तीं फडकणारीं निशाणें, ते अश्वारूढ स्वार इत्यादि गोष्टींचा चट् सारा देखावा त्या आईच्या नीरस डोळयांस केवळ ओबड धोबड दिसला!! त्या आईनें त्या मुलावर न दर्डावतां, त्यास निराश न करितां, तें चित्र नीट पाहून त्यांत कळकळीनें मन घातलें

असतें, तर त्या मुलास अधिक चांगलें चित्र काढून आईस केव्हां दाखवूं व शाबासकी केव्हां मिळवूं असें वाटून ज्यास्ती उमेद आली असती, व त्याच्या आंगच्या उत्साहाचा अंकुर जागच्या जागींच चिरडून गेला नसता.

प्रत्येक कुटुंबांत चांगलें वळण, सुव्यवस्था व पद्धत ह्या गोष्टी असल्याच पाहिजेत. त्याचप्रमाणें प्रत्येक गोष्ट करण्याची वेळ व वस्तु ठेवण्याची जागाही ठरलेली पाहिजे. तसेंच आज्ञा पालनाची संवयही मुलांस लागली गेली पाहिजे. परंतु हा सर्व प्रकार यथास्थित घडून येण्यास एका महत्वाच्या गोष्टीची फार फार जरूरी असते. ती नसली तर सर्वच फिक्कें पडतें व मनाप्रमाणें कांहींच घडून येत नाहीं. ही गोष्ट कोणती म्हणाल तर कळकळ होय. आईबापांनीं व मुलांनीं एकमेकांच्या अंतःकरणांतील वृत्तींचा आदर करण्यास शिकलें पाहिजे. मुलांनीं आईबापांवर निःसीम विश्वास ठेवण्यास शिकलें पाहिजे, व आईबापांनीं त्यांच्या विश्वासास स्वतां पूर्णपणें पात्र होण्यास झटलें पाहिजे. लहान मुलांचा विश्वास बसवून घेणें, त्यांच्या लहानपणच्या इच्छा व उमेदी यांचें निरीक्षण करून त्या लक्षांत आणणें, त्यांच्या मनांतील आशा, त्यांच्या चिंता, त्यांचीं सुख-दुःखें जाणणें, दिवसानुदिवस उमलत जाणाऱ्या व आपलें निर्मल स्वरूप प्रकट करणाऱ्या या बालपुष्पाच्या नूतन पाकळ्यांचा विकास कसकसा होत चालला आहे हें पाहत जाणें;— ह्या गोष्टी कमी महत्वाच्या नाहींत. हे आई! तुझ्या मनांत

अपत्यांबद्दल खरी कळकळ व आस्था नसेल, तर त्यांच्या विचारांस चांगलें वळण तुला कसें लावितां येईल? त्यांच्या उमेदींस व इच्छांस योग्य दिशा लावून त्या तुला दृढ कशा करितां येतील? तारुण्यांतील पाहिजे तिकडे जोरानें वाहत जाणाऱ्या त्यांच्या मनोवृत्ति मर्यादित करून त्यांचा ओघ योग्य दिशेकडे तुला कसा वळवितां येईल! व त्यांच्या मनांत थोर हेतूंची प्रेरणा तुला कशी करितां येईल?

सरते शेवटीं "आनुवंशिक संस्कार आणि हिंदुस्थानची पुनर्धारणा*" या विषयावर एका विद्वान् गृहस्थाच्या लेखांतील कांहीं ठळक ठळक गोष्टी वाचकांच्या मननासाठीं त्यांच्या पुढें ठेवून व त्यांत किती ग्राह्यांश आहे हें विचारानें ठरविण्याचें काम त्यांच्यावरच सोंपवून हा भाग संपवितों:—

कित्येक शारीरशास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं, मुलीमध्यें बापाची प्रकृति जास्त उतरते व मुलामध्यें आईची प्रकृति जास्त येते, पुष्कळ मोठमोठ्या नामांकित गृहस्थांचे मुलगे त्यांच्या तोडीचे न बनतां अगदींच साधारण निपजतात. ही गोष्ट वर प्रदर्शित केलेल्या मतास बळकटी आणणारी आहे. कित्येक शास्त्रज्ञांचें मत या मताच्या अगदीं उलट आहे. पण शास्त्रीय वादाच्या गोंधळांत न पडतां या गोष्टीचा निःपक्षपातानें विचार केला तर, वंशपरंपरा मनुष्याच्या अंगीं अर्धे गुणावगुण त्याच्या आईकडून व अर्धे बापाकडून आलेले असतात, हें अगदीं निर्वि-

*" Heredity and Regeneration of India."

वाद ठरेल. तर मग एका मागून एक जन्मास येणाऱ्या पिढीच्या आईबापांपैकीं अर्धा भाग (आई) जर पिढ्यानपिढ्या शिक्षणाचा संस्कार न होतां केवळ अज्ञानांधकारांत घोरत राहिला, तर त्याचा दुष्परिणाम तदुत्पन्न संततीवर घडून आल्यावांचून राहील काय ? कित्येक ठिकाणीं स्त्रियांस अज्ञान ठेवण्याचीच नव्हे तर त्यांस गोषांत ठेवण्याची घातक चाल आहे. या गोषाच्या पद्धतीनें त्यांची अवनति तर इतकी होत जाते कीं, त्या केवळ नीच गुलामाच्या स्थितीस येऊन पोंचतात. त्यांची स्वतांची इतकी निकृष्टावस्था झाल्यावर त्यांपासून होणाऱ्या मुलाबाळांची त्याहून वेगळी स्थिति होईल, हें मनांत सुद्धां आणावयास नको. मनास व शरीरास आलेला थकवा नाहींसा करून त्यांस ताजा दम आणणारा, त्यांचे निरनिराळे व्यापार यथास्थित चालवून प्रकृति निकोप ठेवणारी व एकंदर जीवनास अत्यंत उपयुक्त,–अशा शुद्ध हवेस बिचाऱ्या निरंतर नागविल्या जातात. गोषांतलि दूषित हवेंत काल कंठणाऱ्यांच्या पोटीं येणाऱ्या संततीवर अनिष्ट परिणाम कालान्तरानें तरी होतील हें सांगावयास नकोच. त्यांची अवनति म्हणजे सगळ्या जातीची अवनति होय. ही अनिष्ट चाल या देशांत प्राचीनकाळीं नव्हती असें दिसतें. या बाबतींत लोकांनीं केवळ मुसलमानांचें अनुकरण केलें आहे. प्राचीन आर्य लोकांमध्यें ही चाल नव्हती, हें उदाहरणांनीं दाखवितां येईल. सारांश, ईश्वराच्या अत्यंत अमोल व जीवनास अत्यंत अवश्य अशा देणगीचा–

हवेचा–यथेच्छ उपभोग न घेतां आल्यामुळें व ज्ञानरवीची आनंददायी उष्णता मेंदूस न मिळाल्यामुळें, कष्टमय बंदिवासांत जन्म काढणाऱ्या बिचाऱ्या अबलाजनांच्या मनाची व शरीर-प्रकृतीची धुळधाण उडत आहे, व अशी स्थिति सुरू असल्यामुळें हजारों–लाखों–अनर्थ गुदरताहेत. पण रूढीच्या शृंखला तोडण्यापुरतें मानसिक धैर्य जोंपर्यंत लोकांच्या अंगांत येत नाहीं तोंपर्यंत हे सर्व विचार मनांत आले न आले सारखेच.

ज्या भरतभूमींत संस्कृत वाङ्मयाचा सर्वत्र प्रसार होऊन जी जगतांतील अत्यंत विद्याचारसंपन्न राष्ट्रांमध्यें अग्रगण्य म्हणून सारखी गाजत होती, तीच भरतभूमि गेल्या हजार वर्षांत अगदीं गतप्रभ होऊन सारखी अवनतीस येत चालली आहे! इतर राष्ट्रांचा विचार मनांत आणितां असें कळून येतें कीं, तीं मोठ्या झपाट्यानें आपापला मार्ग पुढें काढीत आहेत व अशा भयंकर चढाओढींत भरतभूमि फारच मागें पडत चालली आहे. हें सर्व कशामुळें ? विद्याचारसंपन्नतेच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या प्राचीन ‘ग्रीस’ देशाससुद्धां टक्कर देणारें जें राष्ट्र होतें, काव्य, तत्त्वज्ञान व अशाच इतर गहन विषयांत पारंगत झालेलीं मानवरत्नें जेथें चमकत होतीं म्हणून ज्या राष्ट्रास अत्यंत गर्व वाटत असे, तेंच राष्ट्र मंदप्रभ होत होत इतकें खालीं येत चाललें आहे कीं, नांव घेण्यासारखें त्यांत कांहींच व कधींच झालें नसेल, असें वाटण्याचा काल येत चालला आहे!! असा प्रकार तरी कशामुळें घडत आला आहे? या ऱ्हासाचें अमुक एक कारण आहे असें

जरी कोणास खात्रीनें सांगतां येणार नाहीं, तरी जीं अनेक कारणें आहेत त्यांत स्त्रियांचा गोषा व त्यांची अज्ञान दशा हें एक कारण आहे असें कोणता समंजस मनुष्य म्हणणार नाहीं? प्रकृतीचे धर्म वंशपरंपरा नवीन पिढींत उतरत जातात, हा नियम जर खरा धरला (व तसा न धरण्याला कांहीं बलवत्तर कारण दिसत नाहीं) तर मग त्यांस अज्ञानदशेंत व गोषांत ठेवण्याची पद्धत भावी संततीच्या म्हणजे एकंदर राष्ट्राच्या अवनतीस कारणीभूत झालीच पाहिजे व त्यामुळें त्यांच्या शारीरिक, मानसिक व कदाचित् नैतिक शक्तीस सुद्धां कमीपणा येण्याचा संभव आहे. बुद्धिमत्ता व शरीरसामर्थ्य या दोन्ही गोष्टींची पूर्ण वाढ बाहेरील स्वच्छ, शुद्ध व मोकळ्या हवेच्या यथेच्छ उपभोगावर अवलंबून आहे. रात्रंदिवस घरांतल्या घरांत काल काढणाऱ्या स्त्रियांस गृहकृत्य कितीही करावें लागलें, तरी, त्यांच्या पतींच्या किंवा भावांच्या कामकाजासंबंधानें त्यांस यत्किंचित्ही माहिती झाली नाहीं, किंवा दररोजच्या संसारसंबंधीं कामापलीकडे त्यांस कधींच विचार करण्याचें सामर्थ्य आलें नाहीं, तर त्यांचीं मनें अगदींच संकुचित व संस्कारहीन राहतील. अशा तऱ्हेच्या चरित्रक्रमाचा परिणाम साहजिक असा होतो कीं, मुली जसजशा वाढूं लागतात, तसतंशी त्यांच्या वयाबरोबर शरीराची वाढ बरोबर रीतीनें होत नाहीं व त्यांच्या मनाचाही विकास व्हावा तसा होत नाहीं. अशा रीतीनें त्यांच्या शरीराची व मनाची दुर्बलता त्यांच्या बालकांत उतरत जाते व एकंदर राष्ट्रावर त्याचा दुष्परिणाम घडून तें ऱ्हास पावतें.

वर जें कांहीं म्हटलें आहे त्यास इतिहासांतल्या गोष्टींवरून बरीच बळकटी येते. पूर्वेकडील राज्यांचे त्वरित रीतीनें झालेले अभ्युदय व ऱ्हास ह्यांस तरी त्यांतील स्त्रियांस कोंडून ठेवल्यामुळें त्यांस आलेली अवनत दशाच कारण आहे, असें म्हणतां येईल. पूर्वेकडील राज्यांची एकंदर हकीकत लक्षांत आणिली असतां असें कळून येतें कीं, कांहीं हीन लोकांची टोळी एकत्र जमावी व एक जूट करून तिनें एखाद्या सुसंपन्न राज्यास धक्का देऊन त्यास खालीं पाडावें व त्या जागीं आपलें राज्य स्थापावें. अशा मंडळीनें कांहीं कालपावेतों राज्यलक्ष्मीचा उपभोग घेतल्यानंतर दुसऱ्या एखाद्या भिकार जातीनें त्या मंडळीवर उठून तीस पादाक्रांत करावें व आपण तिची जागा पटकवावी. या हीन जातीचा कालान्तरानें ऱ्हास व्हावयाचाच. सारांश, अभ्युदय होऊन कांहीं भरभराटीचा काल प्राप्त झाला म्हणजे वर्तनक्रमांत फेर पडून व ऱ्हासाच्या मार्गास लागून थोडक्याच वेळांत तें सर्वस्वी नाश पावावें. परंतु युरोपीय इतिहासाकडे दृष्टि फेकिली असतां असें दिसतें कीं, तिकडील राष्ट्रांस ऐश्वर्य, संपत्ति व अभ्युदय प्राप्त होऊन त्यांचा भरभराट झाला असतां हटकून त्यांस क्षीणता येतेच असें होत नाहीं. पूर्वेकडील राष्ट्रें ऐश्वर्य-गिरीच्या शिखरीं चढून राज्यलक्ष्मीचा यथेच्छ उपभोग घेत असतां, तेथील स्त्रियांस गोषांत ठेवण्याची चाल पडते व तीपासून सर्व राष्ट्रांस स्वाभाविकच क्षीणता येते व तें राष्ट्र कितीही मोठें असलें, तरी अरण्यांतून इतस्ततः परिभ्रमण करणाऱ्या

व शुद्ध हवेचा यथेच्छ उपभोग घेतल्यामुळें धडधाकट बनलेल्या, इतर जंगली व अडदांड जातींशीं टक्कर देण्यास अर्थात्च तें असमर्थ होण्याचा संभव असतो. हिंदुस्थानांतल्या इतर लोकां-प्रमाणें मराठे लोक आपल्या स्त्रियांस गोषांतील कोंदट हवेंत न ठेवितां घराबाहेर पडून खुशाल कामकाज करण्याची मोकळीक देत; आणि म्हणूनच मोगल राज्याचा या टोंकापासून त्या टोंकापर्यंत अवाढव्य विस्तार वाढला होता, तरी त्यास हात दाखवून टक्कर देण्याचें सामर्थ्य त्यांस आलें होतें, असें वाटतें. कालान्तरानें कांहीं इतर कारणांमुळें मराठी राज्या-चाही लय झाला ही गोष्ट वेगळी. अति प्राचीन काळीं ज्या आर्य लोकांनीं वायव्येकडून हिंदुस्थानांत प्रवेश करून येथील मूळच्या रहिवाशांस पादाक्रांत केलें व आपला अंमल स्थापिला त्यांच्या इतिहासावरून तरी हीच गोष्ट स्पष्ट होते. आर्यांच्या ताब्यांत हिंदुस्थान होतें, त्या वेळच्या वस्तुस्थितीची माहिती जी संस्कृत ग्रंथांवरून उपलब्ध आहे, तीवरून सुद्धां असें स्पष्ट दिसतें कीं, अर्वाचीन हिंदु लोकांचे पूर्वज व वाडवडील आपल्या स्त्रियांस कोंडून ठेवीत नसत. सारांश, ज्या बुद्धिमान् व तेजस्वी आर्यांनीं हिंदुस्थान जिंकून तेथें आपला अंमल पूर्ण बसविला व ज्यांनीं जगांत **संस्कृत** भाषा उदयास आणून तिचें स्वरूप अत्यंत प्रगल्भ करून सोडिलें, ते बंदिवासांत काल काढणाऱ्या अज्ञान आयांच्या पोटीं जन्मले नव्हते; तर, ज्या माता मनानें व शरीरानें चांगले सुदृढ मुलगे व तशाच मुली प्रसवत व ज्या युद्धकला व संस्कृत वाङ्मयाचा

जयजयकार करण्याचा मार्ग तयार करून ठेवीत, त्यांच्या पोटीं जन्मलेले असत.

कित्येकांचें असें म्हणणें पडेल कीं, गोषाच्या पद्धतीनें व स्त्रियांच्या अज्ञानानें व्यक्तींच्या व राष्ट्राच्या शारीरिक व मानसिक शक्तीस जरी कमीपणा येतो, तरी स्त्रियांची नीतिमत्ता कायम राहण्यास ही पद्धति अत्यंत उपयोगी आहे. त्यांस गोषांत न ठेवितां बाहेर कामकाजासाठीं हिंडू फिरू दिलें असतां, त्यांस कोणत्याही गोष्टींचा मोह पडणार नाहीं, हें खरें. पण मोह पाडणाऱ्या गोष्टींपासून त्या अलग राहिल्या असतां जरी वाईट कृत्यें कमी होण्याचा संभव आहे, तरी त्यामुळें सद्गुणाची प्रवृत्ति अधिक होईलच असें म्हणतां येत नाहीं. खरा सद्गुण म्हटला म्हणजे तो मोह पाडणाऱ्या वस्तु पुढें असतां त्यांच्या तावडींत न जातां त्यांशीं सामना करून त्यांच्याशीं टक्कर मारण्यांत आहे, त्यांपासून पळून जाण्यांत नाहीं, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

ज्या राष्ट्रांत ही घातक चाल आहे, त्यांची विद्येच्या कामांत, शास्त्रीय शोधांत, किंवा राजकीय हक्क संपादण्यांत इतर राष्ट्रांशीं चढाओढ लागली असतां, पहिल्या राष्ट्राची तुलना एक रिकामा हात पाठीमागें लपवून ठेवून फक्त दुसऱ्या एका हातानेंच लढाई मारणाऱ्या वीराशीं करितां येईल. अशा वीरास त्याच्या अंगच्या चातुर्यानें फारतर कांहीं काळपावेतों यशःप्राप्ति होईल; परंतु चिरस्थायी विजयश्री त्यास कधींच वरणार नाहीं.

भाग २ रा.

पत्नी.

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्रवै ध्रुवम् ॥

मनुस्मृति.

अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।
भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥

महाभारत.

प्रेमाचे नाना प्रकार आहेत. मातृप्रेमाचें वर्णन मागच्या भागांत झालेंच आहे. त्या प्रेमांत व पत्नीच्या किंवा कन्येच्या प्रेमांत किती साम्य आहे आणि किती **भिन्न**ताही आहे? मनुष्याचा शहाणपणा कितीही वाढला, तरी त्याला प्रचंड महासागराच्या खोलीचा जसा थांग लागत नाहीं, तद्वतच या महा मनोविकाराचा थांगही त्यास लागणें अशक्यच. मातृप्रेमांत नेहमीं जागृतता, अढळपणा, निरपेक्षता व दूरदर्शित्व इत्यादि थोर गुण दिसून येतात. पत्नीप्रेमाचीही गोष्ट तशीच आहे. या दोन्ही प्रेमांत साम्य आहे. तरी पण पत्नीप्रेम तें पत्नीप्रेम व मातृप्रेम तें मातृप्रेम. त्या प्रेमाची व या प्रेमाची जात एकच, पण त्यांत तारतम्य आहे. असें आहे, तरी प्रेमप्रेरित पत्नीच्या अंगीं आईपेक्षां कमी सहनशीलता असते, किंवा प्रसंग पडला असतां ती आपली कर्तबगारी कमी बजाविते, किंवा

हिताहिताला ती कमी जपणारी असते, असें कोणास तरी म्हणतां येईल काय? आई आपल्या अपत्यांकरितां जे हाल व कष्ट सोसण्यास तयार होईल, त्यापेक्षां पत्नी आपल्या पतीकरितां हाल सोसण्यास कमी तयार होईल काय? आपल्या प्रिय बालकाचा प्राण वांचविण्याकरितां त्याच्या वधार्थ तयार झालेल्या चांडाळानें उचलून धरलेलें शस्त्र व तें बालक यांच्या दरम्यान स्वतःच्या जीवाची पर्वा न धरितां धाङ्कन येऊन पडणाऱ्या आयांचीं उदाहरणें जशीं आपल्या वाचण्यांत किंवा ऐकण्यांत येतात, तशींच उदाहरणें पतीच्या प्राणाचें रक्षण करण्याकरितां तशीच थोर कृति करणाऱ्या–किंबहुना आपले प्राणसुद्धां खर्ची घालणाऱ्या–उदार पत्नींचीं ऐकण्यांत किंवा वाचण्यांत येत नाहींत काय? मुलें कृतघ्न निघालीं तरी त्यांच्या कृतघ्नतेबद्दल कोणापाशींही एक ब्र सुद्धां न काढितां तें सर्व विसरून जाऊन व त्याबद्दल क्षमा करून त्यांच्यावर असलेल्या प्रेमांत यत्किंचित् सुद्धां अंतर न होऊं देणाऱ्या आया जर आपणास माहीत आहेत तर पतीची गैरमर्जी झाली असतां, तो अत्यंत कोपायमान होऊन वाक्प्रहार–नव्हे, अति नीचतेनें लत्ताप्रहारही–त्यानें केला, किंवा करूं नये अशीं अत्यंत खेदकारक व अधमाधम कृत्यें धडधडीतपणें केलीं तरी तें चट्सारें विसरून जाऊन आमरण पतिव्रता राहिलेल्या पत्नी आपणाला ठाऊक नाहींत काय? सूर्यमालेंतील त्या त्या ग्रहांस सूर्यापासून उष्णता व प्रकाश मिळून त्यांचे व्यापार सुरळीत चालतात, त्याचप्रमाणें पत्नीप्रेमापासूनच इतर प्रेम उद्भवतें व पत्नीप्रेमानेंच त्याचें पोषणही होतें.

शीलवती पत्नीचें पतीवर किती निरपेक्ष प्रेम असतें व पतीकडून एकाद्या प्रसंगीं विशेष कडकपणाचें वर्तन घडलें तरी पतिप्रेमामुळें तें सर्व विसरून जाऊन केवळ तो आपला पति आहे याच बुद्धीनें पतीवर प्रेम ठेवून आपलें थोर वर्तन अखेरपर्यंत त्या कसें कायम ठेवितात, हें **श्रीराम**पत्नी **सीता** हिच्या थोर उदाहरणावरून स्पष्ट होत नाहीं काय? केवळ लोकापवादास भिऊन **श्रीरामानें सीतेस** घोर अरण्यांत कसें घालवून दिलें, हें सर्वांस विदित आहेच. बरें, स्वतःचा कोणत्याही प्रकारचा अपराध नसतां आपणावर असा भयंकर प्रसंग, म्हणून पतीवर रागावून तिनें तोंडावाटे एक अवाक्षर तरी काढिलें काय? "आजच हिला रथांत घालून घोर अरण्यांत सोडून ये" अशी वडील भावाची आज्ञा होतांच केवळ ती गुर्वाज्ञा म्हणून अलंघनीय, असें मनांत आणून **लक्ष्मणानें** तिला अरण्यांत नेलें व स्वामीची आज्ञा अशी आहे असें त्यानें मोठ्या कष्टानें व नाखुषीनें तिला सांगतांच ती मूर्च्छा येऊन धाडकन् खालीं पडली, **लक्ष्मणानें** महाप्रयासानें तिला शुद्धीवर आणिलें. नंतर तो त्या सर्व प्रकाराबद्दल अतिशय खेद प्रदर्शित करूं लागला. तेव्हां त्या सतीनेंच त्याचें सांत्वन केलें. 'तुझें उत्तरोत्तर कल्याण होवो' असा आशीर्वाद देऊन तिनें त्यास परत जाण्यास सांगितलें. जातांना त्यास तिनें निरोप सांगितला तो असा. 'माझ्या परमपूज्य सासूबाईस अनुक्रमें माझा प्रणाम सांगून त्यांस विनंति करा कीं, मी गर्भवती आहें, त्यागर्भाचें

अभीष्ट चिंतन करा.' तसेंच आपल्या प्रियपतीसही तिनें सांगून पाठविलें कीं, 'गर्भाचें संगोपन करावयाचें नसतें तर, आपल्या चिरस्थायी वियोगामुळें निष्फळ झालेल्या या माझ्या दुर्दैवी जीविताचा मी अव्हेर केला असता. पण असो, अशी जरी माझी विपन्नावस्था आहे, तरी प्रसूती नंतर आमरण तपस्विनी होऊन परमेश्वराचें ध्यान करून, त्याच्या चरणांपाशीं विनंति करीत राहीन कीं, पुढच्या जन्मीं पुनः आपणच माझे पति होऊन आपला माझा जन्मजन्मांतरीं वियोग न होवो.' (रघुवंश, सर्ग १६.) वाचकहो, गंभीरतेचें, मनोनिग्रहाचें, सहनशीलतेचें व पतीविषयींच्या निस्सीम प्रेमाचें हें हृदयंगम चित्र नव्हे काय? पतीच्या वनवासाच्या प्रसंगीं 'तूं मजबरोबर येऊं नको, अरण्यवास तुला सोसावयाचा नाहीं,' असें आग्रहानें तो म्हणत असतां, त्याच्या समवेत रानावनांतून, कांट्याकुट्यांतून, स्वतःच्या जीवितावद्दल उदास राहून, हिंडण्यास ती भ्याली नाहीं; इतकेंच नव्हे तर स्वतःचें वर्तन अतिशय शुद्ध—अतिशय निर्मल असतांही, घरांतून बाहेर काढून घोर अरण्यांत हद्दपार करण्यापर्यंत जरी मजल येऊन पोहोंचली तरी "जन्मांतरेऽपि त्वमेव भर्ता' असा निदिध्यास आमरण करण्याचा ठाम निश्चय ती करिते! केवढी विस्मयजनक पतिनिष्ठा ही!

पतीची गैरमर्जी झाल्यामुळें होणारा जाच व गैरसोयी सहन करून त्या त्या विपत्तींनीं न गांगरतां ज्या सतींनीं आपल्या पातिव्रत्याचा ध्वज उभारला, व सदाचरणाच्या जोरावर ज्या

लोकांच्या स्तुतीस पात्र झाल्या, अशा स्त्रीरत्नांमध्यें **मिराबाईची** गणना अवश्य केली पाहिजे.

शूरपणांत व लष्करी चातुर्यांत नांवाजलेल्या आणि कडव्या मुसलमान वीरांशीं कित्येक वर्षें झुंज घेत राहणाऱ्या **राजस्थानांत** जीं अनेक स्त्रीरत्नें चमकून गेलीं, त्यांपैकीं **मिराबाई** ही एक होती. स्त्रीजातीस केवळ भूषण होऊन बसलेल्या ह्या साध्वीचें नांव या आर्यभूमींत ज्यास ठाऊक नाहीं, असा मनुष्य विरळाच. केवळ तिचें नांव ठाऊक आहे इतकेंच नव्हे, तर या अफाट देशाच्या प्रत्येक प्रांतांत व विशेषेंकरून जेथें जेथें **हिंदी**भाषा बोलतात, तेथें तेथें कवनांतून व निरनिराळ्या गायनांतून तिचे नांवाचा घोष ऐकूं येतो—व हिचीं काव्यें वाखाणलीं जातात,— कित्येक तर हिला अवतारी स्त्री समजून देवीप्रमाणें पूज्य मानतात. **सीते**वरील प्रसंगासारखाच जवळ जवळ प्रसंग या सतीवर दुर्दैवानें येऊन बेतल्यावर हिचा मनोनिग्रह व ठाम निश्चय कसा कायम राहिला, हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल.

राजस्थानांतील अति संभावित कुलांत **मिराबाईचा** जन्म झाला. **मिराबाई** अति रूपवती होती. **चितोड**च्या महाराण्याच्या राजमंदिराला शोभा आणण्यासारखें हिचें अनुपम सौंदर्य असल्यामुळें राजपुत्र **कुंभसिंगा**शीं तिचा विवाह झाला.

अनुरूप स्वभाव, समान अभिरुचि, परस्परप्रेम, राजलक्ष्मीचें तेज, इतक्या गोष्टींचें संमेलन एका ठिकाणीं झाल्यावर संसारांत

आणखी बहार ती कोणती पाहिजे? सुदैवानें **मिराबाई** व **कुंभसिंग** या जोडप्यास अशी सर्व प्रकारची अनुकूलता होती. त्यांतही विशेष गोष्ट ही कीं, उभयतां पतिपत्नीस काव्याची फार गोडी होती. इतकेंच नाहीं, तर तीं दोघेंही स्वतः कविता करीत. उभयतांचा वेळ कविता म्हणण्यांत व नवीन काव्य रचण्यांत जाई. परंतु उभयतांच्या काव्यांत एक मोठा विशेष बनत चालला होता. तो हा कीं, **कुंभसिंगाच्या** वाग्देवतेचा रोंख नेहमीं ऐहिक सुखाचीं वर्णनें लिहिण्याकडे असे; व इहलोकची यात्रा केवळ सुखावह झाली म्हणजे मनुष्यानें सर्व मिळविलें, इतकाच त्यांतील आशय असे. पण **मिराबाईच्या** वाग्देवतेचा प्रकार याहून अगदीं भिन्न असे. तिचें उड्डाण याहूनही उच्च प्रदेशाकडे असे. ऐहिक सुखास्वाद क्षणभंगुर, म्हणून कमी दर्जाचा, हें तत्व सदासर्वकाळ चित्तांत बाळगून, अखंड व चिरस्थायी पारलौकिक सुखाची थोरवी गाण्यांत तिची वाग्देवता दंग असे. भगवन्नामाचा महिमा व उच्च प्रकारचा नीतिबोध, हाच प्रकार तिच्या काव्यांत पूर्णपणें भरलेला आढळतो.

महाराण्याच्या मरणोत्तर **कुंभसिंग** राजपदारूढ झाले व **मिराबाईला** राज्ञीपद आलें. याप्रमाणें विशेष स्वतंत्रता मिळाल्यावर, या प्रेमळ पतीनें आपल्या सुज्ञ पत्नीचा धर्माकडे विशेष ओढा असल्यामुळें, त्या बाबतींत वाटेल तसा धर्म करून आपली मनीषा तृप्त करून घेण्याची तिला मुभा दिली.

स्वतः रचलेलीं कवनें, तीं उत्तम वठविण्याचें अंगचें सामर्थ्य, तीं निरनिराळ्या रागिण्यांत तालसुरांनीं गाण्यास गोड आवाजाचें साहाय्य,-इतक्या गोष्टींची अनुकूलता असल्यावर श्रोत्यांच्या मनोवृत्ति उचंबळून त्यांचीं अंतःकरणें गारेगार करून सोडण्यास उशीर तो कोणता? ती गात असतां तिजबरोबर तालसूर धरणाऱ्या तिच्या सहचारिणी तर इतक्या मोहीत होऊन जात व त्यांची चित्तवृत्ति इतकी गुंग होई कीं, या दृश्य जगताचा त्यांस अगदींच विसर पडे. यावरून **मिराबाईच्या** स्वतःच्या मनाची तंद्री परमेश्वराकडे लागून ती किती तल्लीन होत असेल याची कल्पना वाचकांस सहज होईल.

इतकी ईश्वरभक्ति मनांत बाणल्यावर राजमंदिरांतील विलास तिला निरर्थक वाटून त्यांचा तिला वीट यावा हें साहजिकच आहे. तिचा बहुतेक वेळ आतां देवळांत भजनपूजनांत जाऊं लागला. कसाही दुराचारी–कितीही भ्रष्ट–कसाही नास्तिक मनुष्य असला व **मिराबाईची** प्रार्थना सुरू असतां तो जर सुदैवानें मंदिरांत शिरला, तर त्याचा दुर्वृत्तपणा कमी होऊन त्यास पश्चात्ताप वाटे व धर्माकडे त्याचा कल होई.

याप्रमाणें या सतीची कीर्ति चोहींकडे पसरत **दिल्लीस** मोंगल बादशहाच्या कानावर गेली. त्या वेळीं **दिल्लीच्या** तक्तावर जगत्प्रसिद्ध **अकबर बादशाहा** होता. गुणग्राहकतेबद्दल या थोर बादशहाची आख्या असल्यामुळें त्याच्या पदरीं त्या त्या विद्येंत, शास्त्रांत व कलांत पारंगत असे पुष्कळ गुणी लोक

असत, व त्यांची संभावनाही त्याच्याकडून त्यांच्या योग्यतेप्रमाणें होत असे.

मिराबाईबद्दल हकीकत बादशाहास कळल्यावर तिचीं कवनें ऐकण्याची त्यास इच्छा झाली. **चितोड**च्या बाणेदार व मानी महाराण्यानें त्या प्रबल अधिपतीचें प्रभुत्व जरी कबूल केलें नव्हतें, तरी यांच्या दरम्यान फारसें वैमनस्य नव्हतें. **मिराबाई**चीं कवनें ऐकण्यास कशीं सांपडतात हा बादशहास मोठा विचार पडला. कारण, **मिराबाई** पडली **हिंदुस्त्री,** त्यांतही ती चितोरची महाराणी. शूर **रजपुतां**चा मानी स्वभाव व त्यांची कर्तबगारी बादशाहास चांगलीच माहीत असे. एकदां एका मुसलमान बादशाहानें चितोडच्या राणीला पाहण्याची इच्छा धारण करून ती सफल करण्याचा त्यानें यत्न चालविला असतां, रजपुतांनीं कडव्या इमामांबरोबर दोन हात करून त्यांचा कुर्रा कसा जिरविला होता, व त्यांचा धुव्वा उडवितांना सर्व लोक मृत्युमुखीं पडले तरी हरकत नाहीं, पण आपला कृतनिश्चय बिलकूल सोडावयाचा नाहीं, हें कसें व्यक्त केलें होतें–ही गोष्ट **अकबर** विसरला नव्हता. ज्या महाराणीला पाहण्याची इच्छा त्या बादशाहास झाली होती, तिनें, यवनांच्या दृष्टीस पडून त्यांच्या अमंगल स्पर्शास्पर्शाचा विटाळ सहन करण्यापेक्षां स्वतःस जाळून खाक करून घेणें बरें असें वाटून, शहरांतील सर्व स्त्रियांबरोबर घेतल्या व अग्नि पेटवून त्यांत 'जय नारायण!' म्हणून आपल्या प्राणांच्या आहुति कशा

दिल्या होत्या, ह्याचेंही चित्र त्याच्या मनांतून नाहींसें झालें नव्हतें. तेव्हां **मिराबाईची** भेट घेऊन तिचीं कवनें ऐकण्या-बद्दल इच्छा प्रदर्शित करणें म्हणजे **रजपुतान्यांत** रण माजविण्याची तुतारी फुंकण्यासारखेंच होय, असें त्यास वाटलें. म्हणून बादशाहानें आपल्या पदरचे संगीतशास्त्रपटु–**तानसेन**–यांस बोलावून त्यांची सल्ला विचारली. तेव्हां त्या उभयतांचें असें ठरलें कीं, दोघांनींही हिंदुवेष घेऊन चितोडास जावें व ज्या मंदिरांत महाराणी भजन करीत असे तेथें जाऊन आपली इच्छा पूर्ण करावी.

याप्रमाणें ते उभयतां तपस्व्यांचा वेष घेऊन ज्या मंदिरांत **मिराबाई** भजन करीत असे त्या देवळांत शिरले. तिचें चित्तवेधक सुस्वर गायन व ईश्वराकडे लागलेली तिची तंद्री पाहून बादशहाचें व तानसेनाचें अंत:करण फारच वेधलें गेलें. बादशाहा आपली जागा सोडून उठला व त्यानें तिचे पाय गच्च धरून ‘मुक्ति मिळण्याचा मला उपदेश करा’—म्हणून तिला विनवूं लागला. परंतु आपण कोण आहों हें लवकरच मनांत आणून तो उठला, व बहुमोल रत्नांचा एक कंठा तिला देऊन म्हणाला, ‘अहो सन्माननीय बाई, या लहानशा नजराण्याचा आपण स्वीकार करावा व तो घेऊन देवाच्या गळ्यांत घालावा’ **मिराबाईनें** तो घेऊन त्या वेषान्तर केलेल्या बादशाहाकडे पाहिलें व म्हणाली ‘हा कंठा फार किमतीचा आहे. तर आपणासारख्या तपस्व्यां-जवळ हा कसा आला ? त्यावर बादशाहानें तिला सांगितलें कीं

'**यमुना** नदींत स्नान करतांना हा मला सांपडला; त्याच वेळेस संकल्प केला कीं ह्या देवाला हा अर्पण करावयाचा.' **मिराबा-ईनें** बादशाहाची ईश्वराबद्दल भक्ति पाहून त्याचे आभार मानिले, व यानंतर ते दोघेही **दिल्लीस** चालते झाले.

परंतु हा कंठा आपणावर केवढें अरिष्ट आणणार, आपणास केवढ्या संकटांत घालणार,–किंबहुना हा आपणास आपल्या प्रियपतीच्या समागमसुखासमुद्धां मुकविणार, हें **मिराबाईच्या** ध्यानींमनीं सुद्धां नव्हतें. ह्या अमोल रत्नहाराची बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरली. महाराण्यानें तो पाहिला; राज्यांतल्या मोठमोठ्या नामांकित जवाहिऱ्यांनीं त्याचें मोल दहा लाख रुपये ठरविलें; व एका जवाहिऱ्यानें तर **अकबर** बादशाहास विक-लेला हा कंठा आहे म्हणून स्पष्ट सांगितलें.

प्रत्यक्ष बादशाहा वेषान्तर करून आला ही एवढी महत्त्वाची गोष्ट कोठपर्यंत गुप्त राहणार? राजाच्या कानावर ती गेली. बादशहा वेष पालटून येऊन त्यानें राणीला स्पर्श केला व त्यानें तिला रत्नहार दिला, ही गोष्ट तोंडोतोंडीं झाली. राणीची अब्रू गेली, ती पतित झाली आणि आपल्या कुलाला तिनें बट्टा लाविला,–अशा कल्पनांनीं महाराण्यास पूर्ण घेरिलें. मग अर्था-तच मरणावांचून ह्या अपराधास दुसरी शिक्षाच नाहीं असा राजाचा हुकूम सुटला.

परंतु आबालवृद्धांपर्यंत सारखी प्रिय झालेल्या व सर्वांबद्दल कळकळ बाळगणाऱ्या महाराणीच्या वधास प्रवृत्त व्हावें कोणी?

या शिक्षेची बातमी तिजजवळ नेऊन पोहोंचविण्यास सुद्धां कोणाची छाती होईना.

सरतेशेवटीं महाराण्यानें स्वत: तिला पत्र लिहिलें व आपला आशय त्यांत नमूद केला. एके दिवशीं पूजा आटोपून मंदिरांतून ती घरीं परत येत असतां एका गृहस्थानें तें पत्र तिला दिलें. पत्र वाचून–'एकदा महाराण्याला भेटण्याची इच्छा आहे तेव्हां ही इच्छा पूर्ण होईल किंवा नाहीं?' असें तिनें त्याला विचारिलें. त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं 'पत्रावरून स्पष्टच दिसतें आहे कीं, महाराण्याची इच्छा राणीसाहेबांला इतउत्तर भेटण्याची नाहीं.' तेव्हां महाराणीनें राण्यास परत निरोप पाठविला; तो असा— 'महाराण्यास कळवावें कीं आपली पत्नी आपला हुकूम बरोबर पाळील.'

त्या दिवशीं सुमारें मध्यरात्रीं ती उठली. तिनें आपला पोषाख बदलला. ती एक साधी साडी नेसून राजवाडा सोडून निघाली. तो रात्रीचा समय असल्यामुळें जिकडे तिकडे सामसूम होतें. ज्या स्थळीं आपण आयुष्याचे बरेच दिवस काढल्यामुळें जेथील प्रत्येक वस्तु प्रिय वाटत होती त्या स्थळास शेवटचा रामराम ठोकतांना तिचें अंतःकरण व तिच्या मनोवृत्ति कशा उचंबळल्या असतील, याची कल्पना वाचकांनीं आपल्याशींच करावी. सर्वप्रकारच्या सुखविलासांनीं पूर्ण भरलेला राजवाडा, प्राणापलीकडे तिजवर प्रेम करणारा तिचा सखीगण, व फार दिवसांच्या सहवासामुळें प्रिय वाटणारी ती ती वस्तु

इत्यादिकांस शेवटचा प्रणाम करून निघून जातांना तिला फार फार दुःख वाटलें, यांत फारसें नवल नाहीं. पण तिचा खंबीर निश्चय झाला तो झाला. तिला तो कृतनिश्चय आपलें पवित्र कर्तव्य वाटूं लागला. त्यापासून पराङ्मुख होणें म्हणजे महा-पाप आहे असें तिच्या मनानें पक्कें घेतलें.

तो रात्रीचा समय होता, तरी कशाचीही भीति मनांत न धरितां ती एकदम नदीतीराला येऊन पोहोंचली; व परमेश्वराच्या चरणीं मनाची तन्द्री लावून तिनें एकदम नदींत उडी टाकिली. तत्काळ ती बेशुद्ध झाल्यामुळें पुढें काय झालें हें तिला मुळींच कळलें नाहीं; मात्र तिच्या डोळ्यांसमोर काजवे चमकून कांहींतरी तेजोमय आकृति दिसल्याचा तिला भास झाला. तसेंच तिच्या कानावर असे शब्द आलेः '**मिरा**, आपल्या पतीची आज्ञा पाळण्यासाठीं तूं जीव दिलास. पण तुझ्या हातून ह्याहीपेक्षां कांहीं मोठें कृत्य घडावयाचें आहे. जा व तें करण्याच्या तयारीला लाग.'

परमेश्वर रक्षण करणारा असला म्हणजे प्रत्यक्ष मृत्यु पुढें आला असतांही कसें प्राणरक्षण होतें हें सांगवत नाहीं. **मिराबाई** डोळे उघडून पाहूं लागली तों तिला कळून आलें कीं, आपण नदीच्या कांठीं पडलेलों आहों; चोहोंकडे सूर्यप्रकाशामुळें प्रत्येक वस्तु चमकत आहे; या स्थलीं शांतता असून येथील गंभीर स्तब्धता, फक्त दुथडी भरून वाहत जाणाऱ्या नदीच्या आवाजानें भंग पावत आहे. ती उठून बसली व सभोंवार पाहूं

लागली. परंतु तिच्या दृष्टीस चिटपाखरूंसुद्धां पडलें नाहीं. ती उठून रस्ता निघेल तिकडून जाऊं लागली. जातांना, परमेश्वराचा धांवाच आपला वाटाड्या होय असें समजून परमेश्वर चिंतन करीत ती निर्भयपणें मार्ग क्रमूं लागली. फिरतां फिरतां तिला गवळ्यांचीं मुलें गाई चारतांना दिसलीं. तेव्हां तिनें प्रेमळपणानें म्हटलें;—'लाडक्यांनो! तुम्हांला वृंदावनाचा रस्ता ठाऊक असेल तर मला दाखवा बरें.' तिची ती शांतवृत्ति पाहून व गोड आवाज ऐकून त्या मुलांस तिजबद्दल सन्मान वाटून यांनीं तिला दूध काढून प्यावयास दिलें व रस्ता दाखविण्याकरितां तीं तिजबरोबर गेलीं.

याप्रमाणें ती भगवन्नामस्मरण करीत आपला मार्ग क्रमूं लागली. ज्या ज्या खेड्यांवरून ती गेली त्या त्या खेड्यांतील लोक तिच्या प्रेमळ भजनानें प्रसन्न होत. तिचा तो गोड आवाज, तिचें मधुर गायन व तिचें तें प्रेमळ भजन, तिची ती शांतवृत्ति, प्रवासामुळें अंगीं आलेली म्लानता, इत्यादि गोष्टी मनांत येऊन त्या लोकांच्या मनावर कांहीं चमत्कारिक परिणाम घडून येई. तिला लागेल ती मदत देण्यास ते तयार होत पण दुधावांचून ती कांहींएक घेत नसे. शेतांत व खळ्यांत काम चाललें असतां तें सोडून स्त्रिया व पुरुषही, गायन करीत करीत कोण जात आहे, हें पाहण्याकरितां धावत येत. तसेंच, मुलांनीं व मुलींनीं आपापले खेळ सोडून हिच्यामागें हरि, हरि म्हणत जावें.

याप्रमाणें दिवसानुदिवस तिच्या भक्तांची संख्या वाढत वाढत बरीच वाढली. सरतेशेवटीं ती **वृंदावन** शहरांत शिरली. तेव्हां **कैलासां**तील **गिरिजा** देवीच आपल्या परिचारिकांसह येथें प्रकट झाली कीं काय असा तेथील लोकांला भास झाला. असो.

वृंदावनांत **रूपगोसावी** नांवाचा एक बैरागी होता, त्याच्या मठांत **मिराबाई** जाऊन राहिली. तिची ईश्वरपरायणता, सौजन्य, प्रेमळ भजन व सात्विक वृत्ति मनांत आणून त्या गोसावी महाराजांची पूर्ण खात्री झाली कीं, ही साधारण स्त्रियांपैकीं नसून हिच्या मनाचा पल्ला दूरवर गेला आहे व आबालवृद्धांच्या मनांत हिजबद्दल जो पूज्यभाव वसत आहे तो यथार्थ आहे. **रूपगो**-साव्याबद्दल **मिराबाई**च्या मनांत सन्मानबुद्धि होती. कोणी म्हणत, गोसावी महाराज **मिराबाई**चे शिष्य झाले; कोणी म्हणत कीं **मिराबाईनें** **रूप**गोसाव्यापासून गुरूपदेश घेतला.

केवळ लोकापवाद टाळण्याकरितां **श्रीरामचंद्रानें सीता-बाईचा लक्ष्मणाकडून** त्याग करविल्यानंतर त्या महासतीला आश्रय देऊन तिचें सांत्वन करणारा जसा यतिवर **वाल्मीकि**; तसाच बहुतेक प्रसंग **मिराबाई**वर येऊन बेतल्यावर त्या महासाध्वीला त्या **रूप**गोसाव्याच्या रूपानें **वाल्मीकि** ऋषि आढळून आले.

मिराबाईचा भजनपूजनाचा क्रम येथेंही अव्याहत चालू राहिला. तिच्या कवनाचा प्रसार सर्वत्र झाला. **हिमालय** पर्वताच्या आसपास **गंगायमुने**च्या तीरीं **पंजाबां**तून, दूरच्या

महाराष्ट्रांतून सुद्धां तिच्या कवनांच्या पाठाचा ध्वनि कर्णपथावर येऊं लागला. तिचा कीर्तिपरिमल सर्वत्र पसरला. आपल्या थोर पत्नीची सर्वत्र वाहवा झालेली ऐकून महाराण्याची पक्की खात्री झाली कीं, आपल्या कुलाला तिनें कलंक तर लावला नाहींच; परंतु उलटपक्षीं तिच्यायोगानें त्याचा कीर्तिध्वज मोठ्या थाटानें व गौरवानें उभारला गेला आहे. **सीतेचा** त्याग केल्यावर पश्चात्ताप वाटून "हा हा देवी हृदय फुटतें' असा विलाप करणाऱ्या **रामचंद्रास** जसें मन जाच करूं लागलें किंवा घरीं आलेल्या **शकुंतलेचा** धिःकार करून तिला वनवास कंठावयास लावणाऱ्या व नंतर दीनस्वरानें रुदन करणाऱ्या दुष्यंताप्रमाणें, यावेळीं महाराणा **कुंभसिंग** याच्या मनाची स्थिति झाली.

शेवटीं महाराण्यानें वेषांतरानें **वृंदावनास** जाऊन आपल्या पत्नीची क्षमा मागण्याचा बेत केला. त्यानें याचक वेष घेऊन मंदिरांत जेथें **मिराबाई** भजन करीत बसली होती, तेथें जाऊन तो तिजपाशीं भिक्षा मागूं लागला. तेव्हां **मिराबाई** म्हणाली 'मी स्वतः याचक आहें. माझ्याकडून तुला काय मिळणार ? राणा म्हणाला 'खरा याचक मदतीकरितां याचकाकडेसच जातो.' हें ऐकून 'तुला काय पाहिजे ?' म्हणून तिनें त्यास विचारलें. तेव्हां राण्यानें आपलें खरें स्वरूप प्रकट केलें. तें पाहतांच **मिराबाईनें** त्याचे पाय धरिले व–'मज दिनाची आपणास आठवण झाली काय ?' म्हणून गहिंवरून विचारिलें. त्यावेळीं परस्परांच्या मनोवृत्ति कशा उचंबळल्या असतील याची कल्पना वाचकांनींच करावी.

प्रियपत्नी, लडिवाळ अपत्यें व प्रेमरज्जूनें एकत्र बद्ध झालेलें कुटुंब, हीं ज्यांस लाभतात ते या जगतीतलावर धन्य होत. खरोखर पाहतां विवाहित व कुटुंबवत्सल मनुष्यावर एकादें संकट किंवा विपत्तीचा प्रसंग येऊन गुदरला असतां त्याला आपल्या दुःखाची तीव्रता कमी करण्याचीं जितकीं साधनें उपलब्ध असतात, तितकीं एकाकी मनुष्यास प्राप्त होण्याचा संभव कमी.

विवाहित मनुष्याला सुदैवेंकरून काळ अनुकूल होऊन त्याची भरभराट झाली असतां, त्याचीं मुलेंबाळें व कुटुंबांतील इतर माणसें त्याच्या समवेत सुखानंदाचा यथेच्छ उपभोग घेतात. उलट स्थिति असल्यास, त्याच्या दुःखाचें परिमार्जन करण्यास तीं तयार असतात. जीं अल्पवयस्क व प्रिय बालकें चरितार्थाकरितां व प्रत्येक गरजेकरितां आपल्या बापाच्या तोंडाकडे पाहत असतात, त्यांच्याकरितांच मेहनतीनें कामधंदा करण्यास त्यास वारंवार उमेद धरावी लागते. त्याच्या दुःखाची तीव्रता कमी होण्याचें दुसरें विशेष कारण असें कीं, जगांतल्या निरनिराळ्या व्यक्तींशीं त्याचे व्यवहार चालू असतां बरे वाईट प्रसंग येतात, त्यांत सर्व गोष्टी त्याच्या इच्छेप्रमाणेंच घडतात असें होत नाहीं. केव्हां निराशेनें, केव्हां मानखंडनांनीं किंवा आपणास न रुचणाऱ्या अशा कैक गोष्टींनीं मन क्षुब्ध होण्याचे प्रसंग अपरिहार्य असतात. अशा समयीं घरीं प्रियपत्नीच्या त्या त्या समयास योग्य अशा मृदुभाषणांनीं व नानाप्रकारच्या बाललीलांनीं, त्याचें त्रस्त चित्त शांत व प्रसन्न होतें. त्यास वाटूं लागतें कीं, बाहेर

असतां आपणास कितीही दीनतेचे व निराशेचे प्रसंग काढावे लागले तरी घरीं प्रेमबद्ध असें एक लहानसें कुटुंबरूपी राज्य आहे व त्याचे आपण अधिपति आहों. असा विचार मनांत येऊन त्याचा स्वाभिमान जागृत राहतो व जीवनार्थ कलहास लागणारी ताजी उमेद त्यास येण्याचा संभव असतो.

परंतु सड्या मनुष्याची स्थिति याहून फार भिन्न असते. एकलकोंडेपणामुळें निरुत्साह असण्याचा त्याच्या ठिकाणीं संभव ज्यास्ती ज्याप्रमाणें एकाद्या सुशोभित राजवाड्यांत वस्ती करावयास कोणीच नसल्यामुळें तो प्रथम अगदीं मंदप्रभ व शून्य वाटतो आणि नंतर ओस पडतो, त्याचप्रमाणें सड्या मनुष्याच्या अंतःकरणाची स्थिति होत जाण्याचा संभव असतो.

एका गृहस्थाविषयीं एक गोष्ट वाचण्यांत आली. ती वरील विधानाच्या समर्थनास बरीच उपयोगी असल्यामुळें येथें दिली आहे.

हा गृहस्थ एक धनाढ्य व्यापारी होता. त्याचा व्यापार बहुतेक परदेशांशीं चालत असे. सर्व गोष्टींची अनुकूलता असल्यामुळें चिंता किंवा दुःख हें त्यास ठाऊकही नव्हतें. प्रकृति निकोप, शरीराची एकंदर ठेवण सुरेख, ऐन तारुण्याची उमेद, विद्येची अभिरुचि, मार्मिकता इत्यादि बहुतेक गोष्टींचें त्याचे ठिकाणीं संमेलन असल्यामुळें त्याचे दिवस आनंदांत जाऊं लागले.

सुदैवेंकरून ज्या युवतीशीं त्याचा विवाह झाला होता तीही त्याच्या सर्व वैभवाला व एकंदर थाटाला साजेशी केवळ सद्गु-

णांची खाणच होती. लक्ष्मीच्या तेजाचा लखलखाट सर्व घरभर असतां व तें हरतऱ्हेच्या सोयींच्या, इतकेंच नव्हे, तर नाना विलासांच्या गोष्टींनीं विराजत असतां, या रंगेल जोडप्याच्या सदभिरुचीनें इहलोकींचें तें इंद्रभुवन बनलें तर काय आश्चर्य ? आपल्या सर्व स्थितीस अनुरूप असें शिक्षण तिला देऊं, तिच्या पवित्र व उदार मनास क्षुद्र विचारांचा किंवा नीच कल्पनांचा विटाळ सुद्धां होऊं नये म्हणून तिच्या वाचण्याच्या पुस्तकांची निवड आपण स्वतः फार बारकाईनें करूं, तिच्या गायनाच्यावेळीं योग्य सूरभरणा होऊन तें ज्यास्ती कर्णमधुर करण्याकरितां जीं वाद्यें लागतील, त्यांची परीक्षाही चांगल्या मार्मिकांकडून करवूं, आपल्या प्रियकोमलांगीच्या कल्पना, तिचे विचार व तिचे एकंदर व्यवसाय तिच्या बुद्धीस व अंतःकरणास उन्नतस्वरूप आणण्यास कारण होतील असें वळण आपण तिला लावूं ; सारांश, तिचा आयुष्यक्रम असा थाटलेला पाहून एकाद्या अप्सरेच्या सुद्धां मनांत तिजबद्दल स्पृहा उत्पन्न होईल, एथपर्यंत आपण मजल आणून सोडूं ; अशा आपल्या भावी आनंदाचा चित्रपट खुलविण्यांत तो वारंवार दंग होत असे, व आपल्या इच्छेप्रमाणें तो हळू हळू त्या तयारीसही लागला.

या पतिपत्नीच्या स्वरूपांत जी भिन्नता दिसून येत असे, त्या भिन्नतेमुळेंच हें जोडपें विशेष रीतीनें खुलत असे. पति अद्भुतप्रिय असून कांहींसा गंभीर असे. पत्नीची वृत्ति फारच आनंदी असून तिची उल्हासवृत्ति तर फारच लोकोत्तर होती. केव्हां

केव्हां त्यानें तिजकडे हर्षयुक्त होऊन मुकाट्यानेंच पहात बसावें. त्यावेळीं तिच्या अत्यंत उत्साहजनक वृत्तीमुळें त्याचें ती केवळ आनंदस्थान बने. तिचें मधुर गायन ऐकून किंवा तिनें काढलेलें एकादें छानदार चित्र पाहून कोणी वाहवा-करून मान डोलविली असतां, आपल्या कृतीचा परिणाम आपल्या पतीवर काय होतो हें पाहण्याकरितां तिची दृष्टि त्याच्या चेहऱ्याकडे लागून राहत असे. जणूं काय त्याचा अभिप्राय, त्यानें दाखविलेली मान्यता व पसंती विशेष महत्त्वाच्या आहेत असें तिला वाटत असे. तिचा तो नाजूक व सडपातळ बांधा आणि त्याचें तें भव्य व तेजःपुंज शरीर यांमधील भिन्नताही मोठी चित्ताकर्षक दिसे. प्रेमळ दृष्टीनें भक्तिपुरस्सर ती त्याच्या-कडे पहात असतां आपणावर सर्वथैव अवलंबून असणाऱ्या आपल्या कोमलांगीचे आपण कैवारी आहों असें वाटून आनंद व अभिमान या दोन्ही मनोविकारांच्या छटा त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत. सारांश, संसारांतील कालक्रमणा मोठ्या उमेदीनें करण्यास या पतिपत्नीला जशीं साधनें अनुकूल होतीं, तशीं फार फार थोड्यांस असण्याचा संभव असेल.

तथापि, या जगांत कोणाची एकसारखी स्थिति सुखद राहते? 'सुखदुःखें हीं चक्रन्यायें येती' या सर्वसाधारण नियमास अनुसरून या गृहस्थावर धंद्यासंबंधानें संकटें को-सळून तो दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडला. परदेशांशीं त्याचा व्यापार असल्यामुळें त्याच्या मालाचीं जहाजें समुद्रांतून जात

येत असत; दुर्दैवानें ज्या मालांत त्याचे बहुतेक पैसे अडकले होते, अशा मालाचें एक जहाज समुद्रांत बुडालें. त्यामुळें त्याचा व्यापार अगदींच बसला व दारिद्र्याची उग्रमूर्ति त्याच्याकडे डोळे वटारून पाहूं लागली. त्याच्यावर येऊन बेतलेल्या सकटांचें एक अक्षरही कांहीं काळपावेतों त्यानें दुसऱ्याजवळ काढिलें नाहीं. परंतु अंतर्यामींच्या चक्राची हालचाल बाहेर दिसून येण्यास फारसा उशीर लागत नाहीं. चिंताग्नीनें होरपळल्यामुळें त्याची निस्तेज मुद्रा त्याच्या हृद्रोगाचें चित्र स्पष्ट करूं लागली. यामुळें तर त्याच्या मनांतील दुःख ज्यास्तीच असह्य होऊं लागलें. घरीं आल्यावर त्याला आपल्या प्रियतमेच्या समक्ष आपलें मानसिक दुःख झांकून ठेवून आनंदवृत्ति ओढून ताडून आणावी लागत असे. ही भयंकर गोष्ट ऐकून आपणाप्रमाणेंच तिचेंही अंतःकरण चिंताग्नीनें होरपळावयास लागेल, या दुःखामुळें होणारी तिची दीन स्थिति पाहण्याला कठोर छाती आपणास करितां येणार नाहीं, असें वाटून त्यास फार कष्ट होत. परंतु ही त्याची ढोंगी आनंदवृत्ति तिच्या तीव्र प्रेमदृष्टीस किती वेळ फसविणार ? तिच्या प्रिय भर्त्याच्या बदललेल्या चर्येनें व त्याच्या दीर्घ उसाशांनीं त्याच्या दुःखांचा पाढा तिजपुढें वाचण्यास आरंभ केला. त्याच्या मनास आराम वाटावा म्हणून ती आपली शिकस्त करूं लागली. परंतु त्यामुळें त्याच्या दुःखाचे बाण ज्यास्तीच आंत घुसून त्याला अधिकच पीडा करूं लागले.

जितकें जितकें अधिक हिचें प्रेमळ वर्तन त्याच्या दृष्टीस पडे, तितका तितका त्याच्या जिवाला जास्तीच चटका लागे आणि थोडक्याच दिवसांत हिची आपण पूर्ण दीनावस्था करणार असा निराशेचा विचार वारंवार मनांत येऊन तो वरचेवर विव्हल होऊं लागला. त्याच्या मनांत येई कीं, थोड्याच दिवसांत तिच्या ओठावरचें तें शोभिवंत मधुर मंदस्मित पार नाहींसें होईल, तिचें आल्हादकारक गायन बंद पडेल, चिन्ताग्नीला तिच्या डोळ्यांतील चमकणाऱ्या पाण्याची आहुति पडून ते निस्तेज होतील, आणि जें तिचें अंतःकरण आज आनंदांत गर्क आहे, तेंच माझ्याप्रमाणें जगांतील विपत्तीनें ग्रासलें जाऊन निरनिराळ्या चिंतांच्या ओझ्याखालीं दडपलें जाईल.

सरतेशेवटीं, एके दिवशीं तो आपल्या एका जिवलग मित्राकडे गेला व त्यानें त्याला आपली इत्थंभूत हकीगत मोठ्या दीनवाणीनें सांगितली. त्याच्या मित्रानें त्याची ती सर्व हकीकत ऐकून घेऊन त्याला विचारिलें, 'ही गोष्ट तुझ्या बायकोस ठाऊक आहे काय?' हा प्रश्न ऐकतांच तो खळखळा रडूं लागला. तो म्हणाला—'मित्रा, माझी तुला खरोखर कींव येत असेल तर ह्या गोष्टीबद्दल एक अक्षर सुद्धां तूं माझ्या बायकोजवळ बोलूं नकोस. मी जो इतका बावरलों आहें, तो केवळ तिचें कसें होईल याच विचारानें.

मित्र—कां बोलूं नको? लवकर म्हणा, उशीरां म्हणा, केव्हां तरी तिला ही गोष्ट कळलीच पाहिजे, ही गोष्ट फार

वेळ छपवून ठेवतां येणार नाहीं. आणि तूं स्वत: न सांगतां दुसरी कडून ती तिला कळली तर तिच्या मनाला ज्यास्त भयंकर धक्का बसण्याचा सभंव आहे. कारण अति भयंकर वार्ता जरी असली तरी ती ज्यांच्यावर आपलें प्रेम असतें त्यांच्या तोंडून ऐकली असतां, तिची प्रखरता पुष्कळ अंशीं कमी होते. शिवाय ही गोष्ट चोरून ठेवून तिच्या कळवळ्यापासून उत्पन्न होणाऱ्या सुखास तूं स्वत:ला आंचवून घेत आहेस. इतकेंच नाहीं पण परस्परांचे विचार व परस्परांच्या मनोवृत्ति परस्परांस नि:शंकपणें कळविणें हें जें एकमेकांचीं अंत:करणें एकत्र करून घेण्याचें मुख्य साधन आहे, त्यावर तूं घाला घालीत आहेस. तुझ्या मनाला अंतर्यामीं कांहीं तरी गुप्त टोंचणी लागली आहे हें तिला लवकरच उमगणार. खऱ्या प्रेमाला लपंडाव सहन होत नाहीं. ज्यांच्यावर प्राणापलीकडे प्रेम, त्यांच्यावर आलेलीं दु:खें जर खऱ्या कळकळीच्या माणसांपासून चोरून ठेविलीं, तर त्या कळकळीच्या माणसांचा मनोभंग होऊन त्यांना एक प्रकारचा अपमान वाटतो.

व्यापारी—पण मित्रा, तिला जर मी कळविलें कीं, तुझा पति दरिद्री झाला आहे, म्हणून तुला आतां सुखाच्या व चैनीच्या जिनसांना रजा दिली पाहिजे, समाजांतल्या बहुतेक सुखांस तुला मुकलें पाहिजे आणि त्याच्याबरोबर तुला हलाखींत राहून कोठें तरी एकीकडे आयुष्याचे दिवस कंठले पाहिजेत—तर तिच्या पुढच्या उमेदीस केवढा धक्का बसेल? तिचा अंत-

शात्मा कसा जमीनदोस्त होऊन जाईल! ज्या उच्च स्थितींत राहून सुखानंदांत रुळत असतां तिजकडे पाहून प्रत्येकाला कौतुक वाटलें असतें, त्या स्पृहणीय स्थितींतून तिला खेंचून बाहेर काढून कनिष्ठ स्थितीस मी नेऊन पोहोंचविलें आहे, असें तिला सांगणें म्हणजे केवढें जिवावरचें काम? हलाखींत दिवस कंठणें तिला कसें सहन होईल? श्रीमंतीच्या पूर्ण वैभवांत ती लहानाची मोठी झाली आहे, तिला गरिबीची स्थिति कशी सहन व्हावी? खरोखर या कनिष्ठावस्थेनें तिचा हृदयभेद होईल हें अगदीं निःसंशय!

याप्रमाणें तो आपल्या दुःखमय अंतःस्थितीचे उद्गार स्पष्ट-पणें बाहेर काढूं लागला. त्याच्या मित्रानेंही त्याला कांहीं एक अडथळा न करितां बोलूं दिलें. कारण बोलण्यानें दुःख बरेंच कमी होत असतें, असा सर्वत्र अनुभव आहे. त्याचें तें सर्व वारें निघून जाऊन तो स्तब्ध झाला. त्याच विचारांत तो कांहीं वेळ गर्क राहिला; तेव्हां त्याच्या मित्रानें हलकेंच तो विषय पुन्हा काढून त्यानें आपल्या बायकोस ती सर्व गोष्ट सांगावी, म्हणून त्यास मोठ्या आग्रहानें सांगितलें.

त्यानें मोठ्या कष्टानें होय म्हटलें. त्याचा मित्र म्हणाला– तुला ही गोष्ट तिच्यापासून चोरून ठेवितां येईल कशी? तुझ्या बदललेल्या स्थितीस अनुरूप अशी व्यवस्था तुला करितां यावी म्हणून तिला ती कळलीच पाहिजे. तुझी हलीची राहण्याची तऱ्हा तुला बदलली पाहिजे.

हे शब्द ऐकतांच त्या गृहस्थाचा चेहरा खरकन् उतरला. असें पाहून त्याचा मित्र म्हणतो–तुला त्याचें इतकें दुःख वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं. मला ठाऊक आहे कीं, त्वां आपल्या श्रीमंतीचा व्यर्थ भपका कधींच केला नाहीं. आपल्या स्थितीस अनुसरून तूं राहूं लागलास म्हणजे आपल्या मित्रांपैकीं कोणीही तुझी योग्यता कमी समजतील असें नाहीं. आणखी तुझ्या बायकोबरोबर आनंदानें कालक्रमणा करण्यास तुला एकाद्या भव्य वाड्यांतच राहिलें पाहिजे असें नाहीं.

व्यापारी—(हुंदका दाटून येऊन) तिच्या समागमानें एकाद्या भिकार झोंपडींत सुद्धां मला सुख होईल. (दुःखाचा उसासा टाकून) कशाही प्रकारची निकृष्टावस्था तिच्या समागमानें मला सहन करितां येईल, यांत शंकाच नको. परमेश्वर तिला दीर्घायु करो म्हणजे झालें.

मित्र—(पुढें येऊन व त्याचा हात गच्च धरून) तुझ्या समागमानें तिचीही तीच स्थिति होईल हें पक्कें समज. इतकेंच नाहीं, तर तुझ्यापेक्षांही तिला दुप्पट सुख व समाधान वाटेल. तिचा स्वाभिमान व आत्मसंयमनाचें सामर्थ्य वगैरे उत्तमोत्तम गुण दाखविण्यास तिला अवसर मिळेल. आजपर्यंत कधींच उघडकीस न आलेली अशी तिची नैसर्गिक उल्हासवृत्ति जागृत होऊन तुजबद्दल अंतःकरणापासून तिला वाटणारी सहानुभूति प्रकट होईल. कारण, तुजवर तिचें जें अत्यंत प्रेम आहे, तें निरपेक्ष आहे हें स्पष्ट दाखवितां आल्यामुळें तिला फारच आनंद

होईल. अरे, प्रत्येक सात्विक स्त्रीच्या अंत:करणांत अशी एक अद्भुत ज्योति असते कीं, ती अनुकूल काळांतल्या झकपकीनें किंवा तेजानें चमकत नाहीं. परंतु प्रतिकूल काळाच्या विपत्तीचा जिकडे तिकडे अंधकार झाल्याबरोबर ती पेट घेऊन आपली सर्व प्रभा बाहेर टाकिते. कोणत्याही मनुष्याला आपल्या पत्नीच्या सहवासांत तीव्र विपत्तीचा पूर्ण अनुभव येईपर्यंत, आपली पत्नी आपल्या हितास किती जपणारी आहे याची कल्पना त्यास होत नाहीं.

त्याच्या मित्राच्या या अलंकारिक व कळकळीच्या भाषणानें त्या गृहस्थाची अगोदरच जागृत झालेली कल्पनाशक्ति फारच उंचबळली. त्याला त्या व्यापारी गृहस्थाचा स्वभाव पूर्ण ठाऊक होता. म्हणून त्यानें त्याच्या मनावर जो एका प्रकारचा ठसा उमटविला होता तो तसाच कायम ठेवून, घरीं गेल्यावर आपल्या बायकोला साद्यंत वृत्तांत सांगून चिन्तेनें जड झालेलें आपलें अंत:करण हलकें करण्यास त्यानें त्याचें मन पूर्णपणें तयार केलें.

येथपर्यंत त्याच्या मित्रानें मजल आणून ठेविली तरी या गोष्टीचा परिणाम कसा काय होईल, याजबद्दल त्यास बरीच शंका वाटत होती. जी स्त्री आजपर्यंत सर्व प्रकारच्या सुखांत व चैनींत सारखी रुळत आलेली, ती या निकृष्टावस्थेच्या खडतर समयीं धैर्य धरून आलेल्या प्रसंगांतून पार पडेलच अशी खात्री कोणी द्यावी ? दुर्दैवानें तिच्या कपाळीं अकस्मात आलेल्या या हीन स्थितीबद्दल तिला अति वाईट वाटून आपली अतिशय

मानहानि झाली, असेंही तिला वाटेल. कदाचित् आजपर्यंत काढलेले सुखानंदाचे दिवस आठवून ती झुरणीसही लागेल. शिवाय दुर्दैवाचा घाला आला असतां साधारण स्थितींतल्या लोकांस त्याचें जितकें वाईट वाटण्याचा संभव असतो, त्याजपेक्षां वरच्याप्रतीचे लोकांस त्याजबद्दल असह्य दुःख होतें. म्हणून, दुसरे दिवशीं त्या गृहस्थाची व त्याच्या मित्राची जेव्हां भेट झाली, तेव्हां त्या गृहस्थाचा जीव वर निर्दिष्ट केलेल्या कारणांमुळें बराच धाकधुकींत होता. त्याचा मित्र आपल्या बायकोस सर्व वर्तमान कळवून त्याच्याकडे गेला तेव्हां त्यांच्यामध्यें पुढील संभाषण झालें.

गृहस्थ—कसें काय बुवा, तिला ही गोष्ट अगदींच असह्य वाटली काय?

मित्र—मुळींच नाहीं. तिनें शांतपणानें सर्व हकीकत ऐकून घेतली. ती ऐकून घेतल्यावर तिच्या मनाला कांहींसें बरें वाटलेंसें दिसलें. कारण तिनें लागलीच आपल्या स्वाभाविक प्रेमळपणानें मला प्रश्न केला कीं, 'आपल्या सर्व चिंतेचें कारण एवढेंच कां?' परंतु गरीब बिचारी! आमच्या स्थितींत जें भयंकर अंतर आतां पडणार, त्याची यत्किंचित् सुद्धां कल्पना तिला नाहीं. गरिबीची खरी कल्पना तिला मुळींच नाहीं. गरिबीच्या स्थितीचें वर्णन तिनें केव्हां केव्हां काव्यांत किंवा कादंबरींत वाचलें असेल. अझूनपर्यंत तिला कशाचीही ददात माहीत नाहीं. ज्या नानातऱ्हेच्या सोयींची व सुखांची सवय

तिला झालेली आहे त्या सोयींला व सुखांला ती अझून अंतरली नाहीं. दारिद्र्यांत उत्पन्न होणाऱ्या त्या त्या चिंता व विपत्ति आम्ही प्रत्यक्ष अनुभवूं लागूं, त्यांत होत असणाऱ्या मानखंडना आम्हीं पदोपदीं सोसूं लागूं, तेव्हांच तिची खरी परीक्षा होईल.

गृहस्थ—बायकोला ही गोष्ट सांगण्याचें जें अति जिवावरचें काम तें तर तूं केलेंस. त्याचप्रमाणें आतां मन घट्ट करून प्राप्त झालेल्या स्थितीस अनुरूप असें बिऱ्हाड करून इतर सर्व व्यवस्था एकदांची लावून टाक, म्हणजे मनाला एका प्रकारची स्वस्थता वाटेल. असा हा बदल थोडा अपमानकारक होईल. परंतु हें अपमानाचें दुःख एकदांच होईल; आणि तें अगदींच थोडक्या काळांत नाहींसेंही होईल. नाहींतर आपली खरी स्थिति बाहेर पडेल कीं काय अशी भीति मनाला नेहमीं त्रास देईल. विपत्तींत सांपडलेल्या माणसांस गरिबी जाचीत नाहीं इतकी श्रीमंत दिसण्याची हौस जाचते. वृथाभिमान व रिकामी झालेली पिशवी या उभयतांत कलह सुरू झाला म्हणजे सर्व प्रकारानें मनुष्यास त्रास होतो. पण इतका त्रास होऊनही अखेरीस खरी स्थिति बाहेर येते ती येतेच; व असें झालें म्हणजे श्रीमंतीचें ढोंग करणारा मनुष्य इतरांच्या तिरस्काराला जास्तीच पात्र होतो. म्हणून खऱ्या स्थितीप्रमाणें वागण्याचें धैर्य कर. पोकळ श्रीमंतीच्या थाटमाटास रजा देऊन साधारण गरीबगुरिबाप्रमाणें तूं वागूं लागलास म्हणजे मनास जाच करणाऱ्या गरिबीच्या स्थितीचें जें भय वाटतें तें नाहींसें होईल

याप्रमाणें वर्तन ठेवण्याची त्या व्यापाऱ्याची बहुतेक तयारी होतीच. कारण पोकळ डौल मारून नसता आव आंगीं आणावा हें त्यास पसंत नव्हतें. त्याच्या बायकोविषयीं म्हणाल तर, आपल्या बदललेल्या स्थितीप्रमाणें आपला वर्तनक्रम ठेवण्यास ती अगदीं तयारच झाली होती.

पुढें कांहीं दिवसांनीं एके दिवशीं संध्याकाळीं तो व्यापारी आपल्या मित्राकडे गेला. त्यापूर्वीं तो आपल्या राहत्या घराची व्यवस्था लावून टाकून एका जवळच्या वाडींत एक लहानसें घर घेऊन राहूं लागला होता. तो आपल्या मित्रास भेटावयास गेला, त्या दिवशीं आपल्या नवीन बिऱ्हाडासाठीं कांहीं सामान-सुमान पाहण्यांत गुंतला असल्यामुळें त्याला बरेंच काम पडलें होतें. त्याच्या नवीन थाटलेल्या बिऱ्हाडाला फार थोड्या जि-नसा लागल्या व ज्या लागल्या त्याही अगदीं साध्या होत्या. त्यानें आपल्या पूर्वींच्या बंगल्यांतलें सारें भपकेदार सामान विकून टाकलें होतें. त्यांपैकीं एक चीज मात्र त्यानें विकली नव्हती. ती कोणती म्हणाल तर, त्याच्या बायकोचा वाजवि-ण्याचा बीन होय. त्या वधुवरांचें प्रेम परस्परांवर बसत चाललें होतें, त्यावेळीं वधूनें हें वाद्य वाजवून आपल्या मंजूळ आवा-जानें अलाफ घेतला म्हणजे त्या गृहस्थाचें चित्त अगदीं वेधून जाऊन त्यास फारच आनंद वाटे. तेव्हां त्यांच्या प्रेमाचें हा बीन स्मारक असल्यामुळें त्यांच्यानें तो विकवेना, म्हणून तो ठेवून घेतला होता.

तो आतां आपल्या नवीन बिऱ्हाडाकडे जाण्यास तयार झाला होता. त्यानें तेथें पाठविलेल्या सामानाची नीटनेटकी व्यवस्था लावण्याच्या कामांत त्याची बायको सर्व दिवसभर गर्क होती. नवीन बिऱ्हाडीं काढण्याचे हे नवीनच दिवस असल्यामुळें त्या व्यापाऱ्याच्या मनाची थोडीशी चलबिचल उडाली होती. आपल्या मित्रानें आपल्याबरोबर यावें अशी त्या व्यापाऱ्याची इच्छा दिसल्यामुळें ते दोघे त्या नवीन बिऱ्हाडाकडे जाण्यास निघाले.

सर्व दिवसभर झालेल्या श्रमांमुळें तो व्यापारी अगदींच थकून गेला होता. कांहींवेळ ते उभयतां मुकाट्यानें चालल्यावर त्या व्यापाऱ्यानें एक मोठा उसासा टाकिला, आणि एकदम त्याच्या तोंडांतून असे उद्गार निघाले: 'अरेरे! काय ही माझ्या प्रियेची स्थिति!' त्याच्या मित्रानें विचारिलें–'कां, कायरे बुवा झालें तुझ्या प्रियेला ? ती कांहीं आजारी बिजारी झाली कीं काय ?' व्यापाऱ्यानें आश्चर्यचकित मुद्रेनें आपल्या मित्राकडे पाहून म्हटलें: 'अरे, अशा निकृष्टावस्थेला येऊन पोहोंचणें, अशा भिकार झोंपडींत दिवस काढावे लागणें व अशा हलाखींत राहून पडेल तें हलकें भारी काम उचलण्याची काळजी वाहण्यास भाग पडणें, म्हणजे कांहींच नाहीं काय ?'

मि०—तर मग आपल्या स्थित्यंतरामुळें ती झुरणीस लागली आहे कीं काय ?

व्या०—झुरणीस ? झुरणीस तर लागली नाहींच. परंतु ही गोष्ट ऐकिल्यापासून तर तिचें वर्तन इतकें गोड व तिची वृत्ति इतकी आनंदी झाली आहे कीं पुसूं नये. हल्लीं तर तिज-मध्यें प्रेमळपणा इतका दिसतो कीं तसा मी पूर्वीं कधींच पाहिला नव्हता. तसेंच तिचें सौजन्यही अलौकिकच झालें आहे.

मित्र०—अहाहा ! किती थोर व प्रशंसनीय स्त्रीरत्न हें ! मित्रा, तूं स्वतःला गरीब समजतोस, पण मला तर वाटतें कीं तुझ्यासारखा संपन्न व भाग्यवान फारच विरळा. ही लोकोत्तर स्त्री अति अगोलिक गुणांची केवढी खाण आहे, हें ह्या कालपा-वेतों तुला समजलें नव्हतें.

व्या०—होय, तूं म्हणतोस तें सगळें खरें. परंतु या नवीन सजविलेल्या बिऱ्हाडांतल्या तिच्या माझ्या पहिल्या भेटीच्या वेळीं जर ती आनंदांत राहिली, तर मात्र मग मला बरें वाटेल. खऱ्या अनु-भवाचा व परीक्षेचा दिवस हा आजचा आहे. अशा भिकार बिऱ्हाडांत तिचा आज प्रथमच प्रवेश झाला आहे. तसेंच त्यांतील भिकार सामानसुमानाची व्यवस्था लावण्यांत तिचा आजचा सर्व दिवस गेला आहे. घरगुती कामें कशीं श्रमाचीं असतात, हें तिला आजच कळून आलें आहे. राहत्या घरांत सुंदर, शोभिवंत व सोयीच्या वस्तु नसल्या म्हणजे सर्व देखावा कसा काय दिसतो, त्याचा अनुभव आज तिला नवीनच आहे. हा सर्व प्रकार मनांत आणून पुढील विपत्तीचें आणि हलाखीचें चित्र दृष्टीपुढें आणून त्याचा विचार करीत निराश व निरुत्साह होऊन ती बसली असेल !

त्या व्यापाऱ्यानें सांगितलेल्या प्रकारांत बराच तथ्यांश असल्या मुळें त्याच्या मित्राला त्याचें म्हणणें खोडून काढितां येईना. म्हणून ते उभयतां मुकाट्यानें पुढें चालूं लागले. कांहीं वेळ मोठ्या रस्त्यानें गेल्यावर ते एका बोळाकडे वळले. त्या बोळाच्या दोहों बाजूला झाडें असल्यामुळें त्याला एका प्रकारची चमत्कारिक शोभा आली होती. त्या बोळानें वळून कांहीं अंतर चालून गेल्यावर तें नवीन वसतिस्थान त्यांस दृग्गोचर होऊं लागलें. त्याचा बाह्य देखावा फार साधा होता. तरी छोट्या वस्तीला तें अगदीं शोभण्यासारखें असून त्याच्या साधेपणामुळेंच तें कांहींसें रमणीय दिसत होतें. एका बाजूला द्राक्षवेलींचा मोठा मंडप होता. घरासभोंवती कांहीं वृक्ष होते. त्यांच्या शाखांचा विस्तार बराच मोठा असल्यामुळें त्या घराला उन्हाचा ताप बिलकुल होऊं नये म्हणून कीं काय कोण जाणे, त्या त्याच्यावरून जा ऊन मोठ्या थाटानें एकत्र झालेल्या होत्या. दाराच्या दोहों बाजूंस पुढच्या तृणाच्छादित आंगणांत निरनिराळ्या फुलझाडांच्या कुंड्या मांडल्या होत्या. यावरून ही व्यवस्था करणाऱ्या माणसाच्या आंगची सदभिरुचि व चतुरस्रता चांगलीच व्यक्त होत होती. रस्त्याच्या एका बाजूनें एक पायरस्ता असून तो सभोंवतालच्या झुडपांतून एका दरवाजापर्यंत गेला होता.

ते जवळ जवळ येत चालले तसतसा त्यांना मधुर गायनाचा आवाज ऐकूं येऊं लागला. तो ऐकतांच व्यापाऱ्यानें आपल्या मित्राचा हात दाबून धरून त्यास थांबविलें. ते दोघे कान देऊन ऐकूं लागले.

त्या व्यापाऱ्याची बायको जी रागिणी त्याला विशेष प्रिय होती तिचेच सूर काढीत बसली होती. त्याला गहिंवर येऊन तो कांपूं लागला, आणि जास्ती स्पष्ट ऐकूं यावें म्हणून तो अमळ पुढें सरला. रेतीवर त्यांच्या पावलांचा आवाज झाला. एका तेज:पुंज व रूपवती रमणीनें खिडकीच्या बाहेर डोकावून पाहिलें, व ती तावडतोब मागें फिरली. जिन्यांत हलकीं पावलें ऐकूं आलीं–ती साध्वी दार उघडण्याकरितां त्वरेनें आली. तिनें पांढरा स्वच्छ व अगदीं साधा पोषाख केला होता. तिनें आपल्या वेणींत फुलें खोविलीं होतीं. तिच्या तोंडावर टवटवी असून तिच्या चेहऱ्यावर मंदस्मित असल्यामुळें तो चंद्रबिंबाप्रमाणें खुललेला दिसला. ती त्यावेळीं इतकी रमणीय दिसली कीं तशी ती पूर्वीं क्वचित् दिसली असेल. ती आपल्या पतीला म्हणाली,–' एकदांचें बरें येणें झालें. केव्हांपासून मी सारखी वाट पाहतें आहें. केव्हां येणें होतें हें बघण्यासाठीं या बोळाच्या टोंकापर्यंत मी कितीकदां तरी जाऊन आलें म्हणून सांगूं ? उपहाराची तयारी मी मघांपासूनच करून ठेविली आहे. मनापासून आवडतात अशाच पदार्थांची तयारी पण आहे. हें ठिकाण तर बाई इतकें मौजेचें आहे कीं कांहीं पुसूं नये. ही सभोंवतालची बाग व हीं झाडें मला तर फारच आवडतात. ह्या रमणीय स्थळीं सुद्धां आपला काळ फारच मजेंत जाईलसा दिसतो.'

हे शब्द ऐकून बिचारा व्यापारी तर अगदीं गहिंवरून गेला–तो इतका गहिंवरला कीं त्याच्या तोंडांतून एक सुद्धां अक्षर

निघेना. त्याच्या डोळ्यांतून अश्रु टपटप खालीं पडूं लागले. पुढें व्यापारांत त्याला बरीच द्रव्यप्राप्ति झाली, व त्याचा आयुष्यक्रम बराच सुखांतही गेला. तरी पण, या आणीबाणीच्या प्रसंगीं त्याच्या प्रियपत्नीनें योग्य मनोधैर्य दाखविल्यामुळें व मोठ्या शिताफीनें तो भयंकर प्रसंग पार पाडण्यास तयार झाल्यामुळें, जसा त्याला आनंद झाला व धन्यता वाटूं लागली, तसा आनंद व तशी धन्यता त्यानें पुढें कधींच अनुभवली नाहीं.

एका विद्वान् ग्रंथकारानें असें म्हटलें आहे: "परमेश्वरानें मनुष्यास ज्या देणग्या दिल्या आहेत, त्यांपैकीं 'सुशील पत्नी' ही शेवटची उत्कृष्ट देणगी होय. तिला गृहशोभा व रत्नभांडार म्हणतां येईल. तिचा आवाज हें मनुष्याचें उत्तम संगीत व तिचें स्मित त्याचा महदानंद होय. तिचें सान्निध्य हें त्याचें जीवनामृत व तिचा उद्योग हें त्याचें उत्तम बक्षिस. तिचा मितव्यय त्याचा उत्तम मुनीम, व तिच्या तोंडावाटे निघणारे शब्द हे त्याचे विश्वासू मसलतगार होत. नानाविध चिंतांनीं जड झालेल्या त्याच्या मनास हलकें करण्याकरितां व त्यास पुनः ताजा हुरूप आणण्यास तिचें मृदु अंतःकरण त्याचें रम्य विश्रांतिस्थान होय. त्याच्या कल्याणार्थ परमेश्वराजवळ तिच्याकडून होत असलेली प्रार्थना त्याच्या ऐहिक व पारमार्थिक सुखासाठीं तरफदारी करणारे वकील होत." हें म्हणणें किती तरी खरें आहे! मनुष्याचें घर तिजवांचून अपूर्ण होय. तिजवांचून त्याच्या आयुष्याचा हेतु परिपूर्ण होत नाहीं. निरनिराळ्या चिंतांनीं

ग्रस्त झालेल्या, अनेक निराशांनीं खचलेल्या, नाना विपत्तींनीं हैरपळलेल्या व निरुत्साहाच्या पूर्ण तडाक्यांत सांपडलेल्या मनाचें योग्य अशा उपायांनीं सांत्वन करून त्यास ताजा दम व हुषारी तिलाच आणतां येते. प्रसंगविशेषीं इतर लोक आपणाशीं लबाडी करून आपणास फसवितात, इतर सोयरेधायरे, शेजारी-पाजारी व इष्टमित्रसुद्धां आपणापासून अलग राहण्याचा यत्न करून आपणास टाकून चालते होतात. अशा दुर्धर प्रसंगीं तीच आपणाजवळ सदोदित राहून इमानानें व कळकळीनें आपलें बरें करण्याचा तिच्याकडून होईल तितका यत्न करण्यास तयार असते. जोंपर्यंत नवऱ्याचा व तिचा एक दिल आहे व परस्परांचा परस्परांवर विश्वास कायम आहे, तोंपर्यंत मनुष्यावर कसाही विपत्तीचा प्रसंग आला तरी त्यानें तो सर्वस्वी निर्दाळला जावयाचा नाहीं. अशा प्रसंगीं त्यानें तिच्यावर विश्वास ठेविला असतां, ती त्याचा विश्वासघात न करितां, त्याचे इकडून तिकडे तिकडून इकडे झोल जात असतांही, त्याला खरी वाट दाखवून संकटांतून पार पाडते; ऐन विपत्तीच्या प्रसंगीं जग सर्वत्र तमोमय भासतें, तेव्हां तिचे प्रेमळ नेत्र कृष्णपक्षांतील रात्रीच्या ताऱ्यांप्रमाणें चमकत असतात. वादळ होऊन पावसाच्या व वाऱ्याच्या जोरासरशीं एकाद्या झाडाचें फूल तुटून पडावें व मग त्यास उन्हाची तिरीप लागून थोडीशी टवटवी यावी; तद्वत् विपत्तीच्या जबर बोजाखालीं चिरडून गेलेल्या मनुष्याच्या अंत:करणास तिच्या मंदस्मितानें थोडासा आवांका येऊं लागतो. खरोखर,

सुशील पत्नीच्या अंतःकरणांतील प्रेमोदधींतून वाहणारें सौख्योदक इतकें निर्मल असतें कीं व तें इतक्या झपाट्यानें वाहत असतें कीं, कोणत्याही बाह्योपाधींनीं तें गढूळ होत नाहीं, किंवा त्याचा प्रवाह बंद होत नाहीं. एका विद्वान् गृहस्थानें म्हटलें आहे कीं 'भरभराटीच्या स्थितीमध्यें पत्नीचा उपयोग मित्राप्रमाणें होतो; परंतु तो काल जाऊन विपत्तीनें मनुष्यास जगांतून हद्दपार केल्यावर त्यास ती शांत व रम्य अशा एकांतस्थलाप्रमाणें उपयोगी पडते.' एका प्रसिद्ध ग्रंथकारानें असें लिहिलें आहेः—'दुर्दैवाचा अति जबर घाला आला असतां स्त्रिया आपल्या आंगचें अद्वितीय धैर्य कसें प्रकट करितात, हें पुष्कळ वेळां माझ्या पाहण्यांत आलें आहे. ज्या अतिदारुण प्रसंगीं मनुष्य अगदींच भांबावून जाऊन त्याच्या तोंडचें पाणी पळतें व तो अगदीं जमीनदोस्त होऊन जातो, अशा अति बिकट प्रसंगीं स्त्रियांच्या आंगचा सर्व उत्साह पूर्ण जागृत होऊन त्यांस कांहीं विलक्षण धैर्य येतें व त्यांच्या वर्तनास एका प्रकारचें उन्नत स्वरूप येतें. ऐन भरभराटींत कसलीही चिंता ठाऊक नसतां पतीच्या समागमसुखांत जी सुकुमारी सर्वतोपरी चैन मारीत असते, व आनंदमयवृत्तीनें प्रत्येक प्रकारच्या आरामांत सारखी रुळत असते, व जिची मिजास तर इतकी असते कीं अगदीं क्षुल्लक कारणानें सुद्धां जिची तब्यत जात राहते, तीच कोमलांगी दुर्दैवाची गदा धाडकन् पडतांच खडाडून जागी होते; व विपत्तीच्या तीव्र वेदना मोठ्या नेटानें, निश्चयानें व धीरानें सहन करीत निराशलेल्या आपल्या पतीस

धीर देऊन त्याचें सांत्वन करीत असते! असा हा देखावा दृष्टीस पडला असतां खरोखर तो किती तरी हृदयंगम वाटतो!

'एकादी कोमल वेली एकाद्या गगनचुंबित वृक्षाला आपल्या कोमल पालवीनें वेष्टून घेते व तो वृक्ष त्या वेलीस आनंददायी सूर्यप्रकाशांत नेऊन पोहोचवितो; तोच वृक्ष विद्युद्घातानें दुभंग झाला असतां, ज्या निरनिराळ्या तंतूंनीं तिनें त्यास कुरवाळून धरिलें असतें, त्याच तंतूंनीं त्याच्या छिन्नभिन्न फांद्यांस ती एकत्र धरून ठेविते. तद्वत् परमेश्वराची अशी छानदार योजना आहे कीं, जी स्त्री अनुकूल काल असतां सर्वस्वी पुरुषावर अवलंबून असते व त्यांचें केवळ भूषण होऊन बसते, त्याच स्त्रीनें आपत्कालाची गदा येऊन पडतांच त्याच्या सांत्वनाचें साधन बनून समयोचित उपायांनीं त्याच्या निरुत्साही व होरपळलेल्या मनास हुषारी आणण्यास झटावें व सर्वतोपरी विदीर्ण झालेल्या त्याच्या अंतःकरण्यास एकत्र धरून ठेवावें, '

अंतःकरणांतील कोमलवृत्तीनें आपल्या पतीस केवळ भूषणभूत झालेल्या पत्नीपासून होणारी सुखप्राप्ति लक्षांत आणून एका मार्मिक कवीनें पुढील उद्गार काढले आहेत:—

'पुरुषास होणारीं जीं सुखें स्त्रीच्या प्रेमोदधींत सांठविलेलीं आहेत, त्यांचें मोल महासागरांतल्या रत्नांपेक्षांही जास्ती आहे.

असें जरी आहे तरी पति आपल्या पत्नींचे किती ऋणी असतात, हें सांगतां येणें कठीण आहे. कारण, पति कितीही सद्गुणमंडित व कृतज्ञ असला तरी त्यास विवाहित स्थितींतील असंख्य

बारीकसारीक गोष्टी एकत्र करून दाखवितां येत नाहींत. खरो-खर अशा स्थितींत पतिपत्नींच्या अंत:करणांचें ऐक्य झालें असतां जी बहार वठते व जो अनुपम सुखानुभव येतो त्याचें हुबेहुब वर्णन करण्याचें सामर्थ्य कोणत्याही भाषेंत किंवा कोणा-च्याही लेखणींत नाहीं.

पत्नींनीं आपल्या पतीसाठीं केलेल्या चांगल्या मोठमोठ्या गोष्टींचें स्मरण करून त्यांची इत्थंभूत हकीकत कोणास सांगतां येईल? अधमाधम **कैकेयीच्या** हट्टास्तव **रामास** चौदा वर्षें अति भयंकर वनवास सोसावा लागला; त्या समयीं त्याच्याबरोबर—

'जवळ असतां रघुटिळक। कंटक होती निष्कंटक॥
विष तें होय पीयूष। परम सुख वनवासीं॥'

इत्यादि प्रेमप्रचुर उद्गार काढणारी-स्वसुखाला लाथ मारून पति-सेवा सर्वस्व समजणारी—**सीता** देवी जर नसती, तर तोच वन-वास **रामास** सहस्रपट असह्य झाला नसता काय? त्याचप्रमाणें 'माझ्या प्रियतमेनें आपल्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणें मजजवळ राहून मला मदत दिली नसती व वेळोवेळीं ती मला उत्तेजन देत गेली नसती, तर **ग्रीसच्या** इतिहासासारखा ग्रंथ माझ्या हातून कधींच तडीस गेला नसता' असे उद्गार प्रसिद्ध इतिहासकार **जॉर्ज ग्रोट** यानें वारंवार काढिले नाहींत काय? तसेंच प्रसिद्ध वक्ता—**एड्मंड बर्क**—यास त्याच्या पत्नीकडून त्या त्या कामांत प्रत्यहीं इतकी मदत होत असे व इतकें प्रोत्साहन मिळत असे कीं 'मी घरांत शिरल्याबरोबर माझ्या सर्व प्रकारच्या चिंता नाहींतशा होतात' असे उद्गार त्याच्या तोंडावाटे नेहमीं निघत.

अति त्रासाचीं व मेहनतीचीं कामें करून त्रस्त झालेल्या मनास प्रसन्न करून पूर्व स्थितीवर आणण्यास प्रेमळ, विश्वासू व थोर मनाच्याच मित्राची गरज लागते; व असा मित्र प्रिय पत्नी-वांचून दुसरा सांपडणें कठीण. बाहेर मनुष्यानें कसाही पराक्रम करून नांव गाजविलें तरी तेवढ्यानें त्याच्या मनोवृत्ति अगदीं प्रसन्न न होतां गृहसुखाच्या अमोल व अवर्णनीय सुखास्वादाची अपेक्षा त्यास असतेच. सारांश, बाहेर मिळविलेल्या कीर्तीनें व पराक्रमानें होणाऱ्या सुखासमाधानाला कुटुंबसुखाची भर पडली नाहीं, तर मनुष्याचा सुखानुभव कधींच पूर्ण म्हणतां यावयाचा नाहीं. म्हणून ज्या स्त्रियांस खऱ्या गृहिणीपदास पोंहोचून खरी पत्नी म्हणवून घेण्याची इच्छा असेल, त्यांनीं आपल्या मनास पोक्तपणा आणून त्यांत सुविचारांची भर टाकीत गेलें पाहिजे व सद्गुणमंडित होऊन आपल्या थोर अंतःकरणास साजेशा गंभीर वर्तनानें आपल्या पतीचा व एकंदर कुटुंबाचा आनंद बनलें पाहिजे.

सारख्या मनाच्या व सारख्या अंतःकरणाच्या मनुष्यांमध्यें भांडण किंवा कसलाही कज्जा होत नाहीं. जेथें पतिपत्नी हीं समान अभिरुचीचीं व समान स्वभावाचीं असून प्रेमरज्जूनें एकत्र झालेलीं असतात, तेथें 'अन्य हेतुंनीं न अश्रु जेथें ते केवळ आनंदें' किंवा 'प्रेमकलहची दुजें न भांडण जेथें विदित जनांला' या उक्तीप्रमाणें प्रकार झाल्यावांचून राहणार नाहीं.

आईचें व मुलाचें तादात्म्य होण्यास ज्याप्रमाणें आईच्या

अंगीं आपल्या मुलासंबंधानें अतिशय कळकळ व आस्था पाहिजे, त्याचप्रमाणें, पतिपत्नीचें तादात्म्य होण्यास त्याच भावनांची अवश्यकता आहे. एकाच्या अंतःकरणाचें व स्वभावाचें पूर्ण स्वरूप दुसऱ्यास कळलें पाहिजे; परस्परांचा परस्परांवर पूर्ण विश्वास पाहिजे; परस्परांच्या कामकाजासंबंधानें परस्परांस अंतःकरणापासून कळकळ वाटली पाहिजे. सारांश, एकाची कोणतीही बाबत दुसऱ्यास कळत नाहीं किंवा एकाचें गुह्य दुसऱ्यास कळवितां येत नाहीं, असा प्रकार अगदींच नसला पाहिजे. म्हणूनच मनूनें पतिपत्नीचें एकमेकांबद्दलचें कर्तव्य असें सांगितलें आहे;

'तथा नित्यं यतेयातां स्त्रीपुंसौ तु कृतक्रियौ ।
यथा नाभिचरेतां तौ वियुक्तावितरेतरम् ॥'

असाप्रकार असला म्हणजे एकमेकांत फुटाफुट होणार नाहीं.

पत्नीची कळकळ अमोल आहे.

राज्यप्रकरणासंबंधानें आरोप येऊन कित्येक मोठमोठ्या मुत्सद्यांस कारागृहवास भोगावा लागला; अशा बिकट प्रसंगीं त्यांच्या शूर पत्नींनीं योग्य तें धैर्य दाखवून आपापल्या पतींस सोडवून आणल्याचीं उदाहरणें निरनिराळ्या देशांच्या इतिहासांतून पुष्कळ सांगतां येतील. प्रत्येक स्त्रीवर असा दुर्धर प्रसंग आला तरच तिला आपल्या पतीवरचें अत्यंत प्रेम व भक्ति दाखवितां येणार आहे, असें नाहीं. संसारामध्यें नाना प्रकारच्या प्रसंगीं वर नमूद केलेल्या प्रमाणेंच असह्य संकटें व दुर्धर अडचणी येतात;

मनुष्य अगदीं हवालदील होऊन त्यास कांहीं सुचेनासें होतें व त्याची छाती अगदीं दडपून जाते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं खऱ्या पत्नीस वाटणाऱ्या कळकळीनें हें असह्य ओझें कमी होण्याचा पुष्कळ संभव असतो.

संकटशृंखलेनें एकदा मनास जखडून टाकिलें व त्याच्यापासून त्याचें विचारशस्त्र हिरावून घेऊन त्यास अगदीं गुंग करून सोडिलें, म्हणजे त्या बिकट संकटांतून सुटण्याकरितां त्याला खऱ्या पत्नीच्या खऱ्या प्रेमाचाच आश्रय करावा लागतो. अशा वेळीं सगळ्या जगांत तिच्यासारखा भरंवशाचा मित्र दुसरा मिळणें कठीण. तिच्या विचारसरणीवर पूर्ण विश्वास ठेवून वर्तन केलें असतां तिचें उदार प्रेम कमी होत नाहीं; व तिच्याकडून निरपेक्ष बुद्धीनें झालेली मदत मुळींच व्यर्थ होत नाहीं.

पतिपत्नीमधील नातें.

पतिपत्नीमध्यें निकट मैत्री असली पाहिजे. म्हणून विद्यादि बुद्धिमत्तेच्या गुणांत व कोमलपणादि अंतःकरणाच्या वृत्तींत पत्नी पतीच्या बरोबरीची असली पाहिजे. असें असेल तरच त्यास केव्हां उपदेश करण्याची, तर केव्हां त्याचें सांत्वन करण्याची पात्रता तिच्या अंगीं येईल. खऱ्या पत्नीची योग्यता तिच्या अंगीं येण्यास मित्राप्रमाणें त्यास मदत करण्याची पात्रता तिच्या ठायीं असली पाहिजे. केवळ डागडागिन्यांनीं व उंची वस्त्रांनीं नटूनथटून आपल्या भपकेदार पोषाखाचा ठसा लोकांवर उमटतो किंवा नाहीं हें पाहण्याकडेच तिचें लक्ष असलें, किंवा

याच विचारांत नेहमीं ती गर्क असली, तर तिला आपलें खरें कर्तव्य कधींच कळणार नाहीं व खऱ्या पत्नीची योग्यता तिच्या अंगीं कधींच यावयाची नाहीं. पतिपत्नीस एकमेकांबद्दल सन्मान व आदर वाटला पाहिजे.

जशी पत्नी तसा पति व जसा पति तशी पत्नी.

मनुष्याचें वर्तन त्याच्या सहवासास असलेल्या माणसांच्या वर्तनाप्रमाणें होत जातें, असा सर्वत्र अनुभव आहे. पति थोर मनाचा, उदार अंतःकरणाचा व शुद्ध वर्तनाचा असून पत्नी जर त्याच्या अगदीं उलट असेल, तर त्याच्या अंगच्या सद्गुणांचा हळूहळू ऱ्हास होत जाऊन तो तिच्या पदास येऊन पोंचण्याचा संभव असतो. तसेंच, पत्नीचें वर्तन अतिशय पोक्तपणाचें असून पति बेढंगी, अविचारी व हलकट असला तर तो तिला आपल्या वळणावर आणल्यावांचून राहणार नाहीं. सारांश, जेथें दोघांचा संबंध प्रत्यहीं क्षणोक्षणीं पडणार, तेथें एक माणूस उच्च वृत्तीचें असून दुसरें जर अतिशय नीच वृत्तीचें असलें, तर दुसऱ्या तऱ्हेच्या माणसाचा पहिल्यावर कांहीं तरी परिणाम झाल्यावांचून राहावयाचा नाहीं. असा प्रकार न होऊं देणें ही गोष्ट फारच दुर्घट आहे. आतां श्रेष्ठ वृत्तीचा माणूस नीच वृत्तीच्या माणसाच्या संपर्काचा परिणाम न व्हावा म्हणून कांहींसा सावध राहील, तर फारसा धोका येण्याचा संभव नाहीं, हें खरें आहे.

विद्वत्तेच्या संबंधानेंच फरक असला तर ही भीति फारशी बाळगण्याचें प्रयोजन नाहीं. कारण अशिक्षित पत्नीला आपल्या

विद्वान पतीची विद्वत्ता हिरावून घेतां येणार नाहीं. तरी पण, जिच्या वासना व उमेदी अतिशय नीच तऱ्हेच्या आहेत व जिचा स्वभाव फारच क्षुद्र आहे, तिच्या एकंदर दुर्वर्तनाचा परिणाम तिच्या पतीवर घडून कांहीं अंशीं तरी तिच्यासारखा तो झाल्यावांचून राहणार नाहीं. 'पुष्पसंगें मातीस बास लागे। मृत्तिकेचा पुष्पांत गुण न वागे' असा सत्संगतीचा महिमा आहे, तरी पण मृत्तिकेचा पुष्पाशीं संबंध घडल्यामुळें पुष्पाचा सुवास थोडा तरी कमी झालाच पाहिजे, यांत संशय नाहीं. स्फटिका-प्रमाणें स्वच्छ वाहणाऱ्या झऱ्याला गढूळ पाण्याचा ओढा येऊन मिळाल्यावर त्या एकत्र झालेल्या पाण्याच्या प्रवाहाला तेथून निराळाच रंग येऊन तो पुढें गढूळच वाहूं लागतो.

सारख्यास सारखें असावें.

विवाहापासून सुखप्राप्ति करून घेण्याला बुद्धिमान् पुरुषाला बुद्धिमान् पत्नीच मिळाली पाहिजे असें नाहीं. परंतु सुशिक्षित, संस्कृत मनाच्या मनुष्यास त्याच्याचप्रमाणें सदभिरुचीची पत्नी मिळणें इष्ट आहे; कारण, जिच्याबरोबर सर्व आयुष्य काढावयाचें व जिच्यावर लहानसहान व अतिशय नाजूक गोष्टींबद्दलसुद्धां विश्वास टाकावयाचा, तिच्या अंगीं पतीप्रमाणें गुण नसले तर त्याला तिजपासून फारसें सुख होणें संभवनीय नाहीं. त्याचें हृद्गत जाणण्याची शक्ति तिच्या अंगीं नसेल तर तिजबद्दल त्याच्या मनांत खरें प्रेम उत्पन्न होणें शक्य नाहीं. प्रेमाच्या अंगीं प्रत्येक गोष्टींत रूपांतर घडवून आणण्याचें केवढें सामर्थ्य असतें,

हें सर्वांस ठाऊक आहेच. दऱ्याखोऱ्या असलेल्या खडकाळ जमिनीच्या भागावर चंद्रप्रकाश पडला असतां तो भाग आल्हादकारक कांति येऊन जसा खुलूं लागतो, तद्वतच जिच्यावर मनुष्याचें खरें प्रेम जडतें ती कशीही असली तरी त्यास मनोरमाच भासूं लागते. इतकेंच नाहीं, तर इतर स्त्रियांपेक्षां हिजमध्यें कांहींतरी विशेष आहे असें त्यास वाटून कोणत्याही बाबतींत हिची बरोबरी इतर कोणासही करतां यावयाची नाहीं, असा त्याच्या मनाचा ग्रह होऊन बसतो. तिच्यांत कांहीं थोडा अडाणीपणा असला, तरी तो त्याच्या नजरेस न येऊन तिचें वर्तन फार सन्माननीय आहे, असें तो मानूं लागतो; तिचा आवाज साधारण असला तरी त्यास तो संगीताप्रमाणें फारच गोड वाटूं लागतो व इतरांप्रमाणें साधारण गुण तिजमध्यें असले तरी ते एकाद्या स्वर्गीय देवतेस शोभा आणतील असें त्यास वाटूं लागतें. परंतु जादूच्या कांडीप्रमाणें वस्तुस्थिति बदलून टाकण्याचें इतकें मोठें सामर्थ्य जरी प्रेमाच्या अंगीं आहे तरी तें अतिशय नीच व क्षुद्र माणसाची गणना संभावितांत व थोरांत कधींच करीत नाहीं. 'कांच ती कांच व मणी तो मणी' हा फरक त्यास चांगला कळून येतो. म्हणून मनाचा कोतेपणा, आप्पलपोटेपणा व अशाच तऱ्हेच्या इतर क्षुद्र गोष्टी, यांजकडे डोळेझांक न करितां त्यांस ताबडतोब ओळखून त्यांची योग्यता तितक्याच पुरती आहे, हें तें प्रेम जाणून असतें.

आपल्या पत्नीच्या अंगीं कोणकोणते गुण असावे म्हणून

पत्नीच्या अंगीं कोणकोणते गुण असावे?

मनुष्यास वाटत असतें? संसारांतल्या कामकाजासंबंधानें समजूत व दक्षता, निश्चयी स्वभाव, धोरणशुद्ध मितव्यय, इतके गुण असले म्हणजे काम झालें काय? ज्यामुळें तिचा सहवास तिच्या पतीच्या उल्हासास व उन्नत आनंदास कारणीभूत होईल, असे कांहीं बुद्धीचे गुण, अशी कांहीं सदभिरुचि, तिच्यांत नको काय? किंवा पतीच्या कल्पनाशक्तीस उच्च वातावरणांत नेऊन परस्परांच्या संवादानें या जगाच्या कटकटीचा त्यास घटकाभर तरी विसर पाडतां येईल, असे उदात्त विचार व थोर कल्पना तिच्या अंगीं नकोत काय? तसेंच तिची समजूत चांगली असून मनही आनंदी असावें व वर्तन संभावितपणाचें असून तिचा स्वभाव सौम्य असावा, भपक्यानें राहून दिमाख दाखविण्याचा तिला कंटाळा असावा, अशी पतीची इच्छा असल्यास ती गैर नाहीं. मनुष्यास आपल्या घरांत ज्या अत्यंत जरुरीच्या गोष्टी पाहिजेत, त्या म्हटल्या म्हणजे विश्रांति व शांतता होत. बाहेरील कामकाजामुळें किंवा जगांतल्या चढाओढींमुळें डोक्याला ताण बसून मनुष्यास थकवा आला म्हणजे, किंवा फार काळ चालू असलेल्या व्यासंगानें डोकें संतप्त झालें असतां, घरीं जर सर्व श्रमांचा परिहार होण्यासारखी विश्रांति मिळून समाधान होण्यासारखें असलें, तर तो किती उत्सुकतेनें आपल्या आरामस्थानाकडे यावयास निघेल? परंतु असा सुखासमाधानाचा प्रकार नसून

उलटपक्षीं कज्जाभांडणांचें व तंट्यावखेड्यांचें घरीं साम्राज्य असेल तर मनुष्यास सुख होण्याचा कितपत् संभव आहे हें सांगावयास नकोच. बाहेरील निरनिराळ्या कामांत कधींकधीं मानखंडना होऊन मनाला उद्विग्नता आली व त्यास अगदींच निराश करून सोडणाऱ्या गोष्टी घडल्या, तरी घरीं आपल्या आशानिराशा, मानापमान वगैरे त्या त्या गोष्टींत मन घालून त्या त्या समयास योग्य अशा भाषणानें व वर्तनानें आपली पत्नी आपलें त्रस्त चित्त शांत व प्रसन्न करील, अशी त्यास साहजिक वाटणारी इच्छा सफल होत गेली, तर त्याचा योग्य अभिमान कायम राहून जीवनकलहार्थ श्रम करण्यास त्यास ताजा दम येण्याचा संभव असतो. पति घरांत आल्यानंतर आपल्या कामास सुरुवात होते, त्याच्या बाहेरील कामकाजासंबंधानें आपण अगदींच बेफिकीर असावें अशी जर पत्नीची समजूत असेल, तर ती चुकीची आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यावरून पतीच्या कामाकाजाची बारीकसारीक माहितीदेखील पत्नीला असावी असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु कोणत्या गोष्टी तो काय धोरणानें करीत आहे, व कोणत्या गोष्टी साधण्याची तो खटपट करीत आहे, कोणत्या बाबतीसंबंधानें त्याला फार उमेद किंवा विशेष चिंता वाटत असते, त्याचे हेतु सफळ झाले आहेत किंवा निष्फळ झाले आहेत, या गोष्टींबद्दल साधारण ठोकळ माहिती तिला असणें इष्ट आहे, यांत शंका नाहीं.

पत्नीच्या सहवासाचा परिणाम पतीच्या वर्तनावर घडल्या वांचून राहत नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. हा परिणाम चांगलाच नजरेस येतो. तिचा स्वभाव क्षुद्र असून मन अगदींच कोतें असेल, तर पति मूळचा कसाही सज्जन असला तरी ती त्यास कालान्तरानें आपणासारखी करून सोडील. उलट पक्षीं, तिची बुद्धि उदार असून मन थोर असेल, तर तसाच तो उदार व थोर होईल. अमेरिकेंतील प्रख्यात मुत्सद्दी—डी टॉकेल—याला या गोष्टीच्या सत्यतेबद्दल प्रतीति घडली होती. म्हणून त्यानें असें म्हटलें आहे कीं, 'कित्येक लोकांचें मन मूळचें अगदीं कोतें व बुद्धि क्षुद्र असूनही केवळ सुदैवें करून ज्या वर्तनानें पोक्त व मनाच्या मोठ्या अशा पत्नींच्या सहवासाचा त्यांस लाभ घडल्यामुळें त्यांचा मूळचा हलकटपणा गेला, इतकेंच नाहीं, तर आपापल्या कर्तव्यास जागून त्यांच्याकडून परोपकारादि मोठमोठीं सत्कृत्यें जगांत घडलीं आहेत. उलट जे मूळचे उदार व परोपकारशील ते दुर्दैवेंकरून नीच व आप्पलपोट्या पत्नीच्या सहवासामुळें मूळच्या उत्तमपणास मुकले, इतकेंच नाहीं, तर स्वकर्तव्याविषयीं त्यांच्या उच्च कल्पना रसातळास जाऊन ते केवळ स्वार्थपरायण बनले आहेत.' या गृहस्थास सुदैवें करून अत्यंत सुशील पत्नीचा लाभ झाला होता. तिची उत्साहजनक आनंदवृत्ति, तिचें सद्वर्तन व तिचा गोड आणि सदासर्वकाळ सारखा राहणारा स्वभाव

पत्नीच्या सहवासाचा पतीच्या वर्तनावर परिणाम.

इत्यादि गोष्टींचें वर्णन त्यानें आपल्या जिवलग मित्रांस पाठविलेल्या कित्येक पत्रांत कृतज्ञतापूर्वक केलें आहे. जगांतल्या व्यवहाराचा या गृहस्थास जितका जितका जास्ती अनुभव येत गेला, तितकी तितकी त्याची ज्यास्तीच खात्री होत गेली कीं, मनुष्य सज्जन व सद्गुणी निपजण्यास त्याची गृहस्थिति अवश्य शाबूत व जोमदार असली पाहिजे. मनुष्याचें सुख किंवा दुःख त्यास ज्या प्रकारची पत्नी लाभली असेल, त्यावर विशेषें करून अवलंबून असतें, असें तो नेहमी म्हणे. त्यानें एकदां असे उद्गार काढिले आहेत, कीं, ' माझ्या आयुःक्रमांत अत्यंत शहाणपणाची गोष्ट म्हटली म्हणजे सध्यां जी स्त्री माझी पत्नी झाली आहे, तिजबरोबर माझा विवाह ही होय. परमेश्वरानें मला सुखाच्या गोष्टी पुष्कळ दिल्या आहेत; परंतु त्यांत मनुष्यास प्राप्त होणाऱ्या सुखांपैकीं आद्यसुख जी उत्तम गृहस्थिति, तिचा लाभ मला झाल्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. ऐन आणीबाणीच्या बिकट प्रसंगीं तिचें वर्तन कोणत्या प्रकारचें असतें याची कल्पना तुम्हांस बरोबर करितां येणार नाहीं. तिची नेहमीची वृत्ति साधी व सौम्य असते खरी; परंतु कांहीं विशेष प्रसंग आला असतां तिच्या अंगीं कांहीं विलक्षण स्फूर्ति येऊन तिचा उत्साह वाढत जातो. अडचणीच्या प्रसंगीं माझें सांत्वन करून माझें धैर्य न खचेल अशा रीतीनें वागून माझ्या अंगीं हुषारी आणण्याचा यत्न ती सारखा सुरू ठेविते व माझ्या नजरेस न येईल अशा रीतीनें ती माझ्या कामांची अतिशय काळजी बाळगून तीं तडीस नेण्याची खटपट करीत असते;

अशा प्रसंगीं माझ्या मनास त्रास होतो, परंतु तिची शांतवृत्ति कायम राहून नेटानें प्रसंग पार पाडण्यासाठीं अविश्रांत श्रम ती धिमेपणानें करीत असते.

'ज्या स्त्रीशीं हरएक बाबतींत आपलें तादात्म्य होतें व आपणामध्यें कांहीं चांगुलपणाचा भाग असल्यास त्याचें स्पष्ट प्रतिबिंब तिच्या अंत:करणांत दिसून येतें—इतकेंच नाहीं तर, तो चांगुलपणा दिवसानुदिवस ज्यास्तीच वाढत असतो, अशा स्त्रीच्या निरंतर सहवासापासून होणारें सुख अवर्णनीय असतें. जी गोष्ट मला वाजवी व न्याय्य वाटते ती मी बोलून दाखवीत असतां अथवा करीत असतां, तिजबद्दल वाटणारें पूर्ण समाधान तिच्या चेहऱ्यावर इतकें स्पष्ट दिसतें कीं, त्याचा मला मोठा अभिमान वाटून आनंद होतो. तसेंच एकाद्या कामाबद्दल माझी सदसद्विवेकबुद्धि मला टोचूं लागली म्हणजे, त्याचाही खेदजनक परिणाम तिच्या चेहऱ्यावर दिसून येतो. तिच्यावर माझा मोठा प्रेमा आहे, तरी पण तिचा मला वचक आहे. जोंपर्यंत तिजवर माझें हल्लीं आहे त्याप्रमाणें प्रेम राहील, तोंपर्यंत माझ्या हातून कधींही गैरवाजवी किंवा गैरशिस्त कृत्य व्हावयाचें नाहीं, अशी माझी खात्री आहे.'

सार्वजनिक कृत्यांत इतउत्तर पडावयाचें नाहीं, असा संकल्प करून ह्या गृहस्थानें एकांतवास स्वीकारल्यावर त्याची प्रकृति बरीच क्षीण झाली. त्यामुळें तो अतिशय तापट व चिरडखोर झाला. ह्यावेळीं एक ग्रंथ लिहिण्याचें त्याचें काम सुरू होतें.

ह्याबद्दल त्यानें असें लिहिलें आहे: " चार किंवा पांच तास लिहिण्याचें काम केल्यावर मला थकवा येतो व मग माझ्यानें काम करवत नाहीं. अशा समयीं बराच वेळ विश्रांति घ्यावीशी वाटते. एकादा ग्रंथ लिहित असतां त्याचा शेवटचा भाग लिहिण्याच्या वेळीं ग्रंथकाराचें मन घोटाळून जाऊन त्याच्या मनास फारच त्रास होतो. अशा वेळीं माझ्या प्रियतमेनें शांतवृत्ति धारण करून व मला धीर देण्याचा यत्न करून मजमध्यें उत्साह आणिला नसता तर हा ग्रंथ माझ्या हातून शेवटास गेला नसता."

खरोखर, जिचें वर्तन सन्मार्गाचें आहे व जिचे विचार, हेतु व कल्पना उन्नत आहेत, अशा पत्नीच्या आनंदजनक सहवासापासून पतीस संसारांत जशी मदत मिळेल, तशी इतर कोणाकडूनही व्हावयाची नाहीं. प्रसिद्ध वक्ता-**एडमंड बर्क**-यानें आपल्या पत्नीविषयीं मजेदार वर्णन लिहिलें आहे. तें वाचलें असतां ती स्त्री किती सद्गुणसंपन्न, सुशील, शांत व निश्चयी होती, व तिचें अंतःकरण प्रेमळ असून गृहकृत्यांत ती जितकी दक्ष असे तितकीच ती पतीच्या व्यासंगांत त्यास मदत करण्यास तयार असे, हें कळून येईल. प्रत्येक प्रकारच्या खऱ्या व योग्य कामांसंबंधानें तिला मनापासून कळकळ वाटे. तिच्या पतीनें तिचें जें वर्णन केलें आहे, त्याचा सारांश असा आहे:—

'ती सुंदर आहे; परंतु हें सौंदर्य तिला तिच्या चेहऱ्यावरून, अंगवर्णावरून किंवा आंगच्या ठेवणीवरून प्राप्त झालेलें नाहीं; ह्या तिन्ही गोष्टी तिजमध्यें असाव्या तशा आहेत; परंतु तिला पाहणा-

राच्या अंतःकरणास जो पाझर सुटतो, तो या तीन गोष्टींमुळें नव्हे. तिच्या चेहऱ्यावर तिचा गोड स्वभाव, तिची परोपका-बुद्धि, तिचें सौजन्य व तिचें बुद्धिसामर्थ्य हे गुण स्पष्ट दिसून येतात व या गुणांमुळें ती सुंदर वाटते. तिला पाहिल्यावर पाहणा-रांचें चित्त प्रथम फक्त तिच्या चेहऱ्याकडे वेधलें जातें; मग क्षणाक्षणानें तिच्या चेहऱ्याचा ठसा त्याच्या मनावर बठत जातो; मग त्यास असें आश्चर्य वाटूं लागतें कीं, असा ठसा प्रथम पाहण्या-बरोबर कसा उमटला नाहीं ?

'तिचे डोळे फारसे पाणीदार नाहींत; पण वाटेल तेव्हां तिला आपल्या दृष्टीनें इतरांच्या मनांत आपणाविषयीं पूज्यभाव उत्पन्न करतां येतो. एकाद्या मोठ्या हुद्देदाराचा अवसाफ-त्याच्या अधिकाराच्या जोरामुळें नव्हे—तर त्याच्या सद्गुणांमुळें पडतो, त्याप्रमाणें तिनें एकाद्याकडे पाहिलें असतां तिच्या दृष्टीचा बसतो.'

'तिचा बांधा उंच नाहीं; तिला पाहून प्रत्येकास कौतुक वाटावें म्हणून ती जन्मली नाहीं, तर एकाला सुख व्हावें म्हणून तिचा जन्म आहे.

'तिचें मन कोमल असून निश्चयी आहे. तसेंच तिचें शरीर नाजूक आहे; पण ती अशक्त नाहीं.

'तिचा आवाज मधुर संगीताप्रमाणें आहे; मोठमोठ्या सभांना थक्क करून सोडणारा नाहीं. परंतु ज्यांना पुष्कळ लोकांची गर्दी व थोडकी मंडळी यांतील भेद कळतो, त्यांस तो मनोरम वाटण्यासारखा आहे.'

'तिच्या शरीराच्या वर्णनानेंच तिच्या मनाचें वर्णन होतें; एक दुसऱ्याची नक्कल आहे. ज्या नानाविध विषयांचें ज्ञान संपादण्याचा ती यत्न करिते, त्यांवरून तिची समजूत कशी काय आहे हें स्पष्ट होत नाहीं; तर चांगल्या विषयांची निवड करण्यांत तिची समजूत कशी काय आहे हें दिसून येतें.'

'मनास थक्क करून सोडणाऱ्या गोष्टी करून अथवा बोलून ती आपलें बुद्धिसामर्थ्य दाखवीत नाहीं; तर ज्या गोष्टी करावयाच्या नाहींत किंवा बोलावयाच्या नाहींत, त्या वर्ज करून ती आपली बुद्धि दाखविते.'

'तिचें वय फार नसूनही तिला जगाचें इतकें ज्ञान आहे कीं, तशा वयाच्या इतर कोणासही तें नसेल; तसेंच व्यवहाराच्या सर्व बाजू कळूनही तिचें अंतःकरण व वर्तन इतकें निर्मल आहे कीं, तशी माहिती मिळून इतकें शुद्ध वर्तन इतरांचें बहुतकरून राहणें कठीण.'

'तिचा स्वाभाविक कल परोपकाराकडे असल्यामुळें तिचें वर्तन थोरपणाचें व सभ्यतेचें आहे. केवळ त्यासंबंधीं शिष्टाचारासच तें अनुसरून आहे असें नाहीं. म्हणून तिचें वर्तन पाहून, ज्यांस संभावितपणा समजतो व ज्यांस तो समजत नाहीं असे लोक सारखेच थक्क होतात.

'कोणती गोष्ट योग्य व कोणती अयोग्य हें ती वादविवाद करून ओळखून काढीत नाहीं, तर आंगच्या शहाणपणानें ओळखून काढिते. एकाद्याविषयीं निष्कारण कडक रीतीनें बोलून ती

आपल्या सुस्वभावाला बट्टा लावून घेत नाहीं. तसेंच, एकाद्याची अतिशय फाजील अथवा अयोग्य स्तुति करून आपल्या चांगल्या विचारास कमीपणा आणून घेत नाहीं. ज्याप्रमाणें संगमरवरी दगडाच्या काठिन्यानें त्याच्या सफाईस किंवा चकाकीस कमीपणा येत नाहीं, त्याप्रमाणें, तिचें मन निश्चयी व खंबीर आहे तरी त्यामुळें तिच्या स्त्रीजातीच्या स्वाभाविक वर्तनास बिलकुल कमीपणा येत नाहीं. तिच्या अंगीं असे सद्गुण आहेत कीं, त्यांमुळें स्त्रियांमध्यें ज्यांचें मन खरोखर मोठें असतें अशा स्त्रियांपैकीं ती एक आहे असें वाटून तिजबद्दल आपल्या मनांत सन्मान उत्पन्न होत जातो. मोहक लावण्यामुळें अशक्त व सुंदर माणसाचे दोष सुद्धां आपणास जसे आवडूं लागतात; तसेंच, तिच्या दोषांतसुद्धां असा कांहीं मोहकपणा आहे कीं, त्या दोषांमुळेंच आपलें मनोरंजन होत जातें.'

अशी पत्नी खरोखर आपल्या पतीचें केवळ रत्नभांडार होय; व तिच्या सहवासानेंच निरंतर शिक्षण मिळण्यासारखें असतें. या बाईच्या अंगीं जो उत्तमपणा व जे सद्गुण होते, तो उत्तमपणा व ते सद्गुण तिच्या पतीच्या नजरेस जितके येत असत, तितके त्याच्या जिवलग इतर मित्रांच्या नजरेस येत नसत व तसें होणें शक्यही नाहीं. खरोखर पाहिलें तर असाच प्रकार असणें इष्ट आहे. फुलांची विशेष आवड असल्यामुळें तीं प्रेमानें वेंचणाऱ्याच्याच हातास ज्याप्रमाणें त्यांचा सुगंध लागतो, त्याप्रमाणें केवळ पतीला समजतील असे कांहीं विलक्षण गुण

पत्नीच्या अंगीं असणें इष्ट आहे. पतीला विशेष प्रकारचा आनंद वाटून त्याची चित्तवृत्ति सदासर्वकाळ प्रसन्न रहावी व त्याचा उत्साह नेहमी कायम असावा म्हणून कांहीं तरी विनय-युक्त मनोवेधकता, कांहीं गुप्त रमणीयता, तिजमध्यें असणें जरूर आहे.

तडजोडीवांचून खरें सुख नाहीं.

संसारांत खऱ्या सुखाची प्राप्ति होण्यास पतिपत्नीमध्यें नेहमीं तडजोडीचा प्रकार असला पाहिजे; इतरांनीं आपणाशीं अमुक तऱ्हेनें वागावें अशी आपली इच्छा असल्यास आपणही त्यांच्याशीं तशाच तऱ्हेचें वर्तन ठेविलें पाहिजे. दुसऱ्याच्या अंगीं असलेल्या दोषांकडे मुळींच लक्ष न देतां त्यावर नेहमींच पांघरुण घालण्याचा आपण यत्न करीत जावा, असें नाहीं. होतां होईल तों ते घालविण्याचा यत्न झालाच पाहिजे; परंतु तसें कर-तांना आपली चित्तवृत्ति आपल्या कह्यांत राहिली पाहिजे व शांतपणाचें अवलंबन झालें पाहिजे. वैवाहिक स्थितीमध्यें सर्व गोष्टी यथास्थित घडून येण्यास जे अनेक गुण पाहिजेत, त्यांपैकीं सुस्वभाव हा एक आहे. सुस्वभावाचा संयोग आत्मसंयमनाशीं झाल्यास मनुष्याच्या अंगीं पूर्ण धिमेपणा येतो; व त्याच धिमे-पणामुळें मनुष्य दुसऱ्याचें म्हणणें शांतपणानें ऐकून घेण्यास, राग आला असतां रागाचा झटका निघून जाईपर्यंत स्वस्थ बसण्यास व शांतवृत्तीनें कांहींतरी तडजोडीचा प्रकार घडवून आणण्यास, तो समर्थ होतो.

एका कवीनें सुशील पत्नीच्या गुणांचें वर्णन करीत असतां त्यांचे त्यानें दहा भाग ठरविले. या गुणांची वाटणी त्यानें अशी केली आहे:–चार गुण सुस्वभावाला; दोन गुण चांगल्या समजुतीला; एक गुण चतुराईला; एक गुण सौंदर्याला (सौंदर्य म्हणजे, मनोहर चेहरा, पाणीदार डोळे, गोंडस शरीर, गुलजार बांधा इत्यादि गोष्टींचा ज्यांत समावेश होतो तें.); बाकी राहिलेले दोन गुण तिचा घरंदाजपणा; तिनें आणलेली संपत्ति आणि तिच्या विद्यादि गुणांस दिले आहेत. विद्या म्हणजे फक्त लेखन वाचन नव्हे, तर कांहीं ज्यास्ती प्रकारचें असलें तर तें धरिलें आहे. ह्या शेवटच्या बाकी राहिलेल्या गुणांसंबंधानें त्याचें असें म्हणणें आहे कीं, त्यांची वाटणी ज्यानें त्यानें अर्धा पाव गुण देऊन आपल्या इच्छेनुरुप करून घ्यावी; कारण ह्या शेवटीं सांगितलेल्या गोष्टींपैकीं कोणतीच गोष्ट इतकी महत्त्वाची नाहीं कीं तिला स्वतंत्र सबंध एक गुण देतां येईल. परंतु या कवीनें स्त्रियांच्या धार्मिकतेसंबंधानें कांहींच उल्लेख केलेला नाहीं. खरोखर म्हटलें तर, परमेश्वराच्या ठिकाणीं भक्ति व त्याचें भजनपूजन करून त्यास अनन्यभावें शरण जाणें इत्यादि धार्मिक गोष्टींकडे लक्ष असल्यावांचून तिच्या अंगीं खरी योग्यता यावयाचीच नाहीं. तिच्या धर्मसंबंधीं समजुतींत विचाराचा भाग असला पाहिजे. सर्वभूतीं दया, पापभीरुता, परपीडा निवारण्याचा यथाशक्ति यत्न, सावित्रीसारख्या महासतींच्या कथांचें वाचन व श्रवण व तदनुरूप वर्तन ठेवण्याची खटपट, या व अशाच

तऱ्हेच्या इतर गोष्टींकडे रोंख ठेवून चालणें ह्यांत पुण्य आहे, अशी त्यांची पक्की समजूत असणें अत्यंत इष्ट व हितप्रद आहे.

लग्नासंबंधी पोक्तपणाचा उपदेश.

एका समंजस व पोक्त गृहस्थानें आपल्या एका मित्रास असा उपदेश केला आहे. "लग्न करतेवेळीं वधूच्या श्रीमंतीवर नजर ठेवून तिची निवड करूं नको. खरें वैवाहिक सुख आपणास मिळावें अशी तुझी इच्छा असल्यास, सद्गुणी व ज्ञानसंपन्न अशा स्त्रीशीं लग्न कर. जी वेड्यासारखी नेहमींच स्तब्ध असते किंवा सदोदित सारखा वाचाळपणा करीत असते, अशा पत्नीपासून सुख होणें कठीण. तसेंच ती सुशिक्षित असावी.— निदान शिक्षण ग्रहण करण्याची पात्रता तरी तिच्या अंगीं असावी. अशा स्त्रीबरोबर लग्न झालें असतां संसारांत कसाही प्रसंग आला तरी, ती मोठ्या धिमेपणानें व शांतरीतीनें वागेल. भरभराटींत आपणच कायते मोठे, इतर सर्व क्षुद्र, अशा वेड्या समजुतीनें ती उन्मत्त होणार नाहीं, किंवा विपत्तींत धैर्य सोडणार नाहीं; तर त्या त्या प्रसंगीं मनाची समता व आनंदवृत्ति कायम ठेवून सल्लामसलतीनें प्रसंग पार पाडण्यास झटेल. तिला मुलेंबाळें झालीं असतां तीं स्तनपानाबरोबरच तिजपासून ज्ञानामृतपान करतील व लहानपणापासूनच ती त्यांस शहाणपणाचें बाळकडू पाजील. अशी प्रेमळ, बहुश्रुत व जिवलग पत्नी घरीं असल्यावर, बाहेर कसेंही मित्रमंडळ असलें तरी घरीं परत जाऊन प्रिय सखीच्या आनंददायी सान्निध्यानें,

मनास व शरिरास आलेला थकवा केव्हां घालवूं असें तुला होईल.

'अशावेळीं तिनें वीणा हातीं घेऊन स्वतः रचलेलें एखादें गाणें ह्मटलें तर, तुझ्या एकांत आरामस्थलीं तुझ्या सर्व श्रमाचा उपशम होऊन तिचा त्यावेळचा आवाज कोकिलेच्या आवाजापेक्षांही मधुर वाटेल. तिच्याशीं संभाषण करण्यांत तुझे दिवसाचे दिवस व रात्रीच्या रात्री मोठ्या आनंदानें जातील व तिच्या भाषणचातुर्यांत तुला नेहमीं नवीन नवीन खुब्या आढळून येतील. तुझ्या चित्ताला ती कायमची गंभीरता आणील व कोणत्याही मनोविकाराचा अतिरेक न होऊं देतां व मनाला उदासीनतेची बाधा न होऊं देतां चिंतेचें निरसन करील.'

आणखी एका दूरदर्शी व चाणाक्ष गृहस्थानें लग्नाबद्दल आपल्या मुलास सदुपदेशपर चार शब्द सांगितले आहेत, तेही व्यवहारास अनुसरून असल्यामुळें ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. ते असेः "ईश्वरकृपेनें तूं मोठा होऊन कर्तासवरता झालास म्हणजे लग्न करतांना अतिशय सावधगिरी ठेव. बायकोची निवड करतांना पूर्ण विचार कर. कारण ज्या मानानें तुझी ही निवड बरी वाईट होईल, त्या मानानें तुला सुखदुःख होईल. समरांगणांत उभें राहून लढाईस आरंभ करण्यापूर्वी युक्ति योजतांना चुकी झाली म्हणजे ती जशी पुन्हा कधींच दुरुस्त करतां येत नाहीं व त्यामुळें घातक परिणाम निरंतर सोसावे लागतात, तद्वतच् आयुष्यांतल्या या अतिशय महत्त्वाच्या कामांत

एकदां चूक झाली म्हणजे ती कधींच दुरस्त करितां येत नाहीं व तिचे दुष्परिणाम नंतर सदोदित भोगावे लागतात. तुझी मालमिळकत बरीचशी असली तर आसपासच्या प्रांतांतली बायको कर व लग्नाची फारशी जलदी न करितां सावकाश रीतीनें कर. परंतु मालमिळकत बेताबाताचीच असली तर, दूरदेशांतली कर; व मग फार काळ घालविण्यांतही अर्थ नाहीं. तिचा स्वभाव कसा आहे, व तिच्या आईबापांचे तारुण्यांतील मनाचे कल कसे काय होते, याजबद्दल नीट चौकशी कर......तसेंच, ती कुरूप नसावी. कारण, तशी असली, तर सर्व लोक तिचा तिरस्कार करतील व तुलाही तिचा तिटकारा येईल,किंवा खुजी किंवा अगदीं मूर्ख अशा स्त्रीची निवड करूं नको. कारण, ती खुजी असली तर प्रजा खुजी होईल, किंवा मूर्ख असली तर आपल्या, मूर्खपणाच्या कृतीनें ती तुला लाज आणील, व तिच्याशीं बोलून तुला कधींच सुख व्हावयाचें नाहीं."

जॉन स्टुअर्ट मिल्ल यांची पत्नी.

पतिपत्नीच्या अंतःकरणाचें संमेलन होऊन जो विवाहसंबंध जुळतो त्याची योग्यता वर्णावी तितकी थोडीच. पतीच्या प्रत्येक कामांत कळकळीनें मन घालून तीं करण्यास त्यास मदत करण्यासाठीं झटणें हें पत्नीचें प्रथम कर्तव्य आहे. अशा प्रकारचें थोर कर्तव्य यथाशक्ति करून ज्यांनीं आपणास धन्य म्हणवून घेतलें अशा स्त्रीरत्नांपैकीं एक प्रसिद्ध **जान स्टुअर्ट मिल्ल** यांची पत्नी होय. **स्वातंत्र्य** या विषयावर मिल्ल साहेबांनीं

जो उत्तम निबंध लिहिला आहे, त्याच्या आरंभीं त्यांनीं तिज-बद्दल असें लिहिलें आहे: 'जिच्यामुळें उत्तम लेख लिहिण्याची स्फूर्ति मजमध्यें उत्पन्न झाली, त्यांतील कांहीं कांहीं उत्तम भाग जिच्या स्वतःच्या कृतीचें फळ होय, जिच्या उच्च सत्यनिष्ठेनें व न्यायप्रियतेनें असे लेख लिहिण्यास नेहमीं मला उत्तेजन मिळालें, व जिची मान्यता हेंच माझें उत्तम बक्षीस असे, अशा माझ्या प्रियसखीस-पत्नीस-हा ग्रंथ मी अर्पण करितों.'

ज्यांची मूळची चित्तवृत्ति उदास व प्रकृति अशक्त अशा पतींस स्वतःच्या प्रेमळ व कळकळीच्या वर्तनानें त्यांच्या मनास व शरिरास उदासीनतेची व क्षीणतेची बाधा न होऊं देतां ज्यांनीं सदासर्वकाळ त्यांस आनंद देण्याचा यत्न केला, व आपल्या उत्तम स्मरणशक्तीनें व शांत गंभीर विचारसरणीनें, सद-भिरुचीनें व कुशाग्रबुद्धीनें त्यांच्या विद्याव्यासंगांत त्यांस मदत केली, अशा पाश्चिमात्य थोर स्त्रियांचीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील.

आमरण पातिव्रत्य पाळून एकनिष्ठ पतिसेवा करणाऱ्या सतींची थोरवी वर्णावी तितकी थोडीच. **अनुसूया, अहल्या, सीता, दमयंती, सावित्री** इत्यादि महापतिव्रता स्त्रियांच्या कथा किती बोधप्रद व किती विचार करण्यासारख्या आहेत? त्या कथा वाचून किंवा ऐकून या थोर साध्वींच्या पवित्र वर्तन-क्रमाचा ठसा हृत्पटलावर वठून तदनुरूप वर्तन ठेवण्याचा यत्न स्त्रियांकडून झाला असतां फार चांगलें. परंतु दुःखाची गोष्ट अशी आहे—व ती नित्यशः पाहण्यांत येते—कीं, वर सांगितलेल्या पवित्र स्त्रियांच्या कथा ऐकून त्यांपासून घेण्यासारखा व्यावहारिक

बोध कोणता, ह्याचा विचार स्त्रिया मुळींच करीत नाहींत; व या कथांचें निरूपण करणारेही त्याबद्दल बहुतकरून बेफिकीरच असतात. त्याचा परिणाम बहुतेक एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें तें सोडून देण्यासारखाच होतो; किंवा देवळांत जाऊन वर सांगितल्याप्रमाणें कर्णमधुर नामावलीच्या नामावलि पाठ मात्र होतात पण व्यवहारांत त्यांचें अनुकरण मुळींच होत नाहीं. ही स्थिति पालटून स्त्रिया पोथ्यापुराणांत वर्णिलेल्या साध्वींच्या वर्तनाचा कित्ता आपल्या नजरेपुढें सदासर्वकाळ ठेवून व आपल्या मनोहर सान्निध्यानें व गोड समागमानें पतीच्या चंचल वृत्तींस स्थैर्य आणून आपापल्या गृहास सर्वत्र शोभा आणण्याचा यत्न करतील तरच त्यांनीं आपलें खरें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावलें व आपणावरची योग्य जबाबदारी ओळखली असें होईल. एका मार्मिक कवीनें एकदां असे उद्‌गार काढिले आहेत कीं, 'जी स्त्री पतीच्या सुखदु:खाची वांटेकरीण बनून या जगांतील नानाविध चिंतांनीं त्रासलेल्या आपल्या पतीच्या क्षुब्ध मनोवृत्तींस मोठ्या प्रेमभावानें, न रागावतां, व त्या त्या प्रसंगास शोभेशा गोड वर्तनानें गार करून सोडते, व गृहप्रेमरज्जूनें त्याचें अंत:करण निगडित करिते,-अशी सहचारिणी मिळणें म्हणजे संसारांत खरी सुखप्राप्ति होय.

संसार सुखावह होण्यास कोणत्या गोष्टींची जरूरी आहे ?

संसारांत सुख कशानें होईल ?

आम्हांस वाटतें कीं, पतिपत्नीचा स्वभाव जुळणें व त्यांत ऐक्य असणें ही प्रथमची अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. बाहेरून त्यांचे स्वभाव जुळलेले दिसले म्हणजे काम झालें असें

नाहीं. तर परस्परांचें अंतर्याम तादात्म्य पावलें पाहिजे. परस्परांच्या अभिरुचि समान असून त्यांस परस्परांबद्दल अत्यंत कळकळ वाटली पाहिजे. तसेंच परस्परांच्या मनांत अंतःकरणापासून एकमेकांबद्दल सन्मानबुद्धि उत्पन्न झाली पाहिजे व एकानें दुसऱ्याशीं खऱ्या व अढळ सौजन्यानें वागलें पाहिजे. पतिपत्नी हीं जरी एकमेकांवर रागावलीं नाहींत किंवा त्यांनीं एकमेकांबद्दल नाखुषी दाखविली नाहीं, तरी परस्परांच्या अभिरुचि भिन्न असून त्यांच्या स्वभावांत अथवा विचारांत फार विरोध असला, तर त्यांचें तादात्म्य कधींच व्हावयाचें नाहीं. अंतःकरणाच्या ज्या समतेवांचून लग्न म्हणजे केवळ पोरखेळ किंवा थट्टा होते व बहुतकरून अतिशय क्लेशप्रद व त्रासदायक गोष्ट होऊन बसते, ती अंतःसमता—जेथें स्वभावाची भिन्नता आहे तेथें कधींच घडून यावयाची नाहीं. अशा प्रकारच्या दुर्दैवास पडलेले वळी त्यापासून उत्पन्न होणाऱ्या त्रासांवर किंवा क्लेशांवर पांघरूण घालण्याचा कदाचित् यत्न करतील; किंवा तें दुर्दैव आपल्या मित्रांच्या किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या नजरेस न येण्याबद्दल सावधगिरीही ठेवितील. बाहेरून एकमेकांबद्दल बराच स्नेहभाव दाखविण्याची खटपट करून लोकांकडून कदाचित् सुखी जोडपें देखील म्हणवून घेतील. तथापि सर्व आयुष्यांत अंतःसमता किंवा तादात्म्य होऊन जो अवर्णनीय सुखानुभव यावयाचा, त्याची प्राप्ति त्यांस कधींच व्हावयाची नाहीं. अशा तादात्म्यापासून होणाऱ्या सुखाचा कधींच अनुभव न

आल्यामुळें ती गोष्ट केवळ भ्रमांत राहून जाईल व मरण येई-पर्यंत उभयतांसही ह्या भ्रमाचें खरें स्वरूप कळून यावयाचें नाहीं. एकजण मरून दुसरें माणूस जिवंत राहिल्यास त्याला मृत माण-साच्या सहवासामुळें होत असलेल्या सुखाची व तें माणूस असतां आपली सर्व प्रकारची सोय होत असल्यामुळें आपलें फारसें अडत नव्हतें या गोष्टीची आठवण होऊन वाईटही वाटेल व तें शोका-कुल होईल. तादात्म्यासंबंधीं ही गोष्ट ज्यांची अंतकालपावेतों सदोदित भ्रमांतच राहत असेल, ते एकाप्रकारें सुखीच म्हणाव-याचे; परंतु आयुष्याचा बराच काळ ज्यांना अशा स्थितींत कंठा-वयाचा असतो त्यांच्या मनांत या गोष्टींचें पूर्ण स्वरूप बिंबलें, तर ते मात्र फारच हतभाग्य म्हणावयाचे ! जगांत लग्न झालेल्या पुष्कळ जोडप्यांचें सुरळीत चाललेलें पाहून लोक त्यांस सुखी जोडपीं समजतात. याचें कारण तादात्म्यासंबंधीं भ्रम सदासर्वकाल अंतकालपर्यंत कायम राहतो इतकेंच; एका योग्य आत्म्याचें दुसऱ्या योग्य आत्म्याशीं संमेलन झालें असतें, किंवा एकाच्या मनोवृत्ति दुसऱ्याच्या मनोवृत्तींसारख्या असल्यामुळें जशी अंतः-समता व्हावयाची तशी झालेली असते, म्हणून नव्हे. एखादा शहाणा माणूस म्हणतो, "शेजारीं अमुक गृहस्थ व अमुक अमुक बाई रहातात; त्यांचें एकमेकांशीं चांगलें जुळतेंसें दिसतें." दुसरा म्हणतो "अहो पण तुम्हांला ठाऊक आहे काय ? हा गृहस्थच फार सुशील आहे." कोणी म्हणतो " त्या बाईचाच स्वभाव फार गोड आहे." ठीक आहे, सर्व खरें आहे, हें जोडपें

एकमेकांशीं कधीं भांडत नाहीं, एक दुसऱ्याला वाईट वाटेल असा एक शब्दही तोंडावाटे कधीं काढीत नाहीं व तीं उभयतां एकमेकांवर रागावलेलीं कधींच दिसत नाहींत. तरी पण, बिचाऱ्या **डेस्डिमोने**ला **आथेल्लो**चें अंतर्याम जितकें कळलें होतें, तितकेंच या उभयतांस एकमेकांचें कळलें असेल. किंवा **वसंतसेना** व **चारुदत्त** यांचा जो एक दिल झ ाला होता, त्याचा एक शतांशही यांचा झाला नसेल;-किंबहुना त्यांच्याकडून तसा यत्नही झाला नसेल.

उभयतांचा स्वभाव व अभिरुचि हीं सारखीं असलीं तर अतिशय कठीण कामें सुद्धां विशेष त्रास न होतां कशीं तडीस नेतां येतात, व एकाचें प्रोत्साहन दुसऱ्यास असल्यामुळें बिकट कामें कशीं मजेनें पार पडतात हें **सर विल्यम नेपिअर** व त्यांची पत्नी **लेडी नेपिअर** यांच्या उदाहरणावरूच चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. या गृहस्थाच्या हातून जो एक उत्तम इतिहास लिहिला गेला, तो लिहितांना त्यास त्याच्या पत्नीची मदत मिळाली नसती, तर त्याच्याकडून तें काम कदाचित् पार पडलें नसतें, व तिचें प्रोत्साहन त्यास नसतें तर तें बिकट काम त्यानें हातीं घेतलें असतें किंवा नाहीं याची शंकाच आहे. ज्या लेखांच्या आधारानें तो ग्रंथ लिहिला गेला आहे, ते लेख या स्त्रीनें स्वतः वाचून त्यांचें साग्र भाषान्तर केलें. व रात्रंदिवस मेहनत करून त्यांतून घेण्यासारखा भाग निवडून तो सर्व स्वच्छ लिहून काढिला. ग्रंथकर्त्याचें अक्षर दुसऱ्यास वाचतां येण्यासारखें नसल्यामुळें तो सर्व ग्रंथ लिहून झाल्यावर त्या हस्तलेखाची तिनें

स्वतः नक्कल करून नंतर तो छापावयास पाठविला. या पर्वतप्राय कृत्यास जे अविश्रांत श्रम पडले, त्यांवरून कोणी कदाचित् असें म्हणेल कीं, घरगुती कामांत तिचें अगदींच दुर्लक्ष झालें असेल. पण तसा प्रकार मुळींच नव्हता. कोणत्याही गृहकृत्याची तिनें बिलकुल हेळसांड न करितां जीं कामें स्वतः करावयाचीं तीं दुसऱ्यावर कधींच टाकलीं नाहींत, व घरांतल्या व्यवस्थेंत व टापटिपींत यत्किंचित्सुद्धां कमीपणा पडूं दिला नाही, असें तिच्या पतीच्या सांगण्यांत आलें आहे. जेथें पति म्हणजे एक जुलमी नबाब, व पत्नी म्हणजे एक हलकींसलकीं कामें करण्याकरितां करून आणलेली दासी—म्हणून सल्लामसलतीचीं किंवा विचाराचीं कामें करण्यास अगदींच नालायक अशी समजूत आहे; किंवा जेथें पत्नीचेंच प्राबल्य फार असलें पाहिजे व इतर सर्वांनीं तिच्या करण्यासवरण्यास माना डोलविल्या पाहिजेत असा ग्रह आहे; तेथें खऱ्या सुखाची आशाच नको. उभयतांनीं शांत विचारानें परस्परांच्या वर्तनांत योग्य समता ठेवल्यावांचून सुखप्राप्ति होण्याचा संभव फारच कमी. वर्तनांत पूर्ण समता हेंच परस्परांमधील पूर्ण प्रेमाचें लक्षण होय. येथें हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, वर्तनासंबंधानें अशी समता असल्यामुळें शहाणी पत्नी आपल्या पतीचें श्रेष्ठत्व मोठ्या खुषीनें पत्करून त्याच्याशीं तशा रीतीनें वागण्यास नेहमीं तयार होईल. कारण, तिची अशी समजूत झाली पाहिजे कीं, आपल्या पतीवरची जबाबदारी आपल्या जबाबदारीपेक्षां मोठी आहे; व ईश्वरी नियमांनीं

आणि मानवी नियमांनीं त्यास कुटुंबाचा धुरीण बनविलें आहे. पतिपत्नीचा स्वभाव समान असून जेथें परस्परांमध्यें तादात्म्य आहे, तेथें मालक कोण किंवा मालकीण कोण असा प्रश्नच निघावयाचा नाहीं. उभयतांसही कळून येईल कीं, जरी आपापलीं कामें निरनिराळीं आहेत, एकाचीं कामें दुसऱ्यास करितां यावयाचीं नाहींत, तरी उभयतांचें हिताहित एकच असून हजारों–लाखों—गोष्टींसंबंधानें सुखदु:खाचे आपण सारखे वांटेकरी आहों. कोणत्या बाबतींत कोणाचें मत ज्यास्ती ग्राह्य आहे, व केव्हां एकानें आपला हेका सोडून दुसऱ्यानें सांगितल्याप्रमाणें वर्तन ठेवणें रास्त आहे, हेंही त्यांस समजून येईल. कारण, संसारामध्यें केव्हां केव्हां असे प्रसंग असतात कीं त्या प्रसंगीं पत्नी आपलाच हेका धरून न बसतां पति सांगेल त्याप्रमाणें तिनें वागलें पाहिजे. तसेंच, पतीनें पत्नीच्या मताप्रमाणें वर्तन करणें इष्ट व हितप्रद असतें असे प्रसंगही थोडे असतात असें नाहीं. परंतु उभयतांस एकमेकांच्या विचारानें किंवा सल्लामसलतीनें वागण्याचेच प्रसंग ज्यास्ती असतात.

अशा रीतीनें पतिपत्नीमध्यें सर्वतोपरी ऐक्य होऊन तादात्म्य झालें असतां आयुष्याचे दिवस आनंदानें जाऊन दिवसानुदिवस सुखाची भर कशी पडत जाते, हें प्रसिद्ध शिल्पकार--फ्लाक्स्मन् —याच्या चरित्रावरून स्पष्ट कळण्यासारखें आहे. याच्या सत्ताविसाव्या वर्षी या गृहस्थाचें लग्न ॲन् नांवाच्या एका प्रीतिपात्र व सुगुणसंपन्न स्त्रीशीं झाल्यानंतर त्यांचा काल जसा आनंदांत

गेला, तसा थोड्यांचा जात असेल. **ॲन्** हिला **फ्रेंच** व **इतालियन** भाषा चांगल्या अवगत असून त्या भाषांत लिहिलेले चांगले चांगले लेख वाचण्याचा तिला नाद असे. या शिल्पकाराच्या चरित्रकारानें लिहिलें आहे त्याप्रमाणें सगळ्यांत विशेष गोष्ट ही कीं, त्याच्या सुशील पत्नीला त्याच्या विलक्षण बुद्धिमत्तेचें अतिशय कौतुक वाटत असे. असामान्य बुद्धीच्या माणसांची वृत्ति बहुतकरून नेहमीं उदास असते; त्याप्रमाणें या गृहस्थासही केव्हां केव्हां औदासिन्यानें फार घेरून सोडावें. अशा समयीं त्याचें औदासिन्य घालवून त्याची चित्तवृत्ति आनंदित करण्याकरितां व त्यास उमेद आणण्याकरितां ती भारी झटे. त्यानें काढलेलीं चित्रें ती व्यवस्थेनें लावून ठेवी व केव्हां केव्हां ती त्याचा पत्रव्यवहारही चालवी. हें जरी काम तिला विशेष करावें लागे, तरी गृहकृत्यांत तिजकडून कधींच हयगय होत नसे. इतकेंच नव्हे. पण तीं ती फार धोरणानें व चातुर्यानें करीत असे. तिच्या नेहमीच्या वर्तनावरून असें दिसून येई कीं, परमेश्वरानें त्या उभयतांचें लग्न जुळवून कांहीं अद्भुत चमत्कार घडवून आणून त्या उभयतांचा एकच जीव बनवून दिला आहे. इतक्या सारख्या दिलाच्या मित्राबरोबर होत असलेल्या संभाषणानें या गृहस्थाच्या कल्पनाशक्तीस जोर येत असे. ही गृहकृत्यांत दक्ष असल्यामुळें व संसारांत लागणाऱ्या खर्चाची व्यवस्था तिच्याकडून व्हावी तशी योग्य रीतीनें होत असल्यामुळें, त्या गृहस्थाला **रोम**शहरीं जाऊन तेथल्या

प्राचीन कलांचे उत्तम नमुने पहावयास सांपडले व त्यांचें अध्ययन करतां आलें. त्या शहरीं तो सात वर्षें राहिला. यावेळीं ज्यांनीं त्यास पाहिलें असेल, ते 'त्याची विनयवती पत्नी त्याच्याजवळ नेहमीं असून आपल्या ज्ञानानें व सदभिरुचीनें त्यास मदत करीत आहे,' हा देखावा कधींच विसरणार नाहींत. कोणी कोणी स्त्रिया अंगीं थोडासा गुण असल्यास, आपल्या ज्ञानाची शेखी मिरवून पतीस कमी मानितात, किंवा 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे, हृदयेतु हलाहलम्' असा वर्तनक्रम ठेवितात, व पतीस आपल्या तावडींत आणून मग त्यास आपापल्या इच्छेनुरूप वागवितात, त्यांतली ती नव्हती. त्या उभयतांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम असे. त्यांचीं वाचण्याचीं पुस्तकें एक, त्यांचे विचार एक, अभिरूचि एक, असा प्रकार असल्यामुळें एका शरिराच्या अवयवांप्रमाणें त्यांची स्थिति असे, व एकमेकांपासून विभक्त होण्याच्या विचाराचें वारें सुद्धां त्यांच्या मनांत येत नसे.

इहलोकचा संसार म्हणजे भावी उन्नतावस्था प्राप्त करून घेण्याच्या तयारीचें ठिकाण असें जे समजतात, ते नेहमीं ध्यानांत ठेवितात कीं, लग्न हें मानसिक व नैतिक शिक्षणाचें साधन करून सोडतां येईल. विचारी, सभ्य, ममताळू असें माणूस सहवासाला असेल तर त्याचें वजन इतरांवर कसें बसतें आणि त्याच्या त्या गोड समागमापासून कसे लाभ होतात, हें सांगावें तितकें थोडेंच. पत्नीच्या स्वाभाविक दौर्बल्यापासून उत्पन्न

होणारा कमीपणा पतीच्या स्वाभाविक बळानें व शौर्यानें भरून येतो. तसेंच पतीच्या अंगीं वाजवीपेक्षां जो ज्यास्ती तामसीपणा असतो, तो पत्नीच्या मनोहर सात्विकवृत्तीनें कमी होऊन त्याच्याही वर्तनांत सात्विक वृत्तीची छटा दिसूं लागते. सारांश, एकाची उणीव दुसऱ्याकडून भरून काढिली जाते. खरोखर पाहिलें असतां चांगल्या कल्पक व सुशिक्षित मनुष्याच्या संगतीला अज्ञान व संकुचित मनाचें माणूस असलें, तर त्या मनुष्याचा काल जावा तसा आनंदांत जाईल काय? अशा मनुष्याच्या उदात्त कल्पना व विचार त्याच्या सहवासास असलेल्या माणसास कळावयाचे देखील नाहींत. अति कठीण विषयसुद्धां तिला कळले पाहिजेत असें नाहीं, परंतु जिच्या समवेत त्याचें आयुष्य जावयाचें, तिला सृष्टिशास्त्राच्या शोधांनीं व्यक्त झालेल्या साध्या आणि चित्तवेधक गोष्टी समजत नाहींत, किंवा समजण्याची पात्रता नसल्यामुळें मनास थक्क करून सोडणाऱ्या अद्भुत सृष्टिप्रभावाचा परिणाम तिच्या मनावर यत्किंचित् सुद्धां झाला नाहीं, किंवा ज्या गोष्टींचा संबंध सर्व मानवी जातीच्या सुखाशीं आहे अशा गोष्टींकडे अज्ञानामुळें तिचें चित्त न लागतां, गांवांतल्या उलाढाली अथवा अशाच प्रकारच्या इतर निरर्थक गोष्टी निघाल्या म्हणजे मात्र घड्याळाला किल्ली दिल्याप्रमाणें तिच्या संभाषणाला ऊत आला; तर तिच्या बद्दल पतीच्या मनांत कितीसा सन्मान राहील? क्षुद्र व निरर्थक गोष्टींसंबंधानें तिची टकळी सुरू झाली म्हणजे याच्या मनाचा क्षोभ होऊन त्या बोलण्याचा तिरस्कार उत्पन्न झाला असता

केवल काय? अशी स्थिति असली म्हणजे मुलें बाळें होऊन उभयतांमध्यें जो एका प्रकारचा नाजुक संबंध उत्पन्न होतो, त्यामुळें परस्परांकडे एका प्रकारचा ळळाही लागतो; परंतु अंतःकरणापासून उत्पन्न होणारें प्रेम त्यांच्यांत फारसें वास करीत असेल किंवा नाहीं याचा संशयच. पतीच्या संबंधानें सुद्धां असेंच म्हटलें पाहिजे. ज्याच्या मनांत थोर व गंभीर विचारांचें वारें सुद्धां येत नाहीं व उच्च कल्पनांची प्रेरणाही कधीं होत नाहीं अशा विचारशून्य पतीच्या समागमापासून चाणाक्ष व विचारवती पत्नीला सुखप्राप्तीची आशाच नको. जन्माचा सोबती निवडतांना, आपणांत जें चांगलें असेल तें दृढ करून त्याचा जो विकास करील व जें वाईट असेल तें समूळ जो नाहींसा करील असाच सोबती निवडला पाहिजे; आपल्या सद्गुणाच्या व सद्वर्तनाच्या सामर्थ्यानें थोर विचार व थोर मनोवृत्ति यांच्या प्रांतांत नेऊन यथेच्छ संचार करावयास लावील, अशाचीच निवड झाली पाहिजे. आपल्या आंगची दुर्बलता मनांत आणून ज्या उदाहरणानें आपल्या क्षुद्र वासना नाहींतशा होऊन सन्मार्गाकडे आपल्या मनाचा कल होईल, असें थोर उदाहरण आपणासमोर राहील असा आपला यत्न पाहिजे. मित्रांची निवड करण्याबद्दल आपणास नेहमीं उपदेश होत असतो. आपल्या वर्तनावर त्यांच्या वर्तनाचा फारच परिणाम होत असतो हें निर्विवाद आहे. एका नामांकित प्राचीन कवीचें म्हणणें असें आहे कीं, पुष्कळ मित्र असल्यापासून खरें सुख मिळतें असें नाहीं;

तर योग्य व निवडक मित्रांपासून खरें सुख मिळतें. **जनार्दन** स्वामीच्या समागमापासून **एकनाथा**च्या मनावर थोर संस्कार होऊन **एकनाथ** महाराजांच्या मनाचा आत्मोन्नतीकडे कल कसा झाला हें आपणास ठाऊक आहे. उलट पक्षीं, **कलुशा** ब्राह्मणाच्या संगतीनें **संभाजी** महाराजांवर वाईट परिणाम घडून सर्वांस चकित करून सोडणारें शरीरसामर्थ्य अंगीं असतांही **संभाजी**चा कसा अंत झाला हेंही सर्वांस ठाऊक नाहीं काय? सारांश, एखाद्या माणसाचे जसे सोबती, तसाच तो बनतो व त्याच्या सोबत्यांवरूनच त्याचीही परीक्षा होते. परंतु पतिपत्नीच्या मैत्रीचा परिणाम ज्यास्ती बलवत्तर असून अधिक वेळ टिकणारा आहे. त्या परस्परांची निवड इतर मित्रांच्या निवडीपेक्षां अधिक महत्त्वाची आहे. म्हणून ती ज्यास्ती बारकाईनें करणें अवश्य आहे. परंतु पुष्कळदां असें घडून येतें कीं, सारखा स्वभाव, सारखी अभिरुचि, सारखी समजूत, सारखी वर्तणूक, सारखे गुण वगैरे गोष्टींचा फारसा विचार न होतां लग्नें घडवून आणिलीं जातात! त्यामुळें लग्न सर्वप्रकारच्या शिक्षणाचें व आत्मोन्नतीचें साधन व्हावयास पाहिजे तें मुळींच होत नाहीं. स्त्रीपासून—मग ती स्त्री आई असो वा बहीण असो—खरी सुखप्राप्ति होण्याचा संभव जसा असतो, तसा पुरुषापासून पुरुषाला होण्याचा संभव कमी. त्यांतही पतिपत्नीमध्यें असणारा संबंध तर फारच सलगीचा असतो. परस्परांसंबंधानें कोणतीही गोष्ट,—मग ती हलकी असो भारी

असो, लहान असो मोठी असो,—एकमेकांस कळलीच पाहिजे. परस्परांची दृष्टि परस्परांबद्दल इतकी शोधक बनलेली असते कीं, एकाची कोणतीही गोष्ट दुसऱ्यापासून गुप्त राहणें कठीण. सुविचारी पतिपत्नीमध्यें एकमेकांला शिकण्यासारखें पुष्कळ असतें. एका विद्वान् कवीनें म्हटलें आहे. 'प्रेमळ पतिपत्नी परस्परांस उत्तम पुस्तकांप्रमाणें आहेत. या पुस्तकाचें प्रत्येक पृष्ठ सत्य, सभ्यता, विनय इत्यादि सद्गुणांनीं भरलेलें असतें. म्हणून परस्परांची निवड फार बारकाईनें झाली पाहिजे, असें म्हटलें याचें मुख्य कारण हेंच होय. परंतु अशी गोष्ट बहुधा पाहण्यांत येते कीं, वधूवर परस्परांच्या समागमानें उन्नतदशेस येतील किंवा नाहींत, त्यांच्यामध्यें विचारांचें ऐक्य, सहानुभूति उत्पन्न होईल किंवा नाहीं, परस्परांचे मनाचे कल विरुद्ध आहेत किंवा जुळणारे आहेत, वगैरे गोष्टींचा व्हावा तसा विचार न होतांच संबंध जुळला जातो. **कैकेयी**च्या अतिवाईट स्वभावामुळें **दशरथास** कसा जाच झाला व त्याच जाचांत त्या राजाचा कसा अंत झाला हें बहुतेकांस विदित आहे. **तुकारामाला** कजाग पत्नीमुळें कसा त्रास सोसावा लागला हेंही प्रसिद्धच आहे. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता **साक्रेटीस** याचीही अशीच गोष्ट आहे.

गृहकृत्यें चालवीत असतां आपल्या कुटुंबाचें सौख्य व कल्याण हीं विशेषेंकरून आपल्या उदाहरणावर अवलंबून आहेत, असें गृहिणी निरंतर मनांत आणीत गेली तर तिला बरीच उमेद येण्याचा संभव आहे. तिचा स्वार्थत्याग, तिची साधी वृत्ति, इत-

रांस सुख देण्याची तिची थोर इच्छा, तिची सत्यनिष्ठा, तिची अढळ धर्मश्रद्धा, इत्यादि सद्गुणांचें पूर्ण फळ तिला मिळाल्यावांचून कधीं राहणार नाहीं. तिनें निमुटपणें घालून दिलेल्या धड्याचें बीज अनेकांच्या हृदयांत रुजून तें एकापासून दुसऱ्यास, दुसऱ्यापासून तिसऱ्यास, असें जातां जातां त्याचा केवढा मोठा वृक्ष होईल याची कल्पनासुद्धां तिला करवणार नाहीं. उच्छृंकल मुलांस दाबदपटशा देऊन त्यांला आपल्या कह्यांत ठेवणें, दुःखी जीवांचीं दुःखें आपल्या खटपटीनें नाहींतशीं करणें, तंटेबखेडे मोडून शांतता राखणें, व इतकें सर्व करूनही सर्वांना आनंदाचें स्थान बनणें–वगैरे थोर कृत्यें करणें हें तिचें पवित्र कर्तव्य होय. आपल्या आनंदप्रद समागमानें निदान एका मनुष्यास तरी अतिसंतोष होतो—इतका कीं या कष्टमय जगांत त्याच्यावर कशींही संकटें आलीं तरी त्याला त्याचें कांहींच वाटत नाहीं—ही गोष्ट तिला कांहींच भूषणास्पद नाहीं काय ? आपल्या ओंठावरील मंदस्मित पाहून त्याचें अंतःकरण आनंदानें नाचूं उडूं लागतें, आपला मधुर आवाज ऐकून तो आपले सर्व कष्ट विसरून जातो, रात्रंदिवस खपून आपल्या सर्व श्रमांचें फल कोणताही संशय मनांत न आणतां आपल्या हातीं देण्यांतच त्याला आनंद वाटतो, ही गोष्ट तिला बक्षिसादाखल किंवा अति आल्हादकारक नाहीं काय ? तसेंच गृहिणी बनून आपल्या सौम्य वर्तनानें सद्धर्माकडे त्याच्या मनाचा लय लावून परमेश्वर विषयक चिंतनाच्या उच्च

प्रदेशाकडे त्यास नेणें—सारांश, त्याचा मित्र, त्याचा मंत्री, त्याचा विभागी, त्याची पत्नी बनणें यांत कांहींच मोठेपणा नाहीं काय ?

भाग ३ रा.

कुमारी.

बाल्यावस्था व प्रौढावस्था यांमधील मुलींचा काल फारच अल्लडपणाचा असतो. जगांतल्याकटकटीचा भाग फारसा पाहण्यांत किंवा अनुभवास न आल्यामुळें त्यांतील ती ती वस्तु मनोरम भासत असते. मन कोणत्याही प्रकारानें बहुतकरून गांजलें न गेल्यामुळें त्याचा उत्साह कायम राहून तो दिवसेंदिवस वाढत असतो. मनाच्या व शरीराच्या सर्व शक्ति वाढत्या स्थितींत असल्यामुळें वस्तुमात्रापासून होत जाणाऱ्या सुखानुभवानें सर्व वृत्ति आनंदमय बनत असतात. जगांतले कांहीं व्यवहार अर्धेमुर्धे समजत असतात, कांहीं मुळींच समजत नसतात. अशी अल्लड स्थिति असल्यामुळें कसलीही चिंता मनास फारवेळ बहुतकरून बाधा करीत नसते. ही मनाची स्थिति झाली. पूर्व क्षितिजावर सूर्योदय होतांच सूर्याच्या कोमल प्रभेनें पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्व वस्तु जशा मनोहर भासूं लागतात, तद्वतच यौवनरूपी सूर्याचा उदय होऊं लागतांच त्याच्या प्रभेचा परिणाम सर्व शरीरभर दृग्गोचर होतो व तें विशेष खुलूं लागतें.

याप्रमाणें बाल्यदशा व प्रौढदशा यांस जोडणाऱ्या या तरुणावस्थेच्या काळाला कुमारीचा काल म्हणतां येईल. अशा प्रकारची ही तरुणावस्था प्राप्त होऊन कांहीं काळ लोटल्यावर, वर निर्दिष्ट केलेल्या मनोवृत्ति हळूहळू बदलत जातात. कुमा-

रीच्या मनाला आपल्या भावी स्थितीचा चित्रपट फार अफाट, अनिश्चित व अस्पष्ट दिसूं लागतो. या चित्रपटाचा देखावा दृष्टीसमोर असतांना मनांत नानाप्रकारच्या कल्पना उद्भवूं लागतात. आतांपर्यंत आयुष्याचा जो थोडा काळ गेला तो गेला; पण पुढील काळ कसा जाणार? या संसारसागरांत आपली आयुष्यरूपी नौका मार्ग क्रमूं लागल्यावर तिला कोणती दिशा लागणार? या नौकेस चांगला सुकाण्या कसा मिळेल? सुकाण्या अगोदरच मिळाला असल्यास तो तिला सुमार्ग दाखवून संसारयात्रा पार पाडण्याइतका शाहाणा निघेल किंवा नाहीं? त्याचा आपला एकदिल होईल किंवा नाहीं? त्या त्या स्थितींत योग्य कर्तव्य बजावलें जाऊन शेवट गोड होईल कीं कसें? किंवा तो तब्यतखोर, जुलमी, विचारशून्य निघून षड्रिपूंच्या तुफानाला आळा घालण्यास अगदींच असमर्थ होईल? असें झालें म्हणजे मगतर या नौकेला भलतीच दिशा लागेल व एकदा दिशा चुकली म्हणजे ती कोणत्याना कोणत्यातरी खडकावर आपटून तिचे शतशःतुकडे पडण्याचा संभव फार. अशा तऱ्हेचे कल्पना-तरंग कुमारीच्या मनांत येऊन तिचें अंतःकरण चिंतातूर होण्याचा बराच संभव असतो. मुलाची स्थिति याहून फार भिन्न असते. लहानपणीं एकाद्या मुलाचीं जीं लक्षणें दृष्टीस पडतात तीं पुढें नेहमीं कायम राहून तदनुरोधानेंच त्याचा पुढील आयुष्य-क्रम ठरतोच असें नेहमीं घडत नाहीं; परंतू कुमारीच्या स्थितीवरून मात्र तिच्या भावी आयुष्यक्रमाची दिशा नेहमीं

ठरण्यासारखी असते. कारण स्त्रियांच्या आयुष्यक्रमाची दिशा अगदीं ठरीव असते. वयाला फारशीं वर्षे लोटण्याच्या पूर्वीच तिला प्रौढावस्था येते आणि संसाराची जबाबदारीही तिच्यावर पुरषापेक्षां लवकर येऊन पडते. शाळांत किंवा कालेजांत मुलगा रखडत असतो, तों मुलगी पत्नीपदास पोह्चते, इतकेंच नाहीं, तर तिला मातृत्व सुद्धां येतें. वयाला अनुसरूस निरनिराळ्या ख्यालीखुशालींमध्यें तो दंग असतो, तों तिच्यावर संसाराची जबाबदारी येऊन पडल्यामुळें त्या त्या कामाचा पोक्तपणें विचार करून त्याची व्यवस्था लावण्यांत ती गर्क होते. हें सगळें खरें; पण प्रश्न इतकाच कीं ज्या कामाला पोक्तपणाची व प्रौढ विचारांची अत्यंत अत्यंत जरूरी असते, तें काम करण्यापर्यंत तिची मजल येऊन पोह्चण्यापूर्वीं तिची तयारी कशी काय होत असते? कुमारी दशा संपून तिला स्त्रीत्व येतें; पण या दुसऱ्या अवस्थेंतील कामें करण्यास ती लायक होण्यास तिची अगोदर तयारी व्हावयास पाहिजे ती कितपत होते? अगदींच थोडी, किंबहुना मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. भावी संसाराचें चित्र जें तिच्या सचित अंतःकरणास फारच अफाट व अस्पष्ट भासत असतें, तेंच चित्र संसाराचा गाडा हाकण्याचें योग्य सामर्थ्य अंगीं येण्याकरितां लागणारी तिची तयारी होत नसल्यामुळें ज्यास्तीच अस्पष्ट व ज्यास्तीच अफाट होत जातें. बहुतेक प्रकार असा घडतो कीं, कुमारीच्या मनाचे कल, तिच्या बुद्धीचा पोंच, तिच्या अभिरुचीचें स्वरूप, तिच्या

स्वभावाचें धोरण, इत्यादि गोष्टींचा विचार तिच्या कळकळीच्या माणसांकडूस–आईबापांकडून–सुद्धां होत नाहीं.

कुमारीदशेचा काल प्रत्येक बाबतींत सुधारणा करण्यास फार अनुकूल असतो. या काळांत विचारशक्ति जागृत होऊं लागते, बुद्धीला वळण लागते, या समयांस बाह्य उपाधींचा परिणाम अंतःकरणावर मोठ्या प्रबलतेनें होण्याचा संभव असतो, व पुढें जी वाढ होणार, तिचें बीं रुजण्यास जमीन अगदीं योग्य असते. प्रेम किंवा इतर मनोविकार अनावर न होऊं देतां त्यांना आळा घालून ते दाबांत राहतील अशी व्यवस्था याच काळांत झाली पाहिजे. म्हणून वाईट समागमानें तिचें शुद्ध अंतःकरण विटाळलें जाणार नाहीं, मनावर कोणत्याही प्रकारचा भ्रष्ट परिणाम होणार नाहीं, किंवा कुमार्गवर्ती माणसांनीं पसरलेल्या मोहजालास ती वश होणार नाहीं, अशाबद्दल फार मोठी सावधगिरी व हुषारी ठेवण्यांत आली पाहिजे. अशा प्रकारची काळजी तिच्या हिताहितास जपणाऱ्या व तिजवर प्रेम करणाऱ्या माणसांकडून विशेष घेतली गेली पाहिजे हें सांगावयास नकोच. अशी काळजी घेतली गेली नाहीं, किंवा अशी सावधगिरी ठेविली गेली नाहीं तर कुमारीच्या ज्या वयामध्यें जे आचार व विचार असावे ते त्या वयांत पाळले जाणार नाहींत व तिच्या मनावर इष्ट परिणाम घडावयाचे नाहींत. त्यामुळें समाजांत हट्टी, दुराग्रही, उत्साहशून्य, विचारशून्य, मूर्ख व अज्ञान, अशा स्त्रिया निपजण्याचा संभव फार असतो व तशीं उदाहरणें दिसूनही

येतात. आपल्या वयाचा हा काल आपल्या मनाची व शरीराची सुधारणा करावयाचा आहे, चांगल्या कल्पनांचा साठा करून घेण्यास हा अति योग्य काळ आपण व्यर्थ घालविला तर मिळालेली ही उत्कृष्ट संधि आपण फुकट घालविल्याप्रमाणें होईल; म्हणून आपल्या आचारविचारांस योग्य वळण लावून घेण्याची खटपट आपणाकडून यथा-शक्ति झाली पाहिजे; अमुक अमुक काम आपणांस चांगलें करतां येणें इष्ट आहे म्हणून तें करण्यास आपण आतांपासून झटलें पाहिजे वगैरे कल्पना व विचार कुमारीच्या मनास बहुतकरून शिवतही नाहींत, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

परमेश्वरकृपेनें ज्या पुरुषाचे आपण जन्माचे वाटेकरी बनलों आहों किंवा बनावयाचें आहों, त्याच्या समवेत आपणास विचारवंत मित्राप्रमाणें कालक्रमणा करावयाची आहे, एकाद्या तब्यतखोर व विचारशून्य नबाबाच्या पदरीं त्याच्या उचंबळलेल्या त्या त्या मनोविकारांची तृप्ति करण्यास जशा दासी असतात त्याप्रमाणें आपण नसून संसारांतील त्या त्या कामांत त्यास मदत करण्यासाठीं, सुखदु:खाचें वेळीं किंवा बऱ्यावाईट प्रसंगीं आपल्या सौम्य व शांत वर्तनानें त्याचें सांत्वन करून त्याच्या चिन्ता यथाशक्ति नाहींतशा करण्यासाठीं आपला जन्म आहे, अशी भावना तिच्यांत पूर्णपणें वसत असावी. त्यांच्या वर्तनांत तामसवृत्तीची झाक असल्यास ती आपल्या खुबीदार पण सौम्य वर्तनानें नाहींशी करून त्याचा आपला दिल एक करणें व

व आपल्या स्वतःच्या वर्तनानें आपणासंबंधानें त्याच्या अंतःक-रणांत थोर प्रवृत्ति उत्पन्न करणें हें आपलें कर्तव्य होय हेंही तिनें विसरतां कामा नये.

विनय, सौम्यता, शुद्धाचरण, इत्यादि सद्गुणांनीं आपलें वर्तन गोड करण्याकडे कुमारीच्या मनाचा नेहमीं कल असावा. परंतु हे सद्गुण प्राप्त करून ते दृढ करण्याचा यत्न सुरु असतां मनाच्या सुधारणेकडेही लक्ष पुरवीत गेलें पाहिजे. कोणासही कारण नसतां नाखूष करावयाचें नाहीं असा वर्तनक्रम ठेवणें फार इष्ट गोष्ट आहे; पण मनाची ही वृत्ति दृढ करित असतां खरें व खोटें, वाजवी व गैरवाजवी, न्याय व अन्याय, इष्ट व अनिष्ट इत्यादि प्रकारांकडे बारीक दृष्टीनें व सावधगिरीनें पाहत गेलें पाहिजे. असें न झालें तर कोणी कांहींही म्हणो त्यास आपला होकार पडावयाचाच, अशी संवय झाली म्हणजे आपलें वर्तन दूषणीय होतें हें त्यांस कळलें पाहिजे. असा प्रकार नेहमीं घडत गेला तर मनाचा समतोलपणा कायम न राहतां मन अगदींच दुर्बल होऊन बसेल. मनाचा समतोलपणा नेहमीं कायम ठेवणें ही फार इष्ट गोष्ट आहे.

अशा प्रकारच्या कल्पना मनांत येऊन त्यांचा पूर्ण परिणाम त्यावर घडला पाहिजे, असे इष्ट परिणाम घडून येण्यासाठीं मन संस्कृत होईल व वाजवी रीतीनें विचार करण्याचा मार्ग त्यास लागेल, असें शिक्षण कुमारीला मिळालें पाहिजे. तें मिळण्याची सोय नसेल तर लागवड होत नसलेल्या जमीनीच्या भागांत

ज्याप्रमाणें- काटेरी झाडें किंवा इतर निरुपयोगीं झुडपें वाढतात तशी तिची स्थिति होईल. त्या जमीनीच्या अंगीं सुवासिक फुलझाडें, मधुर फळझाडें, व शीतल आणि आनंददायी छाया देणारे लतामंडप उत्पन्न करण्याची पात्रता असतां ही केवळ तिची मेहनत मशागत न झाल्यामुळें निरुपयोगी होते. त्याचप्रमाणें मुलींच्या अंगीं ग्राहकता असतां त्यांच्या- मनावर सुपरिणाम घडून तें योग्य मार्गाकडे वळविण्याची तजवीज झाली नाहींतर आळस, दुराग्रह, अविचार, पोकळडौल, समयास अनुसरून वर्तन ठेवण्याची अपात्रता वगैरे, दुर्गुणाचें रान तिच्या मनोरूपी भूमीवर माजेल, यांत शंका नको. जेणें करून स्त्रियांच्या अंतःकरण्यास योग्य वळण लागून त्यांच्या मनावरही उत्तम संस्कार घडतील असें शिक्षण त्यांस मिळणें अत्यंत इष्ट व लाभप्रद गोष्ट आहे, तें मुळींच मिळालें नाहीं किंवा त्याला भलतीच दिशा लागली तर त्यांच्या अंतःकरणांतील उत्तम व शुद्ध वृत्ति जागृत होऊन व दृढतर बनत जाऊन जसे व जितके सुपरिणाम घडून यावयास पाहिजेत, तसे व तितके घडून येणार नाहींत. म्हणून एका विद्वानानें म्हटलें आहे कीं, " ज्या स्वभावतः शुद्ध अंत:करणास व मनास सुशिक्षणरूपी अन्नाचें नीटसें व यथेच्छ भोजन करावयास मिळत नाहीं, त्यांचें कसेबसें पोषण होऊन असमाधान, विचारशून्यता, दुर्वासना, अतिलोभ वगैरे विकारांचा पगडा त्यावर बसून त्यास ते अति दुर्बल करून सोडतात व शेवट मूळचा पिंड सदृढ नसल्यामुळें हे विकार

त्यास क्षयाची भावना उत्पन्न करून त्यांचा नायनाट करितात; किंवा त्यांच्या बुद्धीची भूक व तहान योग्य अन्नपाण्यानें तृप्त न झाल्यामुळें तिचा अंकुर न वाढतां जागच्याजागींच करपून जातो. वाढ झालीच तर उन्ह लागूं न देतां वाढविलेल्या शेताप्रमाणें त्यांची स्थिति होते; किंवा प्रवाह खुंटविलेलें पाणी डबक्यांत सांचून राहिल्यामुळें जसें त्यांत घाणेरडे पदार्थ सांचून अनेक त्रासदायक जंतु उत्पन्न होतात तद्वत दुर्वासनादि घाणेरडे विकार सांचून अयोग्य कृतीरूपी जंतु त्यांत वाढतात. अलीकडे जिकडे तिकडे मुलींच्या शाळा स्थापन होऊन त्यांत पुष्कळ मुली शिकण्यास जातात; त्यामुळें त्यांना कांहीं थोडें लिहितां वाचतां येण्यापुरतें ज्ञान मिळतें व त्यापासून लाभ करून घेण्याची इच्छा असल्यास लाभ होण्याचा संभव असतो. कांहीं, कांहीं विदुषींनीं विश्वविद्यालयांतल्या परीक्षा देऊन स्वतःस अलंकृत करून घेतलें आहे; व स्त्रियांची योग्यता केवळ परदास्य करण्यापुरतीच किंवा त्यांच्या अक्कलेची मजल फार तर चुलीपर्यंत आहे असा लोकांमधील खोटा समज घालविण्याची खटपट केली आहे; व बुद्धिसामर्थ्यांत आपण अगदींच टाकाऊ नाहींत असें जरी प्रत्ययास आणून दिलें आहे, तरी एकंदरीनें पाहतां आपल्या कन्यांच्या व भगिनींच्या बुद्धिमत्तेला नीटसें वळण लावण्यास योग्य अवसर न मिळाल्यानें व तशीं साधनें अनुकूल नसल्यानें त्यांची त्या बाबतींत बरीच दैना उडत आहे. अशी स्थितिच कायम राहिली

तर प्रत्यक्ष पतीच्या जिवावरसुद्धां भयंकर प्रसंग गुदरला असतांही तिकडे दुर्लक्ष करून **श्रीरामचंद्रा**सारख्या केवळ सद्गुणाच्या पुतळ्यास चौदा वर्षे त्याचा कोणत्याही प्रकारचा अपराध नसतां वनवास भोगावयास लावण्याविषयीं आग्रह धरणाऱ्या **कैकेयी** सारख्या दुष्ट स्त्रिया निपजल्या तर काय आश्चर्य? किंवा आपल्या पतीच्या मनाचा कल या जगांतल्या हलक्या प्रतीच्या गोष्टींकडे नसून त्याची उड्डाण ईश्वरचिंतनेसारख्या अत्युच्च गोष्टींकडे आहे हें समजण्याची पात्रता जिच्या अंगीं कधींच न आल्यामुळें जिनें **तुकारामा**सारख्या अतिसज्जन, अतिसात्विक, अतिनिर्मल व पवित्र पतीस अहोरात्र जाचिलें, अशा पत्नींप्रमाणें पत्नी समाजांत निघूं लागल्या तर काय नवल? किंवा "मधुतिष्ठति जिव्हाग्रे हृदयेतु हलाहलम्" या उक्तीस अनुसरून महाचांडाळणीप्रमाणें वर्तन करून **नारायणराव** पेशव्या सारख्या तरुण बांडाला यमसदनीं पाठविण्यासाठीं बाईलवेड्या **राघोबास** प्रवृत करणाऱ्या **आनंदी-** बाईसारखीं उदाहरणें दृष्टीस पडत गेलीं तर आम्ही दुःखाचे उद्गार काढून अश्रु कां ढाळावे? मनुष्याच्या मनाची मूळची वृत्ति जशी असते तशीच ती शिक्षणानें बहुधा दृढ होत जाते हें खरें; तथापि सुविचारांची टाकी नेहमीं सुरू असली तर ती अगदीं वाया जाईल असें नाहीं; म्हणून थोर वर्तन, सत्कृत्य, सद्गुण यांकडे मनाची वृत्ति जेणेंकरून वळेल अशी तजवीज होणें आवश्यक व अत्यंत इष्ट गोष्ट आहे हें सांगावयास नकोच.

परंतु लहानपणींच मुलींचीं लग्नें करून टाकण्याची चाल

जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत त्यांच्या मनाची सुधारणा करण्यास योग्य अवसर सांपडण्याचा यत्किंचित् तरी संभव आहे काय? मातृपद प्राप्त झाल्यानंतर जीं जबाबदारीचीं कामें करण्याचा प्रसंग येणार, तत्प्रीत्यर्थ मन तयार होणें हें अत्यावश्यक आहे; पण शिशुसंगोपनासारख्या अतिमहत्वाच्या विषयासंबंधानें एकतरी शब्द त्यांच्या कानीं पडतो काय? बरें, मनाच्या सुधारणेची गोष्ट एकाबाजूस ठेविली तरी अल्प वयांत लग्नें केल्यामुळें ओढवणारे इतर अनर्थ कमी आहेत काय? निरनिराळ्या प्रख्यात डाक्टरांची व वैद्यांची मतें घेऊन **केशव चंद्रसेन** सारख्या विद्वान व मार्मिक गृहस्थांनीं लहानपणीं लग्न करण्याची चाल किती घातक आहे हें साधार ठरविण्याची किती खटपट केली हें बहुतेकांस महशूर नाहीं काय? तेव्हां सर्व राष्ट्रास अपाय करणारी, त्यांतील व्यक्तींच्या उत्साहाचा भंग करून त्यांस शिथिलता आणणारी व एकंदर सर्व राष्ट्रास आपल्या मोहपाशांनीं पूर्णपणें जखडून घेऊन त्यास सर्वस्वी मंदप्रभ करून सोडणारी ही रूढीरूपी राक्षसी सर्वांस घशांत टाकण्यास 'आ' करून बसली आहे, तिचा होईल त्या तऱ्हेनें नायनाट करणें आपलें प्रधान व पवित्र कर्तव्य आहे असें प्रत्येक समंजस मनुष्यानें मनांत आणून तिच्या मूळाशीं घाव घालण्याचा यथाशक्ति यत्न करावयास नको काय? बारा किंवा तेरा वर्षांपलीकडे ज्यांचें वय गेलें नाहीं, अल्लडपणाच्या वृत्तीनें ज्यांस पूर्णपणें सोडिलें नाहीं, बाहुल्याचे किंवा भातकुलीचे खेळांतून ज्यांचें

मन सर्वस्वी निघालें नाहीं, अशा मुग्ध बालिकांस मातृत्व आलें असतां त्यांच्या कमकुवत रक्तमासानें नऊ महिने वाढलेल्या गर्भापासून–तदुत्पन्न संततीपासून–धडधाकट व्यक्ति, समाजांत उत्पन्न होण्याविषयीं आशा करणें व्यर्थ नाहीं काय? असा दुष्परिणाम ताबडतोब लक्षांत येण्यासारखा नसला तरी तो कालांतरानें दृग्गोचर होतो हें मागील इतिहासावरून स्पष्ट होत नाहीं काय? 'शरीर धड तर मन धड' या वचनाला कोणालाही बाध आणतां यावयाचा नाहीं. प्रकृतीनें दुर्बळ अशा जनतेची बुद्धिमत्ता व एकंदर सर्व मानसिक शक्ति जागृत होऊन त्यांस इष्ट परिपक्वता येण्याचा संभव फारच कमी होत जाणार हें उघडच आहे; बरें, १२ पासून १५ वर्षांच्या वयापर्यंत **माता** बनलेल्या स्त्रियांच्या प्रकृतीची स्थिति तरी नीटशी राहते काय? विशी पंचविशीच्या आंतच जरा आलेल्या स्त्रियांची संख्या कमी कां दृष्टीस पडते? ज्या देशांत प्रौढ विवाहाची चाल आहे त्यांतील स्त्रीपुरुषांच्या प्रकृतीचा जोम, मानसिक उत्साह, पराक्रमाची हौस, कार्यक्षमता, इत्यादि गोष्टी बालविवाह प्ररूढ असलेल्या देशांतील जनतेपेक्षां ज्यास्ती प्रमाणानें असतात असा अनुभव प्रत्यहीं येत नाहीं काय? तर मग या बाबतींत इतकी घाई ती कशाला? ज्या कालांत शरीररूपी इमारतीचा पाया नीटपणें घातला जाऊन त्यावर ती इमारत उभारत जावयाची व जो काल शरीराची व मनाची सुधारणा करण्यास अत्यंत अनुकूल अशा कालांतच ती इमारत ढासळून पाडणाऱ्या

बीजांकुरांचा उद्भव करून ठेवणें श्रेयस्कर आहे असें कोण म्हणेल! अलीकडे या बाबतींत थोडी तरी सुधारणा होत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

आपलें लग्न होऊन आपणांस गृहीणीपद प्राप्त व्हावें व योग्य वय झाल्यावर आपण "आई" बनावें अशी इच्छा प्रौढ कुमारींना होणें साहजिक असून सन्मानास्पद, आहे यांत संशय नाहीं. कारण, गृहिणीपद व मातृत्व ह्या दोन्हीं गोष्टी स्त्रियांना अत्यंत भूषणास्पद आहेत. परंतु ज्या दहा बारा वर्षांच्या वयांत लग्न म्हणजे काय, त्याचा हेतु काय त्याची जबाबदारी काय हें कळण्याची मुळींच पात्रता सुद्धां नसते, अशा अल्लडवयांत तें उरकून टाकणें हें एकंदर स्थितीचा विचार करतां फारसें श्रेयस्कर नाहीं, असें म्हटलें तरी फारसा बाध येईल असें वाटत नाहीं. अज्ञान वयांमध्यें लग्नविधि उरकूर टाकून अल्लड मुलींला सासरीं पाठविणें म्हणजे त्यांच्या मनांचा बराच उत्साहभंग करून त्यांची बरीच गैरसोय करण्यायासारखें आहे. सासरचा प्रकार सर्व अपरिचित असल्यामुळें तिच्या मनाची मोकळीक बऱ्याच अंशीं कमी होते. आपली आवड नावड एकीकडे ठेवून अपरिचित माणसांच्या धोरणानें वागणें तिला भाग होतें. प्रेमळ आईबापांचा लडिवाळपणा, प्रिय बहीण भावांची गोड संगति, त्यांच्या समागमांत राहून मन सर्व प्रकारें निर्धास्त असल्यामुळें वेळोवेळीं गाइलेलीं गाणीं, जेवणखाण आटोपल्यावर समवयस्क मुलीं बरोबर खेळलेले बाहुल्याचे खेळ, बसण्या उठण्याची मोकळीक इत्यादि साध्या

पण मनास रमवून सोडणाऱ्या गोष्टींस ती आंचवते. आपली आवडनावड, स्वच्छंदाचें वर्तन वगैरे ज्या ज्या माहेरच्या गोष्टी मनास आल्हाद देत, त्या चटसाऱ्या नाहींतशा होऊन सासरीं गेल्या बरोबर सर्वच प्रकार नवीन व भिन्न वाटावयास लागतो. लग्नाच्या वयाची इयत्ता वाढून त्यांना कांहींशी प्रौढता प्राप्त झाल्या-वर ह्या एकदम पडणाऱ्या फरकाचा परिणाम त्यांच्या मनावर विपरीत होण्याचा संभव कमी होईल.

कुमारी-वयांत बराच काळ घालावयास सांपडला तर उपयुक्त विषयांचें ज्ञान संपादण्यासही कुमारीस योग्य अवसर मिळेल. असें झालें असतां ज्या पतीबरोबर आपलें सर्व आयुष्य जायचें त्याची निवड आईबापांकडून होत असतांना आपलें मत देण्या पुरतें बुद्धिसामर्थ्य तिला प्राप्त होईल. संसार हें सुखाचें खरें साधन करून घ्यावयाचें असेल तर पतीपत्नीची निवड परस्परांकडून झाली पाहिजे. इतर माणसांकडून ती झाली असतां निदान त्या बाबतींत वधुवरांचें मत घेतलें जावें. निदान त्यांच्या मताविरुद्ध तरी त्यांची लग्नें केवळ 'होस हो' म्हणणाऱ्या भिक्षुकांच्या किंवा अशाच तिऱ्हाईत मनुष्याच्या मसलतीवर अवलंबून राहून होऊं नयेत, इतकी तरी खबरदारी घेतली जावी. अशाप्रकारें सर्व थैव इष्ट चाल श्रेष्ठ प्रतीच्या समाजांत व आपल्या देशांतही प्राचीन कालीं होती, **सावित्री**, हे **दमयंती**, **सीता** प्रभृति स्त्रियांच्या स्वयंवरांच्या कथांवरून स्पष्ट होत आहे.

भगिनी.

आतां भगिनी या नात्यानें स्त्रियांची योग्यता काय आहे व त्यांचीं कर्तव्यें कोणतीं आहेत, याकडे आपण वळूं. बंधु व भगिनी सहोदर असल्यामुळें त्यांचें परस्पर प्रेम असणें साहाजिकच आहे. थोर पत्नींनीं पतिसन्निध राहून व त्यास शक्य असेल तितकी मदत भक्तिपुरःसर करून आपणास धन्य म्हणवून घेतल्याचीं उदाहरणें जशीं पुष्कळ आहेत, तशींच उदाहरणें भगिनींनीं आपल्या बंधूना यथाशक्ति मदतनीस होऊन त्यांच्या संसारांतल्या अडचणी दूर करण्याच्या कामांत देह झिजविल्याचींही कमी आहेत असें नाहीं. लहानपणीं त्यांचें खाणें पिणें, निजणें बसणें, खेळणें, एकाच स्थळीं झाल्यामुळें बंधूना भगिनी व विशेषेंकरून भगनींना बंधु अति प्रिय वाटतात. परस्परांवर असलेल्या प्रेमांत पुढें तीं एकमेकांपासून विभक्त झालीं तरी सुद्धां फारसें अंतर पडत नाहीं. बहिणीचा लळा भावाकडे तर इतका ज़ोरदार असतो कीं, लग्न होऊन त्या सासरीं गेल्यातरी प्रत्यहीं त्यांना भावाची आठवण झाल्याविना राहत नाहीं. इतकेंच नाहीं, तर आश्विन मासांतले नवरात्र होऊन दसरा संपतो केव्हां व दिवाळी करितां आपणास नेण्याकरितां आपला बंधु किंवा माहेरचें दुसरें माणूस येतें केव्हां, अशी सारखी तळमळ त्यांस लागलेली असते.

दुर्दैवानें ज्या हतभागी स्त्रिया आपल्या स्वतःच्या संसारास मुकल्या गेल्या, त्यांनीं आपल्या बंधुसमवेत सर्व आयुष्य घालून

त्यांना होईल तितकी मदत केली आहे, अशीं उदाहरणें शतशः नाहींत काय? अशा स्त्रियांच्या अंगीं असणाऱ्या धिम्मेपणाची व विशेषेंकरून स्वार्थत्यागाची किंमत कमी आहे काय? तात्पर्य, आपला संसार नाहींतरी आपल्या सहोदराचा–बंधूचा–संसार तोच आपला, अशी थोर समजूत करून स्वार्थ-त्यागाचें खडतर व्रत स्वीकारणाऱ्या व बंधुसेवेला देह अर्पण करणाऱ्या स्त्रियांचें बंधुप्रेम वर्णावें तितकें थोडेंच होणार आहे.

इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारखें कृत्य अशा स्त्रियांच्या हातून झालें नसलें तरी व्रतनेमादि खडतर उपायांनीं मनोविकार दाबून ऐन तारुण्याच्या वेळीं कोणत्याही प्रकारच्या मोहास वश न होतां आयुष्याचे सर्व दिवस केवळ संन्यासिनी बनून आपल्या बंधूच्या संसाराकरितां देह झिजविणाऱ्या या स्त्रियांची योग्यता कांहींच नाहीं काय? त्यांच्या स्वार्थत्यागाची व आत्मसंयमनाची थोरवी वर्णावी तितकी थोडीच आहे. त्यांच्या मनाला उत्तम संस्कार लावण्याची कोणतीही व्यवस्था समाजांत नसूनही इहलोकीं व परलोकींही धन्य म्हणवून घेण्याच्या थोर इच्छेनें प्रेरित होऊन सदा सर्वकाळ सदाचरणांत काल घालविणाऱ्या या थोर स्त्रियांचे आपण बऱ्याच अंशीं ऋणी आहोंत, अशा समजुतीनें त्यांच्याशीं वर्तन तरी पुरुषांकडून ठेवण्यांत येत असतें काय? उलट-पक्षीं, त्यांच्या विपन्नावस्थेबद्दल यत्किंचित्‌ही सहानुभूति प्रदर्शित न करितां कठोर वाक्प्रहारानें त्यांचें ताडण करणारे व त्यांचा होईल तितका उपमर्द करणारे नराधम कमी आहेत काय!

निःसत्व किंवा मिळेल तसें अन्न खाऊन आणि मिळेल तसें जाडें भरडें वस्त्र नेसून या आपल्या नाशवंत देहाचे आतां चोजले माजवून काय उपयोग आहे, वगैरे थोर समजूत करून घेऊन दीनस्थितींत सुख व समाधान मानून काल कंठणाऱ्या ह्या हतभागिनींवर कालाची वक्रदृष्टि झाली म्हणून ज्यांच्या पदरीं त्यांचा शेर नेमिला असतो, त्यांनीं त्यांस जाचावें ही किती नीच व अधमपणाची गोष्ट आहे ?

आपण सभा भरवून आपल्या लोकांची दाद सरकारांत लागावी म्हणून खटपट करतों. हे प्रभो ! हे दयानिधे ! हे देशाधिपते ! ज्या करांच्या ओझ्या खालीं आम्ही दडपून गेलों आहों, त्यांचें ओझें कमी कर, जे जुलूम व जे अन्याय आपल्या हाताखालचे अधिकारी आम्हांवर करून आम्हांस त्राहि भगवन् करून सोडीत आहेत, त्यांच्या जाचांतून आम्हांस काढ. असा त्यांचा अन्याय नाहींसा करण्याविषयीं आपण हर प्रयत्न करतों; पण आपल्या घरांत प्रत्यहीं पडत असलेल्या न्यायाच्या खुनांसंबधानें आपल्या मनांत यत्किंचित् तरी विचार येतो काय ? राज्यकर्त्यांकडून जुलूम झाला असतां त्याबद्दल प्रतिषेध करण्यास आपण मोठ्या आवेशानें प्रवृत्त व्हावें व सामाजिक आणि धार्मिक जुलूमांबद्दल आपण एक ब्रही न काढतां ते निमूटपणें सहन केले तर आपणास स्वातंत्र्याचे खरे कैवारी हें नांव शोभेल काय ? मुली व सुना यांच्याशीं होत असलेल्या वर्तनांत समता ठेवणाऱ्या सास्वा किती आहेत ?

बहीणभाऊ या उभयतांमधील नातें व संबंध असा कांहीं प्रेम-जनक आहे कीं सख्ख्या बहिणभावांचें प्रेम परस्परांवर अत्यंत असतें इतकेंच नाहीं, तर केवळ बहिण म्हणून मानलेल्या स्त्रीवर सुद्धां प्रेम जडतें व सख्ख्या बहिणींत व मानलेल्या बहिणींत कोण-ताही भेदभाव राहत नाहीं, हें कित्येक उदाहरणांवरून स्पष्ट होण्यासारखें आहे.

सुभद्रा दुर्योधनास द्यावयाची, असा **बळरामाचा** निश्चय असूनही आपल्या बहिणीच्या मनाचा ओढा **अर्जुनाकडे** आहे असें जाणून **श्रीकृष्णानें** कोणत्या युक्तीनें व कशा शिताफीनें आपल्या प्रियभगिनीचा मनोदय पूर्ण केला, हें प्रसिद्धच आहे. ही सख्ख्या बहिणीची गोष्ट झाली. **सुभद्रेच्या** सवतीचा—**द्रौप-दीचा**-तर प्रत्यक्ष संबंध **श्रीकृष्णाशीं** नव्हताना ? परंतु **द्रौपदीनें** त्यास बंधु समजून तदनुरूप प्रेमळ वर्तन त्याच्याशीं ठेवीत गेल्यामुळें परस्परांच्या मनाचा लळा परस्परांशीं कसा होता हें अनेकदां स्पष्ट झालें नाहीं काय ? **द्रौपदीचा** सुस्वभाव, तिचें उदार व थोर अंतःकरण, तिचें अढळ पातिव्रत्य आणि तिचें निर्मल व शुद्ध वर्तन वगैरे सद्गुणांनीं ती त्यास इतकी प्रिय वाटत होती कीं, **सुभद्रेपेक्षांसुद्धां** ज्यास्ती. म्हणूनच **दुःशासनासारख्या** अतिनीच व निर्लज्ज मनुष्यानें भरसभेंत तिची वेणी ओढून तिला खेचीत आणल्या-वरही सर्वांसमक्ष तिची अब्रु घेण्यापर्यंत जरी आपल्या दुष्कृतीची मजल त्या नीचानें नेऊन पोहोंचविली होती, तरी तिनें प्रेमळ

अंत:करणानें आपल्या परमपूज्य बंधूचा धावा केल्याबरोबर तिच्या साहाय्यास तो क्षणाचाही विलंब न लावितां कसा प्रवृत्त झाला, आणि तिची छीथु करण्यास तयार झालेल्या माणसांना कसें तोंडघशी पडावें लागलें हें वर्तमान आबालवृद्धांस माहीत नाहीं असें नाहीं. तसेंच, मूर्तिमंत कोप जो **दुर्वास**, त्यानें मध्यरात्रीच्या सुमारास अन्नासाठीं या महासतीचें सत्व हरण करण्याचा उद्देश धरिला असतां तिनें आपल्या प्रेमळ भक्तीनें आपल्या बंधूचें स्मरण करतांच त्यानें त्या विकट प्रसंगांतून तिला सोडवून कसें यशस्वी केलें, हें विश्रुतच आहे. या महासाध्वींच्या थोर अंत:करणांत अप्रतिम बंधुप्रेम वास करित होतें. तसेंच **श्रीकृष्णानें**ही तिचें साहाय्य तिच्या योग्यतेला अनुरूप वेळोवेळीं कसें केलें हेंही अनेक उदाहरणांनीं स्पष्ट करतां येईल.

भारतीय युद्धापूर्वी **युधिष्ठिरानें कौरवांशीं** साम करण्याकरितां **श्रीकृष्णास** पाठविलें. त्यासमयीं **युधिष्ठिर** व **भीमसेन** या उभयतां बंधूंनीं त्यास सांगितलें कीं **कौरवांकडे** जाऊन अशा धोरणानें बोलावें कीं, जेणेंकरून युद्धप्रसंग टळेल. त्यावेळीं **द्रौपदी** जवळच होती. **कौरवांकडे** आपला बंधु जात आहे असें पाहून दुष्ट **दुर्योधनाच्या** आज्ञेवरून, नीच निर्लज्ज व दांडग्या दु:शासनानें केलेल्या तिच्या विटंबनेचें पूर्ण स्मरण होऊन त्या दुर्दशेचें चित्र तिच्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसूं लागलें. व ती सद्गदित अंत:करणानें डोळ्यांत पाणी आणून व एका हातानें आपले केंस पुढें धरून **कृष्णास** म्हणाली:—

' अयं ते पुण्डरीकाक्ष दुःशासनकरोध्दतः ।
स्मर्त्तव्यः सर्वकार्येषु परेषां संधिमिच्छता ॥'

"तात्पर्य इतकेंच कीं "कृष्णा! दुर्योधन दुःशासनादिकांचीं नांवें ऐकल्याबरोबर माझ्या सर्वांगाची लाही लाही होते. त्या चांडाळांनीं माझी ही वेणी ओढून मला फरफटीत ओढीत भरसभेंत खेचीत न्यावेंना ? हे दीन बंधो ! त्या दुर्दशेला कांहींतरी पारावार राहिला काय ? कृष्णा, माझा जन्म थोर कुलांत खरा. पण त्यावेळीं जी माझी विटंबना झाली ती पाहून किंवा ऐकून पाषाणहृदयी माणसाच्या छातीलासुद्धां पाझर फुटला असता ! असें असूनही पांडवांच्या मनांत सामच करावयाचें असेल तर मी त्यांच्या इच्छेच्या आड कधींही यावयाची नाहीं. कारण, पतींच्या मर्जीविरुद्ध जाणें ही गोष्ट मजकडून कालत्रयीं घडावयाची नाहीं. माझे पांच पुत्र अभिमन्यूच्या सहाय्यानें माझ्या वतीनें सूड उगवतीलच." हें भाषण ऐकून श्रीकृष्णास काय वाटलें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. जिला आपण भगिनी समजतों, तिची अशी दीन स्थिति कौरवांकडून व्हावी व तें चटसारें एका क्षणांत विसरून जावें म्हणजे प्रत्यक्ष न्यायदेवतेस अर्धचंद्र देणें होय, असें त्यास वाटलें.

असें मनांत आणून 'मजकडून योग्य तेंच वर्तन घडेल' असें अभिवचन तिला कृष्णानें देऊन तिचें सांत्वन केलें. पुढें भारतीय युद्धांमध्यें कौरवांच्या दुष्कृतींबद्दल त्यांचा यथेच्छ सूड

कसा उगवला गेला, हें त्या युद्धाची कथा जाणणारांस विदित आहेच.

तसेंच, **मेवाडची** राणी **कर्णावती** हिच्या प्रांतावर स्वारी करून तो जिंकून आपल्या ताब्यांत घ्यावा, या लालसेनें गुजराथचा राजा—**बहादुरशहा**—यानें तयारी करून **चितोर** शहरास वेढा घातला. ही बातमी **कर्णावती**ला समजतांच तिनें **हुमायून** बादशहाकडे एक राखी पाठवून प्रार्थना केली कीं ' या राखीचा स्वीकार करून या संकटसमयीं मी आपली बहीण म्हणून माझें रक्षण करावें; त्या राखीचा त्या बादशहानें सन्मान करून व **कर्णावती**ला आपल्या बहिणीप्रमाणें मानून तिला एक बहु मोलाची चोळी त्यानें पाठविली. ह्या चोळीबरोबरच त्यानें ५००० स्वारांची टोळीही रवाना केली. या नंतर थोडकेच दिवसांनीं आपण स्वतःही अधिक सैन्य बरोबर आणून **बहादुराला** त्यानें हुसकून लाविलें. परंतु तो येण्यापूर्वींच **कर्णावती**नें सर्व स्त्रियांसह जोहाराचा विधि केला होता. तरी पण **हुमायून** आपल्या दत्त वचनास जागून या भयंकर संहारांतून सुरक्षित राहिलेल्या **विक्रमादित्य** राजपुत्रास चितोरच्या गादीवर बसवून नंतर तो तेथून दिल्लीकडे चालता झाला.

कर्णावतीनें पाठविलेल्या राखीचा चमत्कार असा झाला कीं या राखीनें एकटा **हुमायुनच चितोरच्या** राणीचा भाऊ बनला असें नाहीं, तर त्याच्या वंशजांनींही चितोरच्या राणीचे राखीबंद भाई म्हणून आपलें नातें शेटपर्यंत कायम ठेविलें. यांतही

विशेष आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट ही कीं हिंदुलोकांना सदा सर्वकाळ पाण्यांत पहाणारा, त्यांच्या धर्मसंस्थांचा नायनाट करणारा व त्यांना **महंमदी** धर्माची दीक्षा देण्यास तयार असणारा–**अवरंगजेब**–यानेंही हें नातें कायम ठेविलें व आपलें स्वसृप्रेम उत्कृष्ट रीतीनें व्यक्त केलें आहे ! ! या बादशहाचा एकंदर वर्तनक्रम लक्षांत आणला असतां ही त्याची कृति कांहींशी चमत्कारिक भासण्यासारखी आहे. तात्पर्य, **अकबर, जहांगीर, शहाजहान** व **अवरंगजेब** हे अनुक्रमें **चितोर**च्या राणीचे राखीबंदभाई हें नातें ठेवीत गेले !

या बाबतींत **चितोर**च्या राणीला पाठविलेल्या पत्रांत **अवरंगजेबा**नें "प्रिय व सद्गुणवती भगिनी" असें संबोधन योजून शेवटीं 'आपले कुशल व कल्याण इच्छितों' अशा प्रकारच्या स्पष्ट शब्दांनीं आपलें स्वसृप्रेम व आपली भक्ति दाखविली आहे !

याप्रमाणें राखीबंद बहीण व राखीबंद भाऊ बनून परस्परांविषयीं सख्ख्या बहीण भावांप्रमाणें प्रेम जडल्याचीं उदाहरणें **राजस्थान**च्या इतिहासांत कित्येक आहेत. **राजस्थानचा** इतिहास लिहिणारे-**कर्नल् टॉड्**-ह्यांनासुद्धां **उदेपुर, बुन्दी** व **कोटा** येथील तिन्ही राण्यांनीं व **उदेपुरच्या** राण्याची अविवाहित बहीण-**चंदबाई**-हिनेंही राख्यापाठवून आणि **राजपुतान्यां**तील इतर स्त्रियांनींसुद्धां तशीच कृति करून त्यांशीं भावाचें नातें जोडिलें होतें. त्या साहेबानेंही या राख्यांचा सन्मानपूर्वक स्वीकार करून आपल्या मानलेल्या बहिणींस पत्रोत्तरें लिहिलीं आहेत असा ह्या साहेबाचा स्वतःचा लेख आहे.

तसेंच, पेशवाईंत एका पेशव्यानें **नाशिक** जिल्ह्यांतील **हिंगणें** घराण्यापैकीं एका स्त्रीस आपली भगिनी मानून तिच्या चोळी बांगडीच्या खर्चाकरितां मोठ्या उदारपणानें एक गांव जहागीर करून दिला होता. पुढें शेवटच्या **बाजीरावानें** ती जहागीर जप्त करून राज्यास सामील केली. **बाजीरावाची** स्वारी मुलुखांत फिरत असतां त्या जहागीरदारानें संधि साधून आपल्या घरीं त्या पेशव्यास मेजवानीस बोलाविलें. त्या समयीं त्या घराण्यांतील ज्या स्त्रिया वाढावयास आल्या, त्यांनीं अंगांत चोळ्या मुळींच घातल्या नव्हत्या. सभ्यतेच्या विरुद्ध असलेला हा प्रकार पाहून **बाजीराव** आश्चर्यचकित झाला व त्यानें विचारलें कीं अंगांत चोळ्या न घालतां बायकांनीं वाढावयास घेतलें हें काय ? त्यावर जहागीरदारानें उत्तर दिलें कीं 'सरकार! श्रीमंतांनीं मोठ्या उदार बुद्धीनें चोळीसाठीं जो गांव जहागीर–म्हणून दिला होता, तो आपली अवकृपा आमच्या–दुर्दैवानें आम्हावर झाल्यामुळें सरकारांत जप्त झाला आहे. तेव्हां तो चालू होईपर्यंत बायकांनीं चोळी कशी घालावी'? हें ऐकून श्रीमंताची स्वारी ओशाळली व तो गांव पुन्हा परत त्या घराण्यास ताबडतोब पूर्ववत् चालू ठेवण्याचा हुकूम झाला.

सतत परिश्रम.

स्त्री असो अगर पुरुष असो, आळसानें काळ काढणाऱ्यास ज्ञानप्राप्तीचीं फळें कधींही लाभावयाचीं नाहींत, हें कोणीही विसरतां कामा नये. इकडून तिकडे तिकडून इकडे वावरण्यांत

किंवा नटण्यामुरडण्यांत काळाचा अपव्यय न करितां आपल्या तरुण कुमारींनीं वेळेचें योग्य महत्व लक्षांत आणून उपयुक्त व सन्मानदायी आयुष्यक्रमणा करण्याची आणि सुखासमाधानानें मोठमोठ्या साध्वींप्रमाणें मनानें थोर बनून कांही तरी उपयुक्त कामांत प्राविण्य संपादण्याचा यथाशक्ति यत्न केला पाहिजे. कै० वा० **आनंदीबाई** जोशीसारख्या विदुषीचें उदाहरण पुढें ठेवून कळकळीनें व योग्य दिशेनें यत्न केल्यास किती महत्वाचें काम साधितां येतें हें त्यांनीं लक्षांत आणीत गेलें पाहिजे. तसेंच थोर इच्छा धारण करून त्यांनीं सतत परिश्रम करण्याची इष्ट सवय लावून घेतली पाहिजे. अशा प्रकारची सवय लावून घेणें हें स्त्री-जातीस न शोभण्यासारखें आहे, व स्त्री-जातीला जी शोभा येते, ती फक्त अज्ञानांत, आळसांत, व चैनींत काळ घालविल्यानें येते, अशा मूर्खपणाच्या कल्पना मनांत भरून घेऊन त्यांनीं आपल्या कामास कधींही अडथळा आणूं नये. संसारांतील नानातऱ्हेचे काबाडकष्ट आणि शेतांतील श्रमाचें काम, मनांत आणतां, तसेंच पदवीधर बनलेल्या स्त्रियांच्या अंगीं—मानसिक श्रमाचीं कामें करण्याची पात्रता किती आहे, हें लक्षांत आणतां स्त्रिया शारीरिक व मानसिक श्रम करण्यास किती समर्थ असतात, हें सहज समजण्यासारखें आहे. जे कोणी स्त्रियांकडून शरीर श्रमाची व बुद्धिमत्तेचीं कामें फारशीं करवूं नयेत असें प्रतिपादन करित असतील त्यांचीं तोंडें वरील पुराव्यावरून बंद होण्यासारखीं आहेत. आपल्या बंधूंप्रमाणें

आपणांस विद्याव्यासंग चालवितां येणार नाहीं किंवा त्यांच्या इतके श्रम करण्याची पात्रता आपल्या अंगीं नाहीं अशी चुकीची समजूत कुमारींनीं कधींही करून घेऊं नये. संस्कृत भाषेंत किंवा वेदांत विषयांत असें काय गूढ आहे कीं त्यांचें आकलन फक्त-पुरुषांसच व्हावें आणि बायकांस होऊं नये ? संस्कृत किंवा मराठी भाषेंत ज्याप्रमाणें पुल्लिंग किंवा स्त्रीलिंग अशीं नामांचीं रूपें ठरून गेलीं आहेत, त्याप्रमाणें शिक्षणपद्धतींत लिंग-भेद ठरून गेला आहे कीं काय ? विद्यादेवीच्या मंदिरांत अमुक प्रांत पुरुषांचा व अमुक स्त्रियांचा, या ठरीव मर्यादेचें उल्लंघन खबरदार कोणी केलें तर; असा कायमचा-निर्णय कोणी करून ठेविला आहे काय ? स्त्रियांच्या-मेंदूची रचना पुरुषांच्या मेंदूच्या रचनेपेक्षां कांहीं निराळी आहे काय ? **लीलावती**ची गणितांतले-कूट प्रश्न सोडविण्यापर्यंत गणित शास्त्रांत गति झाली होती किंवा **गार्गी**ला **जनका**च्या सभेंत विद्वज्जनसमूहासमोर वेदांतासारख्या विषयावर अस्खलित रीतीनें वादविवाद चालवून जमलेल्या मंडळीस चकित करून सोडतां आलें, तर तशी कृति इतर स्त्रियांना करून दाखवितां येणार नाहीं काय ? स्त्रियांच्या अंगीं बरोबर रीतीनें विचार चालविण्याची शक्ति नाहीं काय ? 'नाहीं', असें कोणास म्हणतां येईल ? तर मग त्यांनीं तर्कशास्त्राचा अभ्यास कां करूं नये ? राजे, सेनापति, किंवा मुत्सद्दी यांच्या कृति-मनांत आणून त्यांच्या वर्तनासंबंधानें विचाराअंतीं योग्य मत त्यांना ठरवितां येणार नाहीं काय ? किंवा घडत असलेल्या

जगत्प्रसिद्ध गोष्टींचा परिणाम काय होईल याचा बरोबर अजमास करणें त्यांना अशक्य आहे काय ? मुळींच नाहीं, तर मग इतिहासाचें अध्ययन त्यांनीं कां करूं नये ? बुद्धिमत्तेची अमोल देणगी सर्व भूतीं समता दाखविणाऱ्या परमेश्वरानें त्यांस दिली असतांही तिचा फारसा उपयोग होऊं न देतां फक्त गळपट्टे, कशीदा, वगैरे कामें करण्यापलीकडे किंवा नाटकें कादंबऱ्या वाचण्यांत धन्यता मानण्यापलीकडे त्यांच्या बुद्धिमत्तेची मजल जाऊं नये, ही शोचनीय गोष्ट नव्हे काय ? एका अलीकडील लेखकानें सुखासमाधानानें कालक्रमणा करणाऱ्या विचारवंत माणसांच्या कुटुंबाचें वर्णन लिहीत असतां असें म्हटलें आहे कीं या कुटुंबांतील प्रत्येक माणूस आपापलें काम मेहनतीनें, सदभिरुचीनें व सुविचारानें चालवून कुटुंबाच्या एकंदर ज्ञानांत व विचारांत भर घालण्याचा यथाशक्ति यत्न करीत आहे. अशा घरांतील माणसांस करमणूकीसाठीं शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या वर्तनावर टीका करून व्यर्थ हाशा पिकविण्याची किंवा कांहींतरी निरर्थक गप्पा गोष्टी करून कालक्षेप करण्याची जरूर पडत नाहीं. खरोखर पाहतां, बागेंतील व्यवस्थित रीतीनें लावलेल्या फुलझाडांच्या ताटव्यांस फुलें येऊन त्यांच्या रम्य देखाव्यानें नेत्रांस जो आनंद होतो किंवा त्यांच्या सुवासानें घ्राणेंद्रियाची जी तृप्ति होते, त्या आनंदाबद्दल किंवा त्या तृप्तीबद्दल किंवा त्या एकंदर मनोहर देखाव्याबद्दल संभाषण करण्यांत किंवा आकाशांत चमकणाऱ्या तारांगणाच्या गतींबद्दल संभाषण चालविण्यांत अथवा

एकाद्या इतिहासकारानें किंवा कवीनें वठविलेल्या उत्तम वर्णना-बद्दल वादविवाद करण्यांत, जी बहार किंवा मजा वाटते, तिची योग्यता एकाद्या सुंदर देखाव्याचें चित्र पाहण्याच्या किंवा नाटक किंवा कादंबरीवाचून होणाऱ्या मजेच्या योग्यतेपेक्षां कमी नाहीं. वर ज्या घराचें वर्णन केलें तें घर व त्यांतील राहणारीं माणसें कांहींतरी ज्ञानार्जनाच्या नादांत परिश्रम करीत असल्यावाचून अस्तित्वांत असणें शक्यच नाहीं. विशेषेंकरून स्त्रियांनीं कांहींतरी बुद्धिमत्तेचीं कामें करण्यांत कांहीं वेळ घालविल्याशिवाय व अशा प्रकारचे श्रम करण्याची इष्ट सवय लावून घेतल्याशिवाय तसा सुखानुभव येणें कठीण आहे. एका नामांकित कादंबरीकाराच्या ग्रंथांत अशा घराचें पुढील वर्णन आहे. गृहिणी आपल्या समजूतदार मुलींसह बसली आहे; व हातांत पुस्तक घेऊन मोठ्यानें वाचीत आहे; एक मुलगी लक्षपूर्वक तें ऐकत आहे. व दुसरीच्या हातांत एक जाळीदार कापडाचा तुकडा असून त्यावर ती कशीदा काढीत आहे. तिचें चित्त कशीद्यांतच गर्क आहे किंवा वाचनां-तल्या मजकुराकडे आहे हें समजण्यासाठीं आई तिला मधून मधून प्रश्न विचारीत आहे व ती त्यांस समर्पक उत्तरें देत आहे. आईचें वाचन झाल्यावर त्यांतील स्त्रीपुरुषांच्या वर्तनावर टीका-त्मक वादविवाद चालला आहे. खरोखर म्हटलें, तर चाणाक्ष कुटुंबाचें हें एक सुंदर चित्र नव्हे काय ? अशा प्रकारच्या उच्च तर आनंदाचा सुखास्वाद अनुभविणाऱ्या गृहसंस्था आपल्या राष्ट्रांत कितीशा आहेत ! कांहीं असल्या तरी त्या बोटाव

मोजण्या इतक्या अगदींच थोड्या नाहींत काय ? आणि अशी स्थिति असण्याचें कारण केवळ आपणांमधील आपल्या तरुण कुमारींना मिळावें तसें शिक्षण मिळत नाहीं हें नव्हे काय ? आपल्या हातून कांहींतरी सत्कृत्य झालें पाहिजे, कांहींतरी महत्कार्य घडलें पाहिजे अशी इष्ट इच्छा प्रत्येक कुमारीच्या मनांत बाणली गेली पाहिजे. अशी ही थोर इच्छा फलद्रूप करून घेणें हें फार कठीण, व दुरापास्त आहे अशी भीति त्यांना बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं; कारण, प्रत्येकानें आपापलें कर्तव्य मेहतीनें, लक्षपूर्वक व चांगल्या रीतीनें बजाविणें हेंच सत्कृत्य होय, आणि आपापल्या आयुष्याचा रास्त व वाजवी उपयोग करणें हें महत्कार्य होय.

स्त्री–जातीला विशेष भूषणास्पद गुण म्हटला म्हणजे सहनशीलता–होय. संसाराचा गाडा चालू असतां कुटुंबांत नाना प्रकारच्या लहान सहान गोष्टी अशा घडतात कीं त्यांचा परिणाम प्रत्येकावर बऱ्याच अंशीं घडल्या-वाचून राहत नाहीं. अशा प्रसंगीं स्त्रियांची सहनशीलता कसोटीस लागण्याचा फार संभव असतो. केव्हां केव्हां तर गोष्टी दिसायला फारच क्षुल्लक दिसतात. त्या म्हटल्या म्हणजे साधक बाधक विचार न करितां एकाद्याला व्यर्थ दोष लावणें, किंवा बोल ठेवणें, गैर समजुतीनें कडक बोलणें, एकदम कोणाला तोडून बोलणें, ह्या प्रकारच्या होत. त्या सहन करायला फार कठीण असतात. कुटुंबांत कित्येकांचें मन इतकें कोवळें

असतें कीं, अशी कांहीं कुरबुर झाल्या बरोबर त्यांच्या कोवळ्या मनास एकदम धक्का बसून तीं बराच वेळ पावेतों विवळत बसतात. इतकेंच नव्हे, तर त्याबद्दल त्यांस केव्हां केव्हां तर इतकें दुःख होतें कीं तें असह्य होऊन डोळयांतून अश्रूंचा प्रवाह सुद्धां चालूं लागतो. केव्हां केव्हां तर परस्परांचीं वर्में काढण्यापर्यंत सुद्धां प्रसंग येऊन पोहचतो. शाळेंतील दांडग्या मुलांच्या सहवासानें टारगा बनलेल्या भावाचा उद्धटपणा किंवा अविचार, कामाकाजाच्या किंवा संसारांतील नानातऱ्हेच्या भानगडीच्या चिंतांनीं त्रस्त म्हणून कांहीं अंशीं बेफिकीर अशा आईबापांच्या सहानुभूतीचा अभाव, जिवलग मित्रांचें मैत्रीला न जागणें इत्यादि गोष्टी इतक्या असह्य होतात कीं, त्यांपासून मनाला अतिताप झाल्याशिवाय राहत नाहीं. आपली समजूत न्याय्य, आपलें मत सर्वांस हितकारक असें असूनही, किंवा आपला कोणताही अपराध नसतां सुद्धां आपल्या विरुद्ध सर्व प्रकार असल्यामुळें असह्य जाच व त्रास निमूटपणें सोसून देहाचा देह खर्चीं घालणाऱ्या स्त्री–पुरुषांची मालिका किती तरी सांपडेल ! परंतु अशा रीतीनें कसोटीस उतरलेलीं माणसें जगांत प्रसिद्धीस आलीं नाहींत म्हणून त्यांची योग्यता कांहींच नाहीं काय ? धर्माच्या बाबतींत स्वमत रक्षणार्थ बळी पडणाऱ्यांचीं नांवें इतिहासांत नमूद होतात म्हणून सर्वांस महशूर असतात. अशा रीतीनें बळी पडणारांपेक्षांही ज्यास्ती त्रास सहन करून आयुष्य कंठणारीं माणसें कित्येक कुटुंबांत किती सांपडतील ! अशा

प्रकारच्या वेदना व अशा प्रकारचे जाच सहन करण्यास एकच मार्ग आहे, व तो म्हटला म्हणजे सहनशीलता हाच होय. शांति व गंभीरपणा कायम ठेवून सहनशीलतेचा अवलंब केला असतां परिणाम शुद्ध झाल्यावाचून राहणार नाहीं.

कित्येक विपत्ति तर अशा असतात, कीं स्त्रिया त्या आपणावर मुद्दाम आणून घेतात व त्यांचें स्वरूप आपल्या कल्पनाशक्तीनें वाढवून मनाचें स्वास्थ्य बिघडवून घेतात. आवड धरून घेतलेलें लुगडें किंवा हौशीची चोळी रंगांत फिकी निघाली, अमुक आमंत्रण यायचें तें आलें नाहीं, तमुक ठिकाणीं लग्नास किंवा इतर कार्यास जायचें म्हणून आशा धरली असतां मध्यंतरींच कांहीं तरी न टाळतां येण्याजोगा अडथळा येणें, या किंवा अशाच प्रकारच्या इतर गोष्टी या संसारांत नेहमीं घडावयाच्याच; पण त्या घडल्या असतां मोठा दुर्घट अनर्थ गुदरला आहे किंवा भरून येणारें नव्हे असें नुकसान झालें आहे, असें समजून बायका त्याबद्दल किती तरी विवळत बसून मनास किती तरी त्रास करून घेतात? अशा प्रसंगीं मनाची समता राखून त्यास थोडासा आळा घातला असतां या गोष्टी सहज सहन करतां यावयाच्या नाहींत काय? अशा वेळीं आपलें दररोजच्या नेमक्या कामांत चित्त घालून त्यास गुंतवून ठेविलें असतां ही मनाची अस्वस्थता एका क्षणांत चट्सारी नाहींशी व्हावयाची नाहीं काय? ज्या स्त्रियांच्या अंगीं सारासार विचार करण्याची शक्ति आली असेल, दमयन्ती, सावित्री, सीता, सिमंतिनी सारख्या थोर साध्वींच्या

कथा ज्यांनीं वाचून किंवा ऐकून त्यांच्यावर आलेल्या भयंकर प्रसंगांचा ज्यांनीं शांतपणें विचार केला असेल, त्यांना अशा गोष्टी अगदींच क्षुल्लक वाटतील, इतकेंच नाहीं, तर अति भयंकर प्रसंगीं सुद्धां त्या आपल्या मनाची समता ढळूं द्यावयाच्या नाहींत. व "संपत्तौच विपत्तौच महतामेक रूपता" ह्या थोर उक्तीप्रमाणें वर्तन ठेवून आपणास धन्य म्हणवून घेतील. या संसारांत कोणत्यावेळीं कसा प्रसंग गुदरेल याचा नेम नाहीं. विपत्तीचे प्रसंग आपणावर कधींच गुदरणार नाहींत, असें छातीला हात लावून कोणास तरी सांगवेल काय? आपल्या डोळ्यांतून नेहमीं आनंदाश्रुच जायचे, दुःखाश्रु जायचे नाहींत, असे भाग्यवान् स्त्री-पुरुष कोण आहेत? ज्यांच्यावर आपलें प्राणापलीकडे प्रेम असतें अशीं माणसें आजारी पडतात, इतकेंच नाहीं तर केव्हां केव्हां तीं आपणास धाय मोकलीत ठेवून कायमचीं चालतीं होतात; अशा प्रसंगीं विचाराचाच अवलंब करून मनाचा समतोलपणा कायम ठेवावा लागतो. अशा समयीं सहनशीलता, व गंभीरपणा यासारख्या थोर मनोवृत्तींचेंच साहाय्य घ्यावें लागतें. 'गंभीरता' या थोर सद्गुणास वाखाणावें तितकें थोडेंच. या सद्गुणांत कांहीं विलक्षण मोहनी आहे. कोणतीही गोष्ट कशीही बिघडलेली असो, ती सुधारून तिला व्यवस्थित स्वरूप आणण्याच्या कामांत या सद्गुणाचा कितीतरी उपयोग होतो व हें काम साधण्याचें, आणि वास्तविक प्रकार काय आहे हें उघडकीस आणून सत्य प्रस्थापित करण्याचें केवढें तरी सामर्थ्य या सद्गु-

णाऱ्या अंगीं आहे ? कित्येक नामांकित ग्रंथकारांनीं सर्व बुद्धिमत्तेचें सार गंभीरता होय असें विधान ठरविलें आहे. हा सद्गुण अंगीं आणण्यास आत्मसंयमनाची फार गरज पडते. जी जी इच्छा मनांत उद्भवेल तिच्या वेगासरसी मन चंचल न होऊं देतां, इकडे तिकडे बहकूं न देतां त्यास स्थिर करून ठेवणें, त्याची चलबिचल न होऊं देणें, त्यास ताब्यांत ठेवणें व त्याची समता चकूं न देणें ह्या प्रकारची सहनशीलता नैतिक व मानसिक शिक्षणाच्या संस्कारानें अंगीं येते. एका पोक्त स्त्री-लेखकानें म्हटलें आहे,'तरुणपणीं दुराग्रही व अनुदार अशा माणसांशीं वाद करण्याचे प्रसंग मजवर वारंवार येत असत. पण माझा स्वभाव शांत असल्यामुळें आणि कोणाच्याही कामांत ढवळाढवळ करणें मला आवडत नसल्यामुळें माझें कोणाशीं भांडण होत नसे. तथापि, कोणी बोलूं नये असें बोललें किंवा माझ्या अथवा ज्यांच्यावर माझें प्रेम आहे, अशांच्या कामांत कारण नसतां कोणी ढवळाढवळ केली तर अंतर्यामीं स्वस्थ राहून मोठ्या आवेशानें माझा क्रोध मी दाखवीत असें. माझ्यामध्यें समयसूचकता फारशी नसल्यामुळें वादविवादांत सरशी करून घेण्याची हातोटी मला फारशी कधींच साधली नाहीं; वाद चालला असतां माझ्या मनाची समता नेहमीं कायम राहत नसे; तरी पण, मी कोणाचा द्वेष करीत नसें. किंवा रागावलें तरी सभ्यतेच्या रीतिभाती विसरत नसें. त्यामुळें प्रत्येकजण मजशीं ममतेनें वागे. व शत्रुत्व तर माझें कोणाशींच झालें नाहीं. मला हसायला कचित् येत असे; तरी खुबीदार विनोदानें

योग्य प्रसंगीं मी खूबच हासत असें. माझ्या मनाला उदासीनता तर कधींच येत नसे. कधीं कधीं मनाविरुद्ध गोष्टी घडल्यामुळें त्याचा हुरूप नाहींसा होत असे हें खरें; तथापि, ही स्थिति फार वेळ टिकत नसे. मनाची पूर्व स्थिति लवकरच येत असे.' ह्यावरून हें स्पष्ट होतें कीं, ह्या बाईच्या अंगीं योग्य सहनशीलता व आत्मसंयमन करण्याची शक्ति बऱ्याच अंशीं वसत होती. ह्या ठिकाणीं इतकें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सभ्यतेनें आपल्या आयुष्यक्रमास शोभा येते व तो उद्योगानें सन्माननीय होतो. आणि सहनशीलतेनें त्या शोभेंत भर पडते. धिम्मेपणास आनंदाचें स्थान करून सोडणारी दूरदृष्टी, कज्जाभांडणास दूर ठेवणारा गोड स्वभाव, काम करण्याच्या उपयुक्त सवयीमुळें समाधान देणारा उद्योग, मनस्ताप नाहींसें करणारें आशायुक्त मन, या सव गोष्टींचें इंगित व बीज एका सहनशीलतेंत भरलें आहे.

सौम्यता, सभ्यता, व्यवस्थितपणा, उद्योग करण्याची इष्ट सवय, आळसाचा कंटाळा, अडचणींत सांपडलेल्या मनुष्याला यथाशक्ति मदत करून त्याला त्या अडचणींतून काढण्याची उत्कट इच्छा, आणखी असेच इतर सद्गुण कुलीन स्त्रियांना फार शोभादायक असून ते त्यांची नीतिमत्ता वाढविण्यास पुष्कळ अंशीं कारण होतात. म्हणून अशा प्रकारचे सद्गुण अंगीं आणण्याची उमेद प्रत्येक कुमारीनें बाळगिली पाहिजे. या गुणांच्या वाढीस आरंभ कुमारीचें अल्पवय असतांनाच झाला पाहिजे. कारण, हा काल अशा इष्ट गुणांची प्राप्ति करून

घेण्यास अत्यंत अनुकूल असतो, म्हणून सांगण्यांत आलेंच आहे. हरएक प्रसंगीं शोभेल असें वर्तन, आपल्या हातांतून होत जाणाऱ्या कामांत स्वच्छता, नीटनेटकेपणा, टापटीप, टारग्या मुलींत गणना करण्यास कारण होणाऱ्या पोषाकाचा कंटाळा वाटून जेणेंकरून कुलीन मुलींना शोभा येईल अशा पोशाकाची आवड, इत्यादि थोर गुण त्यांनीं आपणांमध्यें आणून ते दृढ करण्यास सदा सर्वकाळ झटणें, ही अत्यंत इष्ट गोष्ट आहे.

या वयांत चांगल्या सवयी लावून घेणें हें फार महत्वाचें काम आहे. आळसाची सवय न लागण्याबद्दल फार खबरदारी ठेविली पाहिजे. कारण,-या आळसरूपी शत्रूच्या तावडींत कोणीही माणूस सांपडलें म्हणजे त्यांतून त्याची सुटका होणें फार कठीण असतें. उद्योगांत राहून जो काल जातो त्याची बहार अनुभवावी तेव्हांच कळते. परंतु उद्योग करावयाचा तो कांहीं तरी पद्धतीनें केला पाहिजे, नाहींतर, उद्योग करूनही त्याचें साफल्य व्हावयाचें नाहीं. आळसरूपी शत्रूचा तिरस्कार करून उद्योगरूपी मित्राचा आश्रय करणाऱ्या कुमारीनें पुढील गोष्टी ध्यानांत ठेवून वर्तन ठेवीत असावें.

१ एकावेळीं एक काम.

२ प्रत्येक वस्तूला नेमलेलें ठिकाण.

३ जें काम करावयाचें असेल, त्याच्यामागें एकसारखें लागन तें तडीस नेणें, व तें संपल्यावर विश्रांति घेणें.

४ पद्धतशीर व वेळच्यावेळीं काम केलें असतां आयास न होतां तें चांगलें होतें, हें पक्कें ध्यानांत ठेवणें.

कुमारीला वाचणें, लिहिणें, व हिशोब यांची थोडी तरी माहिती असणें अवश्य आहे. त्यांवांचून असणें फारच गैरसोयीचें असून पदोपदीं अडचण सोसावी लागते. ज्ञानप्राप्ति करून घेण्याच्या इतर साधनांपैकीं वाचन हें मुख्य साधन आहे, असें म्हटलें तरी चालेल. पण तें फलप्रद करून घ्यावयाचें असेल तर तें जसें व्हावयास पाहिजे, तसें झालें पाहिजे; जें वाचावयाचें तें भराभर वाचीत सुटलें असतां त्याचा काय उपयोग? तें सावकाश व स्थिर रीतीनें वाचिलें पाहिजे. त्यापासून काय काय बोध घ्यावयाचा याचें मनन झालें पाहिजे. लेखकाचा हेतु काय आहे, विषयप्रतिपादनाची त्याची तऱ्हा काय आहे, कोणती गोष्ट वाचकांच्या मनांत ठसविण्याचा त्याचा यत्न आहे व तो कितीसा व कसा सिद्धीस गेला आहे, हें प्रथम मनांत चांगलें उतरलें पाहिजे. अडाणी व निष्काळजी मनुष्य शेकडों पुस्तकें वाचून जाईल, पण त्याच्या मनावर त्याचा कांहींएक संस्कार न झाल्यामुळें त्यांत एकही नवीन कल्पना किंवा नवीन विचार प्रवेश करावयाचा नाहीं. या बाबतींत डा. **आर्नोल्डचें** वचन बरेंच ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तें असें; "वाचतांना आपणांस आपणच असे प्रश्न विचारावे; ' हें असें लिहिण्याचा लेखकाचा हेतु काय ? तो हेतु साध्य करण्याकरितां कोणते उपाय योजिले आहेत ? तो हेतु व ते उपाय आपणास नीटपणें कळले आहेत किंवा नाहींत ? त्यानें दिलेलीं साधक बाधक प्रमाणें आपणास मान्य होतात किंवा नाहींत ? पुस्तकांतील वर्णनें आवेशयुक्त असून

वर्णिलेल्या गोष्टींचें प्रतिबिंब मनावर स्वच्छ उमटतें किंवा नाहीं ? त्यांत वर्णिलेल्या व्यक्तींची व गोष्टींची माहिती आपणास आहे किंवा नाहीं ? सारांश, लेखकाच्या व आपल्या विचारांत क्रिया-प्रतिक्रियेचा प्रकार घडून येत आहे किंवा नाहीं ? त्याच्या व आपल्या विचारांत मेळ बसतो किंवा नाहीं ? बसत नसला तर कां बसत नाहीं ? आपणामध्यें मतभेद कसा व कोठें होतो ?

त्याचप्रमाणें **लार्ड बेकनचें**ही वचन स्मरणीय आहे, तें असें:— "जें वाचावयाचें तें कांहीं तरी उलट बोलतां यावें किंवा इतरांचीं तोंडें बंद करितां यावीं म्हणून वाचूं नका, किंवा त्यावर पूर्ण विश्वास ठेवून तें अगदीं बरोबर आहे, असें गृहीत धरण्यासाठीं वाचूं नका, तर तें रास्तपणाच्या तागडींत घालून ग्राह्याग्राह्याचा निर्णय करण्याकरितां वाचा" नीट रीतीनें व शांतपणानें विचार करून निःपक्षपातानें निर्णय ठरवितां येण्याची सवय आपणांस लागणें अत्यंत इष्ट व महत्वाची गोष्ट आहे. साधक बाधक गोष्टींचा शांतपणें विचार करून आपल्या ठिकाणीं निर्णय करून ठेविला म्हणजे घाईघाईनें कसें तरी मत देण्याचा संभव तितका कमी होतो. **लॉकी** नामक ग्रंथकार म्हणतो:—'वाचनानें ज्ञानाच्या सामुग्रीचा पुरवठा होतो; परंतु जें आपण वाचितों तें आपलेंसें होण्यास विचार लागतो,' सारांश, लक्षांत ठेवण्यासारखा मुख्य मुद्दा इतकाच कीं, वाचनापासून जर कांहीं लाभ करून घ्यावयाचा असेल, तर आपण जें कांहीं वाचूं, त्यानें त्याची प्राप्ति न होतां ज्या रीतीनें आपण तें वाचन वाचूं, त्या रीतीवर तो लाभ विशेषें-

करून अवलंबून असतो. वाचनाचा परिणाम विचारशक्तीवर होत नसला तर त्याच्या योगानें नुसत्या गोष्टी ध्यानांत ठेवून स्मरणशक्तीवर बोजा लादण्यांत कांहींच अर्थ नाहीं !

स्त्रियांच्या अंगीं जे सद्गुण असणें अत्यंत इष्ट आहे, त्यांमध्यें सभ्यता या गुणाची थोरवी वर्णावी तितकी थोडीच होणार आहे. स्त्रियांचें नैसर्गिक मार्दव, त्यांना इतरांविषयीं वाटणारी सहानुभूति, शुद्ध व पवित्र गोष्टी करण्याकडे त्यांच्या मनाचा साहजिक कल इत्यादि त्यांच्या आंगच्या गुणांमुळें या गुणाची वाढ करणें पुरुषांपेक्षां त्यांना ज्यास्ती सोपें आहे. असें आहे तरी त्यामुळें त्यांच्या वर्तनाला कितीतरी शोभा येते ? ज्यांच्याज्यांच्याशीं त्यांना वागण्याचा प्रसंग येतो, त्यांच्यात्यांच्यावर त्यांच्या वर्तनाचा परिणाम कितीतरी चमत्कारिक रीतीनें भासमान होतो ? प्रेमाच्या मनोवृत्ति व स्नेहयुक्त संबंध यांची वृद्धि होण्यास हा गुण कितीतरी कारणीभूत होतो ? तरुण मुलींनीं आपला नैसर्गिक नाजुकपणा व आपली शालीनता चट् सारी विसरून जाऊन टारगेपणाचा अवलंब करून उद्धटपणा दाखविला असतां कोणास त्याबद्दल आश्चर्य व तिरस्कार वाटणार नाहीं ? खरी सभ्यता ही सात्विक वृत्तीचें व उदार अंत:करणाचें एक बाह्य चिन्ह होय.

आपणापेक्षां खालच्या प्रतीच्या माणसांना न हिणवणें, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध स्त्रीपुरुषांना योग्य सन्मान दाखविणें, मंडळींत हासें पिकविण्याची वेडी हौस मनांत धरून एकाद्याची चेष्टा करून त्याच्या मनाला न दुखविण्याची सावधगिरी ठेवणें, हें खऱ्या सभ्यतेचें वर्तन

होय. या प्रकारच्या वर्तनाच्या बुडाशीं सहानुभूति हा थोर गुण असतो. आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्याच्या हिताबद्दल कळकळ वाटणें हें किती थोरपणाचें काम आहे ! अमुक प्रकारचें वर्तन इतरांनीं आपणांशीं ठेवावें असें आपणांस वाटत असतें तशा प्रकारचें वर्तन आपण स्वतः इतरांशीं सदासर्वकाळ ठेवण्याबद्दल झटलें पाहिजे. याच उच्च तत्वाच्या पायावर सभ्यतेसारख्या थोर गुणाची उभारणी आहे, हें तरुण मुलींनीं पक्कें ध्यानांत धरिलें पाहिजे. तसेंच "जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुलें, तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा" ही जी एका थोर साधूची उक्ति आहे तिला आपल्या अंतःकरणांत नेहमीं ठाव देऊन तदनुसार वर्तन ठेवण्याचा यथाशक्ति यत्न आपल्या हातून होत गेला, तरच आपण आपल्या खऱ्या कर्तव्यास जागलों असें होईल, हें कुमारींनीं विसरतां कामा नये. एका स्त्रीनें आपल्या पतीबद्दल खालील उद्गार काढिले आहेत.– "त्यांचा स्वभाव खरोखरच ज्यास्ती थोर किंवा उदार आहे अथवा ते कमी गर्विष्ठ आहेत, हें माझ्यानें सांगवत नाहीं; मी इतकें मात्र खात्रीनें म्हणतें कीं, अति मोठ्या माणसांची त्यांनीं कधीं हांजी हांजी केली नाहीं; अगर अति भिकार स्थितींतील माणसाचा तिरस्कार केला नाहीं. वर सांगितलेल्या दुसऱ्या प्रकारच्या माणसांशीं ते फार प्रेमळ व गोडीनें वागत. तरी या त्यांच्या वर्तनांत अशी कांहीं खुबी असे कीं, यांच्या सलोख्याचा फायदा घेऊन त्यांच्या तिरस्कारास पात्र होण्याइतकें धाडस त्या लोकांपैकीं कोणासही करवत नसे. असा

यांचा वचक असे. त्यांच्या मनांत यांच्याबद्दल अतिप्रेम व आदरबुद्धि दिसून येत असे," सभ्यता या गुणांत असें कांहीं तरी आहे कीं, त्यामुळें त्याच्या क्रियेबरोबरच प्रतिक्रिया घडण्यास सुरुवात होते.–एक दुसऱ्याशीं सभ्यतेनें वागूं लागतांच दुसऱ्याच्याही अंतःकरणांत त्याच सद्गुणाची ज्योति पेट घेते. "प्रेमापासून प्रेम वाढतें." आपल्या आंगची योग्य चालचलणूक पाहून दुसऱ्यासही तोच कित्ता घ्यावासा वाटतो. एका मार्मिक ग्रंथकारानें म्हटलें आहे. "सुंदर आकृति ही सुंदर चेहऱ्यापेक्षां ज्यास्ती व सुंदर वागणूक ही सुंदर आकृतीपेक्षांही ज्यास्ती" एकादें सुंदर चित्र पाहून जो मनाला आनंद होतो, त्याहीपेक्षां सुंदर वागणूक पाहून मनाला ज्यास्ती आनंद होतो. उत्तम कलांमध्यें सुंदर वागणूक ही अत्युत्तम कला होय. सुंदर वर्तन पाहून होणारा आनंद असा आहे कीं, त्याची किंमत सगळ्यांना सारखी जाणतां येते. कोणकोणत्या गोष्टींचा मिलाफ एकत्र जुळला म्हणजे मनुष्य सुंदर दिसतो, याबद्दल मतभेद होण्याचा संभव असतो. कित्येकांना काळे केंस पसंत पडतात तर कित्येकांना सोनेरी केंस आवडतात. कित्येकांस उंच कपाळ आवडतें, तर कित्येकांस अष्टमीच्या अर्धचंद्राकृती कपाळाची हौस असते. असा मतभेद सुंदर वागणुकीसंबंधानें कधींच घडत नाहीं. अशा वागणुकींतील खुबी प्रत्येकास कळते. व प्रत्येकाचे मनावर तिचा ठसा जोरानें उमटतो. सर्वप्रकारच्या शोभांमध्यें ही शोभा तर इतकी स्वस्त आहे कीं, हिचा स्वीकार करण्यास किंमत मुळींच

पडत नाहीं. असें असूनही हिजपासून होणारा लाभ अति मोठा असतो. कारण ज्यांच्यावर हिचा परिणाम घडतो, त्या सर्वांच्या मनांत हिजबद्दल अत्यंत सन्मान व आदरबुद्धि उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. अशाप्रकारची प्रशंसनीय शोभा जीमध्यें वसत असते, ती तरुणी खरोखर धन्य होय. अशा थोर मनाच्या स्त्रीच्या हृदयांत जसा धर्म तशीच परोपकारबुद्धिही वास करीत असते. तिच्या तोंडावाटे वाईट शब्द कधींच निघावयाचा नाहीं हें निःसंशय.

एका विद्वानानें असें म्हटलें आहे कीं, आपली वागणूक इतरांस पसंत होईल अशी इच्छा मनांत बाळगून तदनुरूप वर्तन ठेवण्यांतच कुलीनपणा दिसून येतो. कुलीनता ही गोष्ट छपून रहाणारी वस्तु नव्हे. कुलीन माणसांची नजर, त्यांची बोलण्याचालण्याची ढब, सारांश, त्यांच्या एकंदर वर्तनाचा झोंक असा कांहीं असतो कीं, जेणेंकरून इतरांच्या मनाला किंवा शरीराला दुःख किंवा पीडा होईल, त्यास ते यत्किंचित्सुद्धां थारा देत नाहींत.

कुलीनता ही केवळ श्रीमंतीवर अवलंबून नसते. श्रीमंत घराण्यांतील स्त्रियांना पुष्कळसे दागदागिने घालून व उंचीं वस्त्रें परिधान करून आपल्या श्रीमंतीच्या भपक्यानें इतरांवर छाप बसवितां येईल. परंतु याचा परिणाम चिरस्थायी कधीं व्हावयाचा नाहीं. कुलीनपणाचीं लक्षणें कांहीं वेगळींच असतात. जगांत राहणाऱ्या प्रत्येकाला आपल्या ओळखीच्या माणसांमध्यें अशीं स्त्रीरत्नें आढळून येतात कीं, त्यांच्या उच्चतर स्वभावांत कांहीं

तरी अद्वितीय थोरपणा दिसून येतो, व त्याच्या योगानें मनुष्य कांहींवेळपर्यंत तरी थक्क होतो.

इतकेंच नाहीं, तर ज्यांच्या पूज्य व निर्मल अंतःकरणांत दुष्कृति किंवा नीच विचार यांना थोडासासुद्धां थारा मिळत नाहीं, अशा मानवरत्नांपुढें अति उच्छृंखल व अडाणी माणसेंसुद्धां लीन होतात. सौजन्याचा महिमाच कांहीं विलक्षण आहे. **फ्रान्स्** देशांतील एका राज्यकन्येच्या सौजन्याची एक गोष्ट सांगतात ती अशीः— **फ्रान्स्** देशांत एकदां एक नामांकित कवि व वक्ता होऊन गेला. परंतु तो त्या काळच्या एकंदर माणसांत अति कुरूप होता. एकदां असें झालें कीं, ज्या दिवाणखान्यांत तो प्रख्यात पंडित निद्रिस्थ होता, त्या दिवाणखान्यांतून त्या राजकन्येला आपल्या सख्यांसहवर्तमान जाण्याचा प्रसंग आला. जात असतां ती राजकन्या खालीं लवली आणि तिनें त्याच्या ओठाला हळूंच स्पर्श केला. इतक्या मोठ्या सन्मानास हा मनुष्य योग्य नाहीं, असें समजून तिच्या सहचारिणींनीं तिला त्याबद्दल दोष देऊन तिची कांहींशी निर्भर्त्सना केली. त्यावर तिनें उत्तर दिलें:— मी त्याला "स्पर्श केला नाहीं; तर ज्या तोंडांतून इतकीं सुंदर वचनें बाहेर पडलीं, त्यांस मी स्पर्श केला." त्या विद्वच्छिरोमणीस त्या सहानुभूतिदर्शक स्पर्शाची किंमत बहुमोल रत्नांच्या हारापेक्षांही ज्यास्ती वाटावी हें सहाजिकच आहे.

दुसऱ्यांच्या कल्पना, इच्छा, मतें, व लहरीसुद्धां शांतपणें ऐकून घेऊन त्यांस योग्य तो मान देणें, तसेंच त्यांच्या दुराग्रहास वश

न होतां त्यांस त्याबद्दल तिरस्कार न दाखवितां त्यांचा मान ठेवणें, इतरांच्या वर्मी लागेल असें मत ठोकून देऊन त्यांची निर्भर्त्सना मुद्दाम करण्याचें टाळणें, हीं सर्व खऱ्या सौज्यन्याचीं व सभ्यतेचीं लक्षणें होत. संसारांत नानातऱ्हेच्या विपत्तीनें गांजलेल्या व क्षणोक्षणीं कटुशब्द–इतकेंच नव्हे–तर शिव्यांची लाखोली वाहण्यास सुद्धां सदासर्वकाळ तयार असणाऱ्या कैकेयीतुल्य पत्नीचा जाच सुद्धां शिरसावंद्य मानणाऱ्या तुकारामादि साधुंनीं वेळोवेळीं जी अनुपम सौजन्यता व शालीनता प्रकट केली, ती खरोखरच ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. स्वार्थाचा अम्मल जारीनें सुरू असतां सौजन्याचें किंवा सभ्यतेचें कांहींच चालत नाहीं. मनुष्यांमधील हरएक प्रकारचें दळणवळण स्नेहभावानें होऊन समाजांतले व्यवहार सुरळीत रीतीनें चालूं रहाण्यास तरी परस्पर सौजन्य व सभ्यता हेच गुण कारणीभूत होतात. प्रत्येक काम करण्याचा कोणतातरी एक उत्तम मार्ग असतो व तो मार्ग म्हटला म्हणजे सभ्यतेचा होय. प्रसिद्ध ग्रंथकार **इमर्सन** म्हणतोः— “ज्याप्रमाणें सभ्यता छपून रहाणारी वस्तु नव्हे, तद्वतच रीतिभातीचें सामर्थ्य छपून रहाणारें नाहीं. त्याचा प्रभाव कळून आल्यावांचून रहात नाहीं. कोणतेंही राष्ट्र घ्या किंवा देश घ्या. त्यांत मनाची थोरवी ही प्रकट होणारी गोष्ट होय, झाकून रहाणारी नव्हे, हें नेहमीं प्रत्ययास येतें.” सभ्यतेपासून होणाऱ्या परिणामाला अडथळा कोणासही करितां यावयाचा नाहीं. चांगली रीतभात चांगल्या लोकांच्या समागमानें लागते. परंतु या रीतिभातीचा

जोर इतका कांहीं असतो कीं, ज्याला किंवा जिला ती साधते, तो किंवा ती दिसण्यांत सुंदर नसली किंवा श्रीमंत नसली किंवा बुद्धिमान नसली तरी सन्मानास पात्र झाल्यावांचून राहत नाहीं, व सर्वत्र त्यांचा आदर होतोच होतो. सारांश, आपणांमध्यें माणूसकी आहे, भलेपणा आहे, हें इतरांच्या प्रत्ययास आणून देण्याचा आपणांकडून निरंतर यत्न झाला पाहिजे. असें वर्तन नेहमीं घडत गेलें असतां मनास एकेप्रकारचें उच्च समाधान वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

मर्मच्छेद करणाऱ्या भाषणाची किंवा इतरांस टोंचून बोलण्याची सवय ही खऱ्या सौजन्यास विघातक आहे. आपल्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांची गुणावगुणांबद्दल थट्टा उडविणें हा अति सोपा आणि मुळींच किंमत न पडणारा विनोद आहे. या बाबतींत प्रत्येकानें आपल्या द्वाड स्वभावाला आळा घालण्याचा यत्न केला नाहीं तर इतरांस वर्मीं घाव लागण्यासारखें भाषण करण्याचे कामांत सर्वांना चतुरता सहज संपादितां येण्यासारखी आहे. अशा प्रकारची थट्टा करणाऱ्याला आपल्या कृत्यापासून कितीही मौज वाटली तरी कांहीं कांहीं कोंवळ्या मनाच्या माणसांच्या मनावर त्या थट्टेचा इतका जोरदार परिणाम घडतो कीं, त्यांचा मर्मच्छेद होऊन त्यांच्या वर्मीं इतका मोठा घाव पडतो कीं, त्याच्या वेदना त्यांनाच ठाऊक!

अशाप्रकारें बोलण्याची घातक सवय लागली म्हणजे ती किती भांडणाला व वैराला कारण होते, याचा अनुभव सर्वत्रच आहे. त्याबद्दल येथें विशेष उल्लेख करण्याची जरूर दिसत नाहीं. सौम्य

व आनंदायी शब्द उच्चारण्याकरितां ज्या मुखाची घटना विधात्यानें केलेली दिसते, त्या पवित्र मुखांतून इतरांच्या मनाला झोंबणारे कटुशब्द बाहेर यावे, ही मोठ्या दिलगिरीची व सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. एकाद्या स्त्रीचा आवाज कितीही कर्णमधूर असला (व स्त्रियांमध्यें अशा आवाजाची देणगी पुष्कळांना असते) तरी तशा मधुर आवाजाचे द्वारें इतरांस आनंद वाटविणारे शब्द न येतां विपरीत आले, तर परमेश्वरानें कृपायुक्त होऊन दिलेल्या बहुमोल देणगीचा एका प्रकारें अपव्यय केल्यासारखें होत नाहीं काय ?

अशाप्रकारची वर्मीं लागणारी थट्टा केव्हां केव्हां सहज निष्काळजीपणानें केली जाते. अशाप्रकारें बोलणाऱ्या माणसांकडून कोणत्याही मत्सरभावानें किंवा एकादा वाईट हेतु मनांत धरून ही चूक होते असें नाहीं; तर दुसऱ्यास त्याबद्दल किती वाईट वाटेल याबद्दल बेफिकीर राहिल्यामुळें किंवा आपण जें सहज बोलतों त्याचा अर्थही तशाच साहजिक भावानें घेतला जाईल, असें बोलणाराला वाटत असतें, म्हणून ही चूक होते. परंतु अशा लहानसहान सहज बोललेल्या गोष्टींवर समाजाचें स्वास्थ्य व त्याचा आराम किती अवलंबून असतो, याची कल्पना बोलणारास होत नाहीं, किंवा ह्या गोष्टीचा त्यास अगदींच विसर पडतो. शस्त्रानें केलेली जखम लवकर भरते, पण वर्मीं जो घाव शब्दानें पडतो, तो सर्वस्वी बुजण्यास फारच काल लागतो.

मानसिक धैर्याचा महिमाही मोठा असून तें अंगीं असणें इष्ट

आहे. हा गुण पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या अंगीं ज्यास्ती असतो, असें जगाचें मार्मिक रीतीनें अवलोकन करणाऱ्यांच्या चांगलें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. ज्या कामाला शरीरसामर्थ्याची विशेष गरज लागते तीं कामें करण्याचें वळण त्यांस नसल्यामुळें या बाबतींत पुरुषांपेक्षां त्या कदाचित् कमी पडतील; परंतु सहनशीलता, मनोनिग्रह, आणि त्या त्या प्रसंगास पुरून उरणारें त्यांचें आंगचें साहस इत्यादि मनोधैर्य प्रकट करणारे गुण लक्षांत आणितां वरील विधानाची सत्यता ध्यानांत सहज येण्यासारखी आहे.

सावित्री सत्यवानास देणें अतिभयंकर व धोक्याचें काम आहे, कारण, तो अगदीं अल्पायुषी आहे, अशी **मद्रदेशचा** राजा **अश्वपती** याची पक्की खात्री **नारद मुनींनें** केली असतांही, मनानें ज्याला वरिलें, तोच माझा पति, त्यासच मी वरणार, हा माझा कृत-निश्चय कदापि ढळावयाचा नाहीं, म्हणून मनाचा संकल्प करून तो **सावित्रीनें** कसा तडीस नेला, हें प्रसिद्धच आहे. ज्याच्या समवेत कालक्रमणा करावयाची म्हणून तिनें निश्चय केला होता, त्याजवर तिचें प्रेम संपत्ति, वैभव किंवा इतर ज्या जगिक गोष्टींमुळें साधारणतः स्त्रिया भुलतात, त्यांस भुलून बसलें काय? मुळींच नाहीं. त्यासमयीं **सत्यवान्** अगदीं विपत्तींत होता; त्याचा वृद्ध पिता **द्युमत्सेन** यास अंधत्व आलें होतें; इतकेंच नाहीं, तर परचक्र आल्यामुळें त्याचा सर्वस्वी मोड होऊन तो स्वराज्यांतून हद्दपार झाला होता. हेंही असो; एका वर्षाच्या आंतच **सत्यवानाचा** अंत

होण्याचा संभव आहे, असें त्रिलोकीं गमन करणाऱ्या व सर्वांस वंद्य अशा **नारदमुनीनें** सुचविलें; तेव्हां **अश्वपतीच्या** अंगावर रोमांच उभे राहून तो **सावित्रीस** म्हणाला, 'मुली, असा अविचार करूं नकोस; त्यावर तिनें सविनय उत्तर दिलें. 'बाबा, त्यांची आयुष्यमर्यादा कितीही कमी असली तरी त्यांच्यावांचून इतर पुरुष मला आपणांप्रमाणें आहेत." हा तिचा कृतनिश्चय पाहून **नारदमुनि** फारच आश्चर्यचकित झाले. त्यांनीं **अश्वपतीला** सांगितलें कीं, राजा, कृतनिश्चयापेक्षां पवित्र दुसरें काय आहे! सद्धर्माच्या कासेला लागतां कल्याण होतें, म्हणून या थोर मुलीच्या निश्चयाच्या आड कां यावें? असें बोलून मुनिवर्य त्या पितापुत्रीस आशीर्वाद देऊन चालते झाले. नंतर राजानें मुलीचें यथाविधि लग्न करून तिला **सत्यवानास** अर्पण केलें. सासरीं काय प्राप्त होणार, याचा अजमास तिला अगोदरच झाला होता. तपोवनांतील पर्णकुटिकेंत पतीच्या आज्ञेंत वागून व अंध श्वशुराच्या आणि सासूच्या सेवेंत राहून व स्वत: वल्कलें धारण करून काल कंठण्यास मोठ्या उत्साहानें ती तयार झाली. ल्यायला दागदागिने व नेसायाला भारीं वस्त्रें नाहींत म्हणून मनाला यत्किंचित्‌ही तिनें वाईट वाटूं दिलें नाहीं. अरण्यांत रहात असतां ज्या गैरसोयी व अडचणी सोसाव्या लागतात, त्यांबद्दल रागाचा किंवा नाखुषीचा एक शब्दही न काढितां **श्रीरामचंद्राच्या** सेवेस जशी **सीता** किंवा वनवास कंठणाऱ्या पांडवांच्या शुश्रूषेंत सदा दक्ष असणारी **द्रौपदी**, तद्वतच ही तत्पर झाली. ही गोष्ट तरुण कुमारींनीं फार लक्षांत

ठेवण्याजोगी आहे. सासरीं दागिन्यांचा किंवा इतर चैनीच्या वस्तूंचा अभाव असल्यास मूर्ख सुना सासरच्या माणसांस किती कमी समजतात ? सर्व सुख अशा वस्तूंवरच अवलंबून असतें ही त्यांची गैर समजूत निघून जाईल तर त्यांच्या व त्यांच्या इतर नातलगांच्या सुखांत किती मोठी भर पडेल ? असो.

मनास आवडणारें **सावित्रीचें** एकंदर थोर वर्तन पाहून **सत्यवानाच्या** तोंडांतून उद्गार निघाले कीं, 'आपणा सर्वांना आपन्मुक्त करण्याकरितां ही मूर्तिमंत पितृराज्यलक्ष्मीच या आश्रमांत हें रूप स्वीकारून जणो काय तप करिते आहे, असा मला भास होत आहे.' परंतु ती आपल्या बाह्य वर्तनानें अति सुखसमाधान दाखवीत होती, तरी तिचें अंतर्याम चिंताग्नीनें हळूहळू होरपळण्याचें काम सुरू ठेविलें होतें. **नारद** मुनीचें वचन तिच्या कानांत सारखें गुणगुणत होतें.

तो वचनकृमि तिच्या मनोभूमीस रात्रंदिवस सारखा पोखरून फोल करीत होता. **सत्यवाना**चे राहिलेले आयुष्याचे दिवस ती फार लक्ष लावून दररोज मोजीत असे. त्या कामांत तिचें दुर्लक्ष कसें होणार ? ज्याच्या बरोबर आपलें सर्व आयुष्य जावयाचें, ज्याच्या सुखदुःखावर आपलें सुखदुःख अवलंबून, तो आपला जन्माचा वाटेकरी ह्या जगांतून नाहींसा होऊन आपणावर वैधव्याची गदा धाडकन् येऊन पडणार आहे, हा दुर्धर विचार मनांत घोळत असतां तिच्या मनाची स्थिरता कशी कायम राहणार ? चार दिवस कायते उरले, तेव्हां तिनें व्रताला

आरंभ केला. तीन दिवस उपास केल्यावर चौथे दिवशीं सकाळीं सासरा सुनेला प्रेमानें म्हणतो '**सावित्री**, तीन दिवस उपाशी राहून व्रत केलें आहेस. तर आज यथाविधि पारणें करून व्रतांतून मोकळें व्हावयाचें आहे, तेव्हां सर्व तयारी कर, उशीर करूं नकोस; कारण पूर्ववयामध्यें क्षुधा फार तीव्र असते.' यावर तिनें नम्रपणानें उत्तर दिलें कीं, सूर्यास्त झाल्यावर पारणें करावयाचें आहे. त्याच दिवशीं सकाळीं **सत्यवान्** स्नानसंध्यादि अन्हिक उरकून वनांमध्यें फलमूलादि पदार्थ आणण्याकरितां निघून जाण्याची तयारी करूं लागला. तेव्हां **सावित्री** त्याजवळ जाऊन सविनय प्रार्थना करूं लागली, कीं, हे नाथ, वनशोभा पाहण्यास येण्याची माझी इच्छा आहे, ती आपण मान्य करावी; ही मी प्रथमच इच्छा प्रदर्शित केली आहे, म्हणून ती अमान्य न होईल तर बरें. यावर पतीनें म्हटलें, अरण्यांतील वाटा फार बिकट आहेत, त्या चालून जाण्याची तुझ्या कोमल पायांना कधींच सवय नाहीं. शिवाय तीन दिवसांचा तुझा उपास आहे. वनांत किती दूर जावें लागेल याचा नेम नाहीं. तुला अति श्रम होतील. ते तुला सोसावयाचे नाहींत; इतकेंही असून येण्याची प्रबल इच्छा असली तर सासूसासऱ्यांची आज्ञा घे; म्हणजे मग तुला बरोबर नेणें सोयीचें होईल. **सावित्रीचा** आग्रह पाहून तिकडूनही तिला परवानगी मिळतांच **सत्यावान्** आपल्या प्रियतमेसह उटजांतून आईबापांस वंदन करून निघाला. या प्रसंगाविषयीं लिहीत असतां **श्रीरामचंद्राच्या** वनप्रस्थान समयाची

आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. **सीतादेवीनें** त्यासमय असाच हट्ट धरिला आणि पतीनें वनवासांतील संकटांचें चित्र मूर्तिमंत डोळयांसमोर उभें केलें असतांही त्या साध्वीनें **रघुपति** मजबरोबर असतां हीं संकटें मला आनंदस्थान बनल्यावाचून राहणार नाहींत, असें सांगून पतीबरोबर वनवास कंठण्यास ती कशी निघाली हें वाचकांस ठाऊक आहेच. असो.

अरण्याची वाट लागतांच मन मोकळें करून पतीबरोबर गोष्टी बोलून त्याच्या कर्णमधुर वाणीचा आस्वाद मिळावा या हेतूनें वनाचा आश्रय करून राहणाऱ्या नानाविध पक्ष्यांचीं नांवें **सावित्री** पतीला विचारूं लागली. पतीच्या मधुर वचनाचे घुटके सप्रेम अंतःकरणानें घेण्यांत गर्क असतां अरण्यांतील बिकट वाटेचे श्रम किंवा कष्ट तिला भासलेसुद्धां नाहींत! नानाविध पुष्पफलांनीं लादलेल्या वेली व वृक्षसमुदाय नेत्रांस आनंद देत आहेत, त्यांचा मधुर सुगंध घ्राणेंद्रियास तल्लीन करून सोडीत आहे, निरनिराळया जातीचे पक्ष्यांनीं काढिलेले गोड आवाज कर्णेंद्रियास उत्तम संगीताप्रमाणें आराम देत आहेत; मधून मधून पतिपत्नी परस्परांवर प्रेमदृष्टि फेंकीत फेंकित फळें फुलें वेंचण्यांत निमग्न आहेत; त्या समयाचा तो सुखानुभव वर्णावा तितका थोडाच. अशा आनंदाच्या भरांत कांहीं काळ गेल्यावर **सत्यवान्** समिधेकरितां कांहीं काष्टें तोडीत असतां **सावित्रीला नारद**मुनींच्या वचनाची आठवण झाली आणि थोडा विचार करून पाहतां पतीची अखेरची वेळ अगदीं समीप येऊन पोह-

चली आहे असें जाणतांच ती साध्वी पतीला म्हणाली, नाथ ! आपणास फार श्रम होत आहेत. आपलें मनही कांहींसें अस्वस्थ झाल्यासारखें दिसत आहे, तर कांहीं वेळ विश्रांति घेतली असतां बरें होईल. या वेळेच्या सुमारास **सत्यवानाच्या** मस्तकांत असह्य वेदना होऊं लागून मूर्च्छा आल्यासारखें वाटूं लागलें होतें. तेव्हां तो सावित्रीस म्हणाला, माझें मस्तक अति तापलें आहे म्हणून तें तुझ्या शीतांकावर ठेवून मला पडावेंसें वाटतें. तत्क्षणींच त्या सतीनें आपल्या मांडीवर त्याचें डोकें ठेवून त्यास निजविलें, आणि आपल्या कोमल हस्तांनीं तें ती रगडूं लागली. इतक्यांत हातांत जबरदस्त पाश धारण करून एक विक्राळ पुरुष पतीजवळ उभा ठाकला आहे असें तिच्या दृष्टीस पडलें!! त्यावेळीं सावित्रीच्या मनाची काय स्थिति झाली असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी. परंतु तिचें मन साधारण माणसांप्रमाणें भित्रें होतें काय ? मुळींच नाहीं. तिचें प्रसंगावधान, तिचा दृढ निश्चय व तिचें अद्वितीय मनोधैर्य यांचा त्यावेळीं एकसारखा मेळ पडून जितका तो प्रसंग बिकट, तितकेंच तिच्या अंगीं धैर्यही चढलें. अंगावर रोमांच उभे करणारा हा भव्याकृति पुरुष कोण असावा याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. तें यमराजावांचून दुसरें कोण असणार ? त्यास पहातांच त्या पतिव्रतेनें आपल्या पतीचें शीर भुईवर ठेविलें आणि झडकर उठून यमराजास मोठ्या आदरानें वंदन केलें. आणि कर जोडून म्हणाली कीं, देवाधिदेवा, आज आपण या वनांत येऊन मला

दर्शन दिलें त्यामुळें मी धन्य झालें आहें. तेव्हां आपलें नांव सांगून हे माझे कर्ण तृप्त कराल तर बरें. तेव्हां तो पुरुष म्हणाला, मी **'यम'** आहें. तिनें विचारिलें आपण येथें कां आलां? तो म्हणाला तुझ्या पतीला न्यायाला! हें दूत-कार्य आहे. खरोखर म्हटलें तर हा तुझा पति **सत्यवान्** बहु गुणसंपन्न असून फार योग्य आहे, याला नेऊं नये, पण स्वामींचें आज्ञापालन आमचें कर्तव्यकर्म आहे; आम्हांस कर्तव्यपराङ्मुख होतां येत नाहीं, म्हणून आमचा नाइलाज आहे. असें म्हणून त्यानें **सत्यवानास** बांधिलें आणि दक्षिणदिशेकडे जावयास निघाला. तेव्हां **सावित्रीही** त्याच्या मागोमाग जाऊं लागली. तेव्हां यमानें म्हटलें कीं, तुला श्रम बरेच झाले आहेत, आतां पतीचें उत्तरकार्य उरकून त्याचें स्मरण करून रहा, म्हणजे त्याबद्दल तूं आपलें कर्तव्य केल्याप्रमाणें होईल.

सावित्री ह्मणाली:—"आतां मागें राहून काय करायचें आहे? जिकडे पति तिकडे मी. माझ्या वडिलांच्या व व्रताचे प्रसादानें कोणी माझ्यावर कसेंही शस्त्र उपसलें किंवा माझ्या गतीला अडथळा करावा म्हणून कितीही मोठमोठे डोंगर किंवा कडे माझ्या रस्त्यांत आले, तरी त्यांपासून मला गैरसोय किंवा विघ्न यत्किंचित्ही व्हावयाचें नाहीं. पुनः साधुसंतांचें असें वचन आहे कीं, साधूशीं ज्याचा स्नेह झाला त्याच्यावर कोणतेंही संकट येत नाहीं. आणि आलें तर त्याचा अम्मल त्याच्यावर बसतही नाहीं. तुम्ही सर्वांशीं सारखें वर्तन ठेवितां अशी तुमची ख्याति

आहे, म्हणून मी दीनावस्थेंत आहें तर मजकडे आपण दयार्द्र-दृष्टीनें पहावें.” तिच्या तोंडांतून हे शब्द ऐकतांच चंद्रोदय होतांच जशी समुद्रास भरती येते, त्याप्रमाणें यमराजाच्या मनांत तिजबद्दल आदरयुक्त प्रेम उचंबळलें. तो प्रेमळपणानें तिला म्हणाला ‘ साध्वी, ’ तूं फारच श्रमली आहेस, तर आश्रमीं जाऊन विश्रांति घे. तूं मागशील तो वर तुला देतों. **सावित्री** म्हणाली:– मामंजींना दृष्टि द्यावी; तसेंच ते राज्यभ्रष्ट झाले आहेत तर त्यांस राज्यारूढ कराल असें मी इच्छितें. यमानें ‘तथास्तु’ म्हटल्यावर पुनः तिला परत जाण्यास सांगितलें. परंतु ती परत न जातां तिनें यमधर्माशीं आपलें भाषण तसेंच पुढें चालूं ठेविलें. तिची मधुर वाणी, तिची शालीनता, चातुर्य, विनय वगैरे उच्च प्रकारचे गुण पाहून यमानें तिला आणखी वर मागून घे म्हणून सांगतांच तिनें स्वपित्यास पुत्रप्राप्ति मागून स्वतःलाही तिनें तोच वर मागितला. ‘ तथास्तु ’ यमानें म्हणतांच तिनें सांगितलें कीं, आपली वाचा सत्य व्हावी म्हणून मला माझे पति परत मिळाले पाहिजेत. तोही वर मिळाल्यावर ती पतीच्या **कलेवरा**कडे परत आली. आणि पुनः त्याचें शीर आपल्या मांडीवर घेऊन पूर्वीप्रमाणें ती दाबूं लागली. इतक्यांत पूर्ण निद्रा अनुभवल्यानंतर मनुष्य जागा होतो, त्याप्रमाणें **सत्यवान्** जागा होऊन म्हणाला कीं, तुझ्या मृदु व शीतल मांडीचा आश्रय मिळाल्यामुळें मला गाढ झोंप लागली, म्हणून वेळ फार गेला. सूर्यास्तही झाला, झोंपेंत स्वप्न मोठें चमत्कारिक

पडलें कीं, कोणी भव्याकृति पुरुष येऊन मला पाशबद्ध करून घेऊन चालला आहे हें कसें काय ? त्यावर ती सती म्हणाली:- रात्र बरीच झाली आहे, उद्यां सर्व सांगेन. चालण्यापुरतें बळ असेल, तर मी हात देत्यें, कसें तरी घरीं चला. फुलें, फळें, समिधा आणि कुऱ्हाड सर्व मी धरून घेऊन चालतें. नंतर तीं दोघें घरीं आल्यावर पहातात तों **अश्वपती**ला दृष्टि येऊन तो बुचकळ्यांत पडला आहे. **सावित्रीनें** सर्व वृत्तांत कथन केल्यावर जिकडे तिकडे आनंद पसरून, उभयतां कुलांस भूषणभूत झालेल्या सुनेचें व कन्येचें कौतुक किती करावें असें तिच्या सासरच्या व माहेरच्या माणसांस वाटावें यांत नवल तें कोणतें?

त्याचप्रमाणें **राजस्थान**च्या इतिहासाकडे नजर फेकली असतां काय दिसून येतें ? ज्यांच्या अंगीं क्षात्रतेज मूर्तिमंत वास्तव्य करीत होतें अशा क्षत्रिय कुलोत्पन्न राजांवर यवन राजांनीं हल्ले केले तेव्हां अनेकदां आपापल्या पातिव्रत्याचें रक्षण करण्याच्या थोर हेतूनें प्रेरित होऊन राणी **पद्मिनी,** राणी **संयोगिता, कृष्णाकुमारी** प्रभृति राजघराण्यांतील कुलवती स्त्रियांनीं जीविताचीसुद्धां पर्वा न धरितां कसकसे पराक्रम करून अजरामर कीर्ति संपादिली आहे, हें इतिहास वाचणारांस अवगत आहेच. पातिव्रत्य भंग करण्याच्या नीच लालसेनें येणाऱ्यास जालीम विषानें रंगविलेला वेष परिधान करावयास लावून तडफडून प्राण सोडण्यास एक वीरपत्नी लाविते तर दुसरी अजब युक्तीच्या काव्यानें त्याच्या हातावर तुरी देऊन त्यास

चकवून तोंडांत बोट घालावयास लावून प्रत्यक्ष त्याच्या छावणीं-तून आपली व आपल्या प्रियतमाची सुटका करून आणिते; अशीं एक दोन नाहींत, तर शेंकडों उदाहरणें आहेत. अशा आणी-बाणीच्या प्रसंगीं त्यांच्या मनाचा समतोलपणा ढळला असता किंवा त्यांच्या आंगची लोकोत्तर सहनशीलता नाहींशी होऊन त्यांनीं धैर्य सोडलें असतें तर परिणाम वाईट झाला असता व त्यांची आज मोठमोठ्या सतींमध्यें जी गणना होत आहे, ती खचित झाली नसती. आणि त्यांनीं गाजविलेल्या पराक्र-मांमुळें आज त्यांचा यशोदुंदुभी जसा सर्वत्र दुमदुमत आहे, तसा राहिला नसता.

वर निर्दिष्ट केलेल्या वीरकन्यांवर व वीरपत्नींवर दुर्धर संकटें गुज-रून त्यांच्या आंगची असाधारण सहनशीलता व मनोनिग्रह वगैरे गुण भयंकर कसोटीस लागण्याचे प्रसंग त्यांजवर आले. तसे प्रसंग अली-कडच्या काळीं येण्याचा संभव फारच कमी आहे. तरीपण, संसारांत-सुद्धां त्यांच्या आंगचे हे गुण कसोटीस लागण्याचे प्रसंग अनेक येतात. अशा प्रसंगीं या सद्गुणांचा पूर्ण अवलंब त्यांनीं अवश्य केला पाहिजे. अशा प्रकारची थोर कृति घडली असतां त्यांचाच केवळ उद्धार होईल इतकेंच नाहीं, तर त्या उभ-यकुलांस भूषणभूत होऊन त्यांस उन्नत्ति आणतील; आणि आपल्या सतेज उदाहरणानें आपल्या समाजास उद्धर-तील यांत शंका नाहीं. संसारांत होणारे नानातऱ्हेचे त्रास मनाची चलविचल न होऊं देतां शांतवृत्तीनें सहन करण्याची

इष्ट सवय लागणें ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. त्यांतल्या-त्यांत आपल्या आंगच्या सद्गुणाची तारीफ कोणीही करणार नाहीं, किंवा आपला सद्गुण कोणाच्या दृष्टीस पडण्याचा संभव नाहीं, असें असलें तरी या थोर सद्गुणांकरतांच हे अंगीं बाणून घेण्याची खटपट करून ते साध्य करून घेणें ही गोष्ट तर केवळ सद्गुणाची परमावधि होय. फलप्राप्तीच्या आशेनें एकादा सद्गुण अंगीं आणणें ही गोष्ट विशेष प्रशंसनीय नाहीं. फलाविषयीं निरपेक्ष राहून कर्म करणें याची थोरवी वर्णावी तितकी कमीच होणार आहे. अशाच तऱ्हेचा उच्च प्रकारचा बोध ' माकर्म फल हेतुर्भूः ' वगैरे शब्दांनीं श्री**कृष्ण** भगवानानें **अर्जुनास** केलेला जगद्विख्यातच आहे. तात्पर्य, तरुण मुलींनीं घरांतल्या त्रासानें मनाची समता बिघडूं न देतां त्या त्रासाचें कारण शक्य असेल तितक्या उपायानें नाहींसें करण्याची खटपट करावी व मनाचें नेहमीं संयमन करावें म्हणजे वर सांगितलेल्या महासाध्वींच्या यशाचें श्रेय त्यांनीं संपादिल्यासारखें होईल. घरांत तंटेबखेडे होतात, त्यांस मुख्य कारण स्वार्थबुद्धि असते. या नीच वृत्तीचा परिणाम फारसा होऊं दिला नाहीं म्हणजे बखेड्याचें फारसें कारण उरत नाहीं. स्वार्थबुद्धि कितीतरी घराण्यांच्या नाशास कारण झाली आहे ! आत्मसंयमनाची इष्ट सवय लावून घेण्याचा यत्न केला असतां या स्वार्थबुद्धीचा जोर नाहींसा करितां येण्यास फारसा उशीर लागणार नाहीं. ही सवय करून घेणें फारसें

अवघड आहे असें नाहीं. इतरांच्या सोयीकरितां आपणा सर्वांस आपल्या इच्छा, आपले दुराग्रह, आपलीं लहानसहान सुखें सहज एकीकडे ठेवितां येतील. **अबू** पहाडांतील आरोग्यकारक हवेंत बराचकालपावेतों वास्तव्य करून वृद्ध पिता **रावसुरशाम** याच्या सेवेंत सदासर्वकाळ तत्पर राहणाऱ्या व अखेरीस पित्याची इच्छा कशास न भितां परिपूर्ण करणाऱ्या **ताराबाई**प्रमाणें इहपरलोकीं धन्य म्हणवून घेणें सर्व मुलींना शक्य आहे. पराक्रमाची दिशा भिन्न असली तरी स्वकर्तव्यास पूर्णपणें जागण्याचें श्रेय एकाच प्रकारचें असतें. तसेंच तारांगणाचें निरीक्षण करण्यांत सदासर्वकाळ निमग्न असणारा जगद्विख्यात–**हर्शेल**–ज्योतिषी याला सर्व वेळ आपल्या आवडत्या विषयांत घालवावयास सांपडावा म्हणून त्याचीं लिहिण्याचीं व घरगुतीं कामें अविश्रांत श्रम करून नेटानें चालविणारी त्याची थोर भगिनी–**कारोलाइन**–इजप्रमाणें पुष्कळांना सुभगिनी बनतां येण्यासारखें आहे. बुद्धिमान व थोर मनाच्या पुष्कळ मुली त्रास पावून विपत्तींत पडतात; ह्याचें मुख्य कारण पाहूं गेलें असतां जीं लहानसहान कामें त्यांस करावीं लागतात, त्यांत होणारे परिश्रम मनाची स्थिरता व गंभीरता कायम राखून सहन करण्याची सवय त्या लावून घेत नाहींत हें होय. दुसरें कांहींएक नाहीं. त्यांनीं हें तत्व नेहमीं लक्षांत ठेवावें कीं, लहानसहान कामें चोख रीतीनें व चतुराईनें करण्याची योग्यता त्या कामाच्या मह-

त्यावर नसून तीं कामें ज्या बऱ्यावाईट रीतीनें केलीं जातील त्या रीतीवर त्यांचें महत्व अवलंबून आहे.

सारांश, आपल्या एकंदर आयुष्यांत आपण काय केलें असतां आपल्या पोक्त वयाचा काल सुखकर होईल? हा प्रश्न महत्त्वाचा असून विचार करण्यासारखा आहे. याचें उत्तर इतकेंच कीं, **परमेश्वरानें** जी स्थिति आपणांस दिली असेल त्या स्थितींतील आपापलें काम मन घालून व्यवस्थित रीतीनें व सदसद्विवेक बुद्धीस जागून करावें व सर्व हवाला **परमेश्वरा**वर ठेवावा, म्हणजे आपल्या वयांतील कोणताही काल मनाचें समाधान राखून घालविण्यास हरकत पडणार नाहीं. जरी कदाचित् एकाद्या स्त्रीला **पत्नी** व **माता** या नात्यानें कांहींच काम करावयाचें नाहीं अशी स्थिति असली, तरी **भगिनी**, **कन्या**, किंवा विद्वान **मित्र** या नात्यानें काम उत्तम प्रकारें बजाविण्यास त्यांस पुष्कळ अवसर सांपडेल. त्या कामाचें स्वरूप ओळखून व महत्व जाणून तें उत्तम रीतीनें बजावलें जाईल तर मनाला कमी समाधान होईल असें नाहीं. पुरुषाचा शहाणपणा जसजसा अधिक वाढत जाईल, तसतसा तो स्त्रीला अधिक मानास्पद समजत जाणार हें खचित. म्हणून त्या मानास आपण योग्य आहों असें आपल्याकृतीनें दाखविण्याचें काम आपलें आहे, व ही आपणावरची जबाबदारी आपण पूर्ण ओळखली पाहिजे, हें कुमारींनीं विसरतां कामा नये, याप्रकारें कर्तव्याची जबाबदारी जाणून तें यथायोग्य रीतीनें पार पाडिलें असतां या जगताच्या रंगभूमीवरील आपल्या भूमिकांचें

काम आटोपून यमराजानें सोडलेल्या पडद्याच्या आंत आपला प्रवेश फार शांतपणानें होईल यांत संशय नाहीं.

सरतेशेवटीं कुमारींनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, त्यांच्या वयाचा काल फार बहारीचा आहे. उत्साह, उल्हास, तरतरी, उमेद, ताकद, वगैरे मनास व शरीरास हुषारी देणाऱ्या गोष्टींचा मेळ असल्यामुळें हा काल फारच मजेचा असतो, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. हा काल जाऊन वृद्धापकालाचीं चिन्हें दिसूं लागतांच बहुतकरून पुष्कळ स्त्रियांस पुरुषांपेक्षां ज्यास्ती वाईट वाटूं लागतें हें साहजिकच आहे. आपली सर्व शोभा कायती आपल्या चांगलें दिसण्यावर आहे, असें मानण्याची मनाची तयारी आरंभापासूनच झाली असल्यामुळें शरीराच्या गोंडसपणाचा व त्यावरील तुकतुकीचा भाग वयपरत्वें कमी झाल्यावर एकाद्या स्त्रीच्या मनास वाईट वाटलें असतां त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. या प्रकारें त्यांच्या मनाला आलेली उद्विग्नता कांहींशी क्षम्यही आहे, म्हणून अशा समयीं हा मजेचा काल कांहीं ज्यास्ती वेळ टिकविण्याची थोडीशी खटपट त्यांच्यापैकीं कांहींकांकडून झाली असतां त्यांस हसणें रास्त होणार नाहीं. तारुण्य ही अशी कांहीं चीज आहे कीं, ती कोणासही कशाही प्रयत्नानें परत म्हणून मिळावयाची नाहीं; या अति महत्वाच्या अमोल काळाचा विचार मनांत आला असतां त्यास उतरती कळा लागतांच आपणा सर्वांस थोडा तरी खेद वाटल्यावांचून राहावयाचा नाहीं. शरीराचा उत्साह, अवयवांची तरतरी, स्नायूंची शक्ति,

नेत्रांचें पाणी, किंवा भिवयांचा छानदारपणा, सारांश, जी शरीराची स्थिति आपणास आल्हादजनक असते, इतकेंच नव्हे तर इतरांच्या दृष्टीसही रंजविणारी असते, त्या स्थितीला कमीपणा आल्याबद्दलच आपणास वाईट वाटतें इतकेंच नाहीं, तर मनाचेही पुष्कळ व्यापार कमी कमी होत जातात, म्हणूनही वाईट वाटतें–अंत:करणाचा तो आल्हाद, यौवनांतला तो आनंद, ती उमेद, ती हौस, कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टतेचा संपर्क न लागल्यामुळें कायम असणाऱ्या सदभिरुची, ते मनाचे तरंग व कल्पनाशक्ति, अहाहा ! ते दिवस कीं, ज्या प्रत्येक सुप्रभातीं कांहींना कांहीं तरी नवा आनंद झाल्यामुळें मन आनंदलहरींत गर्क असावें व सर्व दिवस मजेंत गेल्यावर सांयकाळीं, येणारा दुसरा दिवस कोणच्या प्रकारच्या सुखानंदांत घालवावयाचा याबद्दल नवीन बेत करणें, यांत गुंग असावें;–ते दिवस, कीं ज्यावेळीं सुवासिक पुष्पांच्या योगानें सुगंधित झालेल्या हवेंत घ्राणेंद्रियांस, उपवनांतील पक्षी समुदायाच्या मधुर आवाजानें श्रोत्रेंद्रियांस आणि अशा रमणीय सुस्थलास शोभविणाऱ्या रम्य देखाव्यानें नेत्रेंद्रियास जो अपूर्व सुखानुभव प्राप्त होत असे, तो अनुभव इतउत्तर कधींही भासमान व्हावयाचा नाहीं. ती कल्पना, तो फुलांचा घमघमाट, तो कर्णमधुर शब्द, व मनाला गुंग व तल्लीन करुन सोडणारें तें सृष्टिसौंदर्य वयपरत्वें क्षीणता पावत जाणाऱ्या इंद्रियांना आनंदविण्याचा संभव फारच कमी. त्यावेळीं सर्व

जग ह्मणजे केवळ आनंदस्थान, केवळ नंदनवन भासतें आणि जीवित इतकें दीर्घकाल टिकणारें भासतें कीं, तें कधींही संपावयाचें नाहीं. तसेंच तें इतकें सुखमयही वाटतें कीं तें संपावें अशी इच्छा आपल्या मनांत कधींही वास करावयाची नाहीं. तो काल असा असतो कीं त्यावेळीं मित्रांच्या मैत्रीवर निःशंक विश्वास, वडील माणसांनीं जगांतल्या लुच्चेगिरीच्या, खोटेपणाच्या, फसवणुकीच्या सांगितलेल्या गोष्टी केवळ मिथ्या वाटूं लागतात, इतका मनाचा साधेपणा असतो; ते दिवस परत कधींच यावयाचे नाहींत. कितीही बुद्धिमत्ता खर्चिली, कसेंही चातुर्य कामीं लावलें, तरी ते दिवस परत आणणें कोणासही साधावयाचें नाहीं. वर्षेंचीं वर्षें निघून जातात, तीं कधींच थांबत नाहींत; वार्धक्य जवळ जवळ येऊं लागतें, व शाहण्या वाडवडिलांनीं विचारपूर्वक ठरविलेलीं कांहीं मतें व कांहीं गोष्टी, ज्यांना आपण तारुण्यांत पोट धरधरून हांसत होतों, ज्यांची थट्टा उडवीत होतों, तीं मतें व त्या गोष्टी सरतेशेवटीं आपणास पुरतेपणीं अनुभवास आल्यावर रास्त व खऱ्या आहेत, असें वाटूं लागतें. तात्पर्य, पुढें येणारा वार्धक्याचा काल शांतरीतीनें व सुखकर होण्याचा उत्तम मार्ग एवढाच आहे कीं, जें कर्तव्य आपलें असेल त्यास सर्वदा जागून तें उत्तम रीतीनें करीत असावें. सारांश, **भर्तृहरीनें** म्हटल्याप्रमाणें जोंपर्यंत हें तनू स्वस्थ असून जरा जों दूर आहे, तोंपर्यंत शाहाण्या माणसानें साधण्यासारख्या गोष्टी साधून घ्याव्या. “ पूर्वे वयसि तत्कुर्याद्येन वृद्धः सुखं वसेत् ।

यावज्जीवेन तत्कुर्याद्येनामुत्र सुखं वसेत्" ॥ ही उक्ति सदासर्वकाळ चित्तांत वागवून वर्तन ठेविलें असतां ही संसारयात्रा सुखानें पार पडण्याचा बराच संभव आहे, इतकेंच नाहीं, तर पारलौकिक सुखाचाही आस्वाद मिळाल्यावाचून राहणार नाहीं.

मुंबई.–खेतवाडी ब्याकरोड घर नं. १-२ व ३ येथें 'तत्त्वविवेचक' छापखान्यांत रा. **भिवा हरी** यांनीं मालकाकरितां छापिलें.